
॥ श्री ॥

ज्योतिषसार

व

ज्योतिषरत्न.



१९

हें पुस्तक

बाळकृष्ण लक्ष्मण पाठक यांनीं

मुंबईंत

" जगदीश्वर " प्रेसमध्यें छापिलें.

आवृत्ति ६ वी.

किंमत १ रुपया.

अथ अनुक्रमणिका.

अनुक्रमणिका.

अनुक्रमणिका.

अनुक्रमणिका.

श्री वे. मु. संगमेश्वर शास्त्री

॥ श्री ॥

ज्योतिषसार व ज्योतिषरत्न.

शकप्रकरण.

संवत्सरनामपरिज्ञान.

॥ श्लोक ॥ शकेंद्रकालोऽर्कयुतःकार्यःशून्यरसैर्हृतः ॥
शेषाःसंवत्सराज्ञेयाःप्रभवाद्याबुधैःक्रमात् ॥ १ ॥

टीका—शालिवाहन शकांतील ज्या संवत्सराचें नांव पाहिजे तो शक मांडावा त्यांत १२ मिळवावे आणि ६० नीं भागावें; शेष राहील तें त्या संवत्सराचें नांव प्रभवादिक्रमानें जाणावें ॥ १ ॥

संवत्परिज्ञान.

सएवपंचाग्निकुभिर्युक्तः स्याद्विक्रमस्यहि ॥
रेवायाउत्तरेतीरेसंवन्नाम्नातिविश्रुतः ॥ २ ॥

टीका—जो शालिवाहनाचा शक त्यांत १३५ मिळवावे; ह्मणजे तो विक्रम संवत् होतो ॥ २ ॥

संवत्सरांचीं नांवें.

प्रभवोविभवःशुक्लःप्रमोदोऽथप्रजापतिः ॥ अंगिराःश्रीमुखो भावोयुवाधातातथैवच ॥ १ ॥ईश्वरोबहुधान्यश्चप्रमाथीविक्रमो वृषः ॥ चित्रभानुःसुभानुश्चतारणःपार्थिवोव्ययः ॥ २ ॥ सर्व जित्सर्वधारीचविरोधीविकृतिःखरः ॥ नंदनोविजयश्चैवजयोम न्मथदुर्मुखौ ॥ ३ ॥ हेमलंबोविलंबोचविकारीशार्वरीप्लवः ॥ शुभकृच्छोभनःक्रोधीविश्वावसुपराभवौ ॥ ४ ॥ प्लवंगःकीलकः सौम्यःसाधारणविरोधकृत् ॥ परिधावीप्रमादीचआनंदोरा क्षसोनलः ॥ ५ ॥ पिंगलःकालयुक्तश्चसिद्धार्थीरौद्रदुर्मती ॥ दुदुंभीरुधिरोद्गारीरक्ताक्षीक्रोधनक्षयः ॥ ६ ॥

टीका.

१	प्रभव.	१३	प्रमाथी.	२५	खर.	३७	शोभन.	४९	राक्षस.
२	विभव.	१४	विक्रम.	२६	नन्दन.	३८	क्रोधी.	५०	नल.
३	शुक्ल.	१५	वृष.	२७	विजय	३९	विश्वावसु.	५१	पिंगल.
४	प्रमोद.	१६	चित्रभानु.	२८	जय.	४०	पराभव.	५२	कालयुक्त.
५	प्रजाप.	१७	सुभानु.	२९	मन्मथ.	४१	प्लवंग.	५३	सिद्धार्थी.
६	अंगिरा.	१८	तारण.	३०	दुर्मुख.	४२	कीलक.	५४	रौद्र.
७	श्रीमुख.	१९	पार्थिव.	३१	हेमलंबी.	४३	सौम्य.	५५	दुर्मति.
८	भाव.	२०	व्यय.	३२	विलंबी.	४४	साधारण.	५६	दुंदुभी
९	युवा.	२१	सर्वजित्.	३३	विकारी.	४५	विरोधकृत्.	५७	रुधिरोद्गारी.
१०	धाता.	२२	सर्वधारी.	३४	शार्वरी.	४६	परिधावी.	५८	रक्ताक्षी.
११	ईश्वर.	२३	विरोधी.	३५	प्लव.	४७	प्रमादी.	५९	क्रोधन.
१२	बहुधान्य.	२४	विकृति	३६	शुभकृत्.	४८	आनंद.	६०	क्षय.

संवत्सरांचें फळ.

प्रभवाद्द्विगुणंकृत्वात्रिभिन्यूनचकारयेत् ॥ सप्तभिस्तुहरेद्भागंशेषं ज्ञेयंशुभाशुभम् ॥ १ ॥ एकंचत्वारिदुर्भिक्षंपंचद्वाभ्यांसुभिक्षकम् ॥ त्रिषष्ठेतुसमंज्ञेयंशून्यंपीडानसंशयः ॥ २ ॥

टीका—प्रभवादि संवत्सरापासून चालते संवत्सरापावेतों मोजावे आणि दुप्पट करावे; त्यांतून तीन काढावे; बाकी राहील तीस सातांनीं भागावें; शेष उरेल त्याचें शुभाशुभ फळ पहावें. तें असें कीं, १ अथवा ४ उरले तर महर्घता; ५ अथवा २ उरले तर सुभिक्षता; ३ अथवा ६ उरले तर धारण सम राहील आणि शून्य आलें तर जनांस पीडा जाणावी.

संवत्सरांचे स्वामी.

युगंभवेद्वत्सरपंचकेनयुगानिचद्वादशवर्षषष्ट्या ॥ भवंतितेषामधिदेवताश्चक्रमेणवक्ष्यामिमुनिप्रणीताः ॥ १ ॥ विष्णुर्जीवः शुक्रोदहनस्त्वष्टाअहिर्बुध्न्यःपितरः ॥ विश्वेदेवाश्चंद्रज्वलनौनासत्यनामानौचभगः ॥ २ ॥

टीका–पांच वर्षांचें एक युग याप्रमाणें साठ संवत्सरांचीं युगें १२ आणि त्यांचे स्वामी १२ ते विष्णु १, बृहस्पति २, शुक्र ३, अग्नि ४, ब्रह्मा ५, शिव ६, पितर ७, विश्वेदेव ८, चंद्र ९, अग्नि १०, अश्विनीकुमार ११ सूर्य १२.

भेद.

संवत्सरःप्रथमकःपरिवत्सरोऽन्यस्तस्मादिडान्विदितिपूर्वपदाद्ववेयुः ॥
एवंयुगेषुसकलेषुतदीयनाथावह्न्यर्कशीतगुविरिंचिशिवाःक्रमेण ॥ २॥

टीका–इष्टशकाला ५ नीं भागावें; शेष राहील तें संवत्सराचें नांव अनुक्रमें जाणावें. प्रथम संवत्सराचा स्वामी वह्नि १, द्वितीयपरिवत्सराचा स्वामी अर्क २, तृतीय इडावत्सराचा स्वामी चंद्र ३, चतुर्थ अनुवत्सराचा स्वामी ब्रह्मा ४, पंचम इद्वत्सराचा स्वामी शिव ५.

अन्यमतानें.

आनंदादिपतिर्ब्रह्माभावादिर्विष्णुरेवच ॥
जयादिःशंकरःप्रोक्तःसृष्टिपालननाशकाः ॥ १ ॥

टीका—आनंदादिक संवत्सर २० त्यांचा स्वामी ब्रह्मा तो सृष्टिकर्ता १; भावादिक संवत्सर २० त्यांचा स्वामी विष्णु तो पालनकर्ता २; जयादिक संवत्सर २० त्यांचा स्वामी रुद्र तो संहारकर्ता ३.

ऋतुप्रकरण (अयन).

शिशिरपूर्वमृतुत्रयमुत्तरंह्ययनमाहुरहश्चतदामरम् ॥
भवतिदक्षिणमन्यऋतुत्रयंनिगदितारजनीमरुतांहिसा ॥ १ ॥

टीका–शिशिर, वसंत, ग्रीष्म, ह्या तीन ऋतूंत उत्तरेस सूर्याची गति होते त्यास उत्तरायण ह्मणावें; तो देवांचा दिवस वर्षाऋतु, शरदृतु, हेमंतऋतु ह्या तीन ऋतूंत सूर्याची गति दक्षिणेस होते; त्यास दक्षिणायन ह्मणावें. ती देवांची रात्र होय ॥ १ ॥

अयनामध्यें शुभाशुभ कर्मे.

गृहप्रवेशत्रिदशप्रतिष्ठाविवाहचौलव्रतबंधदीक्षाः ॥
सौम्यायनेकर्मशुभंविधेयंयद्गर्हितंतत्खलुदक्षिणायने ॥ १ ॥

टीका–गृहप्रवेश, देवप्रतिष्ठा, विवाह, चौल, व्रतबंध, मंत्रग्रहणादिक हीं शुभकर्मे उदगयनांत करावीं. या कर्मांहून अन्य कर्मे तीं दक्षिणायनांत करावीं ॥ १ ॥

संक्रांतिपरत्वें ऋतु.

मृगादिराशिद्वयभानुभोगात्षडर्तवःस्युःशिशिरोवसंतः ॥
ग्रीष्मश्चवर्षाचशरच्चतद्वद्धेमन्तनामाकथितश्चषष्ठः ॥ १ ॥

टीका–मकरादि दोन दोन राशि सूर्यानें भोगिल्या ह्मणजे एक ऋतु होतो. या रीतीनें राशि १२ आणि ऋतु ६ वर्षांत भोगितात. यास उदाहरणः—

१ मकर २ कुंभ	शिशिरऋतु १	५ वृषभ ६ मिथुन	ग्रीष्मऋतु ३	९ कन्या १० तुला	शरदृतु ५
३ मीन ४ मेष	वसंतऋतु २	७ कर्क ८ सिंह	वर्षाऋतु ४	११ वृश्चिक १२ धन	हेमंतऋतु ६

मतांतर राशिपरत्वें.

मेषादितोद्विद्विभभानुभोगाद्वसंतपूर्वाऋतवःषडुक्ताः ॥ २ ॥

१ मेष २ वृषभ	वसंतऋतु	५ सिंह ६ कन्या	वर्षाऋतु	९ धन १० मकर	हेमंतऋतु
३ मिथुन ४ कर्क	ग्रीष्मऋतु	७ तूला ८ वृश्चिक	शरदृतु	११ कुंभ १२ मीन	शिशिरऋतु

मतांतर मासपरत्वें.

चैत्रादिद्विद्विमासाभ्यांवसंताद्यृतवश्चषट् ॥
दाक्षिणात्याःप्रगृह्णंतिदैवेपित्र्येचकर्मणि ॥ ३ ॥

१ चैत्र २ वैशाख	वसंतऋतु	५ श्रावण ६ भाद्रपद	वर्षाऋतु	९ मार्गशीर्ष १० पौष	हेमंतऋतु
३ ज्येष्ठ ४ आषाढ	ग्रीष्मऋतु	७ आश्विन ८ कार्तिक	शरदृतु	११ माघ १२ फाल्गुन	शिशिर.

मासप्रकरण (मासपरिज्ञान).

पूर्वराशिंपरित्यज्यउत्तरांद्यातिभास्करः ॥
सराशिःसंक्रमाख्यःस्यान्मासर्वयमहायने ॥ १ ॥

टीका—पूर्वराशीचा त्याग करून पुढील राशीस सूर्य जातो; तो मेषादि १२ संक्रांती, मास, ऋतु, वर्ष, अयन यांचे गणनेविषयीं कारण होतो.

दर्शावधिंमासमुशंतिचांद्रंसौरंतथाभास्कर राशिभोगात् ॥
त्रिंशद्दिनंसावनसंज्ञमार्यानाक्षत्रमिंदोर्भगणाश्रयाच्च ॥ १ ॥

टीका—चांद्रमास ह्मणजे शुक्लप्रतिपदेपासून अमावास्येपर्यंत होतो. सौरमास ह्मणजे सूर्याचा एक राशि भोग झाला त्यास ह्मणावें. सावन ह्मणजे तीस दिवसांचा मास जाणावा: नाक्षत्रमास ह्मणजे नक्षत्रांचें परिभ्रमण चंद्रानें केलें त्यास ह्मणतात.

मासांचीं नांवें, सूर्य व देवता.

मधुस्तथामाधवसंज्ञकश्च शुक्रःशुचिश्चाथनभोनभस्यः ॥ तथेष ऊर्जश्चसहोसहस्यस्तपस्तपस्यश्चयथाक्रमेण ॥ १ ॥ अरुणोमाघ मासेतुसूर्योवैफाल्गुनेतथा ॥ चैत्रमासेतुवेदांगोभानुर्वैशाखएवच ॥२॥ ज्येष्ठमासेतपेदिंद्रआषाढेतपतेरविः ॥ गभस्तिःश्रावणेमा सेयमोभाद्रपदेतथा ॥३॥ सुवर्णरेताश्वयुजिकार्तिकेचदिवाकरः ॥ मार्गशीर्षेतपेन्मित्रःपौषेविष्णुःसनातनः ॥ ४ ॥ इत्येतेद्वाद शादित्यामासनामान्यनुक्रमात् ॥ ५ ॥ केशवंमार्गशीर्षेतुपौषे नारायणंविदुः ॥ माधवंमाघमासेतुगोविंदमथफाल्गुने ॥ ६ ॥ चैत्रेविष्णुंतथाविद्याद्वैशाखेमधुसूदनम् ॥ त्रिविक्रमंतथा ज्येष्ठेआषाढेवामनंविदुः ॥७॥ श्रावणेश्रीधरंविद्याद्धृषीकेशंतुभा द्रके ॥ आश्विनेपद्मनाभंचऊर्जेदामोदरंविदुः ॥ ८ ॥ मार्गशी र्षेविशालाक्षीपौषेलक्ष्मीश्चदेवता ॥ माघेतुरुक्मिणीप्रोक्ताफा ल्गुनेधात्रिनामिका ॥ ९ ॥ चैत्रेमासिरमादेवीवैशाखेमोहिनी तथा ॥ पद्माक्षीज्येष्ठमासेतुआषाढेकमलेतिच ॥ १० ॥ कांतिमतीश्रावणेचभाद्रेतुह्यपराजिता ॥ पद्मावतीआश्विनेतु राधादेवीतुकार्तिके ॥ ११ ॥

टीका.

	मास	नांवें	सूर्य	देवता	देवि
१	चैत्र	मधु	वेदांग	विष्णु	रमा
२	वैशाख	माधव	भानु	मधुसूदन	मोहिनी
३	ज्येष्ठ	शुक्र	इंद्र	त्रिविक्रम	पद्माक्षी
४	आषाढ	शुचि	रवि	वामन	कमला
५	श्रावण	नभ	गभस्ति	श्रीधर	कांतिमती
६	भाद्रपद	नभस्य	यम	हृषीकेश	अपराजिता
७	आश्विन	इष	सुवर्णरेता	पद्मनाभ	पद्मावती
८	कार्तिक	ऊर्ज	दिवाकर	दामोदर	राधा
९	मार्गशीर्ष	सह	मित्र	केशव	विशालाक्षी
१०	पौष	सहस्य	विष्णु	नारायण	लक्ष्मी
११	माघ	तप	अरुण	माधव	रुक्मिणी
१२	फाल्गुन	तपस्य	सूर्य	गोविंद	धात्री

वारपरत्वें मासफळ.

पंचार्कवासरारोगाःपंचभौमामहद्भयम् ॥
पंचार्किवारादुर्भिक्षंशेषवाराःशुभप्रदाः ॥ १ ॥

टीका—एका महिन्यांत ५ रविवार आले तर रोग फार उत्पन्न होतील, तसेंच ५ भौमवार आले तर मोठें भय उत्पन्न होईल आणि ५ शनिवार आले तर दुर्भिक्ष होईल, शेष राहिले ते वार पांच आल्यास शुभप्रद जाणावे.

पक्ष.

पूर्वापरेमासदलेहिपक्षौपूर्वापरौतौसितनीलसंज्ञौ ॥
पूर्वस्तुदैवस्त्वपरश्चपैत्र्यःकेचिच्चकृष्णोऽसितपंचमीतः ॥ १ ॥
आदौशुक्लःप्रवक्तव्यः केचित्कृष्णोऽपिमासके ॥ २ ॥

टीका—शुक्लप्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत शुक्लपक्ष आणि कृष्णप्रतिपदेपासून अमांत कृष्णपक्ष. शुक्लपक्ष देवांचा, कृष्णपक्ष पितरांचा. भेद शुक्ल ५ मी पासून कृष्ण ५ पर्यंत शुक्लपक्ष. याच रीतीनें कृष्णपक्ष जाणावा. प्रथम शुक्लपक्ष नंतर कृष्णपक्ष तो अमांत मास होतो प्रथम कृष्ण नंतर शुक्ल पौर्णिमांत मास होतो. हे दोन्ही पक्ष देशपरत्वेंकरून चालू आहेत.

अधिकमास.

द्वात्रिंशद्भिर्गतैर्मासैर्दिनैः षोडशभिस्तथा ॥
घटिकानांचतुष्केणपतत्यधिकमासकः ॥ १ ॥

टीका—३२ महिने १६ दिवस आणि ४ घटिका इतके भोगल्यावर अधिक मासाचा संभव होतो.

क्षयमास.

असंक्रांतिमासोऽधिमासः स्फुटं स्याद्विसंक्रांतिमासः क्षयाख्यः कदाचित् ॥
क्षयः कार्तिकादित्रयेनान्यतः स्यात्तदावर्षमध्येऽधिमासद्वयंच ॥ १ ॥

टीका—ज्या महिन्यांत संक्रांत नाहीं तो अधिकमास आणि ज्या महिन्यांत दोन संक्रांति येतात तो क्षयमास. तो कार्तिकादि तीन मासांत येतो तेव्हां एका वर्षांत दोन अधिकमास येतात.

सिद्धांतशिरोमणौ.

गतोऽब्ध्यद्रिनंदैर्मितेशाककालेतिथीशैर्भविष्यत्यथांगाक्षसूर्यैः ॥
गजाद्र्यग्निभूमिस्तथाप्रायशोऽयंकुवेदेंदुवर्षैः क्वचिद्गोकुभिश्च ॥ १ ॥

टीका--पूर्वीं ज्या शकांत क्षयमास झाला असेल त्या शकापासून १४१ वर्षांचे अंतरानें क्षयमास येतो आणि एखादे समयीं १९ वर्षांनीं क्षयमास आंत किंवा बाहेर येतो. त्यास प्रत्यंतर ९७४ चे शकांत क्षयमास भुक्त जाहला आणि यापुढें क्षयमास येणें तो १११५, १२२६, १३७८, शकांत होईल आणि यापुढें १४१, १९ वर्षांचे अंतरानें क्षयमास येईल याप्रमाणें जाणावें.

तिथिप्रकरण (तिथींचें परिज्ञान).

मासभाच्चांद्रभंयावद्गणयेत्तावदेवतु ॥
यावंतिगणनाद्यानितावंत्यस्तिथयः क्रमात् ॥ १ ॥

टीका--चैत्रादि मास १२ ज्या मासाचें नांव त्याच नांवाचें नक्षत्र तें मासनक्षत्र जाणावें. जसें चित्रा, विशाखा, ज्येष्ठा, पूर्वाषाढा, श्रवण, पूर्वाभाद्रपदा, अश्विनी, कृत्तिका, मृग, पुष्य, मघा, पूर्वाफाल्गुनी, हीं चैत्रादि क्रमानें मासनक्षत्रें जाणावीं. त्या मासनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापावेतों मोजून जी संख्या येईल ती तीथ जाणावी; परंतु पौर्णिमांत मासापासून मोजावें म्हणजे गणित बरोबर येईल.

तिथिसंज्ञापरिज्ञान.

प्रतिपत्सिद्धिदाप्रोक्ताद्वितीयाकार्यसाधिनी ॥ तृतीयाऽऽरोग्य दात्रीचहानिदाचचतुर्थिका ॥ १ ॥ शुभातुपंचमीज्ञेयाषष्ठिका त्वशुभामता ॥ सप्तमीतुशुभाज्ञेयाअष्टमीव्याधिनाशिनी ॥२॥ मृत्युदात्रीतुनवमीद्रव्यदादशमीतथा ॥ एकादशीतुशुभदाद्वाद शीसर्वसिद्धिदा ॥ ३ ॥ त्रयोदशीसर्वसिद्धाज्ञेयाचोग्राचतुर्द शी ॥ पुष्टिदापौर्णिमाज्ञेयात्वमावास्याऽशुभातिथिः ॥ ४ ॥

स्वामी.

वह्निर्विरिंचोगिरिजागणेशःफणीविशाखोदिनकृन्महेशः ॥
दुर्गांतकोविष्णुहरीस्मरश्चशर्वःशशीचेतिपुराणदृष्टाः ॥
अमायाःपितरःप्रोक्तास्थितीनामधिपाःक्रमात् ॥ ५ ॥

संज्ञा.

नंदाचभद्राचजयाचरिक्तापूर्णेतिसर्वास्तिथयःक्रमात्स्युः ॥
कनिष्ठमध्येष्टफलाश्चशुक्लेकृष्णेभवंत्युत्तममध्यहीनाः ॥ ६ ॥

पालन.

कूष्मांडंबृहतीफलानिलवणंवर्ज्यंतिलाम्लंतथातैलंचामलकंदि वंप्रवसताशीर्षंकपालांत्रकम् ॥ निष्पावांश्चमसूरिकाफलमथो वृन्ताकसंज्ञंमधुद्यूतंस्त्रीगमनंक्रमात्प्रतिपदादिष्वेवमाषोडश ॥ ७ ॥

नंदादितिथींवर करण्याचीं कार्यें.

नंदासुचित्रोत्सववास्तुतंत्रक्षेत्रादिकुर्वीततथैवनृत्यम् ॥ विवाह भूषाशकटाध्वयानेभद्रासुकार्याण्यपिपौष्टिकानि ॥ १ ॥ जया सु संग्रामबलोपयोगिकार्याणिसिद्ध्यंत्यपिनिर्मितानि ॥ रिक्ता सुविद्वद्वधघातसिद्धिर्विषादिशस्त्रादिचयातिसिद्धिम् ॥ २ ॥ पूर्णासुमांगल्यविवाहयात्रासपौष्टिकंशांतिककर्मकार्यम् ॥ सदै वदर्शेपितृकर्मचोक्तंनान्यद्विदध्याच्छुभमंगलादि ॥ ३ ॥

टीका—नंदा ह्मणजे प्रतिपदा, षष्ठी, एकादशी या तिथींचे ठायीं आनंदादि कृत्यें देवादिकांचे उत्साह, गृहसंबंधीं कामें, नवीन शेत करणें, घेणें, नृत्यसंबंधीं गीत, वाद्य

इत्यादि कृत्यें करावीं ॥ १ ॥ भद्रा ह्मणजे द्वितीया, सप्तमी द्वादशी, या तिथींचे ठायीं विवाह, दागिने, गाडी-रथसंबंधीं कार्यें, मार्ग नीट करणें, प्रयाण, पुष्टिक्रिया इत्यादि कृत्यें करावीं ॥ २ ॥ जया म्हणजे ३, ८, १३ या तिथींचे ठायीं युद्ध करण्यास सिद्ध जें सैन्य त्याचे उपयोगीं तलवार, ध्वजा, इत्यादि कार्यें केलीं असतां सिद्ध होतात ॥३॥ रिक्ता म्हणजे ४, ९, १४, या तिथींचे ठायीं विद्वानांचा नाश आणि घातकर्मांची सिद्धी, विषप्रयोग, शस्त्रप्रयोग इत्यादि कृत्यें करावीं ॥ ४ ॥ पूर्णा म्हणजे ५, १०, १५, या तिथींचे ठायीं विवाहादि शुभकृत्यें, महायात्रा, शांतिक, पौष्टिक, इत्यादि कार्यें करावीं ॥ ५ ॥ अमावास्येस पितृकार्यें मात्र करावीं.

तिथींचें	फळ	स्वामी	संज्ञा			तिथिपालन करणें तें
तिथी	फळ		नांव	शुक्ल	कृष्ण	
प्रतिपदा	सिद्धि	अग्नि	नंदा	अशुभ	शुभ	कोहळा
द्वितीया	कार्यसाधन	ब्रह्मा	भद्रा	अशुभ	शुभ	डोरली
तृतीया	आरोग्य	गौरि	जया	अशुभ	शुभ	लवण
चतुर्थी	हानि	गणेश	रिक्ता	अशुभ	शुभ	तीळ
पंचमी	शुभा	सर्प	पूर्णा	अशुभ	शुभ	आंबट
षष्ठी	अशुभा	स्कंद	नंदा	मध्यम	मध्यम	तैल
सप्तमी	शुभा	सूर्य	भद्रा	मध्यम	मध्यम	आंवळा
अष्टमी	व्याधिनाश	शिव	जया	मध्यम	मध्यम	नारळ
नवमी	मृत्यु	दुर्गा	रिक्ता	मध्यम	मध्यम	भोपळा
दशमी	धनदा	यम	पूर्णा	मध्यम	मध्यम	पडवळ
एकादशी	शुभा	विश्वेदेव	नंदा	शुभ	अशुभ	पावटे
द्वादशी	सर्वसिद्धि	हरि	भद्रा	शुभ	अशुभ	मसुरा
त्रयोदशी	सर्वसिद्धि	मदन	जया	शुभ	अशुभ	वांगें
चतुर्दशी	उग्रा	शिव	रिक्ता	शुभ	अशुभ	मधु
पौर्णिमा	पुष्टिदा	चन्द्र	पूर्णा	शुभ	०	द्यूत
अमावास्या	अशुभा	पितर	०	०	अशुभ	स्त्रीसंग

अष्टदिशांचे स्वामी.

रविःशुक्रोमहीसूनुःस्वर्भानुर्भानुजोविधुः ॥
बुधोबृहस्पतिश्चैवदिशामीशास्तथाग्रहाः ॥ १ ॥

टीका---पूर्वेचा स्वामी रवि १, आग्नेयीचा स्वामी शुक्र २, दक्षिणेचा स्वामी, मंगळ

३, नैर्ऋत्येचा राहु ४, पश्चिमेचा शनि ५, वायव्येचा चंद्र ६, उत्तरेचा बुध ७, ईशान्येचा गुरु ८, हे दिशांचे स्वामी व ग्रह जाणावे.

ग्रहांचे वर्ण (जाती)

ब्राह्मणौजीवशुक्रौचक्षत्रियौभौमभास्करौ ॥
सोमसौम्यौविशौप्रोक्तौराहुमंदौतथांत्यजौ ॥ १ ॥

टीका–गुरु, शुक्र हे ब्राह्मण; मंगळ, रवि हे क्षत्रिय; बुध, चंद्र हे वैश्य; राहु, केतु आणि शनि हे शूद्र होत.

ग्रहांचे वर्ण.

रक्तावंगारकादित्यौश्वेतौशुक्रनिशाकरौ ॥
गुरुसौम्यौपीतवर्णौशनिराहूसितौशुभौ ॥ १ ॥

टीका—मंगळ, सूर्य यांचा वर्ण तांबडा; शुक्र, चंद्र यांचा वर्ण पांढरा; गुरु, बुध यांचा वर्ण पीत; आणि शनि, राहु, केतु, यांचा वर्ण काळा आहे.

वारांवर कर्में करावयाचीं तीं.

रविवार.

राज्याभिषेकोत्सवयानसेवागोवह्निमंत्रौषधशस्त्रकर्म ॥
सुवर्णताम्रौर्णिकचर्मकाष्ठसंग्रामपण्यादिरवौविदध्यात् ॥ १ ॥

टीका—रविवारीं–राज्यभिषेक, गीत, वाद्य, पालखींत बसणें, राजसेवा, गाय, बैल इत्यादि आणणें व देणें, हवन–यज्ञादि, मंत्र–उपदेश देणें व घेणें, औषध देणें व घेणें. शस्त्रें, सोनें व तांबें, शाली इत्यादि वस्त्रें काष्ठें, युद्धप्रसंग, वाणीपणा हीं कृत्यें करावीं.

सोमवार.

शंखाब्जमुक्तारजतेक्षुभोज्यस्त्रीवृक्षकक्ष्यांबुविभूषणाद्याः ॥
गीतंक्रतुक्षीरविकारशृंगीपुष्पांबरारंभणमिंदुवारे ॥ २ ॥

टीका—सोमवारीं–शंख, कमळें, मोतीं, रुपें, ऊंस, भोजन, स्त्रीभोग, झाडें, गवत, उदक, अलंकार, गायन, यज्ञादि, गोरस, गाई, म्हशी, पुष्पें, वस्त्रें, इत्यादिकांसंबंधीं कार्यें करावीं ॥ २ ॥

भौमवार.

भेदानृतस्तेयविषाग्निशस्त्रवध्याभिघाताहवशाठ्यदंभान् ॥
सेनानिवेशाकरधातुहेमप्रवालरक्तानिकुजेविदध्यात् ॥ ३ ॥

टीका—भौमवारीं—भेद करणें, अनृत, चोरी, विष, अग्नि, शस्त्रें, वध, नाश, संग्राम कपट, दंभ सैन्य ठेवणें, खाणी, धातु, सुवर्ण, प्रवाल, रक्तस्राव हीं कृत्यें करावीं.

बुधवार.

नैपुण्यपुण्याध्ययनंकलाश्चशिल्पादिसेवालिपिलेखनानि ॥
धातुक्रियाकांचनयुक्तिसंधिव्यायामवादाश्चबुधेविधेयाः ॥ ४ ॥

टीका—बुधवारीं—चातुर्य, पुण्य, अध्ययन, कला, शिल्पशास्त्र, सेवा, लिहिणें, चित्रें काढणें, धातुक्रिया, सुवर्ण, युक्ति, सख्यत्व, जाणें, येणें, वाद करणें हीं कृत्यें करावीं.

गुरुवार.

धर्मक्रियापौष्टिकयज्ञविद्यामांगल्यहेमांबरवेश्मयात्राः ॥
रथाश्वभैषज्यविभूषणादिकार्यंविदध्यात्सुरमंत्रिवारे ॥ ५ ॥

टीका—गुरुवारीं—धर्म करणें, नवग्रहादि पूजा, यज्ञ, विद्याभ्यास, सौभाग्य, वस्त्रें, गृहकृत्यें, यात्रा, रथ, अश्व, औषधें व दागिने हीं कृत्यें करावीं.

शुक्रवार.

स्त्रीगीतशय्यामणिरत्नगंधवस्त्रोत्सवालंकरणादिकर्म ॥
भूपण्यगोकोशकृषिक्रियाश्चसिद्ध्यंतिशुक्रस्यदिनेसमस्ताः ॥ ६ ॥

टीका—शुक्रवारीं—स्त्रीगायन, शय्या, मणि, रत्नें, हिरे, गंध, वस्त्रें, उत्साह, अलंकार भूमि, वाणिज्य, गाई, द्रव्य, भांडार, शेतें करणें, इत्यादि कृत्यें करावीं.

शनिवार.

लोहाश्मसीसत्रपुशस्त्रदासपापानृतस्तेयविषासवाद्यम् ॥
गृहप्रवेशद्विपबंधदीक्षास्थिरंचकर्मार्कसुतेहिकुर्यात् ॥ ७ ॥

टीका—शनिवारीं—लोखंड, तिखें, शिसें, कथिल, तलवार, दास, पाप, अनृतभाषण, चोरी, विष, अर्क काढणें, गृहप्रवेश, हत्ती बांधणें, उपदेशादि हीं स्थिर कृत्यें करावीं.

वारकोष्टकें.

॥ देवता ॥ ॥ सूर्यादितःशिवशिवागुहविष्णुकेंद्राकालाःक्रमेणपतयःकथिताग्रहाणाम् ॥ वह्न्यंबुभूमिहरिशक्रशचीविरिंचिस्तेषांपुनर्मुनिवरैरधिदेवताश्च ॥ १ ॥ ॥ विचारकरण्यासकालपरिमाण ॥ ॥ पतंगसूनोर्दिवसाधिपत्यंनिशाप्यहश्चैवतुतिग्मभानोः ॥ रात्रिद्वयंचैकदिनंचसोमेशेषग्रहाणामुदयप्रवृत्तिः ॥ २ ॥ ॥ दोषादोष ॥ ॥ नवारदोषःप्रभवंतिरात्रौदेवेज्यदैत्येज्यदिवाकराणाम् ॥ दिवाशशांकार्कजभूसुतानांसर्वत्रनिंद्योबुधवारदोषः ॥ ३ ॥ कृत्यें ॥ ॥ सोमसौम्यगुरुशुक्रवासराःसर्वकर्मसुभवंतिसिद्धिदाः ॥ भानुभौमशनिवासरेषुचप्रोक्तमेवखलुकर्मसिद्ध्यति ॥ ४ ॥ तैलाभ्यंगास शुभाशुभ ॥ ॥ रविस्तापंकांतिंवितरतिशशीभूमितनयो मृतिंलक्ष्मींसौम्यःसुरपतिगुरुर्वित्तहरणम् ॥ विपत्तिंदैत्यानांगुरुरखिलभोगानुगमनं नृणांतैलाभ्यंगात्सपदिकुरुतेसूर्यतनयः ॥ ५ ॥ वस्त्रपरिधान ॥ ॥ जीर्णरवौसततमंबुभिरार्द्रमिंदौभौमेशुचेबुधदिनेचभवेद्धनाय ॥ ज्ञानायमंत्रिणिभृगौप्रियसंगमायमंदेमलायचनवांबरधारणंस्यात् ॥ ६ ॥ ॥ श्मश्रुकर्म ॥ ॥ भानुर्मासंक्षपयतितथासप्तमार्तंडसूनुर्भौमश्चाष्टौवितरतिशुभंबोधनःपंचमासान् ॥ सप्तैवेंदुर्दशसुरगुरुःशुक्रएकादशेतिप्राहुर्गर्गप्रभृतिमुनयःक्षौरकार्येषुचायुः ॥ ७ ॥ ॥ विद्यारंभ ॥ ॥ विद्यारंभःसुरगुरुसितज्ञेष्वभीष्टार्थदायी ॥ कर्तुश्चायुश्चिरमपिकरोत्यंशुमान्मध्यमोऽत्र ॥ नीहारांशौभवतिजडतापंचताभूमिपुत्रेछायासूनावपिचमुनयःकीर्तयंत्येवमाद्याः ॥८॥

टीका—वारांचे कोष्टकाचीं घरें केलीं त्यांचीं नांवें संकलित लिहिलीं तीं अशीं:—प्रथम वारांचीं नांवें १, वारस्वामी म्हणजे पति २, देवता ३, विचार करण्यास कालपरिमाण ४, दोषादोष ५, उक्तानुक्त कृत्यें ६, तैलाभ्यंग केल्यास शुभाशुभ ७, नवें वस्त्रपरिधान ८, श्मश्रु केल्यास शुभाशुभ ९, विद्यारंभास शुभाशुभ १०, याप्रमाणें नांवें जाणावीं.

वारांचीं नांवें	रवि	सोम	भौम	बुध	गुरु.	शुक्र	शनि
वाराचे पति	शिव	पार्वती	स्कंद	विष्णु	रुद्र	ब्रह्मा	इंन्द्र
देवता	आग्नि	उदक	भूमि	हरि	इन्द्र	इन्द्राणी	ब्रह्मा
विचार करण्यास काल	८ प्रहर	२ रात्री ४ प्रहर	८ प्रहर	८ प्रहर	८ प्रहर	८ प्रहर	४ प्रहर
दोषादोष	रात्रिदोष	दिनदोष	दिनदोष	रा. दिनदोष	रात्रिदोष	रात्रिदोष	दिनदोष
कृत्यें	उक्तकर्म	सर्वकर्मसि.	उक्तकर्म	कर्मसिद्धि	कर्मसिद्धि	कर्मसिद्धि	उ. क. सि.
तैलाभ्यंग	ज्वरप्रद	कांतिप्रद	मृत्युप्रद	लक्ष्मीप्रद	वित्तनाश	विपत्तीप्रद	सम्पत्तिप्रद
वस्त्रपरिधान	जीर्ण होतें.	ओलें राही	शोकप्राप्ति	धनप्राप्ति	ज्ञानप्राप्ति	इष्टसन्मान	मळकट
श्मश्रुकर्म	१ महिमा आयुष्यना.	७ म. आ. वृद्धि	८ म. आ. नाश	५ म. आ. वृद्धि	१० म. आ. वृद्धि	११ म. आ. वृद्धि	७ म. आ. नाश
विद्यारम्भ	मध्यम	जडत्व	मृत्यु	या तीन वारांस आयुष्याभिवृद्धि व अभीष्टार्थ सिद्धि जाणावी			मृत्यु

नक्षत्रें (नक्षत्रपरिज्ञान).

द्विनिघ्नमासस्तिथियुग्विधूनोभशेषितःस्यादुडुशेषसंख्या ॥

टीका—चैत्रादि गतमास चालते मासासहित दुप्पट करावे आणि त्यांत गततिथी चालतेदिवसासुद्धां मिळवाव्या आणि एकत्र करून त्यांत एक वजा करावा. शेष राहील त्यास सत्ताविसांनीं भागून शेष राहील तें नक्षत्र जाणावें.

नक्षत्रसंज्ञापरिज्ञान.

शुभाशुभनक्षत्रें ॥ ॥ अश्विनीतुशुभाप्रोक्ताभरणीनाशकारिणी ॥ कार्यघ्नीकृत्तिकाचोक्तारोहिणीसिद्धिदाबुधैः ॥ १ ॥ मृगःशुभस्ततश्चा र्द्रामध्यमस्तुपुनर्वसुः ॥ पुष्यःशुभःसार्पमघापूर्वाःशुकूनाशमृत्युदाः ॥ ॥ २ ॥ उत्तराहस्तचित्रास्तुविद्यालक्ष्मीशुभप्रदाः ॥ स्वातीविशाखेत्व शुभेमैत्रंसर्वार्थसिद्धिदम् ॥ ३ ॥ ज्येष्ठामूलंक्रमात्तोयंक्षयनाशार्थहानि दम् ॥ विश्वब्रह्माविष्णवश्वबुद्धिवृद्धिसुखप्रदाः ॥ ४ ॥ वासवंवारुणंशै वंशुभंभद्रंमृतिप्रदम् ॥ उत्तराभाद्रकंश्रीदंरेवतीकामदायिका ॥ ५ ॥ नक्ष त्रांचेस्वामी ॥ ॥ नासादस्रयमाग्निकेतुगिरिशाःप्रोक्ताअदित्यंगिराः

सर्पाः कव्यभुजोभगोऽर्यमरवीत्वष्ट्राह्वयोमारुताः ॥ इंद्राग्नीत्वथमित्रइंद्रनिर्ऋतिर्नीरंचविश्वेविधिर्वैकुंठोवसुपाश्यजैकचरणाहिर्बुध्न्यपूषाभिधाः ॥१॥ ॥ अधोमुखनक्षत्रें ॥ ॥ मूलाग्नेयमघाद्विदैवभरणीसार्पाणिपूर्वात्रयंज्योतिर्विद्भिरधोमुखंहिनवकंभानामिदंकीर्तितम् ॥ २ ॥ तिर्यङ्मुख नक्षत्रें ॥ ॥ ज्येष्ठादित्यकराश्विनीमृगशिरःपौषानुराधानिलत्वष्टाख्यानिवदंतिभानिमुनयस्तिर्यङ्मुखान्येषुतु ॥ ३ ॥ ऊर्ध्वमुखनक्षत्रें ॥ पुष्यार्द्राश्रवणोत्तराशतभिषग्ब्राह्मश्रविष्ठाह्वयान्यूर्ध्वास्यानिनवोदितानि मुनिभिर्धिष्ण्यान्यथैतेषुतु ॥ ४ ॥ ध्रुव किंवा स्थिर नक्षत्रें ॥ रोहिणोसहितमुत्तरात्रयंकीर्तयंतिमुनयोध्रुवाह्वयम् ॥ मृदुनक्षत्रें ॥ त्वाष्ट्रमित्रशशिपूषदैवतान्यामनंतिमुनयोमृदून्यथ ॥ ५ ॥ लघुनक्षत्रें ॥ ॥ अश्विनीगुरुभमर्कदैवतंसाभिजिल्लघुचतुष्टयंमतम् ॥ तीक्ष्णनक्षत्रें ॥ मूलशक्रशिवसार्पदैवतान्युल्लपंत्यथचतीक्ष्णसंज्ञया ॥ ६ ॥ चरनक्षत्रें ॥ ॥ वैष्णवत्रययुतःपुनर्वसुर्मारुतंचचरपंचकंत्विदम् ॥ उग्रनक्षत्रें ॥ ॥ पूर्विकात्रितयमांतिकंमघेत्युग्रपंचकमिदंजगुर्बुधाः ॥ ७ ॥ मिश्रनक्षत्रें ॥ ॥ हव्यवाहभयुतंद्विदैवतंमिश्रसंज्ञमथमिश्रकर्मसु ॥ ॥ चरादिनक्षत्रें ॥ ॥ चरंचलंक्रूरमुशंतिचोग्रंध्रुवंस्थिरंदारुणभंचतीक्ष्णम् ॥ ८ ॥ क्षिप्रंलघुत्वंमृदुमैत्रसंज्ञंसाधारणंमिश्रमितिब्रुवंति ॥ ९ ॥ ॥ अंधादिनक्षत्रसंज्ञा ॥ अंधकंतदनुमंदलोचनंमध्यलोचनमतःसुलोचनम् ॥ रोहिणीप्रभृतिभंचतुष्टयंसाभिजिच्चगणयेत्पुनःपुनः ॥ १० ॥ ॥ नक्षत्रांच्या आकृती ॥ ॥ तुरगमुखसदृक्षंयोनिरूपंक्षुराभंशकटसमथथैणस्योत्तमांगेनतुल्यम् ॥ मणिगृहशरचक्रंभातिशालोपमंभंशयनसदृशमन्यच्चात्रपर्यंकरूपम् ॥ १ ॥ हस्ताकारमतश्चमौक्तिकसमंचान्यत्प्रवालोपमंधिष्ण्यंतोरणवत्स्थितंबलिनिभंसत्कुंडलाभंपरम् ॥ ॥ क्रुद्धचत्केसरिविक्र

मेणसदृशंशय्यासमानंपरंचान्यद्दंतिविलासवत्स्थितमतः क्रोष्ट्रासमंव्यक्तिमत् ॥ २ ॥ त्रिविक्रमाभंचमृदंगरूपंवृत्तंततोऽन्यद्यमलद्वयाभम् ॥ पर्यंकरूपंमुरजानुकारीइत्येवमश्व्यादिवचक्ररूपम् ॥ ३ ॥ नक्षत्रांच्या ताऱ्यांची संख्या ॥ ॥ वह्नित्रिऋत्विषुगुणेंदुकृताग्निभूतबाणाश्विनेत्रशरभूकुयुगाब्धिरामाः ॥ रुद्राब्धिरामगुणवेदशतद्वियुग्मदंताबुधैर्निगदिताःक्रमशोभताराः ॥ १ ॥

संख्या	नक्षत्रांचीं नांवें	शुभाशुभ संज्ञा	स्वामींचीं नांवें	मुखसंज्ञा	रूपसंज्ञा नावें	नावें	लोचन संज्ञा	स्वरूपाच्या आकृती	ताऱ्यांची संख्या
१	आश्विनी	शुभ	अश्विनी	तिर्यङ्मुख	लघु	क्षिप्र	मंदलोचल	अश्वमुख	३
२	भरणी	नाशक	यम	अधोमुख	उग्र	क्रूर	मध्यलोचन	योनिरूप	३
३	कृत्तिका	कार्यनाश	अग्नि	अधोमुख	मिश्र	साधा.	सुलोचन	वह्नयास०	६
४	रोहिणी	सिद्ध	ब्रह्मा	ऊर्ध्वमुख	ध्रुव	स्थिर	अंधलोचन	शंकटास.	५
५	मृग	शुभ	चन्द्र	तिर्यङ्मुख	मृदु	मैत्र	मंदलोचन	मृगास०	३
६	आर्द्रा	शुभ	शिव	ऊर्ध्वमुख	तीक्ष्णं	दारुण	मध्यलोचन	मणिसम	१
७	पुनर्वसु	मध्यम	देवमाता	तिर्यङ्मुख	चर	चल	सुलोचन	गृहसम	४
८	पुष्य	शुभ	गुरु	ऊर्ध्वमुख	लघु	क्षिप्र	अंधलोचन	शरासम	३
९	आश्लेषा	शोक	सर्प	अधोमुख	तीक्ष्ण	दारुण	मंदलोचन	चक्रासम	५
१०	मघा	नाशक	पितर	अधोमुख	उग्र	क्रूर	मध्यलोचन	शाळासम	५
११	पूर्वाफा.	मृत्युप्रद	भग	अधोमुख	उग्र	क्रूर	सुलोचन	शय्यासम	२
१२	उत्तराफा.	विद्या	अर्यमा	ऊर्ध्वमुख	ध्रुव	स्थिर	अंधलोचन	पर्यंकास	२
१३	हस्त	लक्ष्मी	रवि	तिर्यङ्मुख	लघु	क्षिप्र	मंदलोचन	हस्तसम	५
१४	चित्रा	शुभदा	ब्रह्मा	तिर्यङ्मुख	मृदु	मैत्र	मध्यलोचन	मौक्तिकस.	१
१५	स्वाती	अशुभदा.	वायु	तिर्यङ्मुख	चर	चल	सुलोचन	तोरणसम	१
१६	विशाखा	अशुभदा.	इंद्राग्नी	अधोमुख	मिश्र	साधा.	अंधलोचन	पोंवळ्यास.	४
१७	अनुराधा	सर्वसिद्धी	मित्र	तिर्यङ्मुख	मृदु	मैत्र	मंदलोचन	बळिसम	४
१८	ज्येष्ठा	क्षयनाश	इंद्र	तिर्यङ्मुख	तीक्ष्ण	दारुण	मध्यलोचन	कुंडलसम	३
१९	मूळ	हानिप्रद	राक्षस	अधोमुख	तीक्ष्ण	दारुण	सुलोचन	वांद्रास.	११
२०	पूर्वाषाढा	हानि	उदक	अधोमुख	उग्र	क्रूर	अंधलोचन	शय्यास.	४
२१	उत्तराषाढा	वृद्धिदाय.	विश्वेदेव	अधोमुख	ध्रुव	स्थिर	मंदलोचन	हस्तिसम	३
२२	अभिजित्	वृद्धिदाय.	ब्रह्मा	०	लघु	स्थिर	मध्यलोचन	कोल्ह्यास.	०
२३	श्रवण	सुखदाय.	विष्णु	ऊर्ध्वमुख	चर	चल	सुलोचन	व्यक्ताकार.	३
२४	धनिष्ठा	शुभदाय.	वसु	ऊर्ध्वमुख	चर	चल	अंधलोचन	वामनासम	४
२५	शततारका	कल्याण	वरुण	ऊर्ध्वमुख	चर	चल	मंदलोचन	मृदंगाकार	१००
२६	पूर्वाभाद्रप.	मृत्युदाय.	अजैकपाद	अधोमुख	उग्र	क्रूर	मध्यलोचन	वर्तुलाकार	२
२७	उत्तराभा.प.	लक्ष्मी	अहिर्बुं०	ऊर्ध्वमुख	ध्रुव	स्थिर	सुलोचन	यमलाकार	२
२८	रेवती	कामदाय.	सूर्य	तिर्यङ्मुख	मृदु	मैत्र	अंधलोचन	पर्यंकासम	३२

कार्याकार्यविचार (अधोमुखनक्षत्रांवर कार्ये.)

वापीकूपतडागगर्तपरिखाखातानिनिध्युद्धृति ॥
क्षेपौद्यूतबिलप्रवेशगणितारंभाःप्रसिद्ध्यंतिच ॥ १ ॥

टीका—अधोमुखनक्षत्रें ह्मणजे (मूळ, कृत्तिका, मघा, विशाखा, भरणी, आश्लेषा, पूर्वाफाल्गुनी, पूर्वाषाढा, पूर्वाभाद्रपदा.) या नक्षत्रांवर विहीर, कुवा, तलाव, खंदक, चर, डबकण, द्रव्य काढणें व पुरणें, द्यूत, बिळांत प्रवेश करणें, गणितारंभ हीं कर्में करावीं.

तिर्यङ्मुखनक्षत्रांवर कार्ये.

अश्वेभोष्ट्रलुलायशासभवृषोरभ्राादिदांत्यश्वनौगंत्रीयंत्रहलप्रवास
गमनारंभाःप्रसिद्ध्यंतिच ॥ २ ॥

टीका--तिर्यङ्मुख ह्मणजे (ज्येष्ठा, पुनर्वसु, हस्त, अश्विनी, रेवती, मृग, अनुराधा, स्वाती, चित्रा) या नक्षत्रांवर अश्व, हत्ती, उंट, टोणगा, गाढव, बैल, मेंढा, डुकर, कुत्रें हीं घेणें; नांव पाण्यांत घालणें; गंत्री, यंत्री, नांगर धरणें, प्रवासगमन हीं कर्में करावीं.

प्रासादध्वजघर्मवारणगृहप्राकारसत्तोरणोच्छ्रायारामविधिर्हि
तोनपरतेःपट्टाभिषेकादिच ॥ ३ ॥

टीका--ऊर्ध्वमुख ह्मणजे (पुष्य, आर्द्रा, श्रवण, उत्तराफाल्गुनी, उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा, शततारका, रोहिणी, धनिष्ठा) या नक्षत्रांवर देवालयें, ध्वजा, मंडप, घरें, कोट, भिंती, तोरणें, चांद्वा, बाग लावणें व राज्याभिषेक, हीं कृत्यें करावीं.

ध्रुवनक्षत्रांवर कार्यें.

बीजहर्म्यनगराभिषेचनारामशांतिषुहितंस्थिरेषुच ॥

टीका--ध्रुवनक्षत्रें ह्मणजे (रोहिणी, उत्तराफाल्गुनी, उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा) या नक्षत्रांवर बीज पेरणें, नगरांत प्रवेश राज्याभिषेक, बागाईत, शांतिकर्म इत्यादि कार्यें हितकारक जाणावीं.

मृदुनक्षत्रांवर कार्यें.

मित्रकार्यरतिभूषणांबरोद्गीतिमंगलविधानमेषुतु ॥

टीका--मृदु ह्मणजे (मृग, चित्रा, अनुराधा, रेवती) या नक्षत्रांवर मित्रकार्यें स्त्रीसंग, भूषणधारण, वस्त्रें, गायन इत्यादि नानाप्रकारचीं मंगलकार्यें करावीं.

लघुनक्षत्रांवर कार्यें.

पण्यभूषणकलारतौषधज्ञानशिल्पगमनेषुसिद्धिदम् ॥

टीका—लघु म्हणजे (अश्विनी, पुष्य, हस्त अभिजित्) या नक्षत्रांवर वाणीपणा भूषणें धारण करणें, कलाकुशलता, क्रीडा करणें, औषध घेणें, ज्ञान, विद्या, सुतारपणा, प्रस्थान करणें हीं कृत्यें करावीं; शुभदायक होतील.

तीक्ष्णनक्षत्रांवर कार्यें.

भूतयक्षनिधिमंत्रसाधनंभेदबंधवधकर्मचात्रतु ॥

टीका—तीक्ष्ण म्हणजे (आर्द्रा, आश्लेषा, ज्येष्ठा, मूळ) या नक्षत्रांवर भूतयक्षादिक, यांची पीडा निवारण, द्रव्य काढणें, मंत्रसाधन करणें, बंधनभेद करणें, वध करणें हीं उत्तम होत.

चरनक्षत्रांवर कार्यें.

दंतिवाजिकरभैषवाहनारामयानविधिषुप्रशस्यते ॥

टीका—चर म्हणजे (पुनर्वसु, स्वाती, श्रवण, धनिष्ठा, शततारका) या नक्षत्रांवर हत्ती, घोडे, नानाप्रकारचीं वाहनें, बागांत जाणें, पालखी, रथ, यांत बसणें इत्यादि कार्यें प्रशस्त होत.

उग्रनक्षत्रांवर कार्यें.

शाठ्यनाशविषघातबंधनोत्साहशस्त्रदहनादिषुस्मृतम् ॥

उग्र म्हणजे (भरणी, मघा, पूर्वाफाल्गुनी, पूर्वाषाढा, पूर्वाभाद्रपदा) यांवर शठत्व करणें, नाश, विष घालणें, बधन, उत्साह, शस्त्र, जाळणें हीं कर्में उक्त होत.

मिश्रनक्षत्रांवर कार्यें.

स्वाभिधानसमकर्मसाधनंकीर्तितानिसकलानिसूरिभिः ॥

टीका—मिश्र म्हणजे (कृत्तिका, विशाखा) या नक्षत्रांवर जशीं ध्रुवादिक नक्षत्र-नांवें आहेत त्याप्रमाणें कार्यें करावीं.

वस्तु नष्ट झाली ती पहावयाचा प्रकार.

लोचनसंज्ञा नक्षत्रावरून.

अंधकेलभतेशीघ्रंमंदकेचदिनत्रयम् ।
मध्यकेचचतुःषष्टिनप्राप्नोतिसुलोचने ॥

टीका—अंधकनक्षत्रीं वस्तु नष्ट झाली तर लौकर सांपडेल; मंदनक्षत्रीं गेली असतां

तीन दिवसांनीं सांपडेल; मध्यलोचननक्षत्रीं वस्तु नष्ट झाली तर ६४ दिवसांनीं सांपडेल, सुलोचननक्षत्रीं नष्ट झाली तर सांपडणार नाहीं.

वस्तु कोणत्या दिशेस आहे ती पहावयाचा प्रकार.

अंधकेपूर्वतोवस्तुमंदकेदक्षिणेतथा ॥
पश्चिमेमध्यनेत्रेचउत्तरेतुसुलोचने ॥ १ ॥

टीका--अंधकनक्षत्रीं वस्तु नष्ट झाली तर पूर्वेस पहावी. मंदलोचनीं वस्तु नष्ट झाली तर दक्षिणेस पहावी. मध्यलोचनीं सांडली असतां पश्चिमेस पहावी. सुलोचनीं वस्तु सांडली तर ती उत्तरेस पहावी.

अंधेसद्यःप्राप्यतेवस्तुनष्टंकष्टात्प्राप्यंमंदनेत्रेचतद्वत् ॥
दूराच्छ्राव्यंमध्यनेत्रेचलभ्यंनश्रोतव्यंनैवलभ्यंसुनेत्रे ॥ १ ॥

टीका—अंधकनक्षत्रीं सांडली असतां वस्तु लवकर सांपडेल. मंदलोचनीं वस्तु प्रयत्नेंकरून. मध्यलोचनीं वस्तु दूर गेली, सांपडणार नाहीं. सुलोचनीं वस्तु गेली असतां निश्चयपूर्वक सांपडणार नाहीं.

नक्षत्रपरत्वें प्रश्न.

मघादित्वार्यमांतंचसमीपेवस्तुदृश्यते ॥ हस्तादिवसुपर्यंतमन्य
हस्तेचदृश्यते ॥ १ ॥ शतताराद्यमांतंतुस्वगृहेवस्तुदृश्यते ॥
अश्वादिसार्पपर्यंतमदृष्टंदूरगंतथा ॥ २ ॥

टीका--मघादि उत्तरा फाल्गुनीपर्यंत नक्षत्रीं जर वस्तु हरवली तर समीप सांपडेल. हस्तनक्षत्रापासून धनिष्ठापर्यंत वस्तु. हरवली असतां दुसऱ्याच्या हातीं दृष्टीस पडेल शततारकापासून भरणी नक्षत्रापावेतों स्वगृहांत वस्तु सांपडेल. कृत्तिकापासून आश्लेषा-पावेतों सांपडणार नाहीं.

तिथिवारंचनक्षत्रंप्रहरेणसमन्वितम् ॥ दिक्संख्ययाहतंचैवसप्तभि
र्विभजेत्पुनः॥१॥एकेनभूतलेद्रव्यंद्वयंचेद्भांडसंस्थितम् ॥ तृतीये
जलमध्यस्थमंतरिक्षेचतुर्थकम् ॥२॥ तुषस्थंपंचमेतुस्यात्षष्ठेगोम
यमध्यगम् ॥ सप्तमेभस्ममध्यस्थमित्येतत्प्रश्नलक्षणम् ॥ ३ ॥

टीका--प्रश्नसमयींची तिथि, वार आणि नक्षत्रें भुक्त झालीं असतील तितकीं मोजून त्यांत जो प्रहर असेल तो मिळवून सर्व एकत्र करून आठांनीं गुणावें आणि

सातांनीं भागावें; शेष उरेल त्याचें फळः—१ उरला तर भूमींत वस्तु आहे, २ उरले तर भांड्यांत वस्तु आहे, ३ उरले तर जळामध्यें आहे, ४ उरले तर अंतरिक्ष आहे, ५ उरले तर तुसांत आहे, ६ उरले तर शेणांत, ७ उरले तर भस्मांत आहे.

मद्यारंभ करण्यास.

रौद्रेपैत्र्येवारुणेपौरुहूतेयाम्येसार्पेनैर्ऋतेचैवधिष्ण्ये ॥
पूर्वाख्येषुत्रिष्वपिश्रेष्ठउक्तोमद्यारंभःकालविद्भिःपुराणैः ॥ १ ॥

टीका—आर्द्रा, मघा, शततारका, ज्येष्ठा, भरणी, आश्लेषा, मूळ, तीन पूर्वा या नक्षत्रीं प्रथम मद्य काढणें उक्त होय.

नवीन वस्त्रधारण.

रोहिणीषुकरपंचकेऽश्विभेत्र्युत्तरेपिचपुनर्वसुद्वये ॥
रेवतीषुवसुदैवतेचभेनव्यवस्त्रपरिधानमिष्यते ॥ १ ॥

टीका—रोहिणी, हस्त, चित्रा, स्वाती, विशाखा, अनुराधा, अश्विनी, तिनी उत्तरा, पुनर्वसु, पुष्य, रेवती, धनिष्ठा यांवर नवीं वस्त्रें धारण करावीं.

मोत्यें, सुवर्ण, मणि, रक्तवस्त्र यांचें धारण.

नासत्यपौष्णवसुभेकरपंचकेचमार्तंडभौमगुरुमंत्रिशशांकवारे ॥
मुक्तासुवर्णमणिविद्रुमदंतशंखरक्तांबराणिविधृतानिभवंतिसिद्ध्यै ॥१॥

टीका— अश्विनी, रेवती, धनिष्ठा, हस्त, चित्रा, स्वाती, विशाखा, अनुराधा, या नक्षत्रांवर आणि रवि, भौम, गुरु, शुक्र, सोम या वारांवर मोत्यें, सुवर्ण, मणि, पोवळीं हस्तिदंताचे चुडे, नवे शंखाची पूजा करणें, तांबडीं वस्त्रें धारण हीं कार्यें शुभ होत.

पुंसवनास नक्षत्रें.

श्रवणःसकरःपुनर्वसुर्निर्ऋतेर्भंचसपुष्यकोमृगः ॥
रविभूसुतजीववासराःकथिताःपुंसवनादिकर्मसु ॥

टीका—श्रवण, हस्त, पुनर्वसु, मूळ, पुष्य, मृग, हीं नक्षत्रें आणि रवि, भौम, गुरु हे वार पुंसवनादिक कर्मास उक्त होत.

कर्णवेध.

पौष्णवैष्णवकराश्विनिचित्रापुष्यवासवपुनर्वसुमैत्रा ॥
सेंदवेश्रवणवेधविधानमादिशंतिमुनयोहिशिशूनाम् ॥ १ ॥

टीका—रेवती, श्रवण, हस्त, अश्विनी, चित्रा, पुष्य, धनिष्ठा, पुनर्वसु, अनुराधा, मृगशीर्ष यांवर मुलांचा कर्णवेध करावा.

अन्नप्राशन.

रेवतीश्रुतिपुनर्वसुहस्तब्राह्मतःपृथगपिद्वितयेच ॥
त्र्युत्तरेषुगदितंहिनवान्नप्राशनंतुऋषिभिःपृथुकानाम् ॥ १ ॥

टीका—रेवती, श्रवण, पुनर्वसु, हस्त, रोहिणी, मृग, आर्द्रा, तिन्ही उत्तरा यांवर लहान मुलांस प्रथम अन्नप्राशन करावें.

श्मश्रुकर्म.

पुष्येपौष्णेचाश्विनीष्वैंदवेचशाक्रेहस्ताद्येत्रिकेभेष्वदित्यः ॥
क्षौरंकार्यंवैष्णवाद्यत्रयेचमुक्त्वाभौमादित्यपातंगिवारान् ॥ १ ॥

टीका--श्मश्रु करविण्यास पुष्य, रेवती, अश्विनी, मृग, ज्येष्ठा, हस्त, चित्रा, स्वाती, पुनर्वसु, श्रवण, धनिष्ठा, शततारका हीं नक्षत्रें उक्त होत. भौम, आणि रवि हे वार वर्जावे.

दंतबंधन.

येषुयेषुप्रशंसंतिक्षुरकर्ममहर्षयः॥तेषुतेष्वेवशंसंतिनखदंतादिलेखनम्॥१॥

टीका--दांत बांधणें व नखें काढणें हीं कृत्यें जीं श्मश्रुकर्मास नक्षत्रें सांगितलीं आहेत त्यांजवर करावीं.

श्लोक.

आज्ञयानरपतेर्द्विजन्मनांदाहकर्ममृतसूतकेषुच ॥
बंधमोक्षमखदीक्षणेषुचक्षौरमिष्टमखिलेषुपुष्टिदम् ॥ १ ॥

टीका--राजाच्या अथवा ब्राह्मणाच्या आज्ञेनें, क्रिया करण्याचे आदि, सूतकाचे अंत्यदिनीं, बंदींतून सुटला ह्मणजे व यज्ञाचे ठायीं अवश्य श्मश्रुकर्म करावें; तें पुष्टिप्रद होय.

ताराशुद्धंक्षौररंविगुरुशुद्धाव्रतदीक्षा ॥
शुक्रविशुद्धिर्यात्रायांसर्वंशुद्धंशशांकेन ॥ १ ॥

टीका—श्मश्रूस तारा (नक्षत्र) शुद्धि, व्रतग्रहणीं रवि-गुरुशुद्धि, यात्रेस जाण्यास शुक्रशुद्धि आणि सर्व कर्मांस चंद्रशुद्धि पहावी.

श्मश्रुकर्मास वर्ज्य.

भद्रापक्षांतरिक्ताव्रतदिनवसुभूश्राद्धषष्ठीषुरात्रौसंध्यापातारभा
स्वच्छनिषुघटधनुःकर्ककन्यागतेऽर्के ॥ जन्मर्क्षेजन्ममासेसुर
दिनयजनेभूषितोग्रामयायीभुक्तोभ्यक्तोभिषिक्तासमदिनरजिगः
श्मश्रुकार्यंनकुर्यात् ॥ १ ॥

टीका—कल्याणी, पौर्णिमा, अमावास्या, चतुर्थी, नवमी, चतुर्दशी, व्रतदिवस, अष्टमी, प्रतिपदा, षष्ठी, रात्रीस, संध्याकाळीं, व्यतीपातादिक दुष्टयोग, भौमवार, रविवार, शनिवार, कुंभ, धनु, कर्क, कन्या या चार राशींचा सूर्य असतां, जन्मनक्षत्र आणि मास, हवनादिक कर्म असेल ते दिवशीं, अलंकारादिक धारण केले असतां, प्रस्थान करण्याच्या दिवशीं, भोजन केल्यावर, अभ्यंगस्नान केलें असतां, मंगलाभिषेक झाल्यावर व स्त्री रजस्वला असतां सम दिवस ह्यांचा त्याग करून श्मश्रु करावा.

मौंजीबंधनास.

सौम्येपौष्णेवैष्णवेवासवाख्येहस्तस्वातीत्वाष्ट्रपुष्याश्विभेषु ॥
ऋक्षेदित्यांमेखलाबंधमोक्षौसंस्मर्येतेनूनमाचार्यवर्यैः ॥ १ ॥

टीका—मृग, रेवती, श्रवण, धनिष्ठा, हस्त, स्वाती, चित्रा, पुष्य, अश्विनी, पुनर्वसु या नक्षत्रांवर मौंजीबंधन करणें अथवा सोडणें प्रशस्त आहे.

विवाहनक्षत्रें.

मूलमैत्रमृगरोहिणीकरैःपौष्णमारुतमघोत्तरान्वितैः ॥
निर्विधाभिरुडुभिर्मृगीदृशांपाणिपीडनविधिर्विधीयते ॥ १ ॥

टीका—मूळ, अनुराधा, मृग, रोहिणी, हस्त, रेवती, स्वाती, मघा, तिन्ही उत्तरा हीं नक्षत्रें विवाहास घ्यावीं उक्त होत.

अग्निहोत्र घेण्यास.

प्राजापत्येपूषभेसद्भिर्दैवेपुष्येज्येष्ठास्वैंदवेकृत्तिकासु ॥
अग्न्याधानंत्र्युत्तराणांत्रयेपिश्रेष्ठैःप्रोक्तंप्राक्तनैर्विप्रमुख्यैः ॥ १ ॥

टीका—रोहिणी, रेवती, विशाखा, पुष्य, ज्येष्ठा, मृग, कृत्तिका आणि तिन्ही उत्तरा यांचे ठायीं; प्रथम अग्निहोत्रास आरंभ करावा.

विद्याभ्यास करण्यास नक्षत्रें.

मृगादिपंचस्वपिभेषुमूलेहस्तादिकेवात्रितयेऽश्विनीषु ॥
पूर्वात्रयेचश्रवणेचतद्वद्विद्यासमारंभमुशंतिसिद्ध्यै ॥ १ ॥

टीका—मृग, आर्द्रा, पुनर्वसु, पुष्य, आश्लेषा, मूळ, हस्त, अश्विनी, पूर्वा, पूर्वाषाढा, पूर्वाभाद्रपदा, चित्रा, स्वाती, श्रवण या नक्षत्रांवर, मुलांस प्रथम विद्याभ्यासास आरंभ करावा. सिद्धि होय.

औषध घेण्यास नक्षत्रें.

पौष्णद्वयेचादितिभद्वयेचहस्तत्रयेचश्रवणत्रयेच ॥
मैत्रेचमूलेचमृगेचशस्तंभैषज्यकर्मप्रवदंतिसंतः ॥ १ ॥

टीका--रेवती, अश्विनी, पुनर्वसु, पुष्य, हस्त, चित्रा, स्वाती, श्रवण, धनिष्ठा, शततारका, अनुराधा, मूळ, मृग यांजवर औषधें घ्यावीं.

रोग उत्पन्न होतो त्याचें शुभाशुभ पहाणें.

स्वात्याश्लेषारौद्रपूर्वात्रयेषुशाक्रेभौमेसूर्यजेसूर्यवारे ॥
नंदारिक्तास्वेवरोगस्यप्राप्तिर्मृत्युर्ज्ञेयःशंकरोरक्षितापि ॥ १ ॥

टीका—स्वाती, आश्लेषा, आर्द्रा, तिन्ही पूर्वा, ज्येष्ठा आणि भौम, शनि, रविवार नंदातिथि ह्मणजे प्रतिपदा, षष्ठी, एकादशी, रिक्तातिथी ह्मणजे चतुर्थी, नवमी, चतुर्दशी यांवर रोग उत्पन्न झाला तर शंकराच्यानेंही रक्षण करवणार नाहीं.

रोगमुक्ति होण्याचें प्रमाण.

व्याध्युत्पत्तिर्यस्यपौष्णेसमैत्रेप्राणत्राणंजायतेतस्यकृच्छ्रात् ॥
वैश्वेसौम्येरोगमुक्तिस्तुमासाद्विंशत्यास्याद्वासराणांमघासु ॥ १ ॥

टीका—रोग उत्पन्न होईल त्या दिवशीं जर रेवती अथवा अनुराधा असल्या तर प्राणांत होईल. उत्तराषाढा अथवा मृग असेल तर एक मास पीडा भोगील आणि मघा असल्या तर वीस दिवस पीडा भोगील.

पक्षाद्धस्तेवासवेसद्विदैवेमूलाश्विन्योरग्निधिष्ण्येनवाहात् ॥
याम्येत्वाष्ट्रेवैष्णवेवारुणेचनैरुज्यंस्यान्नूनमेकादशाहात् ॥ १ ॥

टीका—हस्तनक्षत्रीं रोग उत्पन्न झाला असतां १५ दिवस पीडा भोगील. आणि

धनिष्ठा, विशाखा, मूळ, अश्विनी, कृत्तिका, असल्या तर ९ दिवस पीडा भोगील. भरणी, चित्रा, श्रवण, शततारका असल्या तर ११ दिवस पीडा भोगील.

अहिर्बुध्न्येतिष्यसंज्ञेसभागेप्राजापत्यादित्ययोःसप्तरात्रात् ॥
रोगान्मुक्तिर्जायतेमानवानांनिःसंदिग्धंजल्पितंगर्गमुख्यैः ॥ १ ॥

टीका—उत्तराभाद्रपदा, पुष्य, पूर्वाफाल्गुनी, अभिजित्, पुनर्वसु या नक्षत्रीं रोग उत्पन्न झाला असतां ७ दिवसांनीं पीडा निःसंशय करून जाईल; असें गर्गादिक मुनि सांगतात.

रोगमुक्तिस्नानास नक्षत्रें.

इंदोर्वारेभार्गवेचध्रुवेषुसार्पादित्यस्वातियुक्तेषुभेषु ॥
पित्र्येचांत्येचैवकुर्यात्कदाचिन्नैवस्नानंरोगमुक्तस्यजंतोः ॥

टीका—सोमवार, शुक्रवार आणि ध्रुवनक्षत्रें, रोहिणी, तिन्ही उत्तरा आणि आश्लेषा, पुनर्वसु, स्वाती हीं शुभ होत. मघा व रेवती यांवर रोगमुक्त मनुष्यांनीं स्नान करूं नये.,

रोगमुक्तस्नानास लग्न पाहणें.

लग्नेचरेसूर्यकुजेज्यवारेरिक्तातिथौचंद्रबलेनहीने ॥
केंद्रत्रिकोणार्थगतेजपापेस्नानंहितंरोगविमुक्तिकानाम् ॥ १ ॥

टीका—चरलग्नें (मेष, कर्क, मूळ, मकर) हीं लग्नें; रवि, भौम, गुरु हे वार आणि रिक्तातिथि (चतुर्थी, नवमी, चतुर्दशी) असाव्या आणि चंद्रबळ नसावें; लग्नीं, केंद्रस्थानीं व तृतीयस्थानीं पापग्रह असावे. अशी लग्नशुद्धि पाहून स्नान करावें तें आरोग्यदायक होय.

लता, औषधि व वृक्ष लावण्यास नक्षत्रें.

सावित्रतिष्याश्विनवारुणानिमूलंविशाखाचमृदुध्रुवाणि ॥
लतौषधीपादपरोपणेषुशुभानिभानिप्रतिपादितानि ॥ १ ॥

टीका—हस्त, पुष्य, अश्विनी, शततारका, मूळ, विशाखा आणि मृदु, ध्रुव हीं नक्षत्रें कोष्टकांत लिहिलीं आहेत तीं घ्यावीं आणि वेली, औषधी व वृक्ष लावावे; शुभ होय.

कूपारंभास नक्षत्रें.

हस्तात्रीणिवासववारुणंचशैवंपित्र्यंचोत्तराणांत्रयंच ॥
प्राजापत्यंचापिनक्षत्रमाहुःकूपारंभेश्रेष्ठमाद्यामुनींद्राः ॥ १ ॥

टीका—हस्त, चित्रा, स्वाती, धनिष्ठा, शततारका, आर्द्रा, मघा, तिन्ही उत्तरा आणि रोहिणी या नक्षत्रीं कूपारंभ करावा; असें मुनि सांगतात.

द्रव्य देणें व ठेवणें.

साधारणोग्रध्रुवदारुणाख्यैर्धिष्ण्यैर्यदत्तद्रविणंप्रमुक्तम् ॥
हस्तेनविन्यस्तवस्तुप्रनष्टंनलभ्यतेतन्नियतंकदाचित् ॥ १ ॥

टीका—साधारण, उग्र, ध्रुव आणि दारुण, या संज्ञेचीं नक्षत्रें मागें कोष्टकांत लिहिलीं आहेत तीं घ्यावीं; त्यांजवर दुसऱ्यास द्रव्य दिलें अथवा ठेविलें तर लभ्य होणार नाहीं आणि सांडली वस्तु सांपडणार नाहीं.

हत्ती घेणें व आणणें.

हस्तेषुचित्रासुतथाश्विनीषुस्वातौचपुष्येचपुनर्वसौच ॥
प्रोक्तानिसर्वाण्यपिकुंजराणांकर्माणिगर्गप्रमुखैःशुभानि ॥ १ ॥

टीका—हस्त, चित्रा, अश्विनी, स्वाती, पुष्य, आणि पुनर्वसु या नक्षत्रांवर हत्ती घेणें, देणें, अलंकार करून शृंगारणें हीं सकल कर्में करावीं.

घोडा घेणें व आणणें.

पुष्यश्रविष्ठाश्विनिसौम्यभेषुपौष्णानिलादित्यकराह्वयेषु ॥
सवारुणर्क्षेषुबुधैःस्मृतानिसर्वाणिकार्याणितुरंगमाणाम् ॥ १ ॥

टीका—पुष्य, धनिष्ठा, अश्विनी, मृग, रेवती, स्वाती, पुनर्वसु, हस्त, शततारका या नक्षत्रीं तुरंग घेणें आणि देणें व अलंकारेंकरून शृंगारणें इत्यादि सर्व कर्में करावीं.

गवादिक पशु आणणें व पोहोंचविणें यांस वर्ज्य.

चित्रोत्तरावैष्णवरोहिणीषुचतुर्दशीदर्शदिवाष्टमीषु ॥
ग्रामेप्रवेशंगमनंविदध्याद्गामान्पशूनानकदाचिदेव ॥ १ ॥

टीका—चित्रा, तिन्ही उत्तरा, श्रवण, रोहिणी, चतुर्दशी, अमावास्येस दिवसा अष्टमी यांचेठायीं पशूंस बाहेरगांवास पाठवूं नये व आणूंही नये.

गाय घेणें व विकणें यांस वर्ज्य.

शुक्रवासवकरेषुविशाखापुष्यवारुणपुनर्वसुभेषु ॥
अश्विपूषभयुतेषुविधेयोविक्रयक्रयविधिःसुरभीणाम् ॥ १ ॥

टीका—ज्येष्ठा, धनिष्ठा, हस्त, विशाखा, पुष्य, शततारका, पुनर्वसु, अश्विनी, रेवती या नक्षत्रांचे ठायीं, गायींचा क्रयविक्रय करूं नये.

तृणकाष्ठादि संग्रह करणें.

वासवोत्तरदलादिपंचकेयाम्यदिग्गमनगेहगोपनम् ॥
प्रेतदाहतृणकाष्ठसंग्रहः शय्यकावितरणंचवर्जयेत् ॥ १ ॥

टीका—धनिष्ठांचे उत्तरार्धापासून नक्षत्रें पांच याचे ठायीं दक्षिणेस जाणें आणि गृह नीट करणें व प्रेतदाह, तृण, काष्ठसंग्रह, बाजा, पलंग आदिकरून विणणें हीं सकल कार्यें वर्जावीं.

नांगर धरण्यास नक्षत्रें.

मृदुध्रुवक्षिप्रचरेषुमूलेमघाविशाखासहितेषुभेषु ॥
हलप्रवाहंप्रथमंविदध्यान्नीरोगसुष्कान्वितसौरभेयैः ॥ १ ॥

टीका—मृदु, ध्रुव, क्षिप्र, चर या संज्ञा कोष्टकांतील घ्याव्या आणि मूळ, मघा, विशाखासहित नक्षत्रें यांजवर आंडील बैल जुंपून प्रथम नांगर धरावा.

बीज पेरण्यास नक्षत्रें.

हस्ताश्विपुष्योत्तररोहिणीषुचित्रानुराधामृगरेवतीषु ॥
स्वातौधनिष्ठासुमघासुमूलेबीजोप्तिरुत्कृष्टफलप्रतिष्ठा ॥ १ ॥

टीका—हस्त, अश्विनी, पुष्य, तिन्ही उत्तरा, रोहिणी, चित्रा, अनुराधा, मृग रेवती, स्वाती, धनिष्ठा, मघा, मूळ या नक्षत्रांवर बीजें पेरावीं, उक्त होत.

सर्पदंशास वर्ज्य.

यःकृत्तिकामूलमघाविशाखासार्पेतकार्द्रासुभुजंगदष्टः ॥

सवैनतेयेनसुरक्षितोऽपिप्राप्नोतिमृत्युंवदनंमनुष्यः ॥ १ ॥

टीका—कृत्तिका, मूळ, मघा, विशाखा, आश्लेषा, रेवती, आर्द्रा या नक्षत्रांवर सर्पदंश झाला असतां गरुड संरक्षण करीत असतांही मृत्यु येईल.

नृत्य शिकण्यास.

हस्तस्तिष्योवासवंचानुराधाज्येष्ठापौष्णंवारुणंचोत्तराच ॥
पूर्वाचार्यैःकीर्तितश्चंद्रवर्तीनृत्यारंभेशोभनोऋक्षवर्गः ॥ १ ॥

टीका—हस्त, पुष्य, धनिष्ठा, अनुराधा, ज्येष्ठा, रेवती, शततारका, तिन्ही उत्तरा आणि चंद्र अनुकूळ पाहून नृत्य शिकण्यास आरंभ करावा. असें मुनिवाक्य आहे.

राज्याभिषेकास नक्षत्रें.

मैत्रशाक्रकरपुष्यरोहिणीवैष्णवेषुतिसृषूत्तरासुच ॥
रेवतीमृगशिराश्विनीषुचक्ष्माभृतांसमभिषेकइष्यते ॥ १ ॥

टीका—अनुराधा, ज्येष्ठा, हस्त, पुष्य, रोहिणी, श्रवण, तिन्ही उत्तरा, रेवती, मृग, अश्विनी या नक्षत्रांवर राजांस प्रथम अभिषेक करावा.

राजदर्शनास नक्षत्रें.

सौम्याश्वितिष्यश्रवणश्रविष्ठाहस्तष्ट्रवत्वाध्रुवपूषभानि ॥
मैत्रेणयुक्तानिनरेश्वराणांविलोकनेभानिशुभप्रदानि ॥ १ ॥

टीका—मृग, अश्विनी, पुष्य, श्रवण, धनिष्ठा, हस्त, ध्रुव, चित्रा, रेवती, अनुराधा या नक्षत्रांवर राजाचें दर्शन घ्यावें; शुभप्रद होय.

द्वितीयेस चंद्रोदय होतो त्याची फलश्रुति.

रौद्राहियाम्यानिलवारुणेंद्रान्याहुर्जघन्यानितथाबृहंति ॥
ध्रुवद्विदैवादितिभानिनूनंसमानिशेषाणिपुनर्मुनींद्रैः ॥ १ ॥
बृहत्सुधान्यंकुरुतेसमर्घंजघन्यधिष्ण्येभ्युदितोमहर्घः ॥
समेषुधिष्ण्येषुसमंहिमांशुर्वदंतिसंदिग्धमिदंमहांतः ॥ २ ॥

टीका—आर्द्रा, आश्लेषा, भरणी, स्वाती, शततारका, ज्येष्ठा हीं नक्षत्रें जघन्य होत. यांवर मासाचे आदीं चंद्रोदय जाहला असतां धान्याची महर्घता होईल. ध्रुव ह्मणजे तिन्ही उत्तरा, रोहिणी आणि विशाखा, पुनर्वसु हीं नक्षत्रें बृहत् होत, यांवर चंद्रोदय झाला तर धान्य स्वस्त होईल. शेषनक्षत्रें सम जाणावीं. त्यांजवर चंद्रोदय झाला तर समधारण असेल.

राशिपरत्वें चंद्रोदयाचें फळ.

मीनेमेषोदितेचंद्रे सततंदक्षिणोच्चता ॥ शेषोच्चताउत्तरा
यांसमतावृषकुंभयोः ॥ १ ॥ विड्वरंतुसमेचन्द्रेदुर्भिक्षंदक्षि
णोन्नता ॥ सुभिक्षंक्षेममारोग्यमुत्तराश्रित्यचंद्रमाः ॥ २ ॥

टीका—मीन अथवा मेष या राशींवर शुक्ल द्वितीयेचा चंद्रोदय झाला तर चंद्राची दक्षिणेस उच्चता असेल आणि दुर्भिक्ष होईल. मिथुनादिक मकरराशीपर्यंत चंद्रोदय झाला असतां उत्तरेस चंद्राची उच्चता असेल, तेणेंकरून सुभिक्ष आणि क्षेम, आरोग्य असेल. वृषभ आणि कुंभ यांजवर चंद्रोदय झाला तर चंद्राचें समत्व असेल. राजांचा कलह विड्वरता होईल.

पुष्यनक्षत्राचे गुणदोष.

परकृतमखिलंनिहंतिपुष्योनखलुनिहंतिपरस्तुपुष्यदोषम् ॥
ध्रुवमम्रुतकरेष्टमेतिपुष्येविहितमुपैतिसदैवकर्मसिद्धिम् ॥ १ ॥

टीका—पुष्य, दुसरे दोष आणि अष्टमस्थानचे चंद्राचा दोष दूर करून कार्यसिद्धि करितो. परंतु त्या नक्षत्राचे दोष आहेत ते दुसऱ्याच्यानें दूर होत नाहींत.

सिंहोयथासर्वचतुष्पदानांतथैवपुष्योबलवानुडूनाम् ॥
चंद्रेविरुद्धेप्यथगोचरेऽपिसिद्ध्यंतिकार्याणिकृतानिपुष्ये ॥ १ ॥

टीका—जसा चतुष्पदांमध्यें सिंह बलवान् तसेंच नक्षत्रांमध्यें पुष्य बलवान् होय. गोचरींचा चंद्र कनिष्ठ, चवथा आठवा, बारावा असला तथापि पुष्य कार्यसिद्धि करितो.

ग्रहेणविद्धोऽप्यशुभान्वितोऽपिविरुद्धतारोऽपिविलोमगोऽपि ॥
करोत्यवश्यंसकलार्थसिद्धिंविहायपाणिग्रहणंतुपुष्यः ॥ १ ॥

टीका—पुष्य ग्रहेंकरून विद्ध अथवा अशुभग्रहयुक्त किंवा विरुद्ध विलोम तारा असे प्रतिकूल असतांही विवाहाशिवाय इतर कार्यांची सिद्धि होत्ये.

योगप्रकरण.

प्रतिदिवसाचा योग पहाण्याची पद्धति.

वाक्पतेरर्कनक्षत्रंश्रवणाच्चांद्रमेवच ॥

गणयेत्तद्युतिंकुर्याद्योगःस्यादृक्षशेषतः ॥ १ ॥

टीका—पुष्यापासून चालते सूर्यनक्षत्रापावेतों आणि श्रवणापासून दिवसनक्षत्रापावेतों मोजावीं; दोन्ही संख्या एकत्र कराव्या आणि २७ नीं भागावें; शेष राहील तो योग जाणावा.

योगांचीं नावें.

विष्कंभःप्रीतिरायुष्मान्सौभाग्यःशोभनस्तथा ॥ अतिगंडः सुकर्माचधृतिःशूलस्तथैवच ॥ १ ॥ गंडोवृद्धिर्ध्रुवश्चैवव्याघातो हर्षणस्तथा ॥ वज्रःसिद्धिर्व्यतीपातोवरीयाणःपरिघःशिवः ॥ २ ॥ सिद्धः साध्यःशुभःशुक्लोब्रह्मैंद्रोवैधृतिःक्रमात् ॥ सप्तविंशतियोगा स्तुकुर्युर्नामसमंफलम् ॥ ३ ॥

१	विष्कंभ	५	शोभन	९	शूल	१३	व्याघात	१७	व्यतिपात	२१	सिद्ध	२५	ब्रम्हा
२	प्रीति	६	अतिगंड	१०	गण्ड	१४	हर्षण	१८	वर्याण	२२	साध्य	२६	ऐंद्र
३	आयुष्मान्	७	सुकर्मा	११	वृद्धि	१५	वज्र	१९	परिघ	२३	शुभ	२७	वैधृति
४	सौभाग्य	८	धृति	१२	ध्रुव	१६	सिद्धि	२०	शिव	२४	शुक्ल		

योगांच्या वर्ज्यघटिका.

विरुद्धसंज्ञाइहयेचयोगास्तेषामनिष्टःखलुपादआद्यः ॥ सर्वे धृतिस्तुव्यतिपातनामासर्वोऽप्यनिष्टःपरिघस्यचार्धम् ॥ १ ॥ तिस्र स्तुयोगेप्रथमेचवज्रेव्याघातसंज्ञेनवपंचशूले ॥ गंडेऽतिगंडेचषडेवनाड्यःशुभेषुकार्येषुविवर्जनीयाः ॥ २ ॥

टीका—ह्या सत्तावीस योगांचें नांवांप्रमाणें फळ जाणावें; त्यांमध्यें वाईट नांवाचे योग आहेत त्यांचे आद्यपाद टाकावे आणि व्यतीपात, वैधृति हे सकळ वर्जावे परिघांचें पूर्वार्द्ध टाकावें, परंतु विष्कंभ ३ घटिका, वज्र ९ घ०, व्याघात ९ घ०, गंड ६ घ०, अतिगंड ६ घ०, शूल १९ घ० ह्या वर्ज करून शुभकार्यें करावीं.

करणें-करण पहाण्याची रीति.

गततिथ्योद्विनिघ्नाश्वशुक्लप्रतिपदादितः ॥
एकोनाःसप्तहृच्छेषःकरणंस्याद्बवादिकम् ॥ १ ॥

टीका—शुक्लप्रतिपदेपासून ज्या तिथींचीं करणें पाहिजेत त्यांची दुप्पट करावी; त्यांत एक कमी करावा आणि सातांनीं भागावें; शेष उरेल तें त्या तिथीचें करण जाणावें. प्रति तिथीस २ करणें भोगतात.

नांवें.

बवाह्वयंबालवकौलवाख्यंततोभवेत्तैतिलनामधेयम् ॥ गराभिधानंव णिजंचविष्टिरित्याहुरार्याःकरणानिसप्त ॥ १ ॥ अंतेकृष्णचतुर्दश्यांशकु निर्दर्शभागयोः ॥ ज्ञेयंचतुष्पदंनागंकिंस्तुघ्नंप्रतिपद्दले ॥ २ ॥ स्वामी ॥ इंद्रोब्रह्मामित्रनामार्यमाभूःश्रीःकीनाशश्चेतितिथ्यर्धनाथाः ॥ कल्युक्षा ख्यौसर्पवायूतथैवयेचत्वारस्तेस्थिराणांचतुर्णाम् ॥ ३ ॥ कृत्यें ॥ ॥ पौष्टिकस्थिरशुभापिबवाख्येबालवद्विजहितान्यकुर्यात् ॥ कौलवेप्रमद मित्रविधानंतैतिलेशुभगताश्रयकर्म ॥ ४ ॥ गरेचबीजाश्रयकर्षणानिवा णिज्यकेस्थैर्यवणिकक्रियाश्च ॥ नसिद्धिमायातिकृतंचविष्ट्यांविषारिघा तादिषुतत्रसिद्धिः ॥ ५ ॥ मंत्रौषधानिशकुनौतुसपौष्टिकानिगोविप्ररा ज्यपितृकर्मचतुष्पदेपि ॥ सौभाग्यदारुणधृतिध्रुवकर्मनागेकिंस्तुघ्नना म्निनिखिलंशुभकर्मकार्यम् ॥ ६ ॥

टीका (कोष्टक)

शुक्ल तिथी ६०				कृष्ण तिथी ६०				नांवें	स्वामी	कृत्यें
पूर्वदळ		उत्तर०		पूर्वदल		उत्तर०				
१	स्थिर			०	०	०	०	किंस्तुघ्न	वायु	शुभकार्यें करावीं.
५	८	१	१५	४	११	७	०	बव	इन्द्र	व्रतें उत्साह करावे, देवळें तळीं बांधावीं.
२	१२ ९	५	१२	१	०	४	११	बालव	ब्रम्हा	ब्राम्हणाचें हित करावें.
६	१३	२	९	५	१२	१	८	कौलव	मित्र	उन्माद आणि मित्रत्व करावें.
३	१०	६	१३	२	९	५	१२	तैतिल	सूर्य	विवाहादि मंगलकार्यें करावीं.
७	१४	३	१०	६	१३	२	९	वार	भूमी	बीज पेरणें, नांगर धरणें.
४	११	७	१४	३	१०	६	१३	वणिज	लक्ष्मी	देव प्रतिष्ठा, गृह बांधणें, दुकान घालणें.
८	१५	४	११	७	१४	३	१०	विष्टी	यम	सकल कर्में वर्ज्य, परंतु विष, अरिघात अशीं क्रूर कर्में करावीं.
स्थिर		०	०	०	०	०	१४	शकुनी	कलि	मन्त्रोपदेश, औषध, ग्रहपूजा करावी.
स्थिर		०	०	३०	०	०	०	चतुष्पाद.	बैल	गाई, म्हशी घेणें व देणें राज्याभिषेक आणि मित्रकार्यें करावीं.
स्थिर		०	०	०	०	०	३०	नाग	सर्प	सौभाग्यकर्में, लढाईंत, जाणें; धैर्य धरणें विद्याभ्यास करणें.

कल्याणी.

तिथिमान ॥ ॥ कृष्णेग्निदिशयोरूर्ध्वंसप्तमीभूतयोरधः ॥ शुक्लेवेदेशयोरूर्ध्वंभद्राप्राग्वसुपूर्णयोः ॥ १ ॥ मनुवसुमुनितिथि युगदशशिवगुणसंख्यासुतिथिषुपूर्वात्याः ॥ आयातिविष्टिरेषा पृष्टेशुभदापुरस्त्वशुभा ॥ २ ॥ ॥ शास्त्रार्थ ॥ दिवासर्पमुखी भद्रारात्रौभद्राचवृश्चिकी ॥ सर्पस्यचमुखंत्याज्यंरात्रौपुच्छंपरित्यजेत् ॥ ३ ॥ रात्रिभद्रायदाह्निस्याद्दिवाभद्रायदानिशि ॥ नतत्रभद्रदोषःस्यात्सर्वकार्याणिसाधयेत् ॥ ४ ॥ शारीरभाग ॥ ॥ नाड्यस्तुपंचवदनेथगलेतथैकावक्षोदशैकसहितानियतंचतस्रः ॥ नाभ्यांकटौषडथपुच्छलताचतिस्रोविष्टेर्बुधैरभिहितोंगविभाग एषः ॥५॥ ॥ स्थानफल ॥ ॥ मुखेकार्यध्वस्तिर्भवतिमरणंचाथगलकेधनाहानिर्वक्षस्यथकटितटेबुद्धिविलयः ॥ कलिर्नाभौ देशेविजयमथपुच्छेचजगदुः शरीरेभद्रायाःपृथगितिफलंपूर्वमुनयः ॥ ६ ॥ ॥ चंद्र ॥ ॥ मीनेमेषालिकर्केशशिनिनिवसतिस्वर्गसंस्थापिविष्टिः कन्यायांतौलिसंस्थेधनमिथुनगतेना

तिथी		शास्त्रार्थ	स०	स्थानें	फळ	चंद्र स्थानें		फळ	वार	नांवें
	३	ह्या तिथींची ३० घटिका	३	पुच्छ	विजय	मीन			सोम	
कृष्ण		उत्तरार्धाची भद्रातिचें नांव				मेष	स्वर्गी	सौख्य		कल्या.
	१०	वृश्चिकी ही दिवसास आली	६	कटि	वृद्धि	वृश्चि.			शुक्र	
	४	तर ३ घटिका पुच्छ वर्जा-			नाश	कर्क			शनि	
शुक्ल		वें मुख शुभ होय. उत्तरा-	४	नाभी		कन्या				वृश्चिकी
	११	र्धे म्हणजे रात्र ३० घटिका	११	हृदय	कलह	तूळ	पाता-	धन प्रा.	गुरु	
	७	पूर्वार्धाची भद्रा नांव सर्पिणी			धन	धन	ळीं			पुण्यव.
कृष्ण		ही रात्रीं आली तर ५ घटि-	१	गळा	नाश	मिथु.			रवि	भद्रा
	१४	का मुख वर्जावें. विध्वंसक			मरण	कुंभ				
	८	पुढें पुच्छ शुभ होय.	५	मुख	कार्य	सिंह	मृत्यु	अशुभ	बुध	
शुक्ल		पूर्वार्ध म्हणजे [illegible] होय.			विध्वंस	वृषभ	लोकीं		भौम	भद्रा
	१५		३०	एकूण		मकर				

गलोकेनिवासः ॥ कुंभेसिंहेवृषेवामकरमुपगतेराजतेमृत्युलोके भद्राचंद्रप्रभावाहिमकरतनयानोशुभालौकिकेस्यात् ॥ ७ ॥ ॥ स्थानें ॥ स्वर्गेभद्राभवेत्सौख्यंपातालेचधनागमः ॥ मृत्युलोकेयदाभद्राकार्यसिद्धिस्तदानहि ॥ ८ ॥ ॥ वारपरत्वें नांवें ॥ सोमेशुक्रचकल्याणीशनौचैवतुवृश्चिकी ॥ गुरौपुण्यवती ज्ञेयाचान्यवारेषुभद्रका ॥ ९ ॥ दैत्येंद्रैःसमरेमरेषुविजितेष्वीशः क्रुधादृष्टवान्स्वंकायात्किलनिर्गताखरमुखीलांगूलिनीचक्रपात् ॥ ॥ ॥ विष्टिःसप्तभुजामृगेंद्रगलकाक्षामोदरीप्रेतगादैत्यघ्नीमुदितैः सुरैस्तुकरणप्रांतेनियुक्तातुसा ॥ १० ॥

टीका—दैत्य आणि देव या उभयतांच्या युद्धांत देवांचा पराभव होतो असें सांबांनीं जाणून क्रोधातें पावोन आपले शरीरापासून काढिली ती अशी गर्दभमुखी, पुच्छवती, नांव विष्टी, सात भुजा, गळा हरणाचेपरी, उदर कृश, प्रेतावर बसलेली दैत्यांस मारणारी ही देवांहीं कर्णपांतीं ठेविली ती कल्याणी प्रसिद्ध आहे. ती जाणावी.

संक्रांत.

॥ वारपरत्वें नावें ॥ ॥ घोरारवौध्वांक्ष्यमृतद्युतौचसंक्रांतिशरेचम होदरीस्यात् ॥ मंदाकिनोज्ञेचगुरौचनंदामिश्राभृगौराक्षसीचार्क पुत्रे ॥ १ ॥ नक्षत्रपरत्वें नांवें ॥ उग्रक्षिप्रचरैर्मैत्रध्रुवमिश्राख्य दारुणैः ॥ ऋक्षैःसंक्रांतिरर्कस्यघोराद्याक्रमशोभवेत् ॥ २ ॥ ॥ फळें ॥ ॥ ध्वांक्षीवैश्यान्सुखयतिमहोदर्यलंचोरसार्थान् घोरा शूद्रानथनरपतीनेवमंदाकिनीच ॥ नंदाख्याचद्विजवरगणान्मिश्र काख्यापशूंश्चचांडालांतांप्रकृतिमखिलांराक्षसीसंज्ञिताच ॥ ३ ॥ ॥ काळ व फळें ॥ ॥ पूर्वाह्नकालेनृपतिद्विजेंद्रान्मध्यंदिनेचाथ विशोऽपराह्णे ॥ शूद्रान्रवावस्तमितेप्रदोषे पिशाचकान्नरात्रिच रान्निशीथे ॥ ४ ॥ नटादिकांश्चापररात्रकालेप्रत्यूषकालेपशुपा लकांश्च ॥ सक्रांतिरर्कस्यसमस्तलिंगान्प्रभातसंध्यासमयेनिहंति ॥ ५ ॥ दिशांस मुख ॥ ॥ अर्केशुक्रेमुखंपूर्वेसौम्यंभौमेचदक्षिणे ॥ शनौचंद्रेमुखपश्चाद्गुरौचेवोत्तरामुखी ॥ ६ ॥

वार व नक्षत्रपरत्वें संक्रांति पहाण्याचें कोष्टक.

वार	नक्षत्रें	नांवें	फळश्रुति चांगली	काळ	फळश्रुति वाईट	दिशागमन
रवि	उग्र	घोरा	शूद्रांस सुख	पूर्वाह्ण	विप्र व राजांस	पूर्वेस
सोम	क्षिप्र	ध्वांक्षी	वैश्यांस सुख	मध्याह्न	वैश्यांस वाईट	पश्चिमेस
भौम	चर	महोदरी	चोरांस साह्य	अपराह्ण	शूद्रांस वाईट	दक्षिणेस
बुध	मैत्र	मंदाकिनी	राजांस साह्य	प्रदोष	पिशाचांस	दक्षिणेस
गुरु	ध्रुव	नंदा	द्विजगणांस साह्य	मध्यरात्रि	राक्षसांस वाईट	उत्तरेस
शुक्र	मिश्र	मिश्रा	पशूंस चांगलें	अपरात्रि	नटांस वाईट	पूर्वेस
शनि	दारुण	राक्षसी	चांडाळांस सुख	पहांटे सू. उ.	गोवारीयासवांस	पश्चिमेस

करणपरत्वें संक्रांति.

॥ स्थिति ॥ चतुष्पदेतैतिलनागयोश्चसुप्तोरविःसंक्रमणंकरोति ॥ विद्याद्बवाख्येचगराह्वयेचसबालवाख्येस्थितएवविष्टौ ॥ ७ ॥ ॥ फळ ॥ ॥ किंस्तुघ्नाम्निशकुनेवणिकौलवाख्येचोर्ध्व स्थितस्यखलुसंक्रमणंरवेःस्यात् ॥ धान्यार्धवृष्टिषुभवेत्क्रम शस्त्वनिष्टोमध्येष्टतंतिमुनयःप्रवदंतिपूर्वे ॥ ८ ॥ ॥ वाहनें ॥ सिंहोव्याघ्रोवराहश्चगर्दभःकुंजरस्तथा ॥ महिषीघोटकःश्वाच छागोवृषभकुक्कुटौ ॥ ९ ॥ गजोवाजिर्वृषोमेषःखरोष्ट्रौकेसरी क्रमात् ॥ शार्दूलमहिषीव्याघ्रवानरश्वबवादितः ॥ १० ॥ ॥फळें॥ ॥ गजेलक्ष्मीर्वृषेस्थैर्यंघोटकेवाहनेतथा॥ सिंहेव्याघ्रेभयं प्रोक्तंसुभिक्षंगर्दभेशुनो ॥ ११ ॥ वराहेमहतीपीडाजायतेमे षवाहने ॥ महिष्यांचभवेत्क्लेशःकुक्कुटेमृत्युरेवच॥ १२ ॥ वस्त्रें ॥ श्वेतपीतहरितंचपांडुरंरक्तश्याममसितंबहुवर्णम् ॥ कंबलोविवस नंघनवर्णान्यंशुकानिचबवादितःक्रमात् ॥ १३ ॥ आयुधें ॥ भुशुंडीचगदाखङ्गदंडकोदंडतोमरान् ॥ कुंतपाशांकुशास्त्रंचबाण श्चैवायुधंबवात् ॥ १४ ॥ ॥ भोजनपात्रें ॥ सौवर्णराजतंताम्रं कांस्यंलोहंचखर्परम् ॥ पत्रंवस्त्रंकरोभूमिःकाष्ठपात्रंबवादितः ॥ ॥ १५ ॥ ॥ भक्ष्यपदार्थ ॥ ॥ अन्नंचपायसंभक्ष्यंपक्वान्नंचपयो-

दधि ॥ चित्रान्नंगुडमध्वाज्यंशर्करातुबवादितः ॥ १६ ॥ ॥ लेपनें ॥ कस्तूरीकुंकुमंचैवचंदनंमृत्तिकातथा ॥ गोरोचनमलक्तश्वहरिद्राचतथांजनम् ॥ सिंदूरमगुरुश्चैवकर्पूरश्चबवादितः ॥ १७॥ जाति ॥ देवभूताहिविहगपशवोमृगएवच ॥ ब्रह्मक्षत्रियविट्शूद्रमिश्रजातिर्बवादितः ॥ १८ ॥
॥ पुष्पें ॥ ॥ पुन्नागजातीबकुलश्वकेतकीबिल्वस्तथार्कःकमलंचदूर्वा ॥ मल्लीतथापाटलिकाजपाचबवादिपुष्पाणिचयोजयेत्तु ॥ १९ ॥ ॥
॥ भूषणें ॥ ॥ नूपुरंकंकणंमुक्ताविद्रुमंमुकुटंमणिम् ॥ गुंजावराटकंनीलंगारुत्मंरुक्मकंबवात् ॥ २० ॥ कंचुकी ॥ ॥ विचित्रपर्णाशुकभूर्जपत्रिकासीतातथापाटलनीलवर्णा ॥ कृष्णाजिनंचर्मचवल्कपांडुराबवादितश्चैवतुकंचुकीस्यात् ॥ २१ ॥ ॥ वयें ॥ ॥ शिशुकुमारीचगतालकायुवाप्रौढाप्रगल्भाथततश्ववृद्धा ॥ वंध्यातिवंध्याचसुतार्थिनीचप्रव्राजकाचैवफलंशुभंबवात् ॥ २२ ॥

करणें	बव	बालव	कौलव	तैतिल	गर	वणिज	विष्टि	शकुनी	चतुष्पा	नाग	किंस्तु.
स्थिति	बसली	बसली	उभी	निजली	बसली	उभी	बसली	उभी	निजली	निजली	उभी
फळें	मध्यम	मध्यम	महर्घता	स्वंग	मध्यम	महर्घता	मध्यम	महर्घता	स्वंग	वंग	महर्घता
वाहनें	सिंह	व्याघ्र	डुकर	गाढव	हत्ती	महिषी	कुत्रा	घोडा	मेंढा	बैल	कोंवडा
उपवाह.	गज	अश्व	बैल	मेंढा	गाढव	उंट	सिंह	शार्दूल	हंस	व्याघ्र	वानर
फळें	भीति	भीति	पीडा	सुभिक्ष	लक्ष्मी	क्लेश	सुभिक्ष	स्थैर्य	पीडा	स्थैर्य	अपमृ
वस्त्रें	पांढरें	पिंवळें	हिरवें	पांडूरक	तांबडें	श्याम	काळें	चित्रक	कांबळें	घनवर्ण	पोपटी
आयुधें	भुशुंडी	गदा	खड्ग	दंड	धनुष्य	तोमर	कुंत	पाश	अंकुश	तलवार	तीर
पात्रें	सुवर्ण	रुपें	ताम्र	कांसें	लोह	खापर	पत्र	वस्त्र	कर	भूमि	काष्ठ
भक्षणें	अन्न	पायस	भक्ष्य	पक्वान्न	पय	दहीं	चित्रान्न	गूळ	मध	तूप	साखर
लेपनें	कस्तुरी	कुंकूं	चंदन	मोती	गोरोच	मलया	हळद	काजळ	शेंदूर	अगरु	कापुर
वर्ण	देव	भूत	सर्प	पशु	मृग	विप्र	क्षत्री	वैश्य	शूद्र	मिश्र	अंत्यज
पुष्पें	पुन्नाग	जाई	बकुळ	केवडा	बेल	रुई	कमळ	दूर्वा	मोगरा	पाटली	जास्वंद
भूषणें	विरोद्या	कांकण	मोत्यें	पोंवळीं	मुकुट	मणी	गुंजा	वराट्य	नीळ	पाच	सुवर्ण
कंचुकी	विचित्र	पर्ण	हिरवी	भूर्जपत्र	सीत	पांढरी	नील	कृष्ण	चर्म	वल्कल	पांडुर
वयें	बाल	कुमारी.	गताल.	युवा	प्रौढा.	प्रगल्भा	वृद्धा	वंध्या	आतवं०	पुत्रव.	संन्याशी

फलश्रुति.

वाहनादिबुधैर्ज्ञेयमथोक्रांतिविशेषतः ॥
वाहनादिकवस्तूनांसंक्रमात्तुविनाशता ॥ १ ॥

टीका—ज्या वाहनावर बसेल आणि ज्या वस्तु धारण करील त्यांचा नाश आहे.

मुहूर्त. संक्रांति किती मुहूर्तीं होते त्यांचीं नक्षत्रें व फळें वेगवेगळालीं सांगतों.

संक्रांतौमूर्तिभेदाहरपवनमेवारुणेसार्पऐंद्रेएषापंचेंदुसंज्ञागुरुकरपितृभेचाग्निदस्रेचसौम्ये ॥ त्वाष्ट्रेमैत्रेचमूलेश्रुतिवसुवपुषात्रीणिपूर्वाखरामैर्ब्राम्ह्येदित्येद्विदैवेभवतिशरकृतादुत्तरात्रीणिऋक्षम् ॥ १ ॥

बाणवेदैःसमर्घस्यान्मध्यस्थंव्योमरामयोः ॥
मूर्तौपंचदशेयातेदुर्भिक्षंचप्रजायते ॥ २ ॥

टीका—१५ मुहूर्त म्हणजे आर्द्रा, स्वाती, भरणी, शततारका, आश्लेषा, ज्येष्ठा या नक्षत्रीं जाहली तर दुर्भिक्षता प्रजेस जाणावी; आणि ३० मुहूर्त म्हणजे पुष्य, हस्त, मघा, कृत्तिका, अश्विनी, मृग, चित्रा, अनुराधा, मूळ, श्रवण, धनिष्ठा, रेवती, तीन पूर्वा या नक्षत्रांवर जाहली असतां धारण मध्यम जाणावी; ४५ मुहूर्त म्हणजे रोहिणी, पुनर्वसु, विशाखा, ३ उत्तरा, या नक्षत्रीं जाहली तर स्वस्थता असावी.

दुसरा प्रकार.

पूर्वसंक्रांतिनक्षत्रात्परसंक्रांतिऋक्षकम् ॥
द्वित्रिसंख्यासमर्घस्याच्चतुःपंचमहर्घता ॥ १ ॥

टीका—गतमास दिनसंक्रांति नक्षत्र आणि प्राप्तसंक्रांति दिननक्षत्र यांचें अंतर २ अथवा ३ आलें असतां स्वस्थता, आणि ४ अथवा ५ नक्षत्रांचें अंतर आलें असतां महर्घता.

धान्य घेण्याचें.

संक्रांतिनाड्यातिथिवारऋक्षधान्याक्षरंवह्निहरेत्तुभागम् ॥
संक्रांतिनाडीनवमिश्रिताचसप्ताहतापावकभाजिताच ॥
एकेसमर्घंद्वितयेचसौम्यंशून्येमहर्घंमुनयोवदंति ॥ १ ॥

टीका—संक्रांतीच्या घटिका आणि गततिथी, वार, नक्षत्रें व धान्याचीं अक्षरें मोजून एकत्र करून ३ नीं भागावें; असें एक मत. दुसऱ्या मतानें संक्रांतिनाडि मोजून त्यांत ९ मिळवावे आणि सातांनीं गुणावें; मग ३ नीं भागावें. शेष उरेल त्याचें फळः—१ शेष धान्याची स्वस्थता असेल, २ शेष मध्यम असेल; ० शेष महर्घता जाणावी.

नक्षत्रपरत्वें संक्रांतीची पीडा.

संक्रांत्यधरनक्षत्राद्गणयेज्जन्मभावधि ॥ त्रिकंषट्कंत्रिकंषट्कं
त्रिकंषट्कंपुनःपुनः ॥ पंथाभोगोव्यथावस्त्रंहानिश्चविपुलंधनम् ॥१॥

टीका—संक्रांतीचे अधरनक्षत्रापासून जन्मनक्षत्रापावेतों मोजावयाची रीतीः— प्रथम ३ पंथा, ६ भोग, ३ व्यथा, ६ वस्त्र, ३ हानि व ६ धनप्राप्ति या रीतिनें.

जन्मर्क्षाचें फळ.

यस्यजन्मर्क्षमासाद्यतिथौसंक्रमणंभवेत् ॥
तन्मासाभ्यंतरेतस्यवैरंक्लेशंधनक्षयः ॥

टीका—जन्मनक्षत्रीं संक्रांति जाहली तर वैर पडेल, मासांत जाहली ह्मणजे क्लेश; तिथीवर जाहली असतां धनाचा क्षय जाणावा.

संक्रांतीचें स्वरूप.

षष्टियोजनविस्तीर्णासंक्रांतिःपुरुषाकृतिः ॥ एकवक्त्रानवभुजा
लंबोष्टीदीर्घनासिका ॥१॥ पृष्ठालोकाभ्रमंत्येवगृहीत्वाखर्परंकरे ॥
एवंसंक्रमणेयस्याःफलंप्रोक्तंमनीषिभिः ॥ २ ॥

टीका—शरीर साठ योजनें लांब, रुंद, पुरुषांची आकृति, एक तोंड, ९ भुजा ओंठ लांब, नासिक लांब आणि लक्षणें—पुढें पाहते, मागें चालते, हातांत खापर आणि भ्रमण करिते अशीं जाणावीं.

हातांत फळ कसें त्याविषयीं.

मेषालिकर्केचतथैवरक्तंचापेचमीनेचतुलेचपीतम् ॥
श्वेतंवृषेस्त्रीमिथुनेचचन्द्रेकृष्णंनचक्रेथघटेचसिंहे ॥ १ ॥
रक्तफलेभवेद्दुःखंश्वेतेचैवसुखंशुभम् ॥ पीतेश्रीस्तुतथा
प्रोक्ताश्यामेमृत्युर्नसंशयः ॥ २ ॥

टीका--मेष वृश्चिक, कर्क या राशीचा चंद्र असतां संक्रांतीचा प्रवेश जाहला तर तिचे हातांत आरक्तवर्णाचें फळ आहे तेणेंकरून दुःखप्राप्ति; आणि धनु, मीन, तुला, पिंवळे वर्णाचें फळ, लक्ष्मीप्राप्ति; वृषभ कन्या मिथुन शुभ्रवर्णाचें फळ, सुख व शुभप्राप्ति; मकर, कुंभ आणि सिंह कृष्णवर्णाचें फळ, मृत्युप्राप्ति हीं फळें राशिपरत्वें जनांनीं ध्यावीं.

राशिपरत्वें चंद्र.

याद्दशेनहिमरश्मिमालिनासंक्रमोभवतितिग्मरोचिषा ॥
ताद्दशंफलमवाप्नुयानरःसाध्वसाध्वपिवशेनशीतगोः ॥ १ ॥

टीका--जसा चंद्र अष्टमस्थानीं अथवा उत्तम स्थानीं असतां फळ देतो तसेंच चंद्रपरत्वें संक्रांतीचें शुभाशुभ फळ घ्यावें.

पुण्यकाळ.

पूर्वतोऽपिहिरवेःसुसंक्रमात्पुण्यकालघटिकास्तुषोडश ॥
अर्धरात्रिसमयादनंतरंसंक्रमोपरदिनंहिपुण्यदम् ॥ १ ॥

टीका--सोळा घटका पुण्यकाळ संक्रांत दिवसास जाहली तर आणि मध्यरात्रीस जाहली तर दुसरे दिवशीं पुण्यकाळ.

ग्रहणप्रकरण. चंद्रग्रहणाची प्रवृत्ति.

भानोःपंचदशेऋक्षेचंद्रमायदितिष्ठति ॥
पौर्णमास्यानिशाशेषेचंद्रग्रहणमादिशेत् ॥ १ ॥

टीका--सूर्यनक्षत्रापासून पंधरावें चंद्रनक्षत्र आणि पौर्णिमा सरून रात्रि शेष राहिली तर चंद्रग्रहण त्या रात्रीस येईल.

सूर्यग्रहण.

मघोनंग्रस्तनक्षत्रात्षोडशंयदिसूर्यभम् ॥
अमावास्यादिवाशेषेसूर्यग्रहणमादिशेत् ॥ १ ॥

टीका--सर्व महिन्यांचे अमावास्येस सूर्य आणि चंद्र एका राशीस येतात परंतु ग्रहणकाळीं एके नक्षत्रीं दिवसास येऊन अमावास्या सरून दिवस शेष राहिला असतां

सूर्यग्रहणसंधि होत्ये. त्या दिवशीं चंद्रनक्षत्रापासून सूर्यनक्षत्रापावेतों मोजून आंतून अकरा काढून शेष सोळावें सूर्यनक्षत्र आलें ह्मणजे सूर्यग्रहण होतें.

राशिपरत्वें शुभाशुभ फळें.

त्रिषट्दशायोपगतंनराणांशुभप्रदंस्याद्ग्रहणंरवींद्वोः ॥
द्विसप्तनंदेषुचमध्यमंस्याच्छेषेष्वनिष्टंमुनयोवदंति ॥ १ ॥

टीका—सूर्य अथवा चंद्रग्रहण आपले राशीपासून ज्या राशीस होईल त्या राशी ३,६,१०, ह्या शुभ होत; २,७,९ ह्या मध्यम आणि एक, चार, पांच, आठ, अकरा, बारा ह्या राशी नष्ट होत.

दुसरा पक्ष.

ग्रासात्तृतीयोऽष्टमगश्चतुर्थस्तथायसंस्थःशुभदःस्वराशिः ॥
ग्रासाद्रविःपंचनवर्तुमध्यस्ततोधमोक्ताश्चबुधैश्चशेषाः ॥ १ ॥

टीका—ज्या राशीस सूर्यग्रहण होईल त्या राशीपासून आपले राशीपावेतों. ३,८,४,११ हे उत्तम होत; ५,९,६ हे मध्यम होत आणि १,२,७,१०,१२ कनिष्ठ ज्या राशींत येईल त्याप्रमाणें फळ होय.

प्रयोग.

ऋतुप्रकरण, शुभाशुभ फळें.

तिथिरेकगुणाप्रोक्तानक्षत्रंचचतुर्गुणम् ॥
वारस्तुषड्गुणोज्ञेयोमासश्चाष्टगुणःस्मृतः ॥ १ ॥
वस्त्रंशतगुणंविद्याद्दर्शनंचततोऽधिकम् ॥ २ ॥

टीका—तिथीचा गुण एक, नक्षत्राचे गुण ४, वाराचे ६ मासाचे ८, वस्त्राचे १०० आणि विटाळाचे रक्ताचे गुण सर्वांहून अधिक; परंतु चांगला दिवस असला तर चांगले गुण आणि दुष्ट असला तर वाईट गुण जाणावे.

मासफल.

आर्तवेप्रथमेचैत्रेवैधव्यंजायतेध्रुवम् ॥ वैशाखेधनवृद्धिःस्याज्ज्येष्ठे रोगान्विताभवेत् ॥ ३ ॥ आषाढेमृतवत्साचश्रावणेधनसंयुता ॥ भाद्रपदेदुर्भगानारीआश्विनेधनधान्यभाक् ॥ ४ ॥ कार्तिकेनिर्धनाप्रोक्तामार्गशीर्षेबहुप्रजा ॥ पौषेचपुंश्चलीनारीमाघेपुत्रवतीभवेत् ॥ फाल्गुनेपुत्रसंपन्नाज्ञेयंमासफलंबुधैः ॥ ५ ॥

टीका–चैत्रमासांत ऋतु प्राप्त झाला असतां वैधव्य, वैशाखमासीं धनवृद्धि, ज्येष्ठमासीं रोगप्राप्ति, आषाढमासीं मृतप्रजा, श्रावणांत लक्ष्मीदायक, भाद्रपदमासीं दरिद्री, अश्विनमासीं धनधान्ययुक्त, कार्तिकमासीं निर्धन, मार्गशीर्षमासीं बहुप्रजा, पौषमासीं जारकर्मी, माघमासीं पुत्रवती, फाल्गुनमासीं पुत्रसंपन्ना असें जाणावें.

तिथिफळ.

शुचिर्नारीप्रतिपदिद्वितीयायांतुदुःखिनी ॥ तृतीयायांपुत्रवती चतुर्थ्यांविधवाभवेत् ॥ ६ ॥ पंचम्यांचैवसौभाग्यंषष्ठ्यांकार्य विनाशिनी ॥ सप्तम्यांसुप्रजानारीचाष्टम्यांराक्षसीतथा ॥ ७ ॥ नवम्यांविधवानारीदशम्यांसौख्यभोगिनी ॥ एकादश्यांशु चिर्नारीद्वादश्यांमरणंध्रुवम् ॥ ८ ॥ त्रयोदश्यांशुभाप्रोक्ताचतुर्द श्यांपरान्विता ॥ पौर्णमास्याममावास्यांचशुभांचशुभमेवच ॥ ९ ॥

टीका—प्रतिपदेस ऋतु प्राप्त झाला असतां शुचि, द्वितीया दुःखदायक, तृतीया पुत्रवती, चतुर्थी विधवा, पंचमी सौभाग्यवती, षष्ठी कार्यनाशिनी, सप्तमी सुप्रजा प्रसूति, अष्टमी राक्षसी, नवमी विधवा, दशमी सौख्यभोगिनी, एकादशी शुचि, द्वादशी मरण, त्रयोदशी शुभा, चतुर्दशी जारिणी, पौर्णिमा शुभा, अमावास्या अशुभ असें जाणावें.

ग्रहण आणि संक्रांति यांचें फळ.

संक्रांत्यांग्रहणेचैववैरिणीचगतालका ॥

टीका—संक्रांतीवर प्रथम ऋतु प्राप्त झाला असतां वैरिणी; ग्रहणावर झाला असतां विधवा असें जाणावें.

वारफल.

आदित्येविधवानारीसोमेचैवमृतप्रजा ॥ मंगलेआत्मघातीस्या द्बुधेकन्याप्रसूःस्मृता ॥ १० ॥ गुरुवारेसुतप्राप्तिःकन्यापुत्रयुता भृगौ ॥ मंदेचपुंश्चलीनारीज्ञेयंवारफलंशुभम् ॥ ११ ॥

टीका—रविवारीं ऋतु प्राप्त झाला असतां विधवा, सोमवारीं मृतप्रजा, भौमवारीं आत्मघातकी, बुधवारीं कन्याप्रसूति होईल, गुरुवारीं पुत्रप्रसूति, भृगुवारीं कन्यापुत्रप्रसूति, शनिवारीं जारकर्मी असें जाणावें.

नक्षत्रफळ.

अश्विन्यांसुभगानारीभरण्यांविधवाभवेत् ॥ कृत्तिकायांचव न्ध्यास्याद्रोहिण्यांचारुभाषिणी ॥ १२ ॥ मृगेदारिद्र्ययुक्तो क्ताचार्द्रायांक्रोधकारिणी ॥ पुनर्वसौपुत्रवतीपुष्येपुत्रधनेश्वरी ॥ १३ ॥ आश्लेषायांभवेद्वंध्यामघायांचार्थसंयुता ॥ पूर्वायांचा र्थयुक्ताहिचोत्तरायांसतीतथा ॥ १४ ॥ हस्तेपुत्रधनैर्युक्ताचित्रा यामनुचारिणी॥स्वात्यान्यगर्भावयवाविशाखायांतुनिष्ठुरा॥१५॥ मैत्रेचदुर्भगानारीज्येष्ठायांविधवाभवेत् ॥ मूलेपतिव्रतासाध्वी पूर्वासौभाग्यभोगिनी ॥ १६ ॥ उत्तरार्थवतीप्रोक्ताश्रवेसौभा ग्यसंपदा ॥ धनिष्ठायांशुभानारीशतेभद्रान्वितावुधैः ॥ १७ ॥ पुंभेचोक्ताकामिनीतुउभेलक्ष्मीयुताशुभा ॥ रेवत्यांपतिरिक्ता तुज्ञेयंभानांफलंबुधैः ॥ १८ ॥

टीका—अश्विनीनक्षत्रीं ऋतु प्राप्त झाला असतां शुभ, भरणीवर विधवा, कृत्तिकांवर वंध्या, रोहिणीवर प्रियभाषिणी, मृगावर दरिद्री, आर्द्रांवर क्रोधी, पुनर्वसूवर पुत्रप्राप्ति, पुष्यावर पुत्रधनवती, आश्लेषांवर वांझ, मघांवर अर्थप्राप्ति, पूर्वांवर अर्थयुक्त, उत्तरांवर सती, हस्तावर पुत्र धनप्राप्ति, चित्रांवर मनायोग्य चालणारी, स्वातीवर अन्यगर्भा, विशाखांवर निष्ठुर, अनुराधांवर दुर्भगा, ज्येष्ठांवर विधवा, मूळावर पतिव्रता, पुर्वाषाढांवर सौभाग्य, उत्तराषाढांवर लक्ष्मीदायक, श्रवणावर सौभाग्य, धनिष्ठांवर शुभा, शततारकांवर शुभा, पुर्वाभाद्रपदांवर उत्तम भोग, उत्तराभाद्रपदांवर लक्ष्मीप्राप्ति, रेवतीवर पतीवांचून असेल, असें जाणावें.

योगफल.

आद्यतौविधवानारीविष्कंभेचरजस्वला ॥ स्नेहःप्रीत्यातुदंपत्योरा युष्मांस्तुधनप्रदः ॥ १९ ॥ सौभाग्येपुत्रयुक्तातुशोभनेमंगला न्विता ॥ अतिगंडेतुविधवासुकर्मणितुशोभना ॥ २० ॥ धृतौ संपत्तियुक्ताचशूलेरोगयुताभवेत् ॥ गंडेदुःखान्वितानारीवृद्धौ पुत्रान्विताभवेत् ॥ २१ ॥ ध्रुवेतुशोभनानारीव्याघातेभर्तृघाति

नी ॥ हर्षणेनहर्षयुक्तातुवज्रेचैवानपत्यता ॥ २२ ॥ सिद्धौपुत्रान्विता नारीव्यतीपातेविभर्तृका॥मृतवत्साचवर्याणेपरीघेचाल्पजीविनी ॥ २३ ॥ शिवेपुत्रवतीनारीसिद्धेशीघ्रफलान्विता ॥ साध्येधर्मपरानारीशुभेशुभगुणान्विता ॥ २४ ॥ शुक्लेशुभकरानारी ब्रह्मणिस्वपतौरता ॥ ऐंद्रेदेवरसंयुक्तावैधव्यंवैधृतौस्मृतम् ॥ २५ ॥

टीका—विष्कंभयोगावर ऋतु प्राप्त झाला असतां विधवा, प्रीतियोगावर स्नेह, आयुष्मानावर धनप्राप्ति, सौभाग्यावर पुत्रवती, शोभनावर मंगल, अतिगंडावर विधवा, सुकर्मावर शुभ, धृतीवर संपत्ति, शूलावर भोगी, गंडावर दुःखान्विता, वृद्धीवर पुत्रप्राप्ति, ध्रुवावर शुभा, व्याघातावर पतिघातकी, हर्षणावर हर्षयुक्त, वज्रयोगावर वंध्या, सिद्धीवर पुत्रान्विता, व्यतीपातावर पतिवांचून असेल, वर्याणयोगावर मृतप्रजा, परिघावर अल्पजीवी, शिवयोगावर पुत्रवती, सिद्धीयोगावर शीघ्र फलप्राप्ति, साध्ययोगावर अधर्मी, शुभयोगावर गुणयुक्ता शुक्लयोगावर शुभकर्मी, ब्रह्मयोगावर स्वपतिरत, ऐंद्रावर दीराशीं रत, वैधृतीवर विधवा असें जाणावें.

करणफल.

बवेप्रोक्तातुवंध्यास्त्रीबालवेपुत्रसंपदः ॥ कौलवेपुंश्चलीनारीतैतिलेचारुभाषिणी ॥ २६ ॥ गरेचगुणसंपन्नावणिजेपुत्रिणी स्मृता ॥ विष्टयाचमृतवत्साचशकुनेकामपीडिता ॥ २७ ॥ चतुष्पदेशुभानारीनागेपुत्रवतीभवेत् ॥ व्यभिचारिणीतुकिंस्तुघ्नेकरणानांशुभंफलम् ॥ २८ ॥

टीका—बव करणावर ऋतु प्राप्त झाला असतां वंध्या, बालवावर पुत्रप्राप्ति, कौलवावर वेश्या, तैतिलावर प्रियभाषिणी, गरावर गुणसंपन्ना, वणिजावर पुत्रीणी विष्टीवर मृतवत्सा, शकुनीवर कामातुरा, चतुष्पदावर शुभा, नागावर पुत्रवती, किंस्तुघ्नावर जारिणी जाणावी.

राशिफल.

व्यभिचारीरतामेषेवृषभेस्वभोगिनी ॥ मिथुनेधनयुक्तोक्ताकर्कटेदुःखताबुधैः॥२९॥सिंहेपुत्रवतीनारीकन्यायांमालिनीशुभा॥ तुलेविचक्षणानारीवृश्चिकेव्यभिचारिणी ॥ ३० ॥ धनेपतिव्रता ज्ञेयामांसहीनाचमकरे॥कुंभेधर्मवतीज्ञेयामीनेचचपलाबुधैः॥३१॥

टीका—मेषराशीवर ऋतु प्राप्त झाला असतां जारिणी, वृषभावर सुखभोगिनी, मिथुनावर धनयुक्ता, कर्कावर दुःखी, सिंहावर पुत्रवती, कन्यावर अभिमानी, तूळावर विचक्षणा, वृश्चिकावर जारिणी, धनावर पतिव्रता, मकरावर कृशा, कुंभावर धनवती, मीनावर चपला; असें जाणावें.

होराफल.

सूर्येचव्याधिसंयुक्ताचांद्रेहोरेपतीव्रता ॥ कुजेहोरेतुदौर्भाग्यंबु
धेहोरेतुपुत्रिणी ॥ ३२ ॥ जीवेसर्वसमृद्धिःस्याद्भृगौसौभाग्य
मेवच ॥ शनौसर्वविनाशायहोरकस्यफलंबुधैः ॥ ३३ ॥

होरा	फळ	होरा	फळ
रवीचा होरा	व्याधि	गुरूचा होरा	सर्वसमृद्धि
सोमाचा होरा	पतिव्रता	शुक्राचा होरा	सौभाग्य
भौमाचा होरा	दुर्भगा	शनीचा होरा	सर्वविनाशी
बुधाचा होरा	पुत्रवती		

लग्नफल.

मेषलग्नेदरीद्राचवृषभेधनसंयुता ॥ कामिनीमिथुनेलग्नेकर्कटेप
तिनाशिका ॥ ३४ ॥ सिंहेपुत्रप्रसूताचपतियुक्तास्त्रिलग्नके ॥
तुलेचैवांधतादाथीवृश्चिकेदद्रुदुःखिनी ॥३५॥ धनुर्लग्नेधनैश्वर्य
मकरेकर्कशाभवेत् ॥ कुंभेवंशक्षयघ्नीचमीनेसर्वगुणान्विता ॥ ३६ ॥

टीका—संक्रांति चालती असेल तेंच लग्न प्रथम जाणावें आणि मेषादि क्रमानें फल पहावें. १ दरिद्रता, २ धनयुक्ता, ३ कामिनी, ४ पतिनाशकी, ५ पुत्रप्रसूता, ६ पतियुक्ता ७ अंधतादायिनी, ८ दद्रुदुःखिनी, ९ धनैश्वर्ययुता, १० कर्कशा, ११ वंशक्षयनाशिनी १२ गुणयुक्ता.

ग्रहांचें फल.

लग्नेराहुश्वसौरिश्वरविचंद्रौतथैवतु ॥
तदासाविधवानारीसर्वसौभाग्यवर्जिता ॥ ३७ ॥

टीका—ज्या लग्नीं स्त्रियांस प्रथम ऋतु प्राप्त होईल त्या लग्नीं राहु अथवा शनि रवि, चंद्र, या ४ ग्रहांतून एक ग्रह जरी असला तरी त्या स्त्रीस वैधव्य प्राप्त होईल.

रक्तफल.

शोणितेबिंदुमात्रेणस्वैरिणीचाल्पशोणिता ॥ रक्तेरक्तेभवेत्पुत्रः कृष्णेचैवमृतप्रजा ॥ ३८ ॥ पिच्छलीचभवेद्वंध्याकाकवंध्याच पांडुरे ॥ पीतेदुश्चारिणोज्ञेयासुभगागुंजसद्दशे ॥ ३९ ॥ सिंदूर वर्णेरक्तेतुकन्यासंततिरेवच ॥

टीका—प्रथम ऋतु प्राप्त होतो त्या समयीं त्याचा अल्पवर्ण असला तर त्याचें फळ स्वैरिणी, तांबडा असल्यास पुत्रवती, काळ्यास मृतप्रजा, पिच्छलीस वांझ पांढरा असल्यास काकवंध्या, पिंवळ्यास दुराचरणी, गुंजेसारिखा असल्यास त्याचें फळ सुभगा, सिंदूरवर्णास कन्यासंतति या प्रकारें प्रळश्रुति जाणावी.

काळफल.

पूर्वाह्णेसुभगाप्रोक्तामध्याह्णेचैवनिर्धना ॥ अपराह्णेशुभाचैव सायाह्णेसर्वभोगिनी ॥ ४० ॥ संध्ययोरुभयोर्वेश्यानिशीथेवि धवाभवेत् ॥ पूर्वरात्रेतथावंध्यादुर्भगासर्वसंधिषु ॥ ४१ ॥

टीका—प्रथम ऋतु प्रातःकाळीं प्राप्त झाला असला तर सुभगा, मध्यान्हीं झाल्यास निर्धना, तिसरे प्रहरींचें फळ शुभ, सायंकाळीचें फळ सर्वभोगी, उभयसंधीस वेश्या, मध्यरात्रीस विधवा, पूर्वरात्रीस वांझ, सर्वसंधीस दुर्भगा अशीं फळें जाणावीं.

नेसलेल्या वस्त्राचें फळ.

सुभगाश्वेतवस्त्राचरोगिणीरक्तवस्त्रका ॥ नीलांबरधरानारीवि धवापुष्पवंतिका ॥ ४२ ॥ भोगिनीपीतवस्त्राचमिश्रवस्त्रावर प्रिया ॥ सूक्ष्मास्यात्सूक्ष्मवस्त्राचदृढवस्त्रापतिव्रता ॥ ४३ ॥ दुर्भगाजीर्णवस्त्राचसुभगामध्यवाससा ॥ धौतवस्त्राशुभानारी मलिनेमलिनाभवेत् ॥ ४४ ॥

टीका—प्रथम ऋतु पांढरे वस्त्रावर प्राप्त झाला तर सुभगा, तांबड्यावर रोगी, निळ्यावर विधवा, (पुष्पवंतिका ह्मणजे ऋतुमती) पिंवळ्यावर भोगिनी, मिश्र वर्णावर पतिप्रिया, बारीक असल्यास शरीर कृश, बळकटवस्त्रावर पतिव्रता, जुन्या फाटक्यावर दुर्भगा, मध्यमावर सुभगा, धुतलेल्यावर शुभ, मळकट वस्त्र असल्यास मलीन फळ जाणावें.

लग्नगंडांत.

कुलीरसिंहयोःकीटचापयोर्मीनमेषयोः॥
गंडांतमंतरालंस्याद्धटिकार्धंमृतिपदम् ॥ १ ॥

टीका—कर्क व सिंह या दोहोंलग्नाची संधी अर्ध अर्ध घटिका याच क्रमानें वृश्चिक आणि धन, तसेंच मीन व मेष यांची एक घटिकात्मक संधि वर्ज करावी, ती मृत्युप्रद होय.

नक्षत्रगंडांत.

पौष्णाश्विन्योःसार्पपित्र्यर्क्षयोश्चयच्चज्येष्ठामूलयोरंतरालम् ॥
तद्गंडांतंस्याच्चतुर्नाडिकंहियात्राजन्मोद्वाहकालेष्वनिष्टम् ॥ १ ॥

टीका—रेवती, अश्विनी यांच्या दोन घटिका संधीच्या. याच क्रमानें आश्लेषा, मघा, ज्येष्ठा, मूळ अशा संधीच्या चार घटिका वर्जाव्या. असें हें त्रिविध गंडांत ह्मणजे तिथि, लग्न नक्षत्र अशीं तीन प्रकरणें वर सांगितलीं आहेत तीं यात्रेस जाण्यास, जन्मकाळीं आणि विवाहास वर्जावीं.

जातक.

जन्मकाळाचीं शुभाशुभ फळें व गंडांत.

अश्विनीमघमूलानांपूर्वार्द्धेबाध्यतेपिता ॥ पूषादिचक्रपश्चार्द्धे जननीबाध्यतेशिशोः ॥ १ ॥ सर्वेषांगंडजातानांपरित्यागोविधीयते ॥ वर्जयेद्दर्शनंशावंतच्चषाण्मासिकंभवेत् ॥ २ ॥

टीका—अश्विनी, मघा, मूळ, या नक्षत्रांचे पूर्वार्धीं जन्म झालें तर बापास वाईट आणि रेवती ज्येष्ठा या दोन नक्षत्रांचे उत्तरार्धीं जन्म झाल्यावर मातेस वाईट आणि गंडांतांत जन्म झाल्यास मुलाचा त्याग करावा. अथवा सहा महिने तोंड पाहूं नये.

कृष्णचतुर्दशीचें फळ.

कृष्णपक्षेचतुर्दश्यांप्रसूतेःषड्विधंफलम् ॥ चतुर्दशींचषड्भागांकुर्यादादौशुभंस्मृतम् ॥३॥ द्वितीयेपितरंहंतितृतीयेमातरंतथा ॥ चतुर्थेमातुलंहंतिपंचमेवंशनाशनम् ॥ ४ ॥ षष्ठेचधनहानिःस्यादात्मनोवंशनाशनम् ॥ ५ ॥

टीका—कृष्णचतुर्दशीस जन्म झाल्यास तिथीचे सहा भाग करावे त्यांचीं फळें प्रथम भाग १० घटिकांचा शुभ द्वितीय पित्यास वाईट, तृतीय मातेस, चतुर्थ मातुलास पांचवा वंशास, सहावा धनहानी, आत्मवंशनाशक असें जाणावें.

अमावास्येचें फळ.

सिनीवाल्यांप्रसूताश्वदासीभार्यापशुस्तथा ॥ गजाश्वमहिषीचैवशक्रस्यापिश्रियंहरेत् ॥६॥ कुहूप्रसूतिरत्यर्थंसर्वदोषकरीस्मृता ॥ यस्यप्रसूतिरेतेषांतस्यायुर्धननाशनम् ॥ ७ ॥ सर्वगंडसमस्तत्रदोषस्तुप्रबलोभवेत् ॥

टीका—चतुर्दशीयुक्त अमावास्येस दासी, अथवा भार्या, गाय, हत्तीण, घोडी, म्हैस हीं प्रसूत झालीं असतां स्वामीची संपत्ति जाईल. अमावास्येस प्रसूति झाली असतां पुष्कळ दोष आणि स्वामीच्या आयुष्याचा नाश. धनाचा नाश आणि गंडांताच्या प्रसूतिकाळीं बहुत दोष.

दिनाक्षयादि.

दिनक्षयेव्यतीपातेव्याघातेविष्टिवैधृतौ ॥ शूलेगंडेऽतिगंडेचपरिघेयमघंटके ॥ ८ ॥ कालगंडेमृत्युयोगेदग्धयोगेसुदारुणे ॥ तस्मिन्गंडदिनेप्राप्तेप्रसूतिर्यदिजायते ॥ ९ ॥ अतिदोषकरी प्रोक्तातत्रपापप्रसुतासती ॥

टीका–दिनक्षय, व्यतीपात, व्याघात, कल्याणी, वैधृती, शूल, गंड, अतिगंड, परिघ, यमघंट, कालघंट, मृत्युयोग, दग्धयोग आणि दारुणयोग यांजवर जन्म, जाहलें तर मोठा दोष आणि ती स्त्री पापयुक्त असें जाणावें.

ज्येष्ठानक्षत्राचें फळ.

ज्येष्ठादौजननीमाताद्वितीयेजननीपिता ॥ तृतीयेजननीभ्राता स्वयंमाताचतुर्थके ॥ १० ॥ आत्मानंपंचमेहंतिषष्ठेगोत्रक्षयो भवेत् ॥ सप्तमेचोभयकुलंज्येष्ठभ्रातरमष्टमे ॥ ११ ॥ नवमेश्वशुरंहंतिसर्वंहंतिदशांशके ॥ १२ ॥

टीका—ज्येष्ठानक्षत्रावर जन्म झालें असल्यास त्याचे सहा घटिका प्रमाणें दहा भाग करावे. त्यांचें फळ असें:—प्रथम भाग मातेचे आईस, दुसरा भाग आईचे बापास, तिसरा भाग मामास, ४ भाग मातेस, ५ वा भाग मुलास, ६ वा भाग गोत्रजांस, ७ वा भाग आईचे कुळास, ८ वा भाग वडील भावास, ९ वा भाग श्वशुरास, १० वा भाग सर्वांस वाईट असें जाणावें.

मूलनक्षत्राचें फळ.

मूलंस्तंभंत्वक्चशाखापत्रंपुष्पंफलंशिखा ॥ वेदाश्वमुनयश्चैवदि
शश्ववसवस्तथा ॥१३॥ नंदाबाणरसारुद्रामूलभेदाःप्रकीर्तिताः॥
मूलेमूलविनाशायस्तंभेहानिर्धनक्षयः ॥ १४ ॥ त्वचिभ्रातृ
विनाशायशाखामातुर्विनाशकृत् ॥ १५ ॥ पत्रेसपरिवारःस्या
त्पुष्पेषुनृपवल्लभः॥फलेषुलभतेराज्यंशिखायामल्पजीवितम् ॥१६॥

टीका—मूळनक्षत्रास मूळवृक्ष असें नाम आहे. त्याच्या घटी ६० त्यांचीं स्थानें अशीं:—प्रथम ४ घटिका वृक्षाचें मूळ. त्यांत जन्म जाहलें असतां नाश; द्वितीय भाग ७ घ० स्तंभ, हानि आणि धनाचा नाश; तिसरा भाग १० घ० साल, भावास वाईट; चवथा भाग ८ घ० वृक्षाच्या खांद्या, मातेस वाईट; पांचवा भाग ९ घ० वृक्षपत्रें, परिवारास वाईट; सहावा भाग ६ घ० वृक्षपुष्पें, राजमंत्री; सातवा भाग ६ घ० वृक्षफल, राज्यप्राप्ति; अठवा भाग ११ घ० वृक्षाचे शेंड्यांत, जन्म जाहलें असतां अल्पायुषी; असें साठी घटिकांचें मान जाणावें.

जन्मकाळीं मूलनक्षत्र कोणते लोकीं आहे तें पहावयाचीं लग्नें.

वृषालिसिंहेघुघटेचमूलंदिविस्थितंयुग्मतुलांगनांत्ये ॥
पातालगंमेषधनुःकुलीरनक्रेषुमर्त्येष्वतिसंस्मरंति ॥ १७ ॥

टीका—वृषभ, वृश्चिक, सिंह, कुंभ या चोहोंतून एखादे लग्नीं जन्म जाहलें असतां त्या दिवशीं मूळनक्षत्र स्वर्गीं आहे, त्याचें फळ राज्यप्राप्ति. आणि मिथुन, तूळ, कन्या, मीन या लग्नीं जन्म जाहलें असतां पाताळीं आहे. त्या लग्नांचें फळ धनप्राप्ति. आणि मेष, धन, कर्क, मकर या लग्नीं जन्म जाहलें तर मृत्युलोकीं आहे, त्यांचें फळ सर्व कुटुंबास वाईट. असें १२ लग्नांचें फळ वेगळें जाणावें.

आश्लेषानक्षत्राचा नराकारवृक्ष.

मूर्द्धास्यनेत्रगलकांसयुगंचबाहुहृज्जानुगुह्यपदमित्यहिदेहभागाः ॥ बाणाद्रिनेत्रहुतभुक्श्रुतिनागरुद्रषण्नंदपंचशिरसः क्रमशस्तुनाड्यः ॥ १८ ॥ राज्यंपितृक्षयोमातृनाशः कामप्रियारतिः ॥ पितृभक्तोबलीस्वघ्नस्त्यागीभोगीधनीक्रमात् ॥ १९ ॥

टीका—आश्लेषा नक्षत्राच्या घटिकांचीं नराकारस्थानें. प्रथम ५ घटिका मस्तक त्याचें फळ राज्यप्राप्ति, द्वितीय ७ घ० मुख, हें बापास वाईट; तिसरा विभाग २ घ० नेत्र, हा मातेस वाईट; चवथा विभाग ३ घ० गळा, त्याचें फळ स्त्रीरत; पांचवा विभाग ४ घ० दोन्ही खांदे, हा पितृभक्त; सहावा विभाग ८ घ० दोन्ही बाहु, फळ बळकट; सातवा विभाग ११ घ० हृदय, आत्मघाती; अठवा वि० ६ घ० दोन्ही ढोंपरें, त्यागी; नववा वि० घ० ९ गुह्य भोगी; दहावा वि० ५ घ० दोनही पाय, धनवान्; ज्या भागांत जन्म होईल त्याचें फळ स्थानपरत्व घ्यावें.

जन्मकाळीं ग्रह जसे पडतील त्यांचीं फळें.

तनुस्थान ॥ ॥ लग्नस्थतोदिनकरःकुरुतेंगपीडांपृथ्वीसुतोवितनुतेरुधिरप्रकोपम् ॥ छायासुतःप्रकुरुतेबहुदुःखभाजंजीवेंदुभार्गवबुधाःसुखकांतिदाःस्युः ॥ १ ॥ धनस्थान ॥ दुःखावहाधनविनाशकराःप्रदिष्टावित्तेस्थितारविशनैश्वरभूमिपुत्राः ॥ चंद्रोबुधःसुरगुरुर्भृगुनंदनोवानानाविधंधनचयंकुरुतेधनस्थः ॥ २ ॥ सहज स्थान॥ भानुःकरोतिविरुजंरजनीकरोऽपिकीर्त्यायुतंक्षितिसुतः प्रचुरप्रकोपम् ॥ ऋद्धिंबुधःसुधिषणंसुविनीतवेषंस्त्रीणांप्रियंगुरुकवीरविजस्तृतीये ॥ ३ ॥ ॥ सुहृत्स्थान ॥ ॥ आदित्यभौमशनयःसुखवर्जितांगंकुर्वंतिजन्मनिनरंसुचिरंचतुर्थे ॥ सोमोबुधःसुरगुरुर्भृगुनंदनोवासौख्यान्वितंचनृपकर्मरतप्रधानम् ॥ ४ ॥ सुतस्थान ॥ पुत्रेरविःप्रचुरकोपयुतंबुधश्चस्वल्पात्मजंशनिधरातनुजावपुत्रम् ॥ शुक्रेंदुदेवगुरवःसुतधामसंस्थाःकुर्वंतिपुत्रबहुलंसुखिनंसुरूपम् ॥ ॥ रिपुस्थान ॥ ५ ॥ मार्तंडभूमितनुजौहतशत्रुपक्षंपंगुर्नरंरिपुगृहेष्वतिपूजनीयम् ॥ काव्येंदुजौ मतिविहीनमनल्परोगंजीवःकरोतिविकलंमरणंशशांकः ॥ ६ ॥ जायास्थान ॥

तिग्मांशुभौमरविजाःकिलसप्तमस्थाजायांकुकर्मनिरतांतनुसंतातिं च ॥ जीवेंदुभार्गवबुधाबहुपुत्रयुक्तांरूपान्वितांजनमनोहररूपशालाम् ॥ ७ ॥ मृत्युस्थान ॥ सर्वेग्रहादिनकरप्रमुखानितान्तंमृत्युस्थिताविततुतेकिलदुष्टबुद्धिम् ॥शस्त्राभिघातपरिपीडितगात्रयष्टिंसौख्यैर्विहीनमतिरोगगणैरुपेतम् ॥ ८ ॥ धर्मस्थान ॥ धर्मस्थितारविशनैश्वरभूमिपुत्राःकुर्वंतिधर्मरहितंविमतिंकुशीलम् ॥ चंद्रोबुधोभृगुसुतःसुरराजमंत्रीधर्मक्रियासुनिरतंकुरुतेमनुष्यम् ॥९॥ ॥ कर्मस्थान ॥ ॥ आदित्यभौमशनयःकिलकर्मसंस्थाःकुर्युर्नरंबहुकुकर्मरतंकुपुत्रम् ॥चन्द्रःसुकीर्तिमुशनाबहुवित्तयुक्तंरूपान्वितंबुधगुरूशुभकर्मभाजम् ॥१०॥ लाभस्थान ॥ ॥ लाभस्थितोदिनकरोनृपलाभयुक्तंतारापतिर्बहुधनंक्षितिजःक्षितीशम् ॥ सौम्योविवेकसुभगंचधनायुषीज्यःशुक्रःकरोतिसुगुणंरविजःसुकीर्तिम् ॥ ॥ व्ययस्थान ॥ ॥सूर्यःकरोतिपुरुषंव्ययगोविशालंकाणंशशीक्षितिसुतोबहुपापभाजम् ॥ चंद्रांगजोगतधनंधिषणःकृशांगंशुक्रोबहुव्ययकरंरविजःसुतीव्रम् ॥ १२ ॥राहुकेतुफलंसर्वंमंदवत्कथितंबुधैः ॥

मुलांचे जन्मलग्नास मृत्युकारक ग्रह.

चन्द्राष्टमंचधरणीसुतसप्तमंचराहुर्नवंचशनिजन्मगुरुस्तृतीये ॥
अर्कस्तुपंचभृगुषष्ठबुधश्चतुर्थेजातोनजीवतिनरःप्रवदंतिसंतः ॥ १ ॥

टीका—जन्मलग्नापासून चंद्र अष्टमस्थानीं, भौम ७ स्थानीं, राहु ९ स्थानीं, शनि जन्मलग्नीं, गुरु ३ स्थानीं, सूर्य ५ स्थानीं, शुक्र ६ स्थानीं, बुध ४ स्थानीं असे ग्रह असले तर मूल वांचणार नाहीं.

जन्मलग्नीं मुलाचे बायकोस मृत्युकारक.

षष्ठेचभुवनेभौमोराहुःसप्तमसंभवः ॥
अष्टमेचयदासौरिस्तस्यभार्यानजीवति ॥ १ ॥

टीका—जन्मलग्नापासून षष्ठस्थानीं भौम, राहु ७ स्थानीं, शनि ८ स्थानीं असा योग ग्रहांचा असल्यास त्या मुलाची बायको वांचणार नाहीं.

पुरुषजातक कोष्टक.

जन्मलग्नीं तन्वादि द्वादशभावस्थानीं ज ज ग्रह पडतील त्यांचीं तीं पृथक् पृथक्

फळें जाणावयाचें कोष्टक. राहु केतु यांचीं फळें शनिवत् आहेत.

संख्या	स्थान	रवि	चन्द्र	मंगल	बुध	गुरु	शुक्र	शनि, राहु, केतु.
१	तनु	अंगपीडा	कांति आणि सु०	रक्तकोप	कांति आणि सु०	कांति आणि सु०	कांति आणि सु०	आतिदुःखदायक
२	धन	आतिदुःख व धनाचा नाश	संपत्ति अत्यंत प्राप्ति	दुःखप्राप्ति धनाचा नाश	नानाप्रकारची संपत्ति प्राप्ति	नानाप्रकारचो सम्पत्ति प्राप्ति	नानाप्रकारची सम्पत्ति प्राप्ति	आतिदुःख प्राप्त धनाचा नाश
३	सहज	निरोगी असेल	कीर्ति मिळवील	कोपयुक्त असेल	समृद्धि	सुबुद्धिवान्	नाना वेष धारण करील	स्त्रियांस प्रिय होईल
४	सुहृत्	शरीरास पीडा बहुत होईल	सुख भोगील	शरीरास पीडा बहुत होईल	सुख भोगील	सुख भोगील	सुख भोगील	शरीरास पीडा बहुत होईल
५	सुत	मोठा रागीट होईल	बहुत पुत्र होतील	सन्तती होणार नाहीं	अल्प पुत्रसन्तती होईल	बहुत पुत्र प्राप्ति	बहुत पुत्र होतील	सन्ततीच होणार नाहीं
६	रिपु	शत्रूचा नाश करील	मरण पावेल	शत्रूचा नाश करील	बुद्धिहीन, बहुत रोग असतील	शरीर विकलित असेल	बुद्धिहीन व रोगी बहुत	शत्रूचे गृहीं पूज्य होईल
७	जाया	वयकां दुष्टकर्मी संततीअल्प	स्त्रीरूपवान्–गुण० वान् व पुत्र गुण	स्त्री दुष्टकर्मी व संततीअल्प	स्त्री रूपवान् व मन हरण करणारी व बहुत पुत्र होतील अशी चांगलेस्वभावाची प्राप्त होईल.			स्त्री दुष्टकर्मी व संतती थोडी उ०
८	मृत्यु	सर्व ग्रहांचें फळ एकच आहे, दुष्टबुद्धि व शस्त्रघातें करून शरीरास पीडा होतील; सौख्यरहित असेल आणि रोगी असेल जो ग्रह ज्या स्थानीं असेल त्यांनीं घ्यावें.						
९	धर्म	अधर्मी दुष्टमती दुष्टशील	धार्मिक होईल	अध० दुष्टम० दुष्टशील	धर्म निरंतर करील.			अंध० बु० हो० दु० बु० हो०
१०	कर्म	अत्यन्त दुष्टकर्मी व कुपुत्रवान्	अत्यन्त कीर्तिवान् होईल	दुष्टकर्मी व कुपुत्री	कांति चांगली	शुभकर्में करील	सम्पत्तिवान्	फार दुष्टकर्मी व कुपुत्र होईल
११	आय	राजाशीं समागम करील	धन पुष्कळ मिळवील	पृथ्वीचे राजापासून लाभ होईल	विवेकयुक्त सुंदर असेल	धन आणि आयुष्य वृद्धि	गुणवान् असेल	चांगली कीर्ति मिळवील
१२	व्यय	दुष्टशील	काणा होईल	पापकर्म आचरेल	गतधनीअसेल	कृशांग असेल	व्याधिस्थ	तीव्रता असेल

चांगले पराक्रमाचे ग्रह.

मूर्तौशुक्रबुधौयस्यकेंद्रेचैवबृहस्पतिः ॥
दशमोऽङ्गारकश्चैवसज्ञेयःकुलदीपकः ॥ १ ॥

टीका—जन्मलग्नीं शुक्र, बुध, आणि केंद्र (ह्मणजे प्रथम, चतुर्थ, सप्तम, दशम यांस ह्मणतात.) यास्थानीं बृहस्पती, दशमस्थानीं भौम असल्यास तो मुलगा कुलदीपक असें जाणावें.

पराक्रमीग्रह.

नैवशुक्रोबुधोनैव नास्तिकेंद्रेबृहस्पतिः ॥
दशमोंगारकोनैवजातकंकिंकरिष्यति ॥ १ ॥

टीका—लग्नीं शुक्र, बुध अथवा केंद्रीं बृहस्पती, किंवा दशमस्थानीं अंगारक यांतून कोणी ग्रह नसला तर जन्म होऊन व्यर्थ जाणावें.

जातिभ्रंशकारक.

धनस्थानेयदासौरिःसैंहिकेयोधरात्मजः ॥ शुक्रोगुरुःसप्तमेचरत्व
ष्टमौरविचंद्रकौ ॥ १ ॥ ब्रह्मपुत्रपदेवापिवेश्यासुचसदारतिः ॥
प्राप्तेविंशतिमेवर्षेम्लेंच्छोभवतिनान्यथा ॥ २ ॥

टीका—धनस्थानीं शनि, राहु, मंगळ अथवा सप्तमस्थानीं शुक्र, गुरु, अष्टमस्थानीं रवि व चंद्र असे ग्रह असतां ब्राह्मणजन्म असला तथापि वेश्येशीं रत असेल, आणि वीस वर्षांचा जाहला ह्मणजे म्लेंच्छ होईल.

मातापितरांस नाशक.

षष्ठेचद्वादशेराशौयदापापग्रहोभवेत् ॥
तदामातृभयंविंद्याच्चतुर्थेदशमेपितुः ॥ १ ॥

टीका—षष्ठस्थानीं अथवा द्वादशस्थानीं पापग्रह असला तर मातेस वाईट किंवा चतुर्थ दशमस्थानीं असला तर पित्यास वाईट.

नाशवंत ग्रह.

अर्कोराहुःकुजःसौरिर्लग्नेतिष्ठतिपंचमे ॥
पितरंमातरंहंतिभ्रातरंचशिशूनक्रमात् ॥ १ ॥

टीका—जन्मलग्नापासून पंचमस्थानीं ग्रह आले तर त्यांचीं फळें:-रवि असल्यास पित्यास वाईट; राहु मातेस; भौम भ्रात्यास; शनि असल्यास मुलास मृत्युकारक क्रमेंकरून जाणावे.

लग्नस्थानेयदासौरिः षष्ठोभवतिचंद्रमाः ॥
कुजस्तुसप्तमस्थानेपितातस्यनजीवति ॥ १ ॥

टीका—जन्मलग्नीं शनि, षष्ठस्थानीं चंद्र, सप्तमस्थानीं मंगळ असे असले तर पित्यास मृत्युकारक.

पातालस्थोयदाराहुश्चेंदुःषष्ठाष्टमेऽपिच ॥
पापदृष्टोऽपिशेषेणसद्यःप्राणहरःशिशोः ॥ १ ॥

टीका—जन्मलग्नापासून सप्तमस्थानीं राहु, षष्ठ अथवा अष्टमस्थानीं चंद्र आणि शेष ग्रहांची पापदृष्टि असल्यास जन्म होतांच मृत्यु जाणावा.

जन्मलग्नेयदाराहुःषष्ठोभवतिचंद्रमाः ॥
जातोमृत्युमवाप्नोतिकुदृष्ट्यात्वपमृत्युना ॥ १ ॥

टीका—जन्मलग्नीं राहु, षष्ठस्थानीं चंद्रमा असे असल्यास जन्म होतांच मृत्यु आणि जन्मलग्नावर कुदृष्टि असली तर अपमृत्यु.

जन्मलग्नेयदाभौमश्चाष्टमेचबृहस्पतिः ॥
वर्षेचद्वादशेमृत्युर्यदिरक्षतिशंकरः ॥ १ ॥

टीका—जन्मलग्नीं मंगळ अष्टमस्थानीं बृहस्पति असे असले तर बारावे वर्षी शंकर रक्षित असला तथापि मृत्यु प्राप्त होतो.

शनिक्षेत्रेयदासूर्योभानुक्षेत्रेयदाशनिः ॥
वर्षेचद्वादशेमृत्युर्देवोवैरक्षितायदि ॥ १ ॥

टीका—शनीचे गृहांत सूर्य अथवा सूर्याचे गृहांत शनि, असे जन्मकाळीं असल्यास देव रक्षित असतांही बारावे वर्षी मृत्यु होतो.

षष्ठोऽष्टमस्तथामूर्तौजन्मकालेयदाबुधः ॥
चतुर्थवर्षेमृत्युश्चयदिरक्षतिशंकरः ॥ १ ॥

टीका—षष्ठ अष्टम अथवा जन्मलग्नीं बुध असला तर चवथे वर्षी शंकर रक्षित असतांही मृत्यु होतो.

भौमक्षेत्रेयदाजीवःषष्ठाष्टासुचचंद्रमाः ॥
वर्षेऽष्टमेऽपिमृत्युर्वैईश्वरोरक्षितायदि ॥ १ ॥

टीका--मंगळाचे ग्रहांत बृहस्पती आणि षष्ठ अथवा अष्टमस्थानीं चंद्रमा असला तर ईश्वर रक्षित असतां आठवे वर्षीं मृत्यु जाणावा.

दशमोयस्यवैराहूर्जन्मलग्नेयदाभवेत् ॥
वर्षेतुषोडशेज्ञेयोबुधैर्मृत्युर्नरस्यच ॥ १ ॥

टीका--जन्मलग्नापासून दशमस्थानीं अथवा जन्मलग्नीं राहु असला तरी सोळावे वर्षीं मृत्यु असें जाणावें.

ग्रहांची दृष्टी.

पादैकदृष्टिर्दशमेतृतीयेद्विपाददृष्टिर्नवपंचमेवा ॥ त्रिपाददृष्टिश्च तुरष्टकेचसंपूर्णदृष्टिःसमसप्तकेच ॥ १ ॥ शनेस्त्वेकादशेपूर्णादृष्टिर्जीवस्यकोणके ॥ बुधैर्ज्ञेयापूर्णदृष्टिर्भौमस्यचतुरष्टके ॥ २ ॥

टीका—जन्मलग्नापासून दशमस्थानीं आणि तृतीयस्थानीं जे ग्रह असतील त्यांची एकपाद दृष्टि जन्मलग्नावर असते; याच क्रमानें नव, पंचमस्थानीं असतील त्यांची द्विपाद दृष्टि, जाणावी; चतुर्थस्थानीं व अष्टमस्थानीं जे ग्रह असतील त्यांची त्रिपाद दृष्टि; सप्तमस्थानीं असतील त्यांची पूर्ण सम दृष्टि जाणावी. जन्मलग्नापासून शनैश्चर एकादशस्थानीं अथवा तृतीयस्थानीं असतां पूर्णदृष्टी; पंचम अथवा नवम गुरु असला तर, आणि चतुर्थ अष्टमस्थानीं भौम असला तर लग्नावर संपूर्ण दृष्टि असते.

ग्रहांचें उच्चत्व नीचत्व.

रविर्मेषेतुलेनीचोवृषेचंद्रस्तुवृश्चिके ॥ भौमश्चनक्रेकर्केचस्त्रियां सौम्योझषेतथा ॥ १ ॥ गुरुःकर्केचनक्रेचमीनकन्येसितस्यच ॥ मंदस्तुलायांमेषेचकन्याराहुगृहस्यच ॥२॥ राहुर्युग्मेतुचापेचतमोवत्केतुजंफलम् ॥ प्रोक्तंग्रहाणामुच्चत्वंनीचत्वंचक्रमाद्बुधैः ॥ ३ ॥

टीका—रवि मेषींचा असल्यास उच्चत्व, तूळींचा. असल्यास नीचत्व; चंद्र वृषभीं असल्यास उच्चत्व, वृश्चिकीं असला तर नीचत्व; भौम मकरीं असला तर उच्चत्व, कर्कीचा असला तर नीचत्व; बुध कन्याराशीस असला तर उच्चत्व, मकरींचा नीचत्व; गुरु कर्कींचा उच्चत्व आणि मकरींचा नीचत्व. शुक्राचें मीन उच्चत्व, कन्या नीचत्व; शनि तूळींचा उच्चत्व, मेषींचा नीचत्व; राहूचें कन्यागृह आणि मिथुनींचा उच्चत्व आणि धनींचा नीचत्व; आणि केतूचें शनैश्वराप्रमाणें जाणावें.

जन्मलग्नांचीं फळें.

मेषेदैन्यमुपैतिगर्वितवृषोनानामतिर्मन्मथेशूरःकर्कटकेधृतीचवनपेकन्याचमायान्विता ॥ सत्यंचैवतुलेत्त्वलौमलिनतापापान्वितंवैधनुर्मूर्खोयंमकरेघटेचतुरतामीनेत्वधीरामतिः ॥ १ ॥

टीका—मेषलग्नीं जन्म जाहलें असतां दीनपणा, वृषभीं गर्वित, मिथुनीं नानाप्रकारची बुद्धि, कर्कीं मोठा शूर, सिंहलग्नीं स्थिर बुद्धि, कन्या अत्यंत मायावी, तुळीं सत्यवादी, वृश्चिकलग्नीं मलिनता, धनलग्नीं पापबुद्धि, मकरीं मूर्खपणा, कुंभीं चतुरता, मीनीं अल्पधीरता, अशीं जन्मलग्नाचीं फळें जाणावीं.

स्त्रीजातक.

॥ तनुस्थान ॥ ॥ मूर्तौकरोतिविधवांदिनकृत्कुजश्चराहुर्विनष्टतनयांरविजोदरिद्राम् ॥ शुक्रःशशांकतनयश्चगुरुश्चसाध्वीमायुःक्षयंचकुरुतेऽत्रचशर्वरीशः ॥ १ ॥ धनस्थान ॥ ॥ कुर्वंतिभास्करशनैश्चरराहुभौमादारिद्र्यदुःखमतुलंनियतंद्वितीये ॥ वित्तेश्वरीमविधवांगुरुशुक्रसौम्यानारींप्रभूततनयांकुरुतेशशांकः ॥ २ ॥ ॥ सहजस्थान ॥ ॥ सूर्येन्दुभौमगुरुशुक्रधास्तृतीयेकुर्युःस्त्रियंबहुसुतांधनभागिनींच ॥ सत्यंदिवाकरसुतःकुरुतेधनाढ्यांलक्ष्मींददातिनियतंकिलसैंहिकेयः ॥३॥ ॥ सुहृत्स्थान ॥ ॥ स्वल्पंपयोभवतिसूर्यसुतेचतुर्थेदौर्भाग्यमुष्णकिरणःकुरुतेशशीच ॥ राहुर्विनष्टतनयांक्षितिजोऽल्पबीजांसौख्यान्वितांभृगुसुरेज्यबुधाश्चकुर्युः ॥४॥ ॥ सुतस्थान ॥ ॥ नष्टात्मजांरविकुजौखलुपंचमस्थौचंद्रात्मजोबहुसुतांगुरुभार्गवौच ॥ राहुर्ददातिमरणंरविजस्तुरोगंकन्याप्रसूतिनिरतांकुरुतेशशाङ्कः ॥ ५ ॥ रिपुस्थान ॥ षष्ठस्थिताःशनिदिवाकरराहुभौमा॥जीवस्तथाबहुसुतांधनभागिनींच॥चंद्रःकरोतिविधवामुशनादरिद्रांवेश्यांशशांकतनयःकलहप्रियांच ॥ ६ ॥ जायास्थान ॥ ॥ सौर्यारजीवबुधराहुरवींदुशूक्रादद्युःप्रसह्यमरणंखलुसप्तमस्थाः ॥ वैधव्यबंधनभयंक्षयवित्त

नाशंव्याधिप्रवासमरणंनियतंक्रमेण ॥ ७ ॥ ॥ मृत्युस्थान ॥
स्थानेऽष्टमेगुरुबुधौनियतंवियोगंमृत्युंशशीभृगुसुतश्चतथैवराहुः॥
सूर्यःकरोतिविधवांधनिनींकुजश्चसूर्यात्मजोबहुसुतांपतिवल्लभां
च ॥८॥ ॥ धर्मस्थान ॥ ॥ धर्मस्थिताभृगुदिवाकरभूमिपुत्रजी
वाःसुधर्मनिरतांशशिजःसुभोगाम् ॥ राहुश्चसूर्यतनयश्चकरोतिवं
ध्यांनारींप्रभूततनयांकुरुतेशशांकः ॥९॥ ॥ कर्मस्थान ॥ ॥ रा
हुर्नभस्तलगतोविधवांकरोतिपापेपरांदिनकरश्चशनैश्चरश्च ॥
मृत्युंकुजोऽर्थरहितांकुटिलांचचंद्रः शेषाग्रहाधनवतींबहुवल्लभां
च॥१०॥ ॥ आयस्थान ॥ ॥ आयेरविर्बहुसुतांधनिकांशशांकः
पुत्रान्वितांक्षितिसुतोरविजोधनाढ्याम् ॥ आयुष्मतींसुरगुरुर्भृ
गुजःसुपुत्रीं राहुःकरोतिसुभगांसुखिनींबुधश्च ॥ ११ ॥ व्यय
स्थान ॥ ॥ अंत्येधनव्ययवतींदिनकृद्दरिद्रांवंध्यांकुजःपररतांकु
टिलांचराहुः ॥ साध्वींसितेज्यशशिजाबहुपुत्रपौत्रयुक्तांविधुः
प्रकुरुतेव्ययगोदिनांधाम् ॥ १२ ॥

अष्टोत्तरीच्या महादशा.

आर्द्रापुनर्वसुःपुष्यआश्लेषातुरवेर्दशा ॥ मघापूर्वोत्तराचैवचंद्र-
स्यचदशातथा ॥ १ ॥ हस्तोविशाखाचित्राचस्वातीभौमदशा
स्मृता ॥ ज्येष्ठाऽनुराधामूलेचसौम्यस्यचदशाबुधैः ॥ २ ॥ अभि
जिच्छ्रवणःपूषाऊषाचैवशनेर्दशा ॥ धनिष्ठाशतताराचपूर्वाभाद्र
पदागुरोः ॥ ३ ॥ ऊभापूषाश्विनीकालराहोश्चैवदशास्मृता ॥ कृ
त्तिकारोहिणीचोक्तामृगःशुक्रदशाबुधैः ॥ ४ ॥ एषांभानांक्रमे
णैवज्ञेयाःसूर्यादिकादशाः ॥ क्रूरजाअशुभाप्रोक्ता शुभास्यात्सौ
म्यखेटजा ॥ ५ ॥

स्त्रीजातक कोष्टक.

जन्मलग्नीं तन्वादि द्वादशभावस्थानीं जे जे ग्रह येती त्यांचीं तीं पृथक् पृथक् फळें जाणावयाचें कोष्टक. राहूचें आणि केतूचें एकच फळ जाणावें.

स्थान	नांवें	रवि	चंद्र	भौम	बुध	गुरु	शुक्र	शनि	राहु, केतु
१	तनु	विधवा	आयुष्य नाश	विधवा	पतिव्रता	पतिव्रता	पतिव्रता	दरिद्री	पुत्र मरतील
२	धन	दरिद्रदुःख	बहुपुत्र वती	दरिद्रदुःख	सौभाग्य आणिसं.	सौभाग्य आणिसं.	सौभाग्य आणिसं.	दरिद्र दुःख	दरिद्रदुःख
३	सहज	पुत्रवती धनाढ्य	पुत्रवती धनाढ्य	पुत्रवती धनाढ्य	पुत्रवती धनाढ्य	पुत्रवती धनाढ्य	पुत्रवती धनाढ्य	लक्ष्मीवती	लक्ष्मीवती
४	सुहृत्	दरिद्रता	दौर्भाग्य	अल्पसंतति	अतिसौख्य	अतिसौख्य	अतिसौख्य	दुग्धअल्प	पुत्रनाश
५	सुत	मुलांचा नाश	कन्या पुष्कळ	मुलांचा नाश	बहुफळ प्राप्ति	बहुफळ प्राप्ती	बहुफळ प्राप्ति	रोगी	मरणपावेल
६	रिपु	धनवती	विधवा	धनवती	कलहरूप अप्रिया	धनवती	दरिद्री वेश्या	धनवती	धनवती
७	जाया	रोगी	प्रवासी	विधवा	क्षय	भयबंधन	मृत्यु	वैधव्य मरण	वित्तनाश
८	मृत्यु	विधवा	वियोग मरणांत	धनवान्	स्वजन वियोग	स्वजन वियोग	मरणांत वियोग	अतिपुत्र संतती	मरणांत वियोग
९	धर्म	धर्म पुष्कळ करील	संततिवती	धर्मकृत्य कारक	उत्तम भोगी	धर्मवृद्धि	धर्मवृद्धि	वांझ	वांझ
१०	कर्म	पाप कारिणी	दरिद्री जारिणी	मृत्यु	धनवती वरासप्रिय	धनवती वरासप्रिय	धनवती वरासप्रिय	पापकर्मी	वैधव्य
११	आय	अतिपुत्र प्राप्ती	लक्ष्मीवती	पुत्रअत्यंत	सुखी	आयुष्यवती	पुत्रवान्	धनवती	सौभाग्य-वती
१२	व्यय	खर्चिक	दिनांध	वांझ जारिणी	सुपुत्र	सुशील	पतिव्रता	खर्चिक	जारिणी पापकर्मी

महादशासंख्याक्रम.

सूर्यस्यरसवर्षाणिइन्द्रोःपंचदशैवच ॥ भौमस्यवसुवर्षाणिऋषिश्च

द्बुधस्यच ॥ १ ॥ मन्दस्यदशवर्षाणिगुरोश्चैकोनविंशतिः ॥
राहोर्द्वादशवर्षाणिशुक्रस्यैकोनविंशतिः ॥ २ ॥

टीका—आर्द्रापासून आरंभ तों मृगापर्यंत २८ नक्षत्रें आणि रवि आदि शुक्रपर्यंत ८ ग्रह यांचीं पृथक् पृथक् कोष्टकें केलीं आहेत त्यांजवरून महादशांचीं वर्षसंख्या आहे त्यांत पापग्रहांस नक्षत्रें ४ आणि सौम्यग्रहांस ३ जाणावीं. दशांची संख्या भरून घेणें ती नक्षत्रांचे त्रिभागानें घ्यावी आणि ज्या विभागांत जन्म होईल त्या क्रमानें दशा भोग्याभोग्य जाणावी आणि जन्मकाळीं जी दशा ती प्रथम जाणावी.

अंतर्दशा आणावयाचा क्रम.

महादशास्वस्वदशाब्दनिघ्नाभक्ताःखबाहुशभिःसमाद्याः ॥
अंतर्दशाःस्युर्गगनेचराणांतदेकभावोहिमहादशास्यात् ॥ १ ॥

टीका—ज्या ग्रहाची अंतर्दशा पाहिजे ती जन्मदशेचे वर्षसंख्येनें ती वर्षसंख्या गुणून १०८ नीं भागून जो भाग येईल तीं वर्षें जाणावीं आणि शेष उरेल तें १२ नीं गुणून पूर्ववत् भागून भाग येतील ते मास जाणावे आणि शेष उरेल तें ३० नीं गुणून पूर्ववत् भागून भाग येतील ते दिवस जाणावे आणि शेष उरेल तें ६० नीं गुणून पूर्ववत् भागून भाग येतील त्या घटिका. असा क्रम महादशांतील अंतर्दशा पाहण्याचा जाणावा. (१२० चा भाग विंशोत्तरीला घ्यावा.)

विंशोत्तरीच्या महादशा व अंतर्दशा.

जन्मनोजनुर्भमंकहृत्क्रमशोर्केन्दुकुजागुरुस्य ॥
शनिचंद्रजकेतुभार्गवाःपरिशेषात्तुदशाविपास्ततः ॥ १ ॥

टीका—जन्मनक्षत्र जें असेल त्यांत दोन कमी करून नवांनी भागावें शेष १ उरला तर रवीची दशा, दोन उरले तर चंद्राची, तीन उरले तर भौमाची, चार उरले तर राहुची, पांच उरले तर गुरूची, सहा उरले तर शनीची, सात उरले तर बुधांची, आठ उरले तर केतुची, भाग पुरला तर शुक्राची दशा हे अधिपती जाणावे.

दशांची वर्षसंख्या व भोग्याभोग्य.

ऋतुदिग्गिरयोधृतिपार्नृपातिधृतिमेघहयोनखाःसमाः ॥ क्रमतो हिगताअथादिमाजनिभस्थाघटिकाःसमाहताः ॥ १ ॥ भभोगे नभक्ताःफलंभुक्तपाकस्तदूनादशासाभवेद्भोग्यसंज्ञा ॥

टीका—ऋतु ह्मणजे ६ दिक् ह्मणजे १० गिरी ह्मणजे ७ धृती ह्मणजे १८ नृप ह्मणजे १६ अतिधृती ह्मणजे १९ मेघ ह्मणजे १७ हय ह्मणजे ७ नख ह्मणजे २० हा वर्षसंख्याक्रम; रव्यादिशुक्रांत वर लिहिले आहेत त्यांचा जाणावा आणि

जन्मनक्षत्राचे आरंभापासून जन्म जाहल्याचे पूर्वींच्या घटिकेपावेतों ज्या घटिका होतील त्यांस नक्षत्राधिपतीचे वर्षांनीं गुणावें. जो गुणाकार येईल त्यास नक्षत्रारंभापासून अंतपर्यंत ज्या घटि येतील त्यांनीं भागावें जो भाग येईल तीं वर्षें, शेष राहील त्यास अष्टोत्तरीस लिहिलें आहे. त्या रीतीनें उत्तरोत्तर गुणून याच भाजकानें भागावें. ह्मणजे मास, दिवस, घटिका, येतील, नंतर त्या संख्या त्या. दशाधिपतीचे वर्षांतून न्यून कराव्या आणि शेष राहील ती संख्या भोग्य आहे असें जाणावें.

अष्टोत्तरी दशाक्रम कोष्टक.

सूर्याची महादशा वर्षें ६. आर्द्रा, पुनर्वसु, पुष्य, आश्लेषा. अंतर्दशा क्रम.						चंद्राची महादशा वर्षें १५ मघा, पूर्वा, उत्तरा. अंतर्दशा क्रम.					
ग्रह. नां.	वर्षें	मास	दिव	घटी	फळें	ग्रह	वर्षें	मास	दिव	घटि	फळें
रवि	०	४	०	०	अशुभ	चंद्र	२	१	०	०	शुभ
चंद्र	०	१०	०	०	शुभ	भौम	१	१	१०	०	अशुभ
मंगळ	०	५	१०	०	अशुभ	बुध	२	४	१०	०	शुभ
बुध	०	११	१०	०	शुभ	शनि	१	४	२०	०	अशुभ
शनि	०	६	२०	०	अशुभ	गुरु	२	७	२०	०	शुभ
गुरु	१	०	२०	०	शुभ	राहु	१	८	०	०	अशुभ
राहु	०	८	२०	०	अशुभ	शुक्र	२	११	०	०	शुभ
शुक्र	१	२	०	०	शुभ	रवि	०	१०	०	०	अशुभ
संख्या	६	०	०	०	०	संख्या	१५	०	०	०	०

भौमाची महादशा वर्षें ८. हस्त, चित्रा, स्वाती, विशाखा. अंतर्दशा						बुधाची महादशा वर्षें १७. अनुराधा, ज्येष्ठा, मूळ. अंतर्दशा.					
ग्रह	वर्षें	मास	दिव	घटी	फळें	ग्रह	वर्षें	मास	दिव	घटि	फळें
भौम	०	७	३	२०	अशुभ	बुध	२	८	३	२०	शुभ
बुध	१	३	३	२०	शुभ	शनि	१	६	२६	४०	अशुभ
शनि	०	८	२६	४०	अशुभ	गुरु	२	११	२६	४०	शुभ
गुरु	१	४	२६	४०	शुभ	राहू	१	१०	२०	०	अशुभ
राहु	०	१०	२०	०	अशुभ	शुक्र	३	३	२०	०	शुभ
शुक्र	१	६	२०	०	शुभ	रवि	०	११	१०	०	अशुभ
रवि	०	५	१०	०	अशुभ	चन्द्र	२	४	१०	०	शुभ
चंद्र	१	१	१०	०	शुभ	भौम	१	३	३	२०	अशुभ
संख्या	८	०	०	०	०	संख्या	१७	०	०	०	०

शनीची महादशा वर्षे १०. पूर्वाषा. उत्तराषा. अभिजित् श्रवण.					
अंतर्दशा.					
ग्रह	वर्षे	मास	दिव	घटि	फळें
शनि	०	११	३	२०	अशुभ
गुरु	१	९	३	२०	शुभ
राहु	१	१	१०	०	अशुभ
शुक्र	१	११	१०	०	शुभ
रवि	०	६	२०	०	अशुभ
चंद्र	१	४	२०	०	शुभ
भौम	०	८	२६	४०	अशुभ
बुध	१	६	२६	४०	शुभ
संख्या	१०	०	०	०	०

गुरूची महादशा वर्षे १९. धनिष्ठा, शततारका, पूर्वाभाद्रपदा.					
अंतर्दशा.					
ग्रह	वर्षे	मास	दिव	घटि	फळें
गुरु	२	४	३	२०	शुभ
राहु	२	१	१०	०	अशुभ
शुक्र	३	८	१०	०	शुभ
रवि	१	०	२०	०	अशुभ
चन्द्र	२	७	२०	०	शुभ
भौम	१	४	२६	४०	अशुभ
बुध	२	११	२६	४०	शुभ
शनि	१	९	३	२०	अशुभ
संख्या	१९	०	०	०	०

राहूची महादशा वर्षे १२. उ०भाद्रपदा, रेवती, अश्विनी, भरणी.					
अन्तर्दशा.					
ग्रह.	वर्षे.	मास	दिव	घटि	फळें.
राहु	१	४	०	०	अशुभ
शुक्र	२	४	०	०	शुभ
रवि	०	८	०	०	अशुभ
चन्द्र	१	८	०	०	शुभ
भौम	०	१०	२०	०	अशुभ
बुध	१	१०	२०	०	शुभ
शनि	१	१	१०	०	अशुभ
गुरु	२	१	१०	०	शुभ
संख्या	१२	०	०	०	०

शुक्राची महादशा हर्षे २१ कृत्तिका, रोहिणी, मृग.					
अन्तर्दशा.					
ग्रह.	वर्षे.	मास	दिव	घटि	फळें
शुक्र	४	१	०	०	शुभ
रवि	१	२	०	०	अशुभ
चन्द्र	२	११	०	०	शुभ
भौम	१	६	२०	०	अशुभ
बुध	३	३	२०	०	शुभ
शनि	१	११	१०	०	अशुभ
गुरु	३	८	१०	०	शुभ
राहु	२	४	०	०	अशुभ
संख्या	२१	०	०	०	०

विंशोत्तरीक्रम कोष्टक.

कृत्तिकादिक्रमेणैवज्ञेयाविंशोत्तरीदशा ॥
अंतर्दशायुतावर्षमासवासरवर्तिता: ॥ १ ॥

टीका—कृत्तिका नक्षत्रापासून भरणीपर्यंत २७ नक्षत्रें व दशा व अंतर्दशांचे अधिपतींचीं नावें व त्यांच्या वर्षादि संख्या यांचें कोष्टक.

सूर्याची महादशा वर्षें ६. कृत्तिकाउत्तराफाल्गुनी, उ० अंतर्दशा.				
नांवें	वर्षें	मास	दिव	घ
रविची	०	३	१८	
चंद्राची	०	६	०	
भौमाची	०	४	६	
राहुची	०	१०	२४	
गुरुची	०	९	१८	
शनीची	०	११	१२	
बुधाची	०	१०	६	
केतुची	०	४	६	
शुक्राची	१	०	०	
बेरीज	६	०	०	

चंद्राची महादशा वर्षें १० रोहिणी, हस्त, श्रवण. अंतर्दशा.				
नांवें	वर्षें	मास	दिव	घ.
चंद्र	०	१०		
भौम	०	७		
राहु	१	६		
गुरु	१	४		
शनि	१	७		
बुध	१	५		
केतु	०	७		
शुक्र	१	८		
रवि	०	६		
बेरीज	१०	०		

भौमाची महादशा वर्षें ७. मृग, चित्रा, धनिष्ठा. अंतर्दशा.				
नांवें	वर्षें	मास	दिव	घ.
भौम	०	४	२७	
राहु	१	०	१८	
गुरु	०	११	६	
शनि	१	१	९	
बुध	०	११	२७	
केतु	०	४	२७	
शुक्र	१	२	०	
रवि	०	४	६	
चंद्र	०	७	०	
बेरीज	७	०	०	

राहूची महादशा वर्षें १८ आर्द्रा, स्वाती, शततारका. अंतर्दशा.				
नांवें	वर्षें	मास.	दिव	घ.
राहु	२	८	१२	
गुरू	२	४	२४	
शनि	२	१०	६	
बुध	२	६	१८	
केतु	१	०	१८	
शुक्र	३	०	०	
रवि	०	१०	२४	
चंद्र	१	६	०	
मंगळ	१	०	१८	
बेरीज	१८	०	०	

गुरूची महादशा वर्षें १६ पुनर्वसु, विशा. पूर्वाभाद्रपदा. अंतर्दशा.				
नांवें	वर्षें	मास	दिव	घ.
गुरु	२	१	१८	
शनि	२	६	१२	
बुध	२	३	६	
केतु	०	११	६	
शुक्र	२	८	०	
रवि	०	९	१८	
चंद्र	१	४	०	
मंगळ	०	११	६	
राहु	२	४	२४	
बेरीज	१६	०	०	

शनीची महादशा वर्षें १९ पुष्य, अनुराधा, उत्तराभाद्र० अंतर्दशा.				
नांवें	वर्षें	मास	दिव	घ.
शनि	३	०	३	
बुध	२	८	९	
केतु	१	१	९	
शुक्र	३	२	०	
रवि	०	११	१२	
चंद्र	१	७	०	
मंगळ	१	१	९	
राहु	२	१०	६	
गुरु	२	६	१२	
बेरीज	१९	०	०	

बुधाची महादशा वर्षें १७.					केतूची महादशा वर्षें ७.					शुक्राची महादशा वर्षें २०.				
आश्लेषा, रेवती, ज्येष्ठा.					मघा, अश्विनी, मूळ.					पूर्वाफाल्गुनी, पूर्वाषाढा, भरणी				
अंतर्दशा.					अंतर्दशा.					अंतर्दशा.				
नांवें	वर्षें	मास	दिव	घ.	नांवें	वर्षें	मास	दिव	घ.	नांवें	वर्षें	मास	दिव	घ.
बुध	२	४	२७		केतु	०	४	२७		शुक्र	३	४	०	
केतु	०	११	२७		शुक्र	०	२	०		रवि	१	०	०	
शुक्र	२	१०	०		रवि	०	४	६		चंद्र	१	८	०	
रवि	०	१०	६		चंद्र	०	७	०		मंगळ	१	२	०	
चन्द्र	१	५	०		मंग.	०	४	२७		राहु	३	०	०	
मंगळ	०	११	२७		राहु	१	०	१८		गुरु	२	८	०	
राहु	२	६	१८		गुरु	०	११	६		शनि	३	२	०	
गुरु	२	३	६		शनि	१	१	९		बुध	२	१०	०	
शनि	२	८	९		बुध	०	११	२७		केतु	१	२	०	
बेरीज	१७	०	०		बेरीज	७	०	०		बेरीज	२०	०	०	

(महादशांचें अंतर्दशा फळ) रवीची अंतर्दशा.

देशांतरंचनिजबंधुवियोगदुःखमुद्वेगरोगभयचोरभवाचपीडा ॥
पूर्वस्थितस्यनिखिलस्यधनस्यनाशोभानोर्दशाजननकालदशा
भवंति ॥ १ ॥

टीका—देशांतर करील आणि भावांचें वियोगदुःख; मन उद्वेग असेल, रोग, भय, चोरांची पीडा आणि संचित धनाचा नाश, अशीं सर्व रविदशेंत प्राप्त होतात.

चंद्राची अंतर्दशा.

हेमादिभूतिवरवाहनयानलाभःशत्रुप्रतापबलवृद्धिपरंपराच ॥
इष्टान्नदानशयनासनभोजनानिनूनंसदाशशिदशागमनेभवंति ॥२ ॥

टीका—ऐश्वर्य ह्मणजे सुवर्ण आदिकरून घोडे, रथ, पालख्या यांचा लाभ आणि शत्रूचा पराजय. बळाची वृद्धि अधिकाधिक, आणि नानाप्रकारचीं सुरस अन्नदानें, शयनस्थान, उत्तम आसन, भोजन, सुंदर, असें सर्व चंद्राचे महादशेंत प्राप्त होईल.

भौमाची अंतर्दशा.

भूपालचोरभयवह्निकृताचपीडासर्वांगरोगभयदुःखसुदुःखिताच ॥
चिंताज्वरश्चबहुकष्टदरिद्रयुक्तःस्यात्सर्वदाकुजदशाजननेवदंति ॥ ३ ॥

टीका—राजा आणि चोर यांपासून भय, आणि अग्नीपासून पीडा व सर्वांग रोगी, भय, सदा दुःखित, आणि नानाप्रकारची चिंता, ज्वर, अति कष्ट, दरिद्रेंकरून युक्त हीं सर्व भौमाचे दशेंत प्राप्त होतात.

राहूची अंतर्दशा.

दीनोनरोभवतिबुद्धिविहीनाचिंतासर्वांगरोगभय
दुःखसुदुःखिताच ॥ पापानिबंधबहुकष्टदरि-
द्रयुक्तंग्रहोर्दशाजननकालदशाभवंति ॥ ४ ॥

टीका—मनुष्य दीन; बुद्धीकरून हीन; चिंता, सर्वदा शरीरास रोग, अत्यंत भय व दुःखित, बंधन, कष्ट बहुत आणि दरिद्रता, हीं सर्व राहूचे दशेंत प्राप्त होतात.

गुरूची अंतर्दशा.

राज्याधिकारपरिवर्धितचित्तवृत्तिंधर्मोधिकारपरिपालनसिद्धिबुद्धिम् ॥
सद्विग्रहोपिधनधान्यसमृद्धिताचस्याद्देवतागुरुदशागमनेभवंति ॥५॥

टीका--राज्याधिकार आणि चित्तवृत्ति स्वस्थ, धर्माचेठायीं बुद्धि, शरीरीं आरोग्यता; निश्चयेंकरून धनधान्यसमृद्धि इत्यादि गुरुदशेचीं फळें जाणावीं.

शनीची अंतर्दशा.

मिथ्यापवादवधबंधनमर्थहानिर्मित्रेचबंधुवचनेषुचयुद्धबुद्धिः ॥
सिद्धंचकार्यमपियत्रसदाविनष्टंस्यात्सर्वदाशनिदशागमनेभवंति ॥ ६॥

टीका—मिथ्या आळ, दुसऱ्याचा घात, बंधन, द्रव्याचा नाश आणि मित्र, बंधु, यांचे बुद्धीनें कलहबुद्धि, जीं कार्यें सिद्ध तीं नष्ट होतात. अशीं शनीच्या दशेचीं फळें जाणावीं.

बुधाची अंतर्दशा.

दिव्यांगनामदनसंगमकेलिसौख्यंनानाविलासमभिरागमनोभिरामैः ॥
हेमादिरत्नविभवागमकोशधान्यंस्यात्सर्वदाबुधदशागमनेभवंति ॥७॥

टीका—सुंदर स्त्रीसौख्य आणि सर्वप्रकारें विलास, भोग, सुवर्ण, रत्नें यांची अतिप्राप्ति व धान्यसंग्रह, ईश्वरध्यान इत्यादि बुधदशेंत शुभफळें जाणावीं.

केतूची अंतर्दशा.

भार्यावियोगजनितंचशरीरदुःखंद्रव्यस्यहानिरतिकष्ट
परंपराच ॥ रोगाश्चबंधुकलहश्चविदेशताचकेतोर्दशा
जननकालदशाभवंति ॥ ८ ॥

टीका—स्त्रीवियोगानें शरीरास दुःख आणि द्रव्याची हानि, कष्ट, रोग आणि बंधुकलह, देशांतर इत्यादि केतुदशेंत अशुभ फळें जाणावीं.

शुक्राची अंतर्दशा.

आरामवृद्धिपरिसर्वशरीरवृद्धिः श्वेतातपत्रधनधा
न्यसमाकुलंच ॥ आयुःशरीरसुतपौत्रसुखंनराणां
द्रव्यंचभार्गवदशागमनेभवंति ॥ ९ ॥

टीका—आरामस्थानप्राप्ति आणि शरीरपुष्टि पांढरे अबदागिराची, प्राप्ति, धन, धान्यवृद्धि आणि आयुष्य, पुत्र, नातु, द्रव्य यांची वृद्धि, हीं शुक्राचे दशेंत शुभ फळें जाणावीं.

हींच फळें महादशांचे ठायीं सर्व ग्रहांचीं जाणावीं.

योगिनीदशाक्रम.

स्वर्क्षेपिनाकिनयनैःसंयोज्यवसुभिर्भजेत् ॥
योगिन्यष्टौसमाख्याताःशून्यपातेनसंकटा ॥ १ ॥

टीका—जन्मनक्षत्र जें असेल त्यांत ३ अंक मिळवावे आणि आठांनीं भागावें; शेष अंक उरेल त्याप्रमाणें मंगलादि क्रमेंकरून योगिनी जाणाव्या. याचा क्रम कोष्टकांत लिहिला आहे.

नावें.

मंगलापिंगलाधन्याभ्रामरीभद्रिकापिच ॥
उल्कासिद्धासंकटाचयोगिन्यष्टौदशास्मृताः ॥ २ ॥

टीका—मंगला १, पिंगला २, धन्या ३, भ्रामरी ४, भद्रिका ५, उल्का ६, सिद्धा ७, संकटा ८, हीं योगिनींचीं नावें क्रमेंकरून जाणावीं.

वर्षसंख्या.

एकद्वित्रीणिवेदाश्वपंचषड्रससप्तमानिच ॥
अष्टवर्षाणिहिभवेन्मङ्गलादावनुक्रमात् ॥ ३ ॥

टीका—मंगलादशेचें एक वर्ष पिंगलेचीं वर्षें २ अशीं अनुक्रमें वर्षें जाणावीं.

दशापरत्वें फळें.

मंगलामंगलानंदयशोद्रविणदायिनी ॥ पिंगलातनुतेव्याधिमन सोदुःखसंभ्रमौ ॥ १ ॥ धन्याधनसुहृद्बंधुरूपसीमंतिनीकरी ॥ भ्रामरीजन्मभूमिघ्नीभ्रामयेत्सर्वतोदिशम् ॥ २ ॥ भद्रिकासुखसंपत्तिविलासयशदायिनी ॥ उल्काराज्यधनारोग्यहारिणीदुःख कारिणी ॥ ३ ॥ सिद्धासाधयतेकार्यंनृणांवैसुखदाभवेत् ॥ संकटासंकटव्याधिकरणक्लेशकारिणी ॥ ४ ॥

टीका—मंगलादशेचें फळ शुभकार्यें, आनंद, यश आणि द्रव्य देणारी; पिंगला शरीरास व्याधी आणि मनास दुःख व भ्रमकारिणी; धन्येचें फळ धन, सुहृत्, बंधूभेटी आणि आरोग्यता व सुंदरपणा देणारी; भ्रामरीचें फळ स्थाननाश, दिशा-भ्रमण करणारी; भद्रिका सुखसंपत्ति, विलास, यश इत्यादि देणारी; उल्का राज-भय, धननाश, रोगग्रस्त पीडा करणारी; सिद्धा कार्यसाधक आणि सुखप्राप्ति देणारी; संकटा संकट, व्याधि, मरण आणि क्लेशकारिणी होय.

योगिनीदशांचें कोष्टक.

मंगलादि दशांची नावें पृथक् पृथक् व वर्षसंख्यांचे दिवस करून त्यांत अंतर्दशा आणावयाचा क्रम. प्रथम दशेचें वर्ष १ त्याचे दिवस ३६० भाग ३६ सांचा देऊन भाग येईल त्याचे अंतर्दशांचे स्पष्टीकरण सर्व दशांचे कोष्टकांत अनुक्रमें पहाण्याची रीति, हा योगिनीदशाक्रम ३६ वर्षांचा तो भोगल्यानंतर पुनःपुनः हाच घ्यावा.

मंगलेचें वर्षे १ त्याचे दिव ३६०		पिंगलेचीं वर्षें ४ दिवस ७२०		धन्येचीं व. ३ दिवस १०८०		भ्रामरीचीं व. ४ दिवस १४४०		भद्रिकेचीं व. ५ दिवस १८००		उल्केचीं व. ६ दिवस २१६०		सिद्धेचीं व. ७ दिवस २५२०		संकटेचीं व. ८ दिवस २८८०	
मंगला	१०	पिं	४०	ध.	९०	भ्रा	१६०	भ.	२५०	उ.	३६०	सि.	४९०	सं.	६४०
पिंगला	२०	ध.	६०	भ्रा	१२०	भ.	२००	उ.	३००	सि	४२०	सं.	५६०	मं	८०
धन्या	३०	भ्रा	८०	भ.	१५०	उ.	२४०	सि	३५०	सं.	४८०	मं.	७०	पिं	१६०
भ्रामरी	४०	भ	१००	उ	१८०	सि	२८०	सं.	४००	मं.	६०	पिं	१४०	ध	२४०
भद्रिका	५०	उ	१२०	सि	२१०	सं.	३२०	मं.	५०	पिं.	१२०	ध	२१०	भ्रा	३२०
उल्का	६०	सि.	१४०	सं.	२४०	मं	४०	पिं	१००	ध.	१८०	भ्रा	२८०	भ	४००
सिद्धा	७०	स.	१६०	मं	३०	पिं	८०	ध	१५०	भ्रा.	२४०	भ.	३५०	उ	४८०
संकटा	८०	मं	२०	पिं.	६०	ध	१२०	भ्रा	२००	भ.	३००	उ.	४२०	सि.	५६०
बेरीज	३६०	०	७२०	०	१०८०	०	१४४०	०	१८००	०	२१६०	०	२५२०	०	२८८०

वर्षदशा.

रविदिननखसंख्याचंद्रमाव्योमबाणैः क्षितितनयगजाश्वीचंद्रजः षट्कशराश्च ॥ शनिरसगुणसंख्यावाक्पतिर्नागबाणैर्नयनयुगक राहुःसप्ततिःशुक्रसंख्या ॥ १ ॥ जन्मनाविंशतिःसूर्येतृतीयेदशचंद्रमाः ॥ चतुर्थेभौमचाष्टौचषष्ठेबुधचतुर्थकम् ॥ २ ॥ सप्तमंदशसौरिःस्यान्नवमेचाष्टमंगुरोः ॥ दशमेराहुविंशत्यातदूर्ध्वेतुभृगोर्दशा ॥ ३ ॥ फळ ॥ ॥ पंथाभोगोऽनुतापश्चसौख्यंपीडाधनं क्रमात् ॥ नाशःशोकश्चसौख्यंचजन्मसूर्यदशाफलम् ॥ ४ ॥

टीका—वर्षदशांचा आरंभ त्यांचा क्रम. ज्या महिन्यांत ज्याचे जन्मराशीस सूर्य येईल तो द्वादश स्थानें भोगितो, त्यांत सर्व ग्रहांच्या दशा, त्यांचा क्रम सांगतों.

२० दिवस सूर्याची दशा जन्मस्थानापासून जाणावी. त्याचें फळ मार्गे चालणें.

५० दिवस चंद्राची दशा तृतीयस्थानाचे १० दिवस रवि भोगतो, त्याचें फळ नानाप्रकारचे उत्तम भोग भोगील.

२८ दिवस मंगळाची दशा चतुर्थस्थानाचे ८ दिवस रवि भोगितो, त्याचें फळ रोग आणि तप्तता होईल.

५६ दिवस बुधाची दशा षष्ठस्थानाचे ४ दिवस रवि भोगितो, त्याचें फळ सौख्यकारक होय.

३६ दिवस शनीची दशा सप्तमस्थानचे १० दिवस रवि भोगतो, त्याचें फळ पीडाकारक जाणावें.

५८ दिवस गुरूची दशा नवमस्थानाचे ८ दिवस रवि भोगतो, त्याचें फळ धनप्राप्ति

४२ दिवस राहूची दशा ती दशमस्थानाचे २० दिवस रवि भोगतो त्याचें फळ नानाप्रकारचे शोक.

७० दिवस शुक्राची दशा द्वादशस्थानें रवि भोगतो; त्याचें फळ सर्व सौख्य जाणावें. ॥ ॥ या प्रकारें वर्षदशाक्रम जाणावा. ॥ ॥

ग्रहांच्या नित्यानित्य दशांचा प्रकार.

तिथिवारंचनक्षत्रंनामाक्षरसमन्वितम् ॥ नवभिश्चहरेद्भागंशेषंदिनदशोच्यते ॥ १ ॥ रविचंद्रौभौमराहूगुरुमंदज्ञकेसितौ ॥ क्रमेणैकादशाक्षेयाफलंपूर्वोक्तमेवहि ॥ २ ॥

टीका—गततिथि, वार, नक्षत्र आणि आपल्या नांवाचीं अक्षरें हीं सर्व एकत्र करून नवांनीं भागावें; शेष १ उरला तर रवीची दशा, २ उरले तर चंद्राची दशा, ३ राहिल्यास भौमाची दशा, ४ उरले तर राहूची दशा, ५ उरले तर गुरूची दशा, ६ उरले तर शनीची दशा, ७ उरले तर बुधाची दशा, ८ उरले तर केतूची दशा, भाग पुरला तर शुक्राची दशा, या प्रकारें अनुक्रमेंकरून नित्यदशा जाणावी. आणि फळश्रुति वर्षदशांचीच आहे.

अन्यमतें.

जन्मतांराचतुर्गुण्यंतिथिवारस्यमिश्रितम् ॥ नवभिस्तुहरेद्भागंशेषंदिनदशोच्यते ॥ १ ॥ रविणाशोकसंतापौशशांकेक्षेमलाभकौ ॥ भूमिपुत्रेतुमृत्युःस्याद्बुधेप्रज्ञाविवर्द्धनम् ॥ २ ॥ गुरौवित्तंभृगौसौख्यंशनौपीडानसंशयः ॥ राहुणाघातपातौचकेतौमृत्युर्दशाफलम् ॥ ३ ॥

टीका—जन्मनक्षत्र चतुर्गुणित करावें आणि त्यांत गततिथि व वार मिळवावे. आणि एकत्र करून नवांनीं भागावें. शेष १ उरला तर त्या दिवशीं रवीची दशा, फळ शोकसंतापकारक. २ उरले तर चंद्राची दशा तिचें फळ क्षेम व लाभकारक. ३ उरले तर भौमाची दशा, तिचें फळ मृत्युकारक. ४ उरले तर बुधाची दशा, तिचें फळ बुद्धिची वृद्धि. ५ उरले तर गुरूची दशा, तिचें फळ वित्तप्राप्ति ६ उरले तर शुक्राची

दशा, तिचें फळ सौख्यकारक. ७ उरले तर शनीची दशा, तिचें फळ पीडाकारक. ८ उरले तर राहूची दशा, तिचें फळ घातक. ९ उरले तर केतूची दशा, तिचें फळ मृत्यु. या प्रकारें फळें जाणावीं.

(गोचरप्रकरण)ग्रह किती मास एकेक राशि भोगितो.

मासंशुक्रबुधादित्याःसार्द्धमासंतुमंगलः ॥ त्रयोदशगुरुश्चैवस पादद्वेदिनेशशी ॥ १ ॥ राहुरष्टादशान्मासान्त्रिंशन्मासान् शनैश्वरः ॥ राहुवत्केतुरुक्तस्तुराशिभोगाःप्रकीर्तिताः ॥ २ ॥
॥ फल ॥ ॥ सूर्यःपंचदिनंशशीत्रिघटिकाभौमोष्टवैवासरं सप्ताहंह्युशनाबुधत्रयदिनंमासद्वयंवैगुरुः ॥ षण्मासंरविजस्त थैवसततंस्वर्भानुमासद्वयेकेतोश्चैवतथाफलंपरिमितंज्ञेयंग्रहाणां फलम् ॥ ३ ॥ राशिप्रवेशेसूर्यारौमध्येशुक्रबृहस्पती ॥ राहुश्चंद्रः शनिश्चांतेसौम्यश्चैवसदाशुभम् ॥ ४ ॥

टीका---राशीला ग्रह भोगतात त्यांची माससंख्या आणि आदि, मध्य, अंत्य फळ देतात त्यांचे दिवस संख्याक्रम अनुक्रमें सांगतों.

सूर्य, एकमास राशि भोगितो त्यांत प्रथम ५ दिवस फळ देतो.
चंद्र, सव्वादोन दिवस १ राशि भोगितो त्यांत अंतींच्या ३ घटिका फळ देतो.
मंगळ, दीड मास १ राशि भोगितो त्यांतील प्रथम ८ दिवस फळ देतो.
बुध, एक मास १ राशि भोगितो. त्याचें सगळे दिवस फळ जाणावें.
गुरु, तेरा मास १ राशि भोगतो त्याचें फळ मध्यभागीं २ मास जाणावें.
शुक्र, एक मास १ राशि भोगतो त्यांतील मध्यभागीं ७ दिवस फळ.
शनि, तीसमास १ राशि भोगतो त्यांत अंतींचे ६ मास फळ देतो.
राहु, केतु, अठरा महिने एक राशि भोग० त्यांतील अंतींचे २ मास फळ देतात.

द्वादशभवनांच्या स्थानांचें शुभाशुभ कोष्टक सां०

॥ द्वादशस्थानांचीं नांवें ॥ ॥ तत्रादौतनुधनसहजसुहृतसुत रिपवश्च ॥ जायामृत्युधर्मकर्मव्ययाख्यानिद्वादशभवनानि ॥ ॥१॥ ॥ स्थानपरत्वें फळ ॥ ॥ सूर्यःस्थानविनाशंभयंश्रियंमा

नहानिमथदैन्यम् ॥ विजयंमार्गपीडांसुकृतंहंतिसिद्धिमायमंथ हानिम् ॥१॥ चंद्रोऽन्नंचधनंसौख्यंरोगंकार्यक्षतिंश्रियम् ॥ श्रियं मृत्युंनृपभयंसुखमायव्ययंक्रमात् ॥ २ ॥ भौमोरिभीतिंनधना शमर्थंभयंतथार्थक्षतिमर्थंलाभम् ॥ धनात्ययंशत्रुभयंचपीडांशो कंधनंहानिमनुक्रमेण ॥ ३ ॥ बुधस्तुबंधनमन्यभीतिंधनंरुजं स्थानमथोचपीडाम् ॥ अर्थंरुजंसौख्यमथात्मसौख्यमर्थक्षतिंज न्मगृहात्करोति ॥ ४ ॥ गुरुर्भयंधनंक्लेशंधननाशंसुखंशुचिः ॥ मानंरोगंसुखंदैन्यंलाभंपीडांचजन्मभात् ॥ ५ ॥ कविशत्रुना शंधनंसौख्यमर्थंसुताप्तिंरिपोःसाध्वसंशोकमर्थम् ॥ बृहद्वस्त्रला भंविपत्तिंधनाप्तिंधनाप्तिंतनोत्यात्मनोजन्मराशेः ॥ ६ ॥ सर्वनाशं शनिर्वित्तनाशंविधत्तेधनंशत्रुवृद्धिंसुतादेःप्रवृद्धिम् ॥ श्रियंदोष संधिंरिपुंद्रव्यनाशंतथादौर्मनस्यंधनंबह्वनर्थम् ॥ ७ ॥ राहुर्हानिं तथानैःस्वंधनंवैरंशुचंश्रियम् ॥ कलिंवसुंचदुरितंवैरंसौख्यंशुचंक्र मात् ॥ ८ ॥ केतुःक्रमाद्रुजंवैरंसुखंभीतिंशुचंधनम् ॥ गतिंगदंदु ष्कार्तिंचशोकंकीर्तिंचशत्रुताम् ॥ ९ ॥

नांवें	रवि	चन्द्र	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि	राहु	केतु
तनु	नाश	अन्नप्रा.	शत्रुभय	बंधन	भय	शत्रुनाश	सर्वना.	हानि	रोग
धन	भय	धनप्रा०	धननाश	धनप्राप्ति	धनप्राप्ति	धनप्राप्ति	वित्तना.	धनना०	वैर
सहज	लक्ष्मी	सुख	धनप्राप्ति	भीति	क्लेश	सौख्य	धनला.	धनप्रा.	सुख
सुहृत्	मानहानि	रोग	भय	धनप्राप्ति	धननाश	धनप्रा०	शत्रुवृ.	वैर	भय
सुत	दैन्य	कार्यक्षय	अर्थप्रा०	रोग	सुख	पुत्रप्रा०	सुतप्रा.	शुचि	शुचिष्म
रिपु	विजय	लक्ष्मी	लाभ	स्था. ला.	शोक	रिपुभय	धनप्रा.	लक्ष्मी	धनप्रा.
जाया	मार्गक्र.	लक्ष्मी	खर्च	पीडा	मान	शोक	दोष	कलह	मार्गक्र.
मृत्यु	पीडा	मृत्यु	शत्रुभय	अर्थप्रा०	रोग	धनप्रा०	रिपु	धनला०	रोग
धर्म	पुण्यना.	राजभय	पीडा	रोग	सुख	म. व. ला.	धनना.	पापक.	दुष्टकर्म
कर्म	सिद्धि	सुख	शोक	सौख्य	दैन्य	विपत्ति	दौर्मनस्य	वैर	शोक
आय	लाभ	आदाय	धनप्राप्ति	सौख्य	लाभ	धनप्रा०	धनप्रा.	सौख्य	कीर्ति
व्यय	हानि	खर्च	हानि	नाश	पीडा	धनप्राप्ति	धनना.	शुचि	शत्रुना.

जन्मस्थ चंद्र असतां पंचकर्में वर्ज्य.

जन्मस्थर्क्षेशशांकेतुपंचकर्माणिवर्जयेत् ॥
यात्रांयुद्धंविवाहंचक्षौरंचगृहवेशनम् ॥ १ ॥

टीका—यात्रेस आणि युद्धांत जाणें व विवाह, क्षौर करणें आणि गृहप्रवेश अशीं हीं पांच कर्में जन्मस्थ चंद्र असतां वर्जावीं.

श्रेष्ठस्थानपरत्वें चंद्राचें बळ उक्त.

द्विपंचनवमेशुक्लेश्रेष्ठश्चंन्द्रोहिउच्यते ॥ अष्टमेद्वादशेकृष्णेचतुर्थेश्रेष्ठउच्यते ॥ शुक्लपक्षेबलीचंद्रःकृष्णेताराबलीयसी ॥ १ ॥

टीका—दुसरे, अथवा पांचवे व नववे स्थानीं चंद्र असतां शुक्लपक्षीं श्रेष्ठ जसा तसाच कृष्णपक्षीं आठवे, बारावे, चौथे स्थानीं श्रेष्ठ परंतु शुक्लपक्षीं चन्द्रबळ आणि कृष्णपक्षीं ताराबळ असें श्रेष्ठ होय.

ग्रहांचीं नेष्ठस्थानें.

येखेचरागोचरतोऽष्टवर्गाद्दशाक्रमाद्वाप्यशुभाभवंति ॥
दानादिनातेसुतरांप्रसन्नास्तेनाधुनादानविधिंप्रवक्ष्ये ॥ १ ॥

टीका—ग्रह, गोचरींचा अथवा अष्टवर्गीचा किंवा दशाक्रमाचा जो नेष्ठस्थानीं असेल त्यास प्रसन्न करण्यास दानें करावीं लागतात.

वारपरत्वें दानें.

भानुस्तांबूलदानादपहरतिनृणांवैकृतंवासरोत्थंसोमःश्रीखंडदानादवनिवरसुतोभोजनात्पुण्यदानात् ॥ सौम्यःशास्त्रस्यमंत्राद्गुरुहरभजनाद्भार्गवःशुभ्रवस्त्रात्तैलस्नानात्प्रभातेदिनकरतनयोब्रह्महत्यापरेच ॥ १ ॥

टीका—सूर्यास तांबूलदान, चन्द्रास श्रीखंड; मंगळास भोजन आणि पुण्यदान; बुधास शास्त्रोक्त मंत्रजप; गुरूस सांबाचें आराधन व भजन, शुक्रास शुभ्र वस्त्र; शनीस तैलाभ्यंग आणि विप्रास नमन; याप्रकारें ज्या ग्रहाचें त्या वारीं केलें म्हणजे दोष जातात व शुभफळ प्राप्त होतें.

ग्रहांचीं दानें व फळ.

॥ रविप्रीत्यर्थ दानें ॥ ॥ माणिक्यगोधूमसवत्सधेनुःकौसुंभवासो गुडहेमताम्रम् ॥ आरक्तकंचंदनमंबुजंचवदंतिदानंहिविरोचनाय ॥ १ ॥ ॥ चंद्राचीं दानें ॥ ॥ सद्वंशपात्रस्थिततंदुलाश्चक र्पूरमुक्ताफलशुभ्रवस्त्रम् ॥ युगोपयुक्तंवृषभंचरौप्यंचंद्रायदद्याद्घृत पूर्णकुंभम् ॥ २ ॥ ॥ भौमाचीं दानें ॥ ॥ प्रवालगोधूममसु रिकाश्ववृषोरुणश्चापिगुडःसुवर्णम् ॥ आरक्तवस्त्रंकरवीरपुष्पंताम्रंच भौमायवदंतिदानम् ॥ ३ ॥ ॥ बुधाचीं दानें ॥ ॥ चैलंचनीलंकलधौ तकांस्यंमुद्गाज्यगारुत्मतसर्वपुष्पम् ॥ दासीचदन्तोद्विरदस्यनू नंवदंतिदानंविधुनंदनाय ॥ ४ ॥ ॥ गुरूचीं दानें ॥ ॥ शर्कराचरज नीतुरंगमःपीतधान्यमपिपीतमंबरम् ॥ पुष्करागलवणंसकांचनं प्रीतयेसुरगुरोःप्रदीयते ॥ ५ ॥ ॥ शुक्राचीं दानें ॥ ॥ चित्रांब रंशुभ्रतुरंगमंचधेनुंचवज्रंरजतंसुवर्णम् ॥ सतंदुलानुत्तमगंधयुक्तंवदं तिदानंभृगुनंदनाय ॥ ६ ॥ ॥ शनीचीं दानें ॥ ॥ माषाश्चतैलं विमलेंद्रनीलंतिलाःकुलित्थामहिषीचलोहम् ॥ कृष्णाचधेनूःप्रव दंतिनूनंदुष्टायदानंरविनंदनाय ॥ ७ ॥ ॥ राहूचीं दानें ॥ ॥ गो मेदरत्नंचतुरंगमश्वसुनीलचैलामलकंबलंच ॥ तिलाश्चतैलंख लुलोहमिश्रंस्वर्भानवेदानमिदंवदंति ॥ ८ ॥ ॥ केतूचीं दानें ॥ ॥ वैडूर्यरत्नंसतिलंचतैलंसुकंबलश्चापिमदोमृगस्य ॥ शस्त्रंचकेतोः परितोषहेतोश्छगस्यदानंकथितंमुनींद्रैः ॥ ९ ॥ ॥ ग्रहांचा जप ॥ ॥ रवेःसप्तसहस्राणिचन्द्रस्यैकादशैवतु ॥ भौमेदशसहस्राणिबुधे चाष्टसहस्रकम् ॥ १० ॥ एकोनविंशतिर्जीवेशुक्रेएकादशैवतु ॥ त्रयोविंशतिमंदेचराहोरष्टादशैवतु ॥ केतोःसप्तसहस्राणिजपसं ख्याप्रकीर्तिता ॥ ११ ॥

नांवें	रवि	चंद्र	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि	राहु	केतु
दान	माणिक	वेळुपात्र	पोवळें	काळा बै.	साखर	चित्रवस्त्र	उडीद	गोमेद	वैडूर्य
	गहूं	तंदुळ	गहूं	सोनें	हळद	श्वेतअश्व	तेल	घोडा	रत्न
	गौ व वत्स	कर्पूर	मसूर	कांस्यपा.	घोडा	गाय	नील	निळें वस्त्र	तीळ
	तांबडें०	मोत्यें	ताम्रबैल	मूग	च०डाल	वज्र	तीळ	कांवळें	तेल
	गूळ	श्वेतवस्त्र	गूळ	तूप	पिंवळेंवस्त्र	रुपें	हुलगे	तीळ	कांवळें
	सोनें	जानवें	सोनें	गारुमत	पुष्पराग	सोनें	म्हैस	तेल	कस्तुरी
	तांबें	श्वेतबैल	ताम्रवस्त्र	कुळवोण	मीठ	तांदूळ	लोह	लोह	शंख.
	रक्तचंदन	रुपें	कण्हेरपुष्प	हस्तिदंत	सोनें	चंदन	काळी गाय	पुष्पका०	मेंढा
	कमळ.	घृतकुंभ	तांबें	नीळ	०	०	०	०	०
जप	७०००	११०००	१००००	८०००	१९०००	११०००	२३०००	१८०००	७०००

ग्रहपीडा निवारणार्थ.

देवब्राह्मणवंदनाद्गुरुवचःसंपादनात्प्रत्यहंसाधूनामभिभाषणाच्छ्रु
तिरवःश्रेयःकथाकारणात् ॥ होमादध्वरदर्शनाच्छुचिमनोभा
वाज्जपाद्दानतोनोकुर्वंतिकदाचिदेवपुरुषस्यैवंग्रहाःपीडनम् ॥ १ ॥

टीका—देवब्राह्मणांस नमन करावें आणि प्रतिदिवशीं गुरु व साधु यांचे मुखां-
तून उत्तम कथा श्रवण कराव्या, होम व अध्वरदर्शन करावें, मनोभावें जप आणि
दान केलें असतां पीडा निरसन होऊन उत्तम फल प्राप्त होतें.

जातकर्म (पुत्रावण).

जातेपुत्रेपिताकुर्यान्नान्दीश्राद्धंविधानतः ॥
जातकर्मततःकुर्यादन्यैरालंभनात्पुरा ॥ १ ॥

टीका—पुत्रजन्म झाल्यावर तात्कालिक पित्यानें नांदीश्राद्धोक्त विधिपूर्वक
शिशूस अन्यानीं स्पर्श केल्यचे पूर्वीं जातकर्मसंस्कार करावा.

नामकर्म (नांव ठेवणें).

पुष्यार्कत्रयमैत्रभेतुमृगभेज्येष्ठाधनिष्ठोत्तरादित्याख्येषुचनामकर्म
शुभदंयोगेप्रशस्तेतिथौ ॥ अह्निद्वादशकेतथाऽन्यदिवसेशस्ते
तथैकादशेगोसिंहालिघटेष्वृर्कबुधयोर्जीवेशशांकेऽपिच ॥ १ ॥

टीका—पुष्य, हस्त, चित्रा, स्वाती, अनुराधा, मृग, ज्येष्ठा, धनिष्ठा, उत्तरात्रय,
पुनर्वसु हीं आणि जन्मापासून १२ अथवा ११ वा दिवस उक्त. अन्य मतें १६,

२०, २२, १०० हे उक्त. आणि वृषभ, सिंह, कुंभ, वृश्चिक हीं लग्नें व रवि, बुध, गुरु, शुक्र, शनि वार शुभ. रिक्तातिथ्यादि दुष्ट योगादि वर्जित करून शुभ पाहून नाम ठेवावें.

नांवाचें अवकहडा चक्र.

चूचेचोलाश्विनीप्रोक्तालीलूलेलोभरण्यथ ॥ आईऊएकृत्तिकास्याद्वो वावीवूतुरोहिणी ॥ १ ॥ वेवोकाकीमृगशिरःकुघंगछतथार्द्रका ॥ केको हाहीपुनर्वसुहूहेहोडातुपुष्यभे ॥ २ ॥ डीडूडेडोतुआश्लेषामामीमूमेमघा स्मृता ॥ मोटाटीटूपूर्वफल्गुटेटोपापीत्युत्तरंतथा ॥ ३ ॥ पूषंणाठाह- स्ततारापेपोरारीतुचित्रका ॥ रूरेरोतास्मृतास्वातीतीतूतेतोविशाखिका ॥ ४ ॥ नानीनूनेनुऽराधाक्षंज्येष्ठानोयायियूस्मृता ॥ येयोभाभीमूळता- रापूर्वाषाढाभूधाफढा ॥ ५ ॥ भेभोजाज्युत्तराषाढाजूजेजोखाभिजिद्भ- वेत् ॥ खीखूखेखोश्रवणंगागीगूगेधनिष्ठिका ॥ ६ ॥ गोसासीसूशत भिषक्सेसोदादीतुपूर्वभाद् ॥ दूथझञथोत्तरभाद्रदेदोचाचीतुरेवती ॥ ७ ॥

चूचेचोला	अश्विनी	हूहेहोडा	पुष्य	रूरेरोता	स्वाती	जूजेजोखा	अभिजित
लीलूलेलो	भरणी	डीडूडेडो	आश्लेषा	तीतूतेतो	विशाखा	खीखूखेखो	श्रवण
आईऊए	कृत्तिका	मामीमूमे	मघा	नानीनूने	अनुराधा	गागीगूगे	धनिष्ठा
ओवावीवू	रोहिणी	मोटाटीटू	पूर्वा	नोयायियू	ज्येष्ठा	गोसासीसू	शततारका
वेवोकाकी	मृग	टेटोपापी	उत्तरा	येयोभाभी	मूळ	सेसोदादी	पूर्वाभाद्रप
कुघंगछ	आर्द्रा	पूषणाठ	हस्त	भूधाफढा	पूर्वाषाढा	दूथझञ	उत्तराभाद्र.
केकोहाही	पुनर्वसु	पेपोरारी	चित्रा	भेभोजाजी	उत्तराषाढा	देदोचाची	रेवती

मंचकारोहण.

शशितुरगधनिष्ठारेवतीपुष्यचित्राशत भिषगनुराधात्र्युत्तरास्वातिहस्ताः ॥ बुधगुरुभृगुवारेसौम्यलग्नेऽर्भकस्यनिगदितमिहपूर्वैर्मंचकारोहणंतु ॥ १ ॥

टीका—मृग, अश्विनी, धनिष्ठा, रेवती पुष्य, चित्रा, शततारका, अनुराधा, उत्तरात्रय, स्वाती, हस्त या नक्षत्रांवर आणि बुध, गुरु, शुक्र हे वार आणि तुळ, कुंभ, वृश्चिक या लग्नांवर शिशूचें प्राक्शिर करून मंचकावर प्रथम आरोहण करावें, शुभकारक होय.

पालकारोहण (बालकास पाळण्यांत ठेवणें).

आंदोलशयनंपुंसोद्वादशेदिवसेशुभम् ॥
त्रयोदशेतुकन्यायाननक्षत्रविचारणा ॥ १ ॥

टीका—जन्म जाहल्यापासून मुलाला बारावा दिवस आणि कन्येस तेरावा दिवस असे पाळण्यांत ठेवण्यास उक्त. नक्षत्रविचारणा करणें जरूर नाहीं.

बृहस्पतिमतानें दुग्धपानास मुहूर्त.

एकत्रिंशद्दिनेचैवपयःशंखेनपाययेत् ॥
अन्नप्राशननक्षत्रदिवसोदयराशिषु ॥ १ ॥

टीका—जन्म जाहल्यापासून ३१ वे दिनीं जीं अन्नप्राशनास नक्षत्रें सांगितलीं आहेत त्यांजवर शंखामध्यें दूध घेऊन प्रथमतः शिशूस पाजवें.

तांबूलभक्षण.

सार्द्धमासद्वयेदद्यात्तांबूलंप्रथमंशिशोः ॥ कर्पूरादिकसंमिश्रंविलासायहितायच ॥ १ ॥ मूलेचचित्राकरतिष्यहरींद्रभेषुपौष्णेतथामृगशिरेदितिवासरेषु ॥ अर्केंदुजीवभृगुबोधनवासरेषुतांबूलभक्षणविधिर्मुनिभिःप्रदिष्टः २ ॥

टीका—जन्म जाहल्यापासून अडीच महिन्यांनीं कर्पूरादिक पदार्थ मिश्रित करून तांबूल द्यावा; ह्मणजे विलासकारक आणि हितकर्ता होतो. त्याचा दिवस मूळ, हस्त, चित्रा, पुष्य, श्रवण, ज्येष्ठा, रेवती, मृग, पुनर्वसु, धनिष्ठा आणि रवि, सोम गुरु, शुक्र, बुध हे वार, यांतून शुभ पाहून शिशूस तांबूल भक्षण करवावा.

सूर्यावलोकन.

हस्तःपुष्यपुनर्वसूहरियुगंमैत्रत्रयंरोहिणीरेवत्युत्तरफाल्गुनीमृगयुता षाढोत्तरास्वातिषु ॥ मासोतुर्यतृतीयकौशनिकुजौत्यक्त्वा चरिक्तांतिथिंसिंहादित्रयकुंभराशिसहितंनिष्कासनंशस्यते ॥ १ ॥

टीका—हस्त, पुष्य, पुनर्वसु, श्रवण, धनिष्ठा, अनुराधा, ज्येष्ठा, मूळ, रोहिणी, रेवती, उत्तराफाल्गुनी, मृग, उत्तराषाढा, स्वाती आणि चवथा, तिसरा हे मास शुभ. आणि शनि, भौम व रिक्तातिथि वर्ज्य करून सिंह, कन्या, तूळ, कुंभ हीं लग्नें उक्त. असें शुभदिवशीं प्रथमतः शिशूस बाहेर नेऊन सूर्यावलोकन करावें.

कर्णवेध.

रोहिण्युत्तरमूलमैत्रमृगभेविष्णुत्रयेऽर्कत्रयेरेवत्यांचपुनर्वसुद्वयभ गेकर्णस्यवेधःशुभः ॥ मीनेस्त्रीधनुमन्मथेषुचघटेवर्षेचयुग्मेति- थौसौम्येचेंदुगुरौरवौचशयनंत्यक्त्वाचविष्णोर्बुधैः ॥ १ ॥

टीका—रोहिणी, तिन्ही उत्तरा, मूळ, अनुराधा, मृग, श्रवण, धनिष्ठा, शततारका, हस्त, चित्रा, स्वाती, रेवती, पुनर्वसु, पुष्य हीं नक्षत्रें आणि मीन, कन्या, धन, मिथुन, कुंभ हीं लग्नें, शुभ. आणि युग्मवर्षे, युग्मतिथि, उदगयनांत बुध, इंदु, गुरु, रवि हे वार उक्त विष्णुशयन (चातुर्मास्य) वर्ज्य करून शिशूस कर्णवेध करावा.

कन्येचा नासिकावेध.

कर्णवेधोक्तमेशस्तंकन्यायाघ्राणवेधनम् ॥
त्र्युत्तरा जलपस्वातौपूर्वाह्णेशुक्लपक्षके ॥ १ ॥

टीका—उत्तरात्रय, शततारका, स्वातीनक्षत्र व कर्णवेधास जीं नक्षत्रें उक्त आहेत तीं आणि पूर्वाह्ण व शुक्लपक्ष हीं सर्व कन्येचें नाक टोंचण्यास उक्त आहेत.

कटिसूत्र व भूम्युपवेशनं.

पुष्यहस्ताश्विनीमूलेत्र्युत्तरेरोहिणीमृगे ॥ ज्येष्ठायामनुराधायांशुभा हेमासिपंचमे ॥ १ ॥ कुजेशुद्धेसमभ्यर्च्यवाराहंधरणीं भुवि ॥ क टिसूत्रमथोबध्वाबालकंचोपवेशयेत् ॥ २ ॥ पुस्तकंलेखनींशस्त्रंरौप्यं चकांचनंतथा ॥ तस्मिन्कालेयदादत्तेतद्वृत्त्याजीवनंशिशोः ॥ ३ ॥

टीका—पुष्य, हस्त, अश्विनी, मूळ तिन्ही उत्तरा, रोहिणी, मृग, जेष्ठा व अनुराधा हीं नक्षत्रें, व पांचवा महिना आणि रविवारादि सर्व वार त्यांत मंगळवार तर विशेषेंकरून ग्राह्य अशा दिवशीं वराह व भूमी यांची पूजा करून बालकांचे कंबरेस दोरा बांधावा व भूमीवर ठेवावा. अशा दिवशीं लेंकरास भूमीवर ठेवल्यानंतर त्याचेजवळ पुस्तक, लेखणी, शस्त्र, रुपें आणि सोनें इत्यादि ठेवावें. ज्या वस्तूस तें स्पर्श करील त्या वस्तूनें त्याची उपजीविका होईल असें जाणावें.

अन्नप्राशन.

पूर्वार्द्राभरणीभुजंगवरुणंत्यक्त्वाकुजार्कीतथानंदापर्वचसप्तमी
मपितथारिक्तामपिद्वादशीम् ॥ षष्ठेमास्यथवान्नभक्षणविधिः
स्त्रीणामयुक्पंचमेगोकन्याझषमन्मथेबुधबलेपक्षेचयोगेशुभे ॥ १ ॥

टीका—तिन्ही पूर्वा, आर्द्रा, भरणी, आश्लेषा आणि भौम, शनि हे अशुभ वार तसेंच नंदा (प्रतिपदा, षष्ठी व एकादशी.) पर्वे (अमावास्या व पौर्णिमा) व रिक्ता (चतुर्थी, नवमी व चतुर्दशी) व सप्तमी आणि द्वादशी वर्ज्य करून सहावे अथवा आठवे महिन्यांत मुलास आणि कन्येस पांचवा महिना व दुसरे विषममास अन्नप्राशनास उक्त आहेत. वृषभ, मिथुन, कन्या या लग्नीं बल पाहून शुक्लपक्षीं व शुभ योगांचेठायीं अन्नप्राशन करवावें.

चौल.

रेवत्याद्यकरत्रयादितिमृगज्येष्ठासुविष्णुत्रयेपुष्येचोत्तरगेर
वौगुरुकवींदुज्ञेषुपक्षेसिते ॥ गोस्त्रीमन्मथचापकुंभमकरंहि
त्वाचरिक्तांतिथिंषष्ठीपर्वतथाष्टमीमपिसिनीवालींचमूढांशु
भाम् ॥ १॥ जन्मतस्तुतृतीयेऽब्देश्रेष्ठमिच्छंतिपंडिताः ॥
पंचमेसप्तमेवापिजन्मतोमध्यमंभवेत् ॥ २ ॥

टीका—रेवती, अश्विनी, हस्त, चित्रा, स्वाती, पुनर्वसु, मृग, ज्येष्ठा श्रवण, धनिष्ठा, शततारका, पुष्य आणि उदगयन गुरु, शुक्र, सोम, बुध आणि शुक्लपक्ष शुभ; वृषभ, कन्या, मिथुन, धन, कुंभ, मकर हीं लग्नें वर्ज्य करून शेष शुभ होत. रिक्ता आणि षष्ठी, अष्टमी, पर्वे अमावास्यादिक दुष्टतिथी वर्ज्य करून जन्म झाल्यापासून तिसरे वर्षीं चौल श्रेष्ठ असें पंडित ह्मणतात; आणि पांचवें सातवें वर्षें मध्यम होय.

विद्यारंभास मुहूर्त.

सौम्येविधौजीवके ॥ अब्देपंचमकेविहायनिखिलानध्यायषष्ठीयुता
रिक्तांसौम्यदिनेतथैवविबुधैःप्रोक्तोमुहूर्तःशुभः ॥ १ ॥

टीका—रेवती, मृग, आर्द्रा, पुनर्वसु, पुष्य, आश्लेषा, श्रवण, धनिष्ठा, पूर्वा, हस्तादित्रिक, मूळ अश्विनी, अभिजित् आणि रवि, बुध, शुक्र, गुरु, सोम हे वार, आणि जन्मापासून पांचवे वर्षीं शुभ होय. अनध्याय, षष्ठी, रिक्ता, पर्वण्यादिक दुष्टयोगादि तिथि वर्ज्य करून उदगयनांत शुक्लपक्षीं आणि शुभलग्नीं प्रथम विद्याभ्यासास आरंभ करावा.

मौंजीबंधनास मुहूर्त.

पूर्वाषाढहरित्रयेऽश्विमृगभेहस्तत्रयेरेवतीज्येष्ठापुष्यभगेषुचोत्तरगते
भानौचपक्षेसिते ॥ गोमीनप्रमदाधनुर्वनचरेशुक्रेर्कजीवेतिथौपंच
म्यांदशमीत्रयेव्रतमहश्चैवंद्विजन्मद्वये ॥ १ ॥

टीका—पूर्वाषाढा, श्रवण, धनिष्ठा, शततारका, अश्विनी, मृग, हस्त, चित्रा, स्वाती, रेवती, ज्येष्ठा, पुष्य, पूर्वाफाल्गुनी आणि उदगयन, शुक्लपक्ष व वृषभ, मीन, कन्या, धन, सिंह हीं लग्नें आणि शुक्र, रवि, गुरु, सोम हे वार आणि पंचमी दशम्यादि त्रिदिन ह्मणजे दशमी, एकादशी व द्वादशी ह्या तिथि हीं सर्व मौंजीस उक्त आहेत.

मासादिक मुहूर्त.

विप्रंवसंतेक्षितिपंनिदाघेवैश्यंघनांतेव्रतिनंविदध्यात् ॥
माघादिशुक्रांतिकपंचमासाःसाधारणावासकलद्विजानाम् ॥ १ ॥

टीका—विप्रास वसंत, क्षत्रियास ग्रीष्म, वैश्यास शिशिर, असे वर्णपरत्वें व्रतबंधास ऋतु घ्यावे आणि माघादिक शुक्र ह्मणजे ज्येष्ठापर्यंत पांच मास साधारण सकल द्विजांस उक्त होत.

वर्षसंख्या.

गर्भाष्टमेऽष्टमेवाब्देपञ्चमेसप्तमेऽपिवा ॥
द्विजत्वंप्राप्नुयाद्विप्रोवर्षेत्वेकादशेनृपः ॥ १ ॥

टीका—गर्भापासून अथवा जन्मतः आठवें वर्ष मुख्य. अथवा पांचवें किंवा सातवें वर्ष ब्राह्मणास आणि अकरावें वर्ष क्षत्रियास उक्त होय.

गुरुबल.

वर्णाधिपेबलोपेते उपनीतक्रियाहिता ॥
सर्वेषांचगुरौसूर्येचंद्रेचबलशालिनी ॥ १ ॥

टीका—वर्णाधिपतिपरत्वें बळ पहावें आणि सर्वांस गुरु, सूर्य, चंद्र यांचें बळ घ्यावें.

त्रयोदश्यादिचत्वारिसप्तम्यादितिथित्रयम् ॥
चतुर्थ्येकाकिनीप्रोक्ताह्यष्टावेवगलग्रहाः ॥ १ ॥

टीका—त्रयोदश्यादि प्रतिपदंत तिथि ४ व सप्तमी, अष्टमी, नवमी, चतुर्थी ह्या आठ तिथि गलग्रह त्या वर्जाव्या.

शूद्रादिकांस संस्कार करण्यास मुहूर्त.

मूलार्द्राश्रवणद्विदैववसुभेपुष्येतथाचाश्विभेरेवत्यांमृगरोहिणीदितिकरेमैत्रेतथावारुणे ॥ चित्रास्वातिमथोत्तराभृगुसुतेभौमेतथाचांद्रजेशूद्राणांतुबुधैःशुभंहिकथितंसंस्कारकर्मोत्तमम् ॥ १ ॥

टीका—मूळ, आर्द्रा, श्रवण, विशाखा, धनिष्ठा, पुष्य, अश्विनी, रेवती, मृग, रोहिणी, पुनर्वसु, हस्त, अनुराधा, शततारका, चित्रा, स्वाती, उत्तरात्रय हीं नक्षत्रें; आणि शुक्र, भौम व बुध हे वार शूद्रादिक व संकरजातीयांस उक्त आहेत.

विवाहप्रकरण. अस्तोदय.

प्रागुद्गतःशिशुरहस्त्रितयंसितःस्यात्पश्चाद्दशाहमिहपंचदिनानिवृद्धः ॥ प्राक्पक्षमेवगदितोऽत्रवसिष्ठमुख्यैर्जीवस्तुपक्षमपिवृद्धशिशुर्विवर्ज्यः ॥ १ ॥

टीका—पूर्वेस शुक्राचा उदय होतो तेव्हां ३ दिवस शिशुत्वाचे आणि अस्त होतो तेव्हां वृद्धत्वाचे १५ दिवस वर्जावे. आणि पश्चिमेस उदय होतो तेव्हां ९ दिवस शिशुत्वाचे आणि १० दिवस वृद्धत्वाचे वर्जावे. आणि गुरुचा अस्त व उदय यांस पंधरा पंधरा दिवस वर्जावे.

अस्त व उदयाचें लक्षण.

यमशरभुजवासरवज्रिणोदिशीद्विसप्तसितास्तमनंतुतथा ॥
गगनबाणयमैर्दिशिपश्चिमेनवदिनास्तमनंतुभृगोर्बुधैः ॥ २ ॥

टीका—२९२ दिवशीं शुक्राचा अस्त पूर्वेस होतो, त्याचा उदय ७२ वे दिवशीं पश्चिमेस होतो. आणि २५० वे दिवशीं पश्चिमेस अस्त होतो, त्याचा उदय ९ वे दिवशीं पूर्वेस होतो असें पंडितांनीं जाणावें.

अस्तांत वर्ज्य कर्मे.

वापीकूपतडागयज्ञगमनंक्षौरंप्रतिष्ठाव्रतंविद्यामंदिरकर्णवेधन
महादानंगुरोःसेवनम् ॥ ॥ तीर्थस्नानविवाहकाम्यहवनंमंत्रो
पदेशंशुभंदूरेणैवजिजीविषुःपरिहरेदस्तंगुरोर्भार्गवम् ॥ ३ ॥

टीका—विहीर, आड, तलाव, यज्ञ आणि गमन करणें चौल, देवप्रतिष्ठा, मौंजी, विद्यारंभ, नूतन गृहप्रवेश, मुलांचा कर्णवेध, महादानें, गुरुसेवा, तीर्थस्नान, विवाह, कामनिक होम, मंत्रोपदेश हीं कृत्यें ज्यांस वांचण्याची इच्छा असेल त्यांनीं गुरुशुक्राचे अस्तांत वर्जावीं.

विवाहास वर्ज्य.

आषाढप्रभृतिचतुष्टयेविवाहोनोपौषेनचमधुसंज्ञकेविधेयः ॥
नैवास्तंगतवतिभार्गवेचजीवेवृद्धत्वेनखलुतयोर्नबालभावे ॥ ४ ॥
गीर्वाणमंत्रिणिमृगेंद्रमधिष्ठितेनमासेऽधिकेत्रिदिनसंस्पृशिनावमेच ॥५॥

टीका—आषाढापासून चार मास आणि पौष व चैत्रमास, गुरुशुक्रांचा अस्त व सिंहस्थ, अधिक आणि क्षयमास, हीं सर्व विवाहास वर्जावीं.

मूलादिजन्मनक्षत्रांचे दोष.

मूलजाचगुणंहंतिव्यालजाकुलटांगना ॥
विशाखजादेवरघ्नीज्येष्ठजाज्येष्ठनाशका ॥ ६ ॥

टीका—मूलनक्षत्रावर उत्पन्न झालेले कन्येचे गुण फार वाईट. आश्लेषा नक्षत्रावर उत्पन्न झालेली कन्या जारिणी. विशाखांवर झालेली दिरास मृत्युकारक. ज्येष्ठांवर झालेली ज्येष्ठबंधूस नाशकारक जाणावी.

जन्मनक्षत्रादि वर्ज्य.

जन्मर्क्षेजन्मदिवसेजन्ममासेशुभंत्यजेत् ॥ ज्येष्ठेमासाद्यगर्भस्य
शुभवर्ज्यांस्त्रियायथा ॥ ७ ॥ अज्येष्ठाकन्यकायत्रज्येष्ठपुत्रोवरो
यदि ॥ व्यत्ययेवाततोस्तत्रज्येष्ठोमासःशुभप्रदः ॥ ८ ॥

टीका—जन्मनक्षत्र, जन्मदिवस व जन्ममास, हीं शुभकार्यांचे ठायीं वर्जावीं. ज्येष्ठ महिना ज्येष्ठ पुत्राचे शुभकार्यास वर्ज्य; जसें स्त्रियांनीं पांढरें वस्त्र धारण करूं नये, परंतु कनिष्ठ कन्या आणि ज्येष्ठ वर असला तर ज्येष्ठमासीं विवाहास शुभ होय.

वर्षांचें प्रमाण.

जन्मतोगर्भाधानाद्वापंचमाब्दात्परंशुभम् ॥
कुमारीवरणंदानंमेखलाबंधनंतथा ॥ ९ ॥

टीका—जन्म झाल्यापासून अथवा गर्भधारणापासून पांचवे वर्षीं कन्यावरणास अथवा दानास व व्रतबंधास उक्त होय.

गुरु व चंद्र यांचें बळ.

स्त्रीणांगुरुबलंश्रेष्ठंपुरुषाणांरवेर्बलम् ॥
तयोश्चंद्रबलंश्रेष्ठमितिगर्गेणभाषितम् ॥ १० ॥

टीका—स्त्रियांस गुरुबळ आणि पुरुषांस रवीचें बळ आणि दोघांसही चंद्रबळ श्रेष्ठ होय.

गुरूचें बळ.

नष्टात्मजाधनवतीविधवाकुशीलापुत्रान्विताहतधवासुभगावि
पुत्रा ॥ स्वामिप्रियाविमतपुत्रधवाधनाढ्यावंध्याभवेत्सुरगुरौ
क्रमशोऽभिजन्म ॥ ११ ॥

टीका—कन्येस जन्मस्थ गुरु असतां विवाह केला तर मुलें मरतील, द्वितीय धनवती, तृतीय विधवा, चतुर्थ जारकर्मी, पंचम पुत्रान्विता, षष्ठ पति मरेल, सप्तम सौभाग्यवती, अष्टम अपुत्री, नवम पतिप्रिया, दशम मुलें वांचणार नाहींत आणि विधवा, एकादश धनाढ्या, द्वादश वांझ अशीं अनुक्रमें करून फळें जाणावीं.

गुरु अनुकूल करण्याचा प्रकार.

जन्मत्रिदशमारिस्थःपूजयाशुभदोगुरुः ॥
विवाहेचचतुर्थाष्टद्वादशस्थोमृतिप्रदः ॥ १२ ॥

टीका—जन्मस्थ, तृतीय, षष्ठ आणि दशम या स्थानींचा गुरु नष्ट, परंतु पूजा केली असतां शुभफल देतो. ४,८,१२ या स्थानींचा मृतिप्रद तो वर्जावा.

चन्द्राचें राशिभोग्य.

अश्विनीभरणीकृत्तिकाःपादंमेषः ॥ कृत्तिकात्रयोरोहिणी मृगशिरार्धंवृषभः ॥ १ ॥ मृगशिरार्धंआर्द्रापुनर्वसुत्रयंमिथुनः ॥ पुनर्वसोःपादंपुष्यआश्लेषांतंकर्कटकः ॥ २ ॥ मघापूर्वाउत्तराःपादंसिंहः ॥ उत्तरात्रयंहस्तचित्रार्धंकन्या ॥ ३ ॥ चित्रार्धंस्वाती विशाखात्रयंस्तूलः ॥ विशाखाःपादमनुराधाज्येष्ठांतंवृश्चिकः ॥ ४ ॥ मूलपूर्वाषाढाउत्तराषाढाःपादंधनुः ॥ उत्तराषाढात्रयंश्रवणधनिष्ठार्धंमकरः ॥ ५ ॥ धनिष्ठार्धंशततारकापूर्वाभाद्रपदात्रयंकुंभः ॥ पूर्वाभाद्रपदाःपादंउत्तराभाद्रपदारेवत्यंतंमीनः ॥ ६ ॥

टीका—सवादोन नक्षत्रें एकराशि भोगिते याप्रमाणें १२ राशींचा क्रम जाणावा.

घटित पाहण्याचा क्रम.

वर्णोवश्यंतथातारायोनिर्ग्रहगणौतथा ॥
भकूटंनाडिमैत्रीचइत्येताचाष्टमैत्रिका ॥ १ ॥

टीका—वर्ण १, वश्य २, तारा ३, योनि ४, ग्रह ५, गण ६, भकूट, ७ आणि नाडी ८ इत्यादिकांची मैत्री क्रमेंकरून जाणावी.

॥वर्णविचारः॥ ॥ मीनालिकर्कटाविप्रान्नृपाःसिंहाजधन्विनः ॥ कन्यानक्रवृषावैश्याशूद्रायुग्मतुलाघटाः ॥१॥ ॥ वश्यविचारः॥ द्वंद्वचापघटकन्यकातुलामानवाअजवृषौचतुष्पदाः ॥ कर्कमीनमकराजलोद्भवाकेसरीवनचरालिकीटकाः ॥ २ ॥ ॥ तारावलम् ॥ कन्यार्क्षाद्वरभंयावत्कन्याभंवरभादपि ॥ गणयेन्नवभिःशेषेत्रिष्वद्रिभमसत्स्मृतम् ॥ ३ ॥ ॥ योनिविचारः ॥ ॥ अश्वोगजश्छागसर्पौसर्पश्वानविडालकाः ॥ मेषोबिडालकश्चैव मूषकोमूषकश्चगौः ॥ ४ ॥ महिषीचततोव्याघ्रोमहिषोव्याघ्र

कंक्रमात् ॥ मृगोमृगस्तथाश्वाचकपिर्नकुलएवच ॥ ५ ॥ नकुलो वातरःसिंहोतुरगोमृगराट्पशुः ॥ अघोरेणक्रमेणैवह्यश्विन्यादि भयोनयः ॥ ६ ॥ ॥ वैरयोनिः ॥ ॥ गोव्याघ्रंगजसिंहमश्वम हिषंश्वैणंचबभ्रूरगंवैरंवानरमेषयोश्वसुमहत्तद्वद्बिडालोदुरुम् ॥ लो कानांव्यवहारतोऽन्यदपितज्ज्ञात्वाप्रयत्नादिदंदंपत्योर्नृपभृत्ययोर पिसदावर्ज्यंशुभस्यार्थिभिः ॥ ७ ॥ ॥ राशिस्वामिनः ॥ ॥ मेषवृश्चिकयोर्भौमःशुक्रोवृषतुलाधिपः ॥ कन्यामिथुनयोःसौम्यो गुरुस्तुधनमीनयोः ॥ ८ ॥ शनिर्नक्रस्यकुंभस्यकर्कस्यैवतुचंद्र माः ॥ सिंहस्याधिपतिःसूर्यः कथितोगणकैःक्रमात् ॥ ९ ॥ ॥ गणः ॥ ॥ अनुराधामृगोऽश्विस्तुश्रवणोदितिपुष्यकः ॥ स्वातीहस्तोरेवतीचनवदेवगणाःस्मृताः ॥ १० ॥ पूर्वात्रयंरो हिणीचह्युत्तरात्रयमेवच ॥ आर्द्रातुभरणीचैवनवैतेमानुषागणाः ॥ ११ ॥ आश्लेषाशतभिष्मूलविशाखाकृत्तिकातथा ॥ चित्रा ज्येष्ठावसुमघानवैतेराक्षसागणाः ॥ १२ ॥ ॥ अंत्यनाडी ॥ ॥ कृ त्तिकारोहिणीस्वातीमघाऽश्लेषाचरेवती ॥ श्रवणश्चोत्तराषा ढाविशाखात्वेकनाडिका ॥ १३ ॥ ॥ मध्यनाडी ॥ ॥ पूर्वा फाल्गुनिकाचित्राधनिष्ठाभरणीमृगः ॥ पूर्वाषाढाऽनुराधाचपु ष्योऽहिर्बुध्न्यमेवच ॥ १४ ॥ ॥ आद्यनाडी ॥ ॥ पूर्वाभाद्रपदा मूलंज्येष्ठाहस्तःपुनर्वसुः ॥ अश्विन्यार्द्राशतभिषाचोत्तरात्वे कनाडिका ॥ १५ ॥

ताराबलाची टीका.

वधूनक्षत्रापासून वरनक्षत्रापावेतों मोजावें, आणि नवांनीं भागावें, शेष ३, ७ अथवा ५ हे राहिल्यास अशुभ. अन्य सर्व शुभ होत.

असेंच वरनक्षत्रापासून वधूनक्षत्रापावेतों मोजिलें असतां पूर्ववत् प्रमाणेंच जाणावें.

घटितमान राशिपरत्वें.			
राशी	वर्ण	वैश्य	स्वामी
मेष	क्षत्रिय	चतुष्पद	भौम
वृषभ	वैश्य	चतुष्पद	शुक्र
मिथुन	शूद्र	मानव	बुध
कर्क	विप्र	जलचर	चन्द्र
सिंह	क्षत्रिय	वनचर	रवि
कन्या	वैश्य	मानव	बुध
तूळ	शूद्र	मानव	शनि
वृश्चिक	विप्र	कीटक	भौम
धन	क्षत्रिय	मानव	गुरु
मकर	वैश्य	जलचर	शुक्र
कुम्भ	शूद्र	मानव	शनि
मीन	ब्राह्मण	जलचर	गुरु

घटितमान नक्षत्रपरत्वें.				
नक्षत्र	योनि	वैरयोनि	गण	नाडी
अश्विनी	अश्व	ह्मैस	देव	आद्य
भरणी	गज	सिंह	मनुष्य	मध्य
कृत्तिका	मेंढा	वानर	राक्षस	अन्त्य
रोहिणी	सर्प	मुंगुस	मनुष्य	अन्त्य
मृग	सर्प	मुंगुस	देव	मध्य
आर्द्रा	श्वान	मुंगुस	मनुष्य	आद्य
पुनर्वसु	मांजर	उंदीर	देव	आद्य
पुष्य	मेंढा	वानर	देव	मध्य
आश्लेषा	मांजर	उंदीर	राक्षस	अन्त्य
मघा	उंदीर	मांजर	राक्षस	अन्त्य
पूर्वा	उंदीर	मांजर	मनुष्य	मध्य
उत्तरा	गाय	व्याघ्र	मनुष्य	आद्य
हस्त	ह्मैस	अश्व	देव	आद्य
चित्रा	व्याघ्र	गाय	राक्षस	मध्य
स्वाती	टोणगा	अश्व	देव	अन्त्य
विशाखा	व्याघ्र	गाय	राक्षस	अन्त्य
अनुरा०	हरण	श्वान	देव	मध्य
ज्येष्ठा	मृग	श्वान	राक्षस	आद्य
मूळ	श्वान	मुंगुस	राक्षस	आद्य
पूर्वाषाढ	वानर	मेंढा	मनुष्य	मध्य
उत्तरा०	मुंगुस	सर्प	मनुष्य	अन्त्य
अभिजि	नकुळ	सर्प	मनुष्य	अन्त्य
श्रवण	मुंगुस	सर्प	देव	अन्त्य
धनिष्ठा	वानर	मेंढा	राक्षस	मध्य
शततार.	सिंह	गज	राक्षस	आद्य
पूर्वा.भा.	अश्व	ह्मैस	मनुष्य	आद्य
उत्त.भा.	गज	सिंह	मनुष्य	मध्य
रेवती	पशु	व्याघ्र	देव	अन्त्य

भकूट.

मीनालिभ्यांयुतेकोटेकुंभमिथुनसंयुते ॥
मकरेकन्यकायुक्तेनकुर्यान्नवपंचके ॥ १ ॥

टीका—मीनापासून नवांचे अंतरानें वृश्चिक राशि येते व वृश्चिकापासून मीन राशि पांचवी येते; आणि कर्क मीनाशीं नवपंचक. वृश्चिकाशीं पांच, नव, आणि कुंभ व मिथुन, मकर व कन्या, या दोन राशी नवपंचकाच्या वर्जाव्या.

मृत्युषडाष्टक.

मेषकन्यकयोरेवतुलामीनकयोस्तथा ॥ युग्मालयोस्तुवैज्ञेयो
मृत्युर्वैनक्रसिंहयोः ॥ १ ॥ कुंभकर्कटयोश्चैवनृषकोदंडयोस्तथा ॥२॥

टीका—मेष व कन्या यांचें परस्परें सहा आणि आठ असें अंतर, याच क्रमानें तूळ, मीन, मिथुन, वृश्चिक, मकर, सिंह, कुंभ, कर्क, धन, वृषभ या दोन दोन राशींस मृत्युषडाष्टक ह्मणतात, तें वर्जावें.

प्रीतिषडाष्टक.

सिंहोमीनयुतश्चैवतुलावृषयुतातथा ॥ धनुकर्कयुतंचैवकुंभकन्य
कयोस्तथा ॥ १ ॥ नक्रस्यमिथुनेप्रीतिरजालयोःप्रीतिरुत्तमा ॥ २ ॥

टीका—सिंह आणि मीन, तूळ आणि वृषभ, कुंभ आणि कन्या, मकर आणि मिथुन, मेष आणि वृश्चिक, धन आणि कर्क या दोन दोन राशींचें प्रीतिषडाष्टक, हें शुभ होय.

द्विर्द्वादशक.

मेषझषौवृषमिथुनौकर्कहरीतूलकन्यकेराशी ॥
अलिधनुषिमकरकुंभावेतौद्विर्द्वादशेराशी ॥ १ ॥

टीका—मेष आणि मीन, वृषभ आणि मिथुन, कर्क आणि सिंह, तूळ आणि कन्या, वृश्चिक आणि धन, मकर आणि कुंभ या दोन दोन राशींचें द्विर्द्वादश येतें, हें वर्ज्य आहे.

चतुर्थ, दशम, तृतीय, एकादश, उभय सप्तम.

चतुर्थोदशमश्चैवतृतीयैकादशःशुभः ॥
उभयःसप्तमःसाम्यमेकर्क्षेशुभमुच्यते ॥ १ ॥

टीका—चतुर्थ, दशम अथवा तृतीय, एकादश हीं द्विर्द्वादशें शुभ, आणि उभय सप्तम मध्यम होत, एक नक्षत्र असल्यास शुभ जाणावें.

वश्यावश्य योजणें.

सिंहंविनानृणांसर्वेवश्याभक्ष्याश्वतोयजाः ॥
सिंहस्यवश्यात्यक्त्वालिंसर्वेणव्यवहारिकः ॥ १ ॥

ग्रहांचें शत्रुत्व, समत्व आणि मित्रत्व.

शत्रूमंदसितौसमश्चशशिजोमित्राणिशेषारवेस्तीक्ष्णांशुर्हिमरश्मिजश्चसुहृदौशेषाःसमाःशीतगोः॥ जीवेंदूष्णकराःकुजस्य सुहृदोज्ञोरिःसितार्कीसमौमित्रेसूर्यसितौबुधस्यहिमगुःशत्रुःसमाश्चापरे ॥ १ ॥ गुरोसौम्यसितावरीरविसुतोमध्योपरेत्वन्यथासौम्यार्कीसुहृदौसमोकुजगुरुशुक्रस्यशेषावरी ॥ शुक्रज्ञौसुहृदौसमःसुरगुरुःसौरेस्तुचान्येऽरयोयेप्रोक्ताःसुहृदस्त्रिकोणभवनात्तेमीमयाकीर्तिताः ॥ २ ॥

नांवें	रवि	चंद्र	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि
शत्रु	शनि शुक्र	०	बुध	चंद्र	बुध शुक्र	रवि चंद्र	रवि चं. मंगळ
सम	बुध	मं. गुरु. शुक्र श.	शु. शनि	मं. शनि गुरु	शनि	मंगळ गुरु	गुरु
मित्र	चंद्र मं. गुरु	रवि बुध	गुरु चं. रवि	रवि शु.	रवि चं. मंगळ	बुध शनि	बुध शुक्र

गुणांचें मेलन.

मुहूर्तमार्तंडमतावरून.

वर्णाचा गुण १.

उभयतांचा एक वर्ण अथवा वराचा उच्चवर्ण असतां गुण १ अन्यथा०

वश्याचे गुण. २.

वैरभक्ष्येगुणाभावोद्वयोःसाम्येगुणद्वयम् ॥
वश्यवैरेगुणश्चैकोवशभक्ष्येगुणार्धकम् ॥१॥

टीका—शत्रुभक्ष्य गुण ० एक जातीयगुण २ वश्य वैर गुण १ वश्य भक्ष्य गुण ॥०

वराचे वर्ण गुण.

वधूचे गुण	ब्रा.	क्ष.	वै.	शू.
ब्राह्मण	१	०	०	०
क्षत्रिय	१	१	०	०
वैश्य	१	१	१	०
शूद्र	१	१	१	१

वराचें वश्य / वधूचे	च.	मा.	ज.	वन.	की.
चतुष्पाद	२	॥	१	०	२
मानव	॥	२	०	०	०
जलचर	१	०	२	२	२
वनचर	०	०	२	२	०
कीटक	१	०	१	०	२

तारांचे गुण.

एकतोलभ्यतेताराशुभाचैवाशुभाऽन्यतः ॥ तदासार्द्धोगुणश्चैकस्ताराशुद्धौमिथस्त्रयः ॥ १ ॥ उभयोर्नशुभातारास्तदाशून्यंसमादिशेत् ॥ २ ॥

टीका—एकाची शुभ आणि एकाची अशुभ अशी आली तर गुण १॥ दोघांची एक तारा अथवा शुभ तारा आली तर गुण ३ आणि उभयतांची अशुभ तारा आली तर गुण ० जाणावा.

तारा	१	२	३	४	५	६	७	८	९
१	३	३	१॥	३	१॥	३	१॥	३	३
२	३	३	१॥	३	१॥	३	१॥	३	३
३	१॥	१॥	०	१॥	०	१॥	०	१॥	१॥
४	३	३	१॥	३	१॥	३	१॥	३	३
५	१॥	१॥	०	१॥	०	१॥	०	१॥	१॥
६	३	३	१॥	३	१॥	३	१॥	३	३
७	१॥	१॥	०	१॥	०	१॥	०	१॥	१॥
८	३	३	१॥	३	१॥	३	१॥	३	३
९	३	३	१॥	३	१॥	३	१॥	३	३

योनीचे गुण ४.

महावैरेचवैरेचस्वस्वभावेयथाक्रमम् ॥
मैत्रेचैवातिमैत्रेचखेंदुद्धित्रिचतुर्गुणाः ॥ १ ॥

टीका—महावैराचा गुण ॥ उभय शत्रुत्वाचा गुण १ स्वभावाचे गुण २ उभयमित्रत्वाचे गुण ३ अतिमित्रत्वाचे गुण ४ एका जातीचे गुण ४ व्यवहारांत ॥·

	अश्व	गज	मेष	सर्प	श्वान	मार्जा.	मूषक	गाय	महिष	व्याघ्र	हरण	वानर	मुंगुस	सिंह
अश्व	४	२	२	३	२	२	२	१	०	१	३	३	२	१
गज	२	४	३	३	२	२	२	२	३	१	२	३	२	०
मेष	२	३	४	२	१	२	१	३	३	१	२	०	३	१
सर्प	३	३	२	४	२	१	१	१	१	२	२	२	०	२
श्वान	२	२	१	२	४	२	१	२	२	१	०	२	१	१
मार्जा.	२	२	२	२	२	४	०	२	२	१	३	३	२	२
मूषक	२	२	१	१	१	०	४	२	२	२	२	२	२	१
गाय	१	२	३	२	२	२	३	४	३	३	३	२	२	१
महिष	०	३	३	२	२	२	२	३	४	१	२	२	२	३
व्याघ्र	१	२	१	१	१	१	२	०	१	४	१	१	२	२
हरण	३	२	२	२	०	३	२	३	२	१	४	२	२	२
वानर	३	३	०	२	२	३	२	२	२	१	२	४	३	२
मुंगुस	२	३	३	०	१	२	१	२	२	२	२	३	४	२
सिंह	१	०	१	१	१	१	१	१	३	२	२	२	२	४

ग्रहांचे गुण ५.

उभयतांचा स्वामी १ व मैत्रीचे गुण ५ आणि सम, शत्रुत्व गुण ॥ सम मित्रत्व गुण ४, शत्रु मित्रत्व गुण १, समत्व गुण ॥ या प्रकारें जाणावें.

गणाचे गुण ६.

उभयतांचा गण १ त्याचे गुण ६, वर देवगणी आणि वधु मनुष्यगणी त्याचे गुण ६, त्याचे विपरीत असतां ५, वर राक्षसगणी वधू देवगणी त्याचा गुण १, अन्यथा शून्य जाणावें.

वराचे.

	ग्रह	र.	चंद्र	भौम	बुध	गुरु	शुक्र	शनि
वधूचे	रवि	५	५	५	३	५	५	०
	चंद्र	५	५	४	१	४	-॥-	-॥-
	भौम	५	४	५	-॥-	५	३	-॥-
	बुध	३	१	-॥-	५	-॥-	५	४
	गुरु	५	४	५	-॥-	५	-॥-	३
	शुक्र	५	-॥-	३	५	-॥-	५	५
	शनि	०	-॥-	-॥-	४	३	५	५

वराचे.

		देव	मनुष्य	राक्षस
वधूचे	देव	६	६	१
	मनु.	६	६	०
	राक्षस	१	०	६

नाडीचे गुण. ८.

भिन्न नाडीचे गुण ८ एक नाडीचे गुण०

वराचे.

		आद्य	मध्य	अन्त्य
वधूचे	आद्य	०	८	८
	मध्य	८	०	८
	अन्त्य	८	८	०

एवं गुणमेलनं अष्टादशगुणोत्तरं शुभं, न्यूनं तु अशुभम्.

वर्णादिकांचीं फळें.

यास्याद्वर्णाधिकाकन्याभर्तातस्यानजीवति ॥
यदिजीवतिभर्तातुज्येष्ठपुत्रोविनश्यति ॥ १ ॥

टीका—कन्येचा वर्ण श्रेष्ठ असला तर तिचा भर्ता नाश पावेल. अथवा ज्येष्ठ पुत्र नाश पावेल.

वैरयोनीचें फळ.

अश्व आणि म्हैस अशा वैरयोनि परस्परें वधुवरांच्या तशाच राजाच्या व सेवकाच्या शुभइच्छकांनीं वर्ज कराव्या. व्यवहारवत्.

गणाचें लक्षण.

स्वगणाच्चोत्तमाप्रीतिर्मध्यमानरदेवयोः ॥
कलहोदेवदैत्यानांमृत्युर्मानवराक्षसाम् ॥ १ ॥

टीका—दोघांचा एक गण असला तर उत्तम प्रीति, मनुष्य आणि देव मध्यम, देव आणि दैत्य कलह, मनुष्य आणि राक्षस मृत्युप्रद असें जाणावें.

॥ कूटफलमाह ॥ षष्टाष्टकेऽपमृत्युःपंचमनवमेऽनपत्यताज्ञेया ॥
द्विर्द्वादशेनिर्धनताशेषेषुमध्यमताज्ञेया ॥ १ ॥

टीका—उभयतांचें षडाष्टक मृत्युकारक आणि नवपंचक अनपत्यकारक, द्विर्द्वादश निर्धनता हीं वर्ज्य. शेष मध्यम तीं घ्यावीं.

सत्कुटाचे गुण ७ व असत्कुट.

एक राशी भिन्न चरण व भिन्न नक्षत्र यांचे गुण ७, सम सप्तम गुण ७, तृतीय एकादश यांचे गुण ७, चतुर्थ दशम यांचे गुण ७, भिन्न राशि एक नक्षत्र यांचे गुण ९, प्रीतिषडाष्टक आणि द्विर्द्वादशक व नवपंचक वरदूरता योनिशत्रुत्व असतां भकूटाचे गुण ६ होत.

असत्कुटाचें लक्षण, जर योनिमैत्री व स्त्रीदूरत्व आहे तर षडाष्टक, द्विर्द्वादशक नवपंचमादि दुष्ट कूटाचे गुण ४ जाणावे.

योनिमैत्रत्व व स्त्रीदूरत्व यांतून एक आहे तर दुष्ट कूटाचा एक गुण आणि एक नक्षत्र व एक चरण उभयतांचा असतां गुण शून्य जाणावा.

	मेष	वृष.	मिथु	कर्क	सिंह	क.	तूळ	वृ०	धन	म०	कुंभ	मीन
मेष	७	०	७	७	०	०	७	०	०	७	७	०
वृषभ	७	७	०	७	७	०	०	७	०	०	७	७
मिथुन	०	७	७	०	७	७	०	०	७	०	०	७
कर्क	७	०	७	७	०	७	७	०	०	७	०	०
सिंह	०	७	०	७	७	०	७	७	०	०	७	०
कन्या	०	०	७	०	७	७	०	७	७	०	०	७
तूळ	७	०	०	७	०	७	७	०	७	७	०	०
वृश्चिक	०	७	०	०	७	०	७	७	०	७	७	०
धन	०	०	७	०	०	७	०	७	७	०	७	७
मकर	७	०	०	७	०	०	७	०	७	७	०	७
कुंभ	७	७	०	०	७	०	०	७	०	७	७	०
मीन	०	७	७	०	०	७	०	०	७	०	०	७

॥ नाडीफलमाह ॥ अग्रनाडीव्यधेभर्तामध्यनाडीव्यधेद्वयम् ॥
पृष्ठनाडीव्यधेत्कन्याम्रियतेनात्रसंशयः ॥ १ ॥

टीका—दोघांची आद्यनाडी भर्त्यास वाईट, मध्यनाडी दोघांस वाईट, अंत्यनाडी कन्येस मृत्युप्रद होय.

मध्यनाडी ॥ जठरेनिधनत्वंचगर्भेमरणमेवच ॥
पृष्ठेदौर्भाग्यमाप्नोतितस्मात्तांपरिवर्जयेत् ॥ १ ॥

टीका—दोघांची मध्यनाडी निधन आणि गर्भ असतां मृत्यु; अंत्यनाडी दौर्भाग्यकारक; ह्मणून त्या वर्जाव्या.

॥ ज्योतिःप्रकाशेपार्श्वनाडी ॥ निधनंमध्यनाड्यांतुदंपत्योर्नैवपार्श्वयोः॥
करग्रहेपृष्ठनाड्यौनानिंद्येइतितद्वचः ॥ १ ॥

टीका—दोघांची मध्यनाडी निधन, तशीच पार्श्वनाडी, परंतु विवाहांस पार्श्वनाडी निंदित नाहीं. अन्यमतें क्षत्रियादिकांस उक्त होय.

असत्कुटाचें फळ.

स्त्रीनक्षत्रापासून वरनक्षत्र जवळ असल्यास शुभ, आणि वरनक्षत्रापासून स्त्रीनक्षत्र दूर असलें तर शुभ, जर नक्षत्र एक असून राशि भिन्न अथवा स्वामी एक असून राशी भिन्न असल्यास शुभ.

वधूवरांचें गुण एकत्र पहाण्याचें कोष्टक.

		रा	मे.	मे.	मे.	वृ.	वृ.	वृ.	मि.	मि.	मि.	क.	क.	क.	सिं.	सिं.	सिं.	कं.	कं.
		भा.	१	१	·।·	·।॥·	१	·॥·	·॥·	१	·।॥·	·।·	१	१	१	१	·।·	·।॥·	१
राशि.	भा.	नक्ष.	अ.	भ.	कृ.	कृ.	रो.	मृ.	मृ.	आ.	पु.	पु.	पु.	आ.	म.	पू.	उ.	उ.	ह.
मेष	१	अ.	३६	३३	३२	२४	२१	२२	२७	२८	१९	२३॥	३१॥	२८	१७॥	२१॥	३२	११	१२
मेष	१	भ.	३४	३६	३४	३१	२२॥	१४॥	१९	२६	२७	३१॥	३३॥	२९॥	३२॥	३४॥	३२॥	२१॥	२[illegible]
मेष	·।·	कृ.	३२॥	३२	३६	३३	१०	१६॥	२०॥	२२	२१	२५	२३॥	२३॥	२३	२६॥	२६॥	१५॥	१५
वृषभ	·।॥·	कृ.	१८॥	१८॥	३६	३६	३४	३२॥	२५॥	२५॥	२९॥	२२	२४	२०	१८	२१॥	३१॥	२८	२८
वृषभ	१	रो.	२३॥	२४॥	१३	३४	३६	३४॥	३५॥	३२	२९	२६॥	२८	१२	१०	२४	२७॥	३४	३४
वृषभ	·॥·	मृ.	२४	११	११॥	३२॥	३६	३६	३५	३३	२९॥	२६	२०	२१	१८	१५	२५	३१	३४
मिथुन	·॥·	मृ.	२८	२९	२३॥	२७॥	३५	३६	३५	३४	३१॥	२०॥	१३॥	१४॥	२२॥	१८	२९॥	३१॥	[illegible]
मिथुन	१	आ.	२०	१८	२३	३३॥	३२॥	३४	३३	३४	३४	३३	२२॥	१५॥	२३॥	१९	२१	२६	[illegible]
मिथुन	·।॥·	पु.	३०	२७	२३	२७॥	३०॥	३१॥	३०॥	३४	३४	३४	२३	१६॥	२१॥	२५॥	२०॥	२३	२४
कर्क	·।·	पु	२३॥	२९॥	२५॥	२२	२५	२६	३०॥	१३	३३	३४	३४	३२॥	२२	१६	२२	१८॥	१८
कर्क	१	पु.	३०॥	२४	२७	२४	२१	१९	१३॥	२४	२३	३४	३६	३४	२५	२१	३०	१६॥	२६
कर्क	१	अ.	२६	२६	२२॥	१३	१२	२०	१४॥	१५॥	१५॥	३२	३४	३४	२०॥	२१	१४	२१॥	२०
सिंह	१	म.	२२	२८॥	३१	१७	१०	१८	२१॥	२२॥	२०॥	२२	२५	२२॥	३६	३६	३२	३[illegible]	१५
सिंह	१	पू.	२६	२४॥	२२॥	२०	२४	१६	१६॥	२८	२६॥	२९	३३	१९	३६	३६	३४	३०	[illegible]
सिंह	·।·	उ	१७	३२	३२	२०	२६	२५	२८	२०॥	२०॥	२३॥	३१	३१	३[illegible]	३४	३६	३३	१५
कन्या			[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
कन्या	१	ह.	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
कन्या	·॥·	चि.	१४	७	२०	३१	२८	२०	१९	२६	२४॥	२१॥	१३॥	२७॥	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
तूळ	·॥·	चि.	२३॥	१६	१९॥	२४॥	२१	१३	२०	२७	३५॥	२२	१३	२७	२५	११॥	१७॥	१८॥	३[illegible]
तूळ	१	स्वा.	३०॥	२९॥	१७॥	१२॥	१५॥	२७	३४	३३	३४॥	२२॥	२८	१५	१२॥	२४॥	२५॥	२६॥	३[illegible]
तूळ	·।॥·	वि.	२२॥	२४॥	२१॥	१६॥	११॥	९॥	३५	२७॥	२१	२२॥	२२॥	१९॥	१७॥	१९॥	१७॥	१८॥	२[illegible]
वृश्चिक	·।·	वि.	१७॥	२५॥	१५॥	२०	१५	२३	१३	१३॥	१३॥	२०	२०	११॥	११॥	२३॥	११॥	१८॥	१[illegible]
वृश्चिक	१	अ.	२४॥	१९॥	१९॥	२४॥	२८॥	२१॥	११	१६	२०॥	१७	१९	२१	२४	२०	१८	[illegible]	१[illegible]
वृश्चिक	१	ज्ये.	१२	१९॥	२४॥	२९॥	२३॥	२३॥	१३	३	५	११॥	२१	२६	[illegible]३	२०॥	१५॥	[illegible]	[illegible]
धन	१	मू.	२८	२८	३३	२०	१४	१४	२१	१३	१३	१०॥	१९॥	२६	३२॥	२६॥	१७	[illegible]	[illegible]
धन	१	पू.	३४	२६	३४॥	१५	१०	१२	१९	२७	२६	२४॥	१६॥	२८॥	३२॥	३४॥	३२	३[illegible]॥	[illegible]
धन	·।·	उ.	३२	३३	३४	१६	११॥	१८	२४	२७	२७	२४॥	२६॥	११॥	२३	३२॥	३२॥	१२	[illegible]
मकर	·।॥·	उ.	२८	२८॥	१५॥	२६	२३	२९॥	२१॥	१३॥	२३॥	२६	२८	१४	१६	२०॥	२०॥	२७	[illegible]
मकर	१	श्र.	२८	२७	२५	२१	२१	३४	२५	२२॥	३३॥	२८	२८	१५	१३	१८	१९॥	२६	[illegible]
मकर	·॥·	ध.	२१	१२	२६	३१	२८	२०	११	१८	१६॥	२०	१२	२६	२६	१५	१२	१८॥	[illegible]
कुंभ	·॥·	ध.	२१	१२	२६	३१॥	२८	२०	१२	१९	२७॥	१४	१६	२०	२५	११॥	१८॥	१४॥	[illegible]
कुंभ	१	श.	१६	२२	२८	२२॥	१६॥	२८	२०	१२	१२	८॥	१५	२१	२१॥	१९॥	११॥	७॥	[illegible]
कुंभ	·।॥·	पू.	१९	२६	२०	३४	३२॥	२२॥	२४॥	१७	१७	१३॥	२१॥	१४	१९॥	२५॥	१६॥	१२॥	[illegible]
मीन	·।·	पू.	२१॥	२९॥	२३॥	३३॥	२७	२७	२७	२७	१८	१७	२६	७॥	३०	२३	१४	१८॥	[illegible]
मीन	१	उ.	३१॥	२३॥	३१॥	३१॥	२७	१९	१९	२७	२८	२६	१९	२०	३०	१५॥	२५	१९	[illegible]
मीन	१	रे.	३२	३०	१८॥	१८॥	१[illegible]	[illegible]	[illegible]	२६	२६॥	२४॥	२३	१३	१८॥	२३	२३	२६	[illegible]

	तू.	तू.	तू.	वृ.	वृ.	वृ.	ध.	ध.	ध.	म.	म.	म.	कुं.	कुं.	कुं.	मी.	मी.	मी.	
।·	·॥·	१	·।॥·	·।·	१	१	१	१	·।·	·।॥·	१	·॥·	·॥·	१	·।॥·	·।·	१	१	
[illegible]	चि.	स्वा.	वि.	वि.	अ.	ज्ये.	मू.	पू.	उ.	उ.	श्र.	ध.	ध.	श.	पू.	पू.	उ.	रे.	
४	२२॥	२९॥	२३॥	१९॥	२४	१५	२१	३३	३१	३६	२७	२१	२१	१६	१०	२२	३१	३४	१
	१३॥	१९॥	२२॥	१८॥	१५॥	१९॥	३४	२६	३४	२८॥	२७॥	११	११	२७	२५	३०॥	२४	३२	२
९॥	२७॥	१५॥	१९॥	१६॥	१८॥	२५॥	३३॥	२८॥	२०	१४॥	२४	२५	२६	२७	२०	२५॥	२६॥	१०॥	३
२८	२०	७॥	१२॥	२०॥	१६॥	३०॥	२२	२३॥	९॥	१४	२०॥	३१॥	३०॥	३१॥	२४॥	२१॥	२१॥	१४	४
३४	१७	१३॥	६॥	१४	२९॥	२४॥	१५	३१	१२॥	१८	२६	३४॥	३३	३१॥	३१	२८	२८	३०	५
२१	१०	२३	१५॥	२३॥	२१॥	२५॥	१६	१२	१८	२३॥	३४	२१	२०	२८	२०॥	२७	२९	२८	६
२१	२१	३४	३४॥	२४	११	१५॥	२३	१९	१८	२१॥	२६	१३	१४	२९	२४॥	२७	२९	२८	७
४	३४	३४	३५	२१॥	१७	४	१४	२८	२८	२५॥	२९	१९	२०	१३	८	२०॥	२८	२८	८
७॥	२७॥	३४	२९	१६॥	२१॥	७	१५	२७	२७	२३॥	२४॥	१८	१९॥	१४	१०	१९	२८	२८	९
॥	२२	२८	२३	२१	२६	११॥	१०॥	२३॥	२६	२६	२७	२१	१४	८॥	११॥	२०	३६	२९	१०
॥	१२	२७	२२॥	२१	१८	११	१९॥	१४॥	२२॥	२६	२७	२३	६	१५	१०॥	८	१८	२७	११
॥	२७	६	१०	१६॥	२०	२६	२५	११॥	९॥	२३	२३	२६	९	२०	१३	२४	३१	१३	१२
॥	२४॥	१०	१९	३२॥	२४॥	३२	३२॥	१६॥	१७	४	४	१९	२४॥	२४॥	१८	१८	१८	११॥	१३
२	[illegible]	२०॥	[illegible]	२४॥	२२॥	३०॥	[illegible]	२४॥	३२॥	१९॥	१८	५	९॥	१८॥	२४॥	२४	१६	१४	१४
	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	२४	१५
	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	१६
	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	२८	१७
	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	१९	१८	[illegible]	[illegible]	१७	२०	१२	२२	१८
	मीना	[illegible]	इरेगां	जरी॥	७॥	११॥	२१	१२	२२	२६॥	२६	२४	२४	३०॥	२६	२४	५	५	१९
	३३	३६	३३	२३॥	२०॥	२७॥	२३	२७	१८	२३॥	२४	२७	२७	२८	३४	२०	२१	१३	२०
	३२॥	३३	३४	२६	२७॥	२१॥	२६	२०	१४	१८॥	१६॥	३०	३०	३१	२०	१५॥	१४॥	७	२१
	१९॥	२६॥	२६	३२	३३	३१॥	२८॥	२३	१७॥	१३	१५॥	२४॥	२५॥	२६॥	११॥	२६	३५	१३॥	२२
	८	३२	१८	३३	३६	३६	२४॥	३२॥	३०	२६	३५	१६	११	२१	२४॥	३१	२५	३४	२३
	१॥	१६॥	२१॥	२१॥	३६	३६	२२	२५	२५	२१॥	२५॥	२९॥	२४॥	२६	११॥	१६॥	२८	२८	२४
	२७	२६	२७	३२॥	१४॥	२४	३४	३५	३२॥	२२॥	२६॥	३०॥	२७	२०॥	१३॥	१६	२६	२८	२५
	८	१९	२६	३१॥	१४॥	३२॥	३४	३६	३४	२४	३४	१६॥	१३॥	२३॥	२७	३०॥	१७॥	३२॥	२६
	७॥	१९	१९	२३॥	३२	३२॥	३२॥	२४	३६	३५	२६	३२॥	३३	२२॥	१९॥	३२	३२	२४	२७
	१॥	३१॥	२३॥	१९॥	२७॥	२२	२८॥	२५	३३	३६	३४	[illegible]	३१॥	१८॥	३१॥	३०	३०	२२	२८
	२७	२२	१७॥	१४	२७	२३	१९॥	१८	२७	३४	३६	३३	३६	१९॥	२९॥	२०	२९॥	३२॥	२९
७	२४	२९	३१॥	२७	१३	२७	२४॥	९॥	१८	३२	२७	३४	३२	२५	२५	२४	१४	२२॥	३०
७	२५	२७	३१॥	२६	१२	२६	२२॥	१५	२४॥	२६॥	१९	३१	३४	३३	३२॥	१७॥	८	१५॥	३१
५	३३	१८	२३	२७	२१	१९	१२॥	२४	२४	२६	१८॥	२५	३३॥	३६	३२	१८	१०॥	२७॥	३२
॥	३१	३३	३३	२७॥	२७॥	३४	१६॥	१९॥	३०॥	३२॥	२२॥	१८॥	३२॥	२३	३४	३४	३४	२१	३३
।	१३	२०॥	३४॥	२७	२६	२३	२३॥	३०॥	३१	२९॥	३०॥	३१	१७॥	२०	१७॥	३४	३३	२०॥	३४
	५	२१	१३॥	२६	१९	३४	३१॥	२३॥	३१॥	२९॥	२१॥	२२	८॥	१७॥	२०	३३	३६	३४	३५
	१८	२२	८	१८॥	२७	२९	२८	३०	२२॥	२०॥	२१॥	२०॥	१५॥	१७॥	[illegible]	[illegible]	३४	३४	३६

राजमार्तंडे दुष्टकूटाचीं दानें.

षडाष्टकेगोमिथुनंप्रदद्यात्कांस्यंसरूप्यंनवपंचमेच ॥
नाड्यांसुधेन्वन्नसुवर्णवस्त्रंद्विर्द्वादशेब्राह्मणतर्पणंच ॥ १ ॥

टीका—अतिसंकटविवाहीं वधूवरांचे दुष्ट कूटादिक दोषनिवारणार्थ दानें चावीं तीं:-षडाष्टकीं दोन गायी द्याव्या. नवपंचकीं कांस्यपात्र रुप्यासह द्यावें. एक नाडीस गाय, अन्न, सुवर्ण आणि वस्त्र हीं द्यावीं. द्विर्द्वादशास विप्रसंतर्पण करावें.

ज्या वर्णास योनि पाहणें उक्त नाहीं त्यास.

जातक पहावें तो प्रकार वास्तुप्रकरणीं कथन केला आहे.

विवाहास उक्त नक्षत्रें.

मूलमैत्रकरस्वातीमघापौष्णध्रुवेंदवैः ॥
एतैर्निर्दोषभैःस्त्रीणांविवाहःशुभदःस्मृतः ॥ १ ॥

टीका—मूळ, अनुराधा, हस्त, स्वाती, मघा, रेवती, रोहिणी, तिन्ही उत्तरा, मृग हीं निर्दोष नक्षत्रें स्त्रीविवाहास शुभ होत.

एकविंशतिमहद्दोषाः।

पंचांगशुद्धिरहितोदोषस्त्वाद्यःप्रकीर्तितः ॥ उदयास्तशुद्धिरहितोद्वितीयःसूर्यसंक्रमः ॥ १ ॥ तृतीयःपापाषड्वर्गोभृगुः षष्ठःकुजोऽष्टमः ॥ गंडांतंकर्तरीरिःफषडष्टेंदुश्चसंग्रहः ॥ २ ॥ दंपत्योरष्टमंलग्नंराशौविषघटीतथा ॥ दुर्मुहूर्तोवारदोषःखार्जुरीकंसमांघ्रिभम् ॥ ३ ॥ ग्रहणोत्पातभंक्रूरविद्धर्क्षंक्रूरसंयुतम् ॥ कुनवांशोमहापातोवैधृतिश्चैकविंशतिः ॥ ४ ॥

टीका—प्रथम पंचांगशुद्धिरहित दोष ॥ १ ॥ उदयास्तशुद्धिरहित ॥ २ ॥ संक्रांतिदिवस ॥ ३ ॥ पापग्रहाचा वर्ग ॥ ४ ॥ लग्नीं शुक्र ६ वा नसावा ॥ ५ ॥ मंगळ लग्नीं आठवा नसावा ॥ ६ ॥ चंद्र ६,८,१२ लग्नीं नसावा ॥ ७ ॥ गंडांतत्रिविध नसावें ॥ ८ ॥ कर्तरी ॥ ९ ॥ लग्नीं चंद्र व पापग्रह नसावे ॥ १० ॥ वधूवरांचे राशीपासून अष्टमलग्न वर्जावें ॥ ११ ॥ विषघटि वर्जाव्या ॥ १२ ॥ दुष्टमुहूर्त ॥ १३ ॥ यामार्धादिक ॥ १४ ॥ लत्ता ॥ १५ ॥ ग्रहणनक्षत्र ॥१६॥ उत्पातनक्षत्र ॥१७॥ पापग्रहविद्धनक्षत्र ॥ १८ ॥ पापग्रहयुक्त नक्षत्र ॥१९॥ पापांश ॥२०॥ संक्रांति साम्य ॥ २१ ॥

दोषलक्षणमाह. कर्तरी.

लग्नाच्चंद्राद्व्ययद्विःस्थौपापखेटौयदातदा ॥ कर्तरीवर्जनीयासाविवाहोपनयादिषु ॥ १ ॥ नहिकर्तरीजोदोषःसौम्ययोर्यदिजायते ॥ शुभग्रहयुतंलग्नंक्रूरयोर्नास्तिकर्तरी ॥ २ ॥

टीका--लग्न अथवा चंद्र यांपासून बारा आणि दोन या स्थानीं पापग्रह असतां कर्तरी दोष होय. तो विवाह आणि उपनयन यांस वर्जावा. कर्तरीदोषलक्षण वर सांगितले स्थानीं सौम्य ग्रह असेल तर अथवा शुभग्रहयुक्त लग्न असलें तर शुभ आणि क्रूर ग्रह असतांही कर्तरी दोष नाहीं.

वधूवरांचे राशीपासून आठवें लग्न.

वरवध्वोर्बटोश्चापिजन्मराशेश्चलग्नतः ॥
त्याज्यमष्टमलग्नंस्याद्विवाहव्रतबंधयोः ॥ १ ॥

टीका—वर, वधू व बटू यांची जन्मराशि व लग्न यांपासून अष्टमलग्न विवाहास आणि उपनयनास वर्जावें.

दुष्ट मुहूर्तकथन.

तिथ्यंशोदिनमानस्यरात्रिमानस्यचैवहि ॥
मुहूर्तःकथितस्तेषुदुर्मुहूर्तंशुभेत्यजेत् ॥ १ ॥

टीका—दिनमान व रात्रिमान यांचा १५ वा अंश दुर्मुहूर्त होय, तो शुभकार्यास वर्ज्य कारावा.

लत्तादोष.

भौमात्र्याकृतिषट्जिनाष्टनखभंहंत्यग्रतोलत्तया ॥
खेटोऽर्कोऽर्कमितंशशीमुनिमितंपूर्णोनसन्मालवे ॥ १ ॥

टीका—भौम ज्या नक्षत्रीं असेल त्यापासून तृतीय नक्षत्रीं लत्तादोष आणि बुध ज्या नक्षत्रीं असेल त्यापासून बाविसावे नक्षत्रीं लत्तादोष. गुरु ज्या नक्षत्रीं असेल त्यापासून ६ वें नक्षत्रीं. शुक्र ज्या नक्षत्रीं त्यापासून २४ वें नक्षत्र. शनि ज्या नक्षत्रीं त्यापासून ८ वें नक्षत्र. राहु ज्या नक्षत्रीं त्यापासून २० वें नक्षत्र. रवि ज्या नक्षत्रीं त्यापासून १२ वें नक्षत्र. चंद्र पूर्ण असतां ७ वे नक्षत्रीं लत्तादोष. हे दोष मागधदेशीं अशुभ, अन्य देशीं शुभ होत.

यामार्द्धादिकथन

सूर्याद्यामदलंदिवैवनिगमाद्र्यश्वीषुनागत्रिषट्संख्याकंकुलिकंविवैं द्रविदिङ्नागर्तुवेदद्विकम् ॥ द्व्येकंतंनिशिषोडशांशमपरेतिथ्यंशमुज्झंतितैःकालंकंटकमैनिघंटममरेज्यज्ञास्फुजिद्भचःक्रमात् ॥ १ ॥

टीका—दिवा रविवारापासून अर्द्ध यामार्ध कोष्टकांत अंक आहेत आणि प्रवृत्ति निवृत्तीचे अंक आहेत ते यथानुक्रमेंकरून जाणावे. ते शुभकर्मांस वर्जावे. दिवा दिनमानाचा षोडशांश रविवारापासून कुलिक कोष्टकांत अंक आहेत ते कुलिक संज्ञा होत. ते शुभकर्मांस वर्जावे. रात्रौ एकेक न्यून करावा. केचिन्मतें दिनमानाचा पंचदशांश वर्ज्य करावा. गुरुवारापासून कालदोष, बुधवारापासून कंटक आणि शुक्रवारापासून ऐनिघंट हे सर्व यथाक्रमें कुलिकवत् वर्जावे.

वार	+ यामार्ध घटिका ४			कुलिक	काळ	कंटक	ऐनिघंट
	संख्या	प्रवृत्ति	निवृत्ति	घ० २	घ० २	घ० २	घ० २
रवि	४ था	१२	१६	१४ वा	८ वा	६ वा	१० वा
सोम	७ वा	२४	२८	१२ वा	६ वा	४ था	८ वा
भौम	२ रा	४	८	१० वा	४ था	२ रा	६ वा
बुध	५ वा	१६	२०	८ वा	२ रा	१४ वा	४ था
गुरु	८ वा	२८	३२	६ वा	१४ वा	१२ वा	२ रा
शुक्र	३ रा	८	१२	४ था	१२ वा	१० वा	१४ वा
शनि	६ वा	२०	२४	२ रा	१० वा	८ वा	१२ वा

ग्रहणनक्षत्रें व उत्पातनक्षत्रें यांचे दोष.

यस्मिन्धिष्ण्येमहोत्पातोग्रहणंवाभवेद्यदि ॥
तस्मिन्धिष्ण्येशुभंकर्मषण्मासेवर्जयेद्बुधः ॥ १ ॥

टीका—ज्या नक्षत्रीं उत्पात अथवा ग्रहण होतें तें नक्षत्र सहा महिने शुभकर्मांस वर्जावें.

पापग्रहयुक्त आणि वेधनक्षत्रें.


श्रुत्यग्निभेऽभिजिद्ब्राह्मवैश्वेंद्वर्क्षेम्बुरुद्रभे ॥ मूलादित्येचपुष्येंद्रेमैत्राश्ले

+ एका दिवसाचे यामार्द्ध आठ. कुलिकादि १६ याप्रमाणें जाणावे. परंतु त्यांतून ज्या वारीं वर्जावयाचे ते कोष्टकांत लिहिले आहेत.

षेमघान्तके ॥ १ ॥ दस्रभाग्यर्यमांत्येचहस्ताहिर्बुध्न्यभेतथा ॥ चित्राऽजचरणेस्वातीवारुणेचपरस्परम् ॥ २ ॥ वासवेंद्राग्निभेतद्धेधः सप्तशलाकजः ॥ त्याज्यःपापोद्भवोयत्नाद्व्रतबंधादिकर्मसु ॥ ३ ॥

टीका—पंचसप्त शलाकांमध्यें ज्या रेघेवर जें नक्षत्र असेल त्या नक्षत्रीं पापग्रह असतां त्याचे समोरचे रेघेवरचें नक्षत्र विद्ध होय.

पंचशलाकायंत्र.



सप्तशलाकायंत्र.

कृ रो मृ आ पु पु आ

नक्षत्रचरणवेध.

सप्तपञ्चशलाकाभ्यांविद्धमेकार्गलेनयत् ॥ लत्तोपग्रहगंधिष्ण्यं पादमात्रंशुभेत्यजेत् ॥ १ ॥ वेधमाद्यंतयोरंघ्र्योरन्योन्यंद्वितृती ययोः ॥ क्रूरैरपित्यजेत्पापंकेचिदूचुर्महर्षयः ॥ २ ॥

टीका—विद्धनक्षत्र, एकार्गल आणि लत्ता व उत्पातनक्षत्र यांचे चरणीं शुभग्रह असतां तो चरण शुभकर्मास वर्जावा. प्रथम, चतुर्थ, द्वितीय आणि तृतीय हे नक्षत्रचरण परस्परेंकरून विद्ध होत. हे केचिन्मतेंकरून पापग्रह विद्धनक्षत्राचें चरण वर्जावें.

एकार्गलदोष मार्तंडमतें.

विष्कंभादि दुष्टयोगरहित दिननक्षत्रापासून अभिजित्‌सह गणून विषमनक्षत्रीं सूर्य असतां एकार्गल दोष होय.

चंडायुध.

शूलगंडांत्यपातानांसाध्यहर्षणयोस्तथा ॥
अंत्यंयच्चंद्रभंतस्मिन्नेतच्चंडायुधंनसत् ॥ १ ॥

टीका—शूल, गंड, व्यतीपात, साध्य, वैधृती, हर्षण या योगांचे अंतीं जें नक्षत्र असेल त्यास चंडायुध दोष ह्मणतात.

क्रांतिसाम्य.

ऊर्ध्वरेखात्रयंचैवंतिर्यग्रेखात्रयंतथा ॥ क्रांतिसाम्यंबुधैर्ज्ञेयंमध्ये मीनंतुयोजयेत् ॥१॥ मेषासिंहोतुलाकुंभौगोनक्रौकर्कवृश्चिकौ ॥ कन्यामीनौधनुर्युग्मेतत्रान्योन्यंस्थितावुभौ ॥ रविचंद्रौतदा ज्ञेयःक्रांतिसाम्यस्यसंभवः ॥ २ ॥

टीका—तीन ऊर्ध्वरेषा व तीन आडव्या रेषा काढून मध्यभागींच्या रेषेवर मीनलग्न मांडून पुढें क्रमेंकरून मेषादि लग्नें सर्व रेषांवार मांडावीं. ज्यालग्नीं चंद्र असेल त्याच्या समोरच्या लग्नीं सूर्य असला ह्मणजे मेष, सिंह, तूळ, कुंभ, वृषभ, मकर, कर्क, वृश्चिक, कन्या, मीन, धन व मिथुन या सहा युग्मीं समोर चंद्रसूर्य असतां क्रांतिसाम्यदोष; तो वर्ज्य आहे.

कुं मी मे

जामित्रदोष.

लग्नेंदोर्नास्तगःपापस्तत्तुल्यांशेयदिस्थितः ॥ तदाजामित्रदोषः स्यान्नहिन्यूनाधिकांशके ॥ १ ॥ क्रूरोवायदिवासौम्योलग्नाच्चं द्राच्चखेचरः ॥ एकोऽपियदिजामित्रेसमांशेचतदाभवेत् ॥ २ ॥ जामित्रंनप्रशंसंतिगर्गकश्यपदेवलाः ॥ आयषष्ठतृतीयेषुधन धान्यप्रदोरविः ॥ ३ ॥

टीका—लग्न चंद्रामध्यें सप्तमस्थानाचा पापग्रह न्यून करून तत्तुल्यांश आला असतां जामित्रदोष होय, अधिक किंवा न्यून असतां दोष नाहीं. दुसरा पक्ष; लग्नचंद्रापासून सप्तमस्थानीं शुभग्रह अथवा पापग्रह समांश असतां जामित्रदोष होय. तो गर्ग, कश्यप, देवल ह्या ऋषींच्या मतें जामित्रदोष विवाहास वर्जावा. जर लग्नापासून एकादश, षष्ठ, तृतीय या स्थानीं सूर्य असला तर जामित्रदोष शुभप्रद जाणावा.

चरत्रयदोष.

कर्कलग्नेऽथवामेषेघटांशोयदिदीयते ॥
तुलायांमकरेचंद्रेवैधव्यंजायतेध्रुवम् ॥ १ ॥

टीका--कर्कलग्नीं व मेषलग्नीं तूळांश आणि मकर अथवा तूळ या दोन्ही राशीचा चंद्र असे योगांचे दोष वैधव्यकारक ते वर्जावे.

तिथिपरत्वें लग्नें वर्ज्य.

प्रतिपदितूलामकरौसिंहमकरौतृतीयायाम् ॥ कन्यामिथुनेपंच
म्यांसप्तम्यांचैवधनुःकर्कौ ॥ १ ॥ नवम्यांकर्कसिंहौएकादश्यांतुधनु
र्मीनौ ॥ त्रयोदश्यांवृषभमीनौशून्यंलग्नानितिथियोगात् ॥ २ ॥

टीका--प्रतिपदेस तूळ आणि मकर. तृतीयेस सिंह मकर. पंचमीस कन्या मिथुन. सप्तमीस धन कर्क. नवमीस कर्क सिंह. एकादशीस धन मीन. त्रयोदशीस वृषभ मीन. हीं या तिथींस लग्नें शून्य होत यास्तव वर्जावीं.

दोषनिवारण.

ज्ञुनंविनाकेंद्रगतोऽमरेज्यस्त्रिकोणगोवापिहिलक्षमेकम् ॥
निहंतिदोषांस्त्रिशतंभृगुश्चशतंबुधोवापिहिदृष्यमूर्तिः ॥ १ ॥

टीका--गुरु, शुक्र, अथवा बुध हे ग्रहत्रय १, ४, १०, ९, ५, या स्थानीं असतां लक्ष, तीनशें, शंभर असे क्रमेंकरून दोष नाश करितें.

लग्नमुहूर्त.

राश्युदय.

गजाग्निदस्रागिरिषट्कदस्राव्योमेंदुरामारसरामरामाः ॥ कुरामरा
मागजचंद्ररामानागेंदुलोकाःकुगुणानलाश्च ॥ १ ॥ षट्रामरा
माखशशांकरामासप्तांगपक्षाश्चगजाग्निदस्राः ॥ २ ॥

टीका--राश्युदय ह्मणजे मेषादि द्वादशराशी तींच लग्नें होत, ज्या राशीस सूर्य येईल तें लग्न उदयकाळीं प्रथम जाणावें त्यांच्या पळसंख्येचा क्रम.

लग्नें	मेष	वृषभ	मिथुन	कर्क	सिंह	कन्या	तूळ	वृश्चि.	धन	मकर	कुंभ	मीन
पळें	२३८	२६७	३१०	३३६	३३१	३१८	३१८	३३१	३३६	३१०	२६७	२३८

लग्नांच्या घटिकांची संख्या.

मीनेमेषेत्र्यष्टपंचक्रमान्नाड्यःपलानिच ॥ वृषेकुंभेऽब्धिसप्तद्वि पञ्चदिङ्मिथुनेमृगे ॥ ३ ॥ धनुःकर्केशरेषट्त्रिसिंहाल्योःशरभूत्रयम् ॥ बाणाष्टदशतूलांगेलग्ननाड्यःपलानिच ॥ ४ ॥

टीका—मेषादि बारा लग्नें यांच्या घटिकापळांचा क्रम.

लग्नें	मे.	वृ.	मि.	क.	सिं.	क.	तू.	वृ.	ध.	म.	कुं.	मी.
घटी	३	४	५	५	५	५	५	५	५	५	४	३
पळें	५८	२७	१०	३६	३१	१८	१८	३१	३६	१०	२७	५८

भुक्त पळें प्रतिदिवशीं पाहणें.

मीनाजेसप्तषट्पंचपलानिविपलानितु ॥ गोकुंभेऽष्टौयुगशरादिग्विंशतिर्नृयुङ्मृगे ॥५॥ कर्केचापेभवाःसूर्याःसिंहाल्योरुद्रदिङ्मिताः ॥ तूलांगेदिक्चषट्त्रीणिलग्नेष्वेकांशसम्मिताः ॥ ६ ॥

टीका—जें लग्न उदयकाळीं असेल तें प्रतिदिवशीं किती भोगतें त्याची संख्या.

लग्नें	मे.	वृ.	मि.	क.	सिं.	क.	तू.	वृ.	ध.	म.	कुं.	मी.
पळें	७	८	१०	११	११	१०	१०	११	११	१०	८	७
विप०	५६	५४	२०	१२	२	३६	३६	०	१२	२०	५४	५६

उदयास्तलग्नकथन.

यस्मिन्राशौयदासूर्यस्तल्लग्नमुदयेभवेत् ॥
तस्मात्सप्तमराशिस्तुअस्तलग्नंतदुच्यते ॥ ७ ॥

टीका—ज्या राशीस सूर्य येतो तेंच लग्न उदयकाळीं प्रथम, त्यापासून सप्तमलग्नीं सूर्यास्त होतो; तें अस्तलग्न जाणावें.

लग्नास भुक्तांश देण्याचा क्रम.

वृषंचमिथुनंकन्यातुलाधन्विझषस्तथा ॥
एतेशुभानवांशास्तुततोऽन्येकुनवांशकाः ॥ १ ॥

टीका—वृषभ, मिथुन, कन्या, तूळ, धन, मीन हे अंश द्वादश लग्नांस शुभ होत, अन्य अशुभ होत. मेषादि १२ लग्नें व अंश ७ कोष्टकांत आहेत. त्यांस ज्या अंशास वर्गशुद्धि येईल त्या अंशाखालील कोष्टकांतील लग्न घ्यावें आणि त्या अंशाच्या घटीस अयनांश देऊन भुक्तकाल आणावा.

	वृष.	मि.	कर्क.	कन्या.	तूळ.	धन.	मीन.
मेष	० ३ २०	० ६ ४०	० १० ०	० १६ ४०	० २० ०	० २६ ४०	० ० ० ०
षभ	१ १३ २०	१ १६ ४०	१ २६ ० ०	१ २६ ४०	० ० ० ० ०	० ०० ० ०	० ० ० ०
मिथुन	० २३ २०	२ २६ ४०	० ० ० ०	० ० ० ०	२ ० ० ०	२ ६ ४०	२ १६ ४०
कर्क	० ० ० ०	० ० ० ०	३ ० ० ०	३ ६ ४०	३ १० ०	३ १६ ४०	३ २६ ४०
सिंह	४ ३ २०	४ ६ ४०	४ १० ०	४ १६ ४०	४ २० ०	४ २६ ४०	० ० ० ०
कन्या	५ १३ २०	५ १६ ४०	५ २० ०	५ २६ ४०	० ० ० ० ०	० ० ० ० ०	० ० ० ०
तूळ	६ २३ २०	६ २६ ४०	६ ० ०	६ ० ०	६ ० ०	६ ६ ४०	१ १६ ४०
वृश्चिक	० ० ० ० ०	० ० ० ० ०	७ ० ० ० ०	७ ६ ४०	७ १० ०	७ १६ ४०	७ २६ ४०
धन	८ ३ २०	८ ६ ४०	८ १० ०	८ १६ ४०	८ २० ०	८ २६ ४०	० ० ० ०
मकर	९ १३ २०	९ १६ ४०	९ २० ०	९ १६ ४०	० ० ० ०	० ० ० ०	० ० ० ०
कुंभ	१० २३ २०	१० १६ ४०	० ० ० ० ०	० ० ० ०	१० ० ० ०	१० ६ ४०	१० १६ ४०
मीन	० ० ० ०	० ० ० ०	११ ० ० ०	११ ६ ४०	११ २० ६	११ १६ ४०	११ २६ ४०

कोष्टकांत वार अंक आहेत त्यांचीं नांवें, राशि, अंश, कला, विकला जाणावीं; राशींची संज्ञा शून्याचें नांव मेष आणि वृषभाचें नांव १ याप्रमाणें बारा राशी होत.

तत्काळ स्पष्टसूर्य आणावयाचें साधन.

गतगम्यदिनाहतद्युभुक्तः खरसप्तांशवियुग्युतोग्रहःस्यात् ॥

टीका—पंचांगीं ग्रहांचे कोष्टकांत पौर्णिमेचा तसाच अमावास्येचा अवधिस्थसूर्य स्पष्ट आहे; परंतु पौर्णिमेचा सूर्य ज्या दिवसास न्यावयाचा ते दिवस मोजून त्या दिवसांनीं कोष्टकांतील सूर्याची गति गुणून ६० नीं भागून जे अंक येतील ते अंश, घटी, पळें जाणावीं; परंतु पौर्णिमेचा सूर्य तो मागें आणावयाचा असल्यास पंचांगीं सूर्याचे अंश, घटी, पळें कोष्टकांत आहेत ते जे अंश आले असतील त्यांत कमी करावे आणि पुढें न्यावयाचा असल्यास आंत मिळवावे; ह्मणजे तात्कालिक सूर्य होतो.

(उदाहरण) भुक्तदिवसांचें.

शके १७६९ कार्तिक शुद्ध ९ भौमवारीं स्पष्टसूर्य किती आहे, तो सांगा.

पळें विप. सूर्याची गति
६० ४७
६ दिवस ९ पासून १५
मेचे अंतरानें गुणावें.
३६० २८२ गुणाकार.
भाग ६०) २८२ (४ अंश.
२४०
३६० ४२ बाकी प.
४ ४२ मिळवावे.
३६४ ४२
अं. घ. प.
६ ४ ४२ भा. ६०) ३६४ (६ ४ ४२
३६

स्पष्ट रवीचें उत्तर.

	रा.	अं.	क.	वि.
पंचांगस्थरवि	७	७	२१	५७
वजाबाकी		६	४	४२
शेषसंख्या	७	१	१७	१५

हा स्पष्टसूर्य जाणावा.

अभुक्त दिवसांचें उदाहरण.

शके १७६९ कार्तिक कृष्ण ६ चा स्पष्टसूर्य आणावयाचा क्रम १५ मेचा स्पष्टसूर्य राशी ७ अंश ७ घ० २१ प. ५७ अभुक्त दिवस ६, सूर्याची गति ६०, ४७ हे अंक ६ नीं गुणावे तो गुणाकार ३६४।४२ यांस ७० नीं भागावें; शेष उरेल ते अंक घटी ४ पळें ४२ हे अंक व सूर्याचे अंश घटिकापळांमध्यें मिळवावे ह्मणजे ७ राशी, १२ अंश, २६ घटी, ३९ पळें याप्रकारें होत.

अयनांश आणावयाचा प्रकार.

शाकोवेदाब्धिवेदोनःषष्टिभक्तोऽयनांशकाः ॥
देयास्तेतुरवौस्पष्टेचरलग्नादिसिद्धये ॥ १ ॥

टीका—चालत्या शकामध्यें ४४४ चारशें चवेचाळीस कमी करावे; शेष राहील त्यास ६० नीं भागावें. चर, स्थिर, द्विःस्वभाव या लग्नांचे सिद्धिकारणें ते अयनांश स्पष्टसूर्याचे अंश—घटिकेंत मिळवावे; ह्मणजे सायनसूर्य होतो.

उदाहरण.

शके १७६९ यांत	भा. ६०) १३२५ (२२ अंश.	७ १ १७ १५ स्पष्टरवि
४४४ हे वजा करावे.	१२०	२२ ५ अयनांश
१३२५	१२५	मंळवावे
	१२०	७ २३ २२ १५
	५	सायनसूर्य जाणावा.
	६० गुणक	
	भाग ६०) ३०० (५ कला.	
	३००	

लग्नावरून इष्टकाळ आणवयाचा क्रम.

स्फुटसायनभागर्कभोग्यांशफलसम्मिति ॥ सायनांशतनो श्चापिभुक्तांशफलसंयुता ॥ १ ॥ मध्यलग्नोदयैर्युक्ताषष्ट्याप्ता नाडिकास्तनोः ॥ २ ॥

टीका—सायनसूर्यांपासून भोग्य आणि सायनलग्नावरून भुक्त आणण्याचा प्रकार. दोघांचा योग करून सूर्यलग्नाचे मध्यंतरींचा उदय घेऊन युक्त करावा. त्यांस ६० नीं भागावें ह्मणजे लग्नावरून सूर्याचा भोग्यकाळ स्पष्ट होतो. उदाहरण—शके १७६९ कार्तिक शुद्ध ९ भौमवारीं स्पष्टसूर्य राश्यादि ७।१।१७।१५ अयनांशाः २२।५ हे सूर्याचे अंश घटिकेंत मिळवावे; तो सायनसूर्य राश्यादि ७।२३।२२।१५ हा वृश्चिकराशीचा सूर्य, २३ अंश २२ घटी, १५ पळें होय. हे ३० विसांत उणे करावे ह्मणजे तो भोग्यांश ६।३७।४५, सूर्य वृश्चिकेस आहे ह्मणन वृश्चिकराशींचा उदय ३३१ यानें भोग्यांश गुणावें. ते अंक २१९४ त्यांस ३० नीं भागावें. ते अंक ७३।८ हा सूर्याचा भोग्यकाळ जाणावा.

लग्नावरून इष्टकाळ आणण्याचा प्रकार.

मकरलग्न वृषभांशीं, तें कोष्टकांत पाहून तें स्पष्टलग्न घेतलें. तें राश्यादि ९ । १३ । २० ह्मणजे मकरराशीचें लग्न, १३ अंश २० घटिका होय. लग्नाचे अंशघटिकेंत अयनांश २२।५ मिळवावे; तें सायनलग्न १०।५।२५ कुंभराशीचें लग्न ५ अंश २५ घटी, सायनलग्न होय. लग्नाचे भुक्तांश ५।२५ कुंभराशीचा उदय २६७ यानें गुणावें. ते अंक १४४६ हे ३० नीं भागावे; ते अंक ४८।१२ हे अंक लग्नाचा भुक्तकाल होय.

भोग्यभुक्तावरून इष्टकाल आणण्याचा प्रकार.

भोग्यभुक्तयोग १२१।२० सूर्यलग्न या राशीचे मध्यंतरींचे उदय २ धन ३३६ मकर ३१० यांचा योग ६४६ भोग्यभुक्तयोग १२१ यांत मिळवावे ते अंक ७६७ यांस ६० नीं भागावें. तो इष्टकाल घटी १२ पळें ४७ या पळांमध्यें प्रवृत्तीचीं ५ पळें मिळवावीं. तो स्पष्टकाळ १२।५२.

उदाहरण.

सायन सूर्यावरून भोग्य आणावयाचा क्रम.

अंश.	घटी.	पळें.	
३०	०	०	यांत
२३	२२	१५	सायनरवीचे अंशांत उणे करावे.
६	३७	४५	हा सूर्य वृश्चिकेस आहे.
		३३१	गुणक.

१९८६	९३१७	१६५५
२०८	९९२	१२२४
२१९४	१२२४७	भाग ६०) १४८९५ (घटीचा २४८
	२४८	१२०
	अंश	२८९
	भाग. ६०) १२४९५ (२०८	२४०
	१२०	४९५
	४९५	४८०
	४८०	१५ शेष पळें.
	१५ शेष घटी	

रवीचा भोग्यकाळ करावयाचा प्रकार.

अंश   घटी
भाग ३०) २१९४   १५   (७३।८ हा सूर्य भोग्यकाळ जाणावा.
२१०
९४
९०
४
४
६० गुणक.
२४०
१५ शेष घटी.
३०) २५५ बेरीज.
२४०
१५ शेष.

भुक्तलग्नावरून भुक्तकाळ आणावयाचा क्रम.

रा.	अं.	क.	
९	१३	२०	मकर लग्न.
	२२	५	अयनांश मिळवावे.
१०	५	२५	सायन लग्नभुक्त.
		२६७	लग्नाचे उदयानें गु०
१३३५.		१७५	
१११		१५०	
१४४६		५०	

६०) ६६७५ (१११ अंश.
६०
६७
६०
७५
६०
१५

भाग.   अंश.   भुक्तांश.
३०) १४४६ (४८।१२ हे लग्नाचे.
१२०
२४६
२४०
६
६० गुणक.
३०) ३६० (१२
३६०

इष्टकाळ.

धन ३३६
मकर ३१० मिळवावे.
६४६
१२१ भुक्ताभोग्य मिळवावे.
भा.६०)७६७(१२ घ.
६०
१६७
१२०
४७
६० गुणक.
भा.६०)२८२०(४७ पळें.
२४०
४२०
४२०

भुक्तभोग्ययोग.

४८ १२ भुक्त }
७३ ८ भोग्य } यांची बेरीज.
१२१
२० सूर्य व लग्न या राशीचे मध्यंतरींचे उदय २

उत्तर इष्टघटीचें.

घ. प.
१२ ४७
५ पांच पळेंप्रवृत्ती मिळ.
१२ ५२ उत्तर इष्ट घटी.

उदाहरण.

प्रश्न, १७६९ कार्तिक शुद्ध ९ भौमवारीं प्रातःकाळचा सूर्य ७।१।१७।१५ आहे; तो सायनसूर्य किती होतो तें सांग.

इष्टघटीस गतीचा गुणाकार.

० १२ ५२ इष्टघटी

ग. ६०	७२०	३१२०
४७	५२६	२४४४

७२० ३६८४ २४४४
यांनीं भाग ६०)७८२(१३।२
६०
१८२
१८०
२
६० गुणक.
भाग ६०) १२० (२
१२०

घटिका पळांचा भागाकार.

७२० ३६८४ ६०) २४४४(४०
६२ ४ २४०
७८२ ६०)३७२४(६२ ४४
३६०
१२४
१२०
४

७ १ १७ १५ प्रातःकाळींचा रवि.
१३ २ गम्य घटी.
७ १ ३० ३५ बेरीज.
२२ ५ अयनांश.
७ २३ ३५ १७ सायन तत्काळ सूर्य.

इष्टकाळ समयास तत्काळ सूर्यसाधन.

तत्कालभवस्तथाघटिघ्नयाःखरसैर्लब्धकलोनसंयुतःस्यात् ॥

टीका—इष्टघटीस सूर्य आणावयाचा त्यास त्याच्या इष्टघटी मागें आल्या आहेत त्यांनीं सूर्याच्या घटी गुणून ६० नीं भागाव्या. जो भाग येईल तो सूर्य गत केला असला तर कमी कराव्या आणि गम्य केला असला तर त्यांत मिळवाव्या; ह्मणजे तत्काळ सूर्य होय.

इष्ट घटींवरून लग्न आणण्याचा क्रम.

तत्कालार्कःसायनोस्योदयघ्नाभोग्यांशाःखत्युद्धताभोग्यकालः ॥
एवंयातांशैर्भवेद्यातकालोभोग्यःशोध्योऽभीष्टनाडीपलेभ्यः ॥ १ ॥
तदनुजहीहिग्रहोदयांश्वशेषंगगनगुणघ्नमशुद्धहृल्लवाद्यम् ॥
सहितमजादिगृहैरशुद्धपूर्वैर्भवतिविलग्नमदोऽयनांशहीनम् ॥ २ ॥

टीका—मागें सायन सूर्य ज्या राशीस असेल त्याचा उदय घ्यावा आणि सायन सूर्याचें अंशादिक ३० अंशांत कमी करावे. ते भोग्यांश जाणावे आणि उदयानें भोग्यांस गुणावें आणि ३० नीं भागावें, ह्मणजे सूर्याचा भोग्यकाल होय.

सूर्यांचा गतकाल आणावयाचा क्रम.

सायन सूर्याचे उदयानें त्याचेच अंशादिक गुणून तिसांनीं भागावें ह्मणजे सूर्याचा भुक्तकाल येतो. इष्ट घटींचीं पळें करून त्यांत भोग्यकाळ उणा करावा. शेष राहील त्यांत सूर्य ज्या राशीस उदय पावेल ती राशि टाकून पुढें जितके राशीचे उदय कमी होतील ते करावे. जो उदय कमी होत नाहीं तो अशुद्ध जाणावा आणि शेष अंकास ३० नीं गुणावें आणि अशुद्ध उदयानें भागावें; ह्मणजे अंशादिक येतील त्यांस मेषराशीपासून अशुद्ध राशींच्या पूर्व राशींपर्यंत युक्त करावे. त्यांत अयनांश उणे करावे ह्मणजे स्पष्टलग्न होय. **उदाहरण**—मागें सायनसूर्य आला आहे ते ७, २३, ३९, १७ त्याचा उदय ३३१ सूर्याचे अंश २३, ३९, १७ हे ३० अंशांत उणे

करावे शेष राहतील ते भोग्यांश ६, २४, ४३, हे उदयानें गुणावे ते अंक २१२२ हे तिसांनीं भागावे ह्मणजे भोग्यकाल होय. त्याचा मांडण्याचा क्रम.

३० यांत

२३	३५	१७ सायनसूर्याचे अंश वजा करावे.
६	२४	४३ शेष भोग्यांश.

३३१ उदयानें गुणावे.

अंश.	कला.	विकला.
१९८६	१३२४	४३
१३६	६६२	१२९
भा.३०)२१२२(७०	७९४४	१२९
२१०	२३७	भा. ६०)१४२३३(२३७ कला.
२२	भाग. ६०)८१८१(१३६ अंश	१२०
६० गुणक	६०	२२३
भा. ३०) १३२० (४४	२१८	१८०
१२०	१८०	४३३
१२०	३८१	४२०
		१३

उत्तर ७० पळें ४४ विपळें याप्रकारें भोग्यकाळ जाणावा.

इष्टघटी १२ ५० ५२ यांचीं पळें ७७२ या अंकामध्यें भोग्यकाळ कमी करावा. ते शेष अंक ७०।१६ धनराशीचा उदय ३३६ व मकरराशीचा उदय ३१० या उभयतांचा योग ६६४ शेष अंकांत कमी करावा. ते अंक ५५।१६ या अंकांत कुंभ राशीचा उदय २६७ कमी होत नाहीं; ह्मणून अशुद्ध उदय जाणावा.

इष्टघटी १२	५२
पळें गुणक ६०	
७२०	
५२	
७७२	
०	४४
७०१	१६
३३६ धनराशीचा उदय ७०१	१६

लग्नास शुभाशुभ ग्रह पाहणें.

लग्नेचंद्रखलारिपौशशिसितौसर्वेद्युनेखेबुधोऽन्त्योऽन्त्येंगुःसुखगोऽष्ट माःकुजशुभाःशुक्रस्तृतीयःशुचे ॥ लाभेसर्वखगाःशुभाअखिलगास्तुषष्ठा रिगायुःखलाश्चंद्रस्त्र्यंबुधनेश्रियेंशभदकेदस्यान्मृत्यवेऽष्टारिगः ॥ १ ॥

टीका—लग्नीं चंद्र आणि पापग्रह व लग्नापासून षष्ठस्थानीं शुक्र आणि चंद्र व सप्तम स्थानीं कोणताही ग्रह आणि दशमस्थानीं बुध, द्वादशस्थानीं चंद्र, चतुर्थस्थानीं राहु, अष्टमस्थानीं मंगळ व शुभग्रह, आणि तृतीयस्थानीं शुक्र असे लग्नास ग्रह आले असल्यास अनिष्ट, शोककारक व अशुभ होत.

लग्नापासून एकादशस्थानीं संपूर्ण ग्रह आणि निचस्थानें वर्जून अन्यस्थानीं शुभग्रह शुभ होत. तृतीय, अष्टमस्थानीं व षष्ठस्थानीं सूर्य आणि २।३।४ स्थानीं चंद्र असल्यास शुभ व लक्ष्मीकारक जाणावे. लग्नाचा स्वामी, अंशाचा स्वामी अथवा द्रेष्काणस्वामी हे षष्ठ व अष्टमस्थानीं असतां मृत्युदायक जाणावे.

पंचभिरिष्टैरिष्टंपुष्टमनिष्टैरनिष्टमादेश्यम् ॥
स्थानादिफलसमृद्धिश्चतुर्भिरपिकथ्यतेयवनैः ॥ १ ॥

टीका—लग्नास पांच ग्रह शुभस्थानीं असतां पुष्टिकारक आणि कमी असतां अरिष्टकारक होत आणि यवनादिमतें चार ग्रह इष्टकारक जाणावे.

षड्वर्गशुद्धि पाहण्याचा क्रम.

गृहंहोराचद्रेष्काणोनवांशोद्वादशांशकः ॥
त्रिंशांशश्चेतिषड्वर्गास्तेसौम्यग्रहजाःशुभाः ॥ १ ॥

टीका—आदौ गृह पाहणें १, होरा २, द्रेष्काण ३, नवांश ४, द्वादशांश ५, त्रिंशांश ६ हे षड्वर्ग; यांत शुभग्रहाचा वर्ग शुभ होय.

त्रिंशांशादिकथन.

त्रिंशद्भागात्मकंलग्नंहोरातस्यार्द्धमुच्यते ॥ लग्नत्रिभागोद्रेष्काणो नवांशोनवमांशकः ॥ द्वादशांशोद्वादशांशस्त्रिंशांशस्त्रिंशदंशकः ॥ १ ॥

टीका—लग्नाचे अंश ३० हें गृह होय. त्याचें अर्ध १५ होरा होय. तिसांचा तिसरा भाग १० असे तीन द्रेष्काण होत. तिसांचे नव भाग ह्मणजे नवमांश होत. आणि तिसांचा १२ वा भाग ह्मणजे द्वादशांश होय. तिसांचा एक अंश तो त्रिंशांश होय. या रीतीनें षड्वर्ग भाग जाणावें.

आदौ गृह पाहणें.

यस्यग्रहस्ययोराशिस्तस्यतद्गृहमुच्यते ॥ १ ॥

टीका—ज्या ग्रहाची जी राशी तें त्याचें गृह होय.

ग्रह	मंगळ	शुक्र	बुध	चन्द्र	सूर्य	बुध	शुक्र	मंगळ	गुरु	शनि	शनि	गुरु
राशी	मेष	वृषभ	मिथुन	कर्क	सिंह	कन्या	तूळ	वृश्चिक	धन	मकर	कुंभ	मीन

होराकथन.

सूर्येंद्वोर्विषमेलग्नेहोराचंद्रार्कयोःसमे ॥ १ ॥

टीका—विषमलग्नीं १५ अंशांचे आंत सूर्याचा होरा; नंतर चंद्राचा होरा जाणावा. समलग्नीं १५ अंशांचे आंत लग्न असतां चंद्राचा होरा नंतर सूर्याच जाणावा. होरा चंद्राचा शुभ सूर्यांचा अशुभ होय.

लग्नें		मेष	वृषभ	मि.	कर्क	सिं.	क.	तूळ	वृ.	धन	म.	कुंभ	मीन
		०	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११
अंश	१५	सू.	चं.	सू.	चं.	सू.	चं.	सू.	चं.	सू.	चं.	सू.	चं.
अंश	३०	चं.	सू.	चं.	सू.	चं.	सू.	चं.	सू.	चं.	सू.	चं.	सू.

द्रेष्काणकथन.

द्रेष्काणआद्योलग्नस्यद्वितीयःपंचमस्यच ॥
द्रेष्काणश्चतृतीयस्तुलग्नान्नवमराशिपः ॥ १ ॥

टीका—प्रथम द्रेष्काण ह्मणजे लग्नाचे अंश ३० त्यांत १० अंशांचा एकेक द्रेष्काण असे तीन द्रेष्काण होत. प्रथम द्रेष्काणाचा लग्नस्वामी होय; द्वितीय द्रेष्काणाचा पंचमस्थानाचा स्वामी होय. तृतीय द्रेष्काणाचा नवमस्थानाचा स्वामी होय; शनि, मंगळ, सूर्य यांचा द्रेष्काण अशुभ जाणावा.

लग्नें	मेष	वृषभ	मिथुन	कर्क	सिंह	कन्या	तूळ	वृ.	धन.	मकर	कुंभ.	मीन
१ अं १०	मं.	शु.	बु.	चं.	सू.	बुध	शु.	मं.	गुरु.	श.	श.	गु.
२ अ १०	सू.	बु.	शु.	मं.	गुरु	श.	श.	गुरु	मं.	शु.	बु.	चं.
३ अं १०	गुरु	श.	श.	गुरु	मं.	शु.	बु.	चं.	सू.	बु.	शु.	मं.

सप्तांश.

	मेष ०	वृषभ १	मिथु. २	कर्क ३	सिंह ४	कन्या ५	तूळ ६	वृश्चि. ७	धन ८	मकर ९	कुंभ १०	मीन ११
४ १७	१	८	३	१०	५	१२	७	२	९	४	११	६
८ ३४	२	९	४	११	६	१	८	३	१०	५	१२	७
१२ ५१	३	१०	५	१२	७	२	९	४	११	६	१	८
१७ ८	४	११	६	१	८	३	१०	५	१२	७	२	९
२१ २५	५	१२	७	२	९	४	११	६	१	८	३	१०
२५ ४२	६	१	८	३	१०	५	१२	७	२	९	४	११
३० ०	७	२	९	४	११	६	१	८	३	१०	५	१२

लग्नाचे नवमांश.

मेषसिंहधनुर्लग्नेनवांशामेषतःस्मृताः ॥ वृषकन्यामृगेलग्नेमकरान्नवमांशकाः ॥ १ ॥ कर्कालिमीनलग्नेषुनवांशाःकर्कितःस्मृताः ॥ नृयुग्मतौलिकुंभेषुतौलिनःस्युर्नवांशकाः ॥ २ ॥

टीका—मेष, सिंह, धन या लग्नांस मेषापासून; वृषभ, कन्या, मकर या लग्नांस मकरापासून; मिथुन, तूळ, कुंभ या लग्नांस तूळापासून, आणि कर्क, वृश्चिक, मीन या लग्नांस कर्कराशीपासून, याप्रमाणें नवांशांचा क्रम जाणावा, त्यांत नवमांश सूर्य, मंगळ, शनि यांचा अशुभ होय.

नवमांशकोष्टक.

		मेष	वृषभ	मिथुन	कर्क	सिंह	कन्या	तूळ	वृश्चिक	धन	मकर	कुंभ	मीन
३	२०	मं.	श.	शु.	चं.	मं.	श.	शु.	चं.	मं.	श.	शु.	चं.
६	४०	श.	श.	मं.	र.	शु.	श.	मं.	र.	शु.	श.	मं.	र.
१०	०	बु.	गु.	गु.	बु.	बु.	गु.	गु.	बु.	बु.	गु.	गु.	बु.
१३	२०	चं.	मं.	श.	शु.	चं.	मं.	श.	शु.	चं.	मं.	श.	श.
१६	४०	र.	शु.	श.	मं.	र.	शु.	श.	मं.	र.	शु.	श.	मं.
२०	०	बु.	बु.	गु.	गु.	बु.	बु.	गु.	गु.	बु.	बु.	गु.	गु.
२३	२०	शु.	चं.	मं.	श.	शु.	चं.	मं.	श.	शु.	चं.	मं.	श.
२६	४०	मं.	र.	शु.	श.	मं.	र.	शु.	श.	मं.	र.	शु.	श.
३०	०	गु.	बु.	बु.	गु.	गु.	बु.	बु.	गु.	गु.	बु.	बु.	गु.

द्वादशांशकथन.

लग्नस्थद्वादशांशास्तुस्वराशेरेवकीर्तिताः ॥ १ ॥

टीका—लग्नाचे अंश ३० त्याचे भाग १२ ह्मणजे द्वादशांश. त्यांचा क्रम चालते लग्नापासून जोंपर्यंत लग्नाचे अंश असतील त्यांचे अंतींचे स्थानाचा स्वामी तो द्वादशांशपति जाणावा. त्यांत मंगळ, शनि, रवि यांचा अशुभ होय.

	मेष	वृष.	मिथु.	कर्क	सिंह	कं०	तूळ.	वृ०	धन	म.	कुंभ	मीन
३०	मं.	शु.	बु.	चं.	सू.	बु.	शु.	मं.	गु.	श.	श.	गु.
०	शु	बु.	चं.	र.	बु.	शु.	मं.	गु.	श.	श.	गु.	मं.
०	बु.	चं.	र.	बु.	शु.	मं.	गु.	श.	श.	गु.	मं.	शु.
१० ०	चं	र.	बु.	शु.	मं.	गु.	श.	श.	गु.	मं.	शु.	बु.
१ ३०	र.	बु.	शु.	मं.	गु.	श.	श.	गु.	मं.	शु.	बु.	चं.
१५ ०	बु..	शु.	मं.	गु.	श.	श.	गु.	मं.	शु.	बु.	चं.	र.
१७ ३०	शु.	मं.	गु.	श.	श.	गु.	मं.	शु.	बु.	चं.	र.	बु.
२० ०	मं.	गु.	श.	श.	गु.	मं.	शु.	बु.	चं.	र.	बु.	शु.
२२ ३०	गु.	श.	श.	गु	मं.	शु.	बु..	चं.	र.	बु.	शु.	मं.
२५ ०	श.	श.	गु.	मं.	शु.	बु.	चं.	र.	गु.	शु.	मं.	गु.
२७ ३०	श.	गु.	मं.	शु.	बु.	चं.	र.	बु.	[illegible]		गु.	श.
३० ०	गु.	मं.	शु.	बु.	चं.	र.	ग.	शु.	मं.	गु.	श.	श.

विषमत्रिंशांश.

कुजार्किगुरुविच्छुक्रास्त्रिंशांशपतयःक्रमात् ॥
पंचपंचाष्टशैलेषुभागानांविषमेगृहे ॥ १ ॥

टीका—विषमलग्नीं पंचमांशपर्यंत लग्न असतां भौमापुढें पांच अंश शनि, त्यापुढें ८ अंश गुरु, त्यापुढें ७ अंश बुध त्यापुढें ५ अंश शुक्र, या क्रमानें विषम लग्नीं त्रिंशांशपति जाणावे. यांत भौम, शनि हे अशुभ जाणावे.

	मेष	मिथु	सिंह	तूळ	धन	कुंभ
५ ०	मं.	मं.	मं.	मं.	मं.	मं.
१० ०	श.	श.	श.	श.	श.	श.
०	गु.	गु.	गु.	गु.	गु.	गु.
२५ ०	बु.	बु.	बु.	बु.	बु.	बु.
०	शु.	शु.	शु.	शु.	शु.	शु.

समत्रिंशांश.

शुक्रेज्ञेज्यार्किभूपुत्रास्त्रिंशांशपतयःसमे ॥
पंचांगाष्टेषुपंचानांभागानांकथितावुधैः ॥ १ ॥

टीका—समलग्नीं ५ अंशपर्यंत लग्न शुक्र, त्यापुढें ७ अंश बुध, त्यापुढें ८ अंश गुरु, त्यापुढें ५ अंश शनि, पुढें ५ अंशपर्यंत मंगळ, हे समलग्नीं त्रिंशांशपति जाणावे, यांत मंगळ, शनि यांचे त्रिंशांश, अशुभ जाणावे.

	वृषभ	कर्क	कन्या	वृश्चि.	मकर	मीन
५°	शु.	शु.	शु.	शु.	शु.	
१२°	बु.	बु.	बु.	बु.	बु.	
२०°	गु.	गु.	गु.	गु.	गु.	ग.
२५°	श.	श.	श.	श.	श.	श.
३०°	मं.	मं.	मं.	मं.	मं.	म.

षड्वर्ग पाहण्याचा क्रम.

कार्तिक शुक्ल ९ मंगळवार, पूर्वी केलें आहे तें लग्न मकर अंश १४ घ. ११ प. ५१ स्वामी शनि, तो गृहेश जाणावा.

गृहेश	होरा	द्रेष्काण	नवमां	द्वादशां	त्रिंशां
शनि	चंद्र	शुक्र	शुक्र	बुध	गुरु.

हे षड्वर्ग, यांत शनि अशुभ; शेष ५ वर्ग शुभ जाणावे.

॥ उक्तांश ॥ ॥ मेषेषष्ठघटौवृषेत्रिद्दगिनाद्वंद्वेद्रिगोकर्क्यःकीटे ब्ध्यंगनवाद्रयोर्कभवनेज्ञाश्वार्कस्त्रियांत्र्यर्कषट् ॥ जूकेकाद्रिखगा अलौगवषट्चापेत्रिषड्गोद्रयोनक्रेशार्क्यरणाघटे झषट्षौमीनेऽद्रि गोषट्शुभाः ॥

राशी. उच्च	मेष	वृ.	मि.	क.	सिं.	क.	तु.	वृ.	ध.	म.	कुं.	मी.
अंश.	६	३	७	४	६	३	१२	९	३	३	१२	७
	७	३	९	६	७	१२	७	७	६	१२	२	९
	०	१२	१२	९	०	६	९	६	९	०	०	६
	०	०	३	७	०	०	०	०	७	०	०	०

षड्वर्गेपंचवर्गेवाचतुर्वर्गेमथापिवा ॥
केचित्त्रिवर्गेसत्प्रोक्तंद्वयेकवर्गेतनुंत्यजेत् ॥ १ ॥

टीका—६, ५ किंवा ४ वर्ग लग्नास आले असतां तें लग्न बलिष्ठ होय. केचिन्मतें करून ३ वर्ग शुभ होत. २, १ वर्ग आले असतां तें लग्न वर्जावें. निर्बलिष्ठ होय.

लग्नांशफलमाह.

लग्नंचतुर्दशेभागेवृषस्यमकरस्यच ॥
कन्याकर्कटमीनानामष्टमेद्वादशेऽलिनः

टीका—वृषभ, मकर यांचे अंश १४, कन्या, कर्क, मीन यांचे अंश ८; आणि वृश्चिकाचे अंश १२ हे शुभफल देतात.

एकविंशतिमेभागेमेषस्याष्टादशेहरेः ॥
संपूर्णफलदंचादौमध्येमध्यफलप्रदम् ॥ २ ॥

टीका—मेषाचे अंश २१, सिंहाचे अंश १८ असे लग्नाचे अंश असतां संपूर्ण फल देतात. मध्यें असतां मध्यम फल देतात.

कुंभस्यांशेचषड्विंशेचतुर्विंशेचतौलिनः ॥
युग्मकार्मुकयोर्लग्नंशुभंसप्तदशांशके ॥ ३ ॥

टीका—कुंभाचे अंश २६, तुळाचे अंश २४, मिथुन व धन यांचे अंश १७ हे शुभ होत.

लग्नवर्गोत्तमलक्षण.

अंतेतुच्छफलंलग्नंयदिवर्गोत्तमंनचेत् ॥
लग्नस्यस्वनवांशोयःसवर्गोत्तमउच्यते ॥ ४ ॥

टीका—लग्नाचे अंत्यभागीं वर्गोत्तम नसेल तर तें लग्न अनिष्ट फल देतें आणि लग्न आपले स्वनवांशीं असलें ह्मणजे त्यास वर्गोत्तम ह्मणावें.

गोधूललग्नकथन.

गोधूलंपदजादिकेशुभकरंपंचांगशुद्धौरवेरर्धास्तात्परपूर्वतोऽर्धघटि
कंतत्रेन्दुमष्टारिगम् ॥ सोग्रांगंकुजमष्टमंगुरुयमाहःपातमर्कक्रमंज
ह्याद्विप्रमुखेऽतिसंकटइदंसद्यौवनाद्येक्वचित् ॥ १ ॥

टीका—सूर्याचे अर्धास्तसमयापूर्वी १५ पळें व नंतर १५ पळें यास गोधूलकाल ह्मणतात. हा शुद्रादिकांस विवाहाविषयीं शुभ होय, परंतु पंचांगशुद्धि असावी; आणि त्या लग्नीं अष्टम आणि षष्ठस्थानीं चंद्र व पापग्रह आणि भौम अष्टमस्थानीं आणि गुरु, शनि हे वार आणि क्रांतिसाम्य व संक्रांतिदिन इत्यादिक दुष्ट योग नसावे ह्मणजे शुभ. आणि केचिन्मतें विप्रादिकांसही अति संकटीं ह्मणजे कन्या उपवर असतां इत्यादि समयीं गोरज लग्न शुभ होय.

षड्वर्गपंचवर्गवाचतुर्वर्गमथापिवा ॥
केंद्रेत्रिवर्गसत्प्रोक्तंद्व्येकवर्गंतनुंत्यजेत् ॥ १ ॥

टीका—६, ५, किंवा ४ वर्ग लग्नास आले असतां तें लग्न बलिष्ठ होय, केचिन्मतें करून ३ वर्ग शुभ होत. आणि २, १ वर्ग आले असतां तें लग्न वर्जावें. निर्बलिष्ठ.

लग्नांशफल.

लग्नंचतुर्दशेभागेवृषस्यमकरस्यच ॥
कन्याकर्कटमीनानामष्टमेद्वादशेऽलिनः ॥ १ ॥

टीका—वृषभ, मकर यांचे अंश १४; कन्या, कर्क, मीन, यांचे अंश ८; आणि वृश्चिकाचे अंश १२ हे शुभफल देतात.

एकविंशतिमेभागेमेषस्याष्टादशेहरेः ॥
संपूर्णफलदंचादौमध्येमध्यफलप्रदम् ॥ २ ॥

टीका—मेषाचे अंश २१; सिंहाचे अंश १८, असे लग्नाचे अंश असतां संपूर्ण फल देतात. मध्यें असतां मध्यम फळ देतात.

कुंभस्यांशेचषड्विंशेचतुर्विंशेचतौलिनः ॥
युग्मकार्मुकयोर्लग्नंशुभंसप्तदशांशके ॥ ३ ॥

टीका—कुंभाचे अंश २६, तुळाचे अंश २४ मिथुन व धन यांचे अंश १७, हे शुभ होत.

लग्नवर्गोत्तमलक्षण.

अंतेतुच्छफलंलग्नंयदिवर्गोत्तमंनचेत् ॥
लग्नस्यस्वनवांशोयःसवर्गोत्तमउच्यते ॥ ४ ॥

टीका—लग्नाचे अन्त्यभागीं वर्गोत्तम नसेल तर तें लग्न फल देतें आणि लग्न आपले स्वनवांशीं असलें ह्मणजे त्यास वर्गोत्तम ह्मणावें.

गोधूललग्नकथन.

गोधूलंपदजादिकेशुभकरंपंचांगशुद्धौरवेरर्धास्तात्परपूर्वतोऽर्धघटिकंतत्रेंदुमष्टारिगम् ॥ सोग्रांगंकुजमष्टमंगुरुयमाहःपातमर्कक्रमंजह्याद्विप्रमुखेऽतिसंकटइदंसद्यौवनाद्येक्कचित् ॥ १ ॥

टीका—सूर्याचे अर्धास्तसमयापूर्वी १५ पळें व नंतर १५ पळें यास गोधूल काल ह्मणतात. हा शूद्रादिकांस विवाहाविषयीं शुभ होय, परंतु पंचांगशुद्धि असावी आणि त्या लग्नीं अष्टम आणि षष्ठ स्थानीं चंद्र व पापग्रह आणि भौम अष्टमस्थानीं आणि गुरु, शनि हे वार आणि क्रांतिसाम्य व संक्रांतिदिन इत्यादिक

योग नसावे ह्मणजे शुभ. केचिन्मतें विप्रादिकांसही अतिसंकटीं ह्मणजे उपवर कन्या असतां इत्यादि समयीं गोरज लग्न शुभ होय.

वधूप्रवेश.

विवाहमारभ्यवधूप्रवेशोयुग्मेऽथवाषोडशवासरांतात् ॥
तदूर्ध्वमब्देयुजिपंचमांतादतःपरस्तन्नियमोनचास्ति ॥ १ ॥

टीका—विवाहदिनापासून १६ दिवसपर्यंत सम दिवशीं वधूप्रवेश उक्त; आणि पुढें ५ वर्षेंपर्यंत विषम मासादिक उक्त. पुढें इच्छेप्रमाणें.

॥ उक्तमासादि ॥ माघफाल्गुनवैशाखेशुक्लपक्षेशुभेदिने ॥
गुर्वादित्यविशुद्धौस्यान्नित्यंपत्नीद्विरागमः ॥ २ ॥

टीका—माघ, फाल्गुन आणि वैशाख, शुक्लपक्षीं शुभ दिवशीं गुर्वादिक अस्त वर्ज करून द्वितीय वेळेस वधूप्रवेश (द्विरागमन) उक्त होय.

नीहारांशुयुगुत्तरादितिगुरुब्राह्मानुराधाश्विनी शाक्रेभास्करवा
युविष्णुवरुणत्वाष्ट्रेप्रशस्तेतिथौ ॥ कुंभाजालिगतेरवौशुभकरे
प्राप्तोदयेभार्गवेजीवज्ञास्फुजितांदिनेनववधूवेश्मप्रवेशःशुभः ॥ ३ ॥

टीका—मृग, तिन्ही उत्तरा, पुनर्वसु, पुष्य, रोहिणी, अनुराधा, अश्विनी, ज्येष्ठा, हस्त, स्वाती, श्रवण, शततारका, चित्रा हीं नक्षत्रें आणि शुभतिथि व कुंभ, मेष, वृश्चिक ह्या राशींचा सूर्य, शुक्रादिउदय आणि गुरु, बुध, चंद्र हे वार अशा शुभ दिवशीं वधूगृहप्रवेश करावा.

नूतन पदर धारणास मुहूर्त.

हस्तादिपंचमृगपूषभदस्रभेषुविष्णुद्वयेबुधदिनेगुरुशुक्रवारे ॥
स्त्रीणांशुभंप्रथमपल्लवधारणंस्यात्पाणिग्रहोक्तसमयेस्वलुपीतवस्त्रैः ॥

टीका—हस्तापासून ५ आणि मृग, पुनर्वसु, अश्विनी, श्रवण, धनिष्ठा, हीं नक्षत्रें आणि बुध, गुरु, शुक्र हे वार आणि विवाहकाळीं जे ग्रह उक्त असतात ते पाहून अशा दिवशीं नूतन पीतवस्त्रेंकरून स्त्रियांस प्रथम पदर परिधान करावें.

गांधर्व विवाहास मुहूर्त.

शूद्रांत्येषुपुनर्भवापरिणयःप्रोक्तोविवाहोक्तभैर्नालोक्यंतिथिमासवेध
भृगुजेज्यास्तादितत्रार्कभात् ॥ त्रित्र्यर्क्षेषुमृतीर्धनंमृतिमृतीपुत्रोमृ
तिर्दुर्भगंश्रीरौत्रन्त्यमथोधृतीशकृतततवक्षेयस्यःसाभिजित् ॥ १ ॥

टीका—शूद्र आणि रजकादि अंत्यजाति यांच्या स्त्रियांचा पुनर्विवाह ह्मणजे पाट लावणें यास मुहूर्त. विवाहनक्षत्रें अवश्य घ्यावीं. मास, तिथि, वार, गुरु, शुक्र, यांचे अस्तोदयांचा दोष नाहीं आणि सूर्यनक्षत्रापासून अभिजित्सहित दिवस-नक्षत्रापर्यंत नक्षत्रें मोजण्याचा क्रम. प्रथम ३ मरण, द्वीतीय ३ धन, तृतीय ३ मरण, चतुर्थ ३ मरण, पंचम ३ पुत्र लाभ, षष्ठ ३ मरण, सप्तम ३ दुर्भग, अष्टम ३ लक्ष्मी, नवम ३ औन्नत्य आणि सूर्यनक्षत्रापासून चवथें, अकरावें, १८ वें, २९ वें या चार स्थानाचे नक्षत्रांवर शुभचक्र उतरलें तथापि हीं वर्जोवींत. अन्य शुभ होत.

अन्यमतानें.

इंद्रादितिशिवाऽऽश्लेषाआग्नेयंवारुणंतथा ॥
अश्विनोवसुदैवत्यंपट्टकालेशुभंस्मृतम् ॥ २ ॥

टीका—ज्येष्ठा, आर्द्रा, आश्लेषा, कृत्तिका, शततारका, धनिष्ठा, हीं नक्षत्रें पाट लावण्यास शुभ होत.

दत्तकपुत्र घेण्यास मुहूर्त.

हस्तादिपंचकभिषग्वसुपुष्यभेषुसूर्यक्षमाजगुरुभार्गववासरेषु ॥
रिक्ताविवर्जिततिथिष्वलिकुंभलग्नंसिंहेवृषेभवतिदत्तपरिग्रहोऽयम् ॥ १ ॥

टीका—हस्त, चित्रा, स्वाती, विशाखा, अनुराधा, अश्विनी, धनिष्ठा, पुष्य हीं नक्षत्रें आणि रवि, मंगळ, गुरु, शुक्र हे वार उक्त होत आणि ४ थी, ९ मी, १४ शी या तिथि वर्ज्य करून बाकी तिथींस आणि वृश्चिक कुंभ हीं लग्नें वर्ज्य करून सिंह, वृषभ या लग्नीं पुत्र घेणें उक्त.

वास्तुप्रकरण.

ग्रामादि आनुकूल्य पाहणें.

ग्रामादेरनुकूलत्वंदिशोभूतग्रहस्यच ॥ मासधिष्ण्यादिशुद्धिंचवी
क्ष्यायव्ययभांशकान् ॥ १ ॥ गुरुशुक्रार्कचंद्रेषुस्वोच्चादिबलशा
लिषु ॥ गुर्वर्केंदुबलंलब्ध्वागृहारंभःप्रशस्यते ॥ २ ॥

टीका—ग्राम आणि दिशा व भूतग्रह हे अनुकूल पाहून मास व नक्षत्रादिकांची शुद्धि आणि आय, व्यय, लग्न व अंशशुद्धि शुभ पाहून व गुरु, शुक्र, सूर्य, चंद्र हे ग्रह स्वोच्चादिस्थानीं बलाढ्य असतां आणि सूर्य, चंद्र, गुरु यांचें बल घेऊन गृह बांधण्यास आरंभ करावा हें प्रशस्त आहे.

वर्ज्य.

विवाहोक्तान्महादोषान्तजामित्रशुद्धितः ॥ रिक्ताःकुजार्कवा

शैचचरलग्नंचरांकशम् ॥ ३ ॥ त्यक्त्वाकुजार्कयोश्चांशंपृष्ठेचाग्रे स्थितंविधुम् ॥ बुधेज्यशशिगंचार्केकुर्याद्गेहंशुभाप्तये ॥ ४ ॥

टीका—विवाहास जे महादोष सांगितले आहेत ते जामित्र शुद्धीवांचून येथें वर्जावे आणि रिक्तातिथि व भौम, रविवार, चरलग्नें व त्यांचे अंश वर्जावे व रवि, भौम यांचा अंश आणि चंद्र पृष्ठभागीं अथवा अग्रभागीं वर्ज्य आणि मिथुन, कन्या, धन, मीन या राशींचा सूर्य घेऊन गृहारंभ शुभ होय.

द्वारशुद्धि.

द्वारशुद्धिंनिरीक्ष्यादौभशुद्धिंवृषचक्रतः ॥
निष्पंचकेस्थिरेलग्नेद्व्यंगेवाऽऽलयमारभेत् ॥ ५ ॥

टीका--प्रथम द्वारशुद्धि, वृषचक्रापासून नक्षत्रशुद्धि अवलोकन करून निष्पंचक स्थिर द्विस्वभाव असें लग्न पाहून त्यावर घर बांधण्यास आरंभ करावा.

ग्राम अनुकूल.

स्वनामराशेर्यद्राशिर्द्धिशरांकेशदिङ्गतः ॥
सग्रामःशुभदःप्रोक्तस्त्वशुभःस्यात्ततोऽन्यथा ॥ ६ ॥

टीका--आपले राशीपासून २, ५, ९, ११, १०, अशी ग्रामाची राशी आली तर शुभ आणि अन्यथा अशुभ जाणावें.

एकभेसप्तमेव्योमगृहहानिस्त्रिषष्ठगे ॥
तुर्याष्टद्वादशेरोगाःशेषस्थानेभवेत्सुखम् ॥ ७ ॥

टीका—एक अथवा सप्तम राशि आली तर शून्य. तिसरी अथवा सहावी आली असतां गृहाची हानी. चवथी, आठवी, बारावी आली असतां रोगकारक आणि शेष राशींतून कोणतीही आली असल्यास सुखप्राप्ति होय.

जातक पाहणें.

अकचटतपयशवर्गाअष्टौक्रमतःस्मृताः ॥ एकोनखेषुवर्णानांस्वरशास्त्रविशारदैः ॥ ८ ॥ अवर्गेषोडशज्ञेयाःस्वराःकादिषु पंचसु ॥ पंचपंचैववर्णाःस्युर्यशौतुचतुरक्षरौ ॥ ९ ॥

टीका--स्वरशास्त्रवेत्त्यांनीं अकारादि हकारांत, एकुणपन्नास ४९ अक्षरांचे अवर्ग, कवर्ग, चवर्ग टवर्ग, तवर्ग पवर्ग य आणि श वर्ग असे आठ वर्ग सांगितले आहेत. त्यांमध्यें अवर्गाचीं १६ अक्षरें कवर्गाचीं ५, चवर्गाचीं ५, टवर्गाचीं ५, तवर्गाचीं ५, पवर्गाचीं ५, यवर्गाचीं ४ आणि शवर्गाचीं ४, अक्षरें आहेत असें जाणावें.

वर्गांचे स्वामी.

तार्क्ष्यमार्जारसिंहाश्वसर्पाखुगजसूकराः ॥
वर्गेशाःक्रमतोज्ञेयाःस्ववर्गात्पंचमोरिपुः ॥ १० ॥

टीका—अवर्गाचा स्वामी गरुड १, कवर्गाचा स्वामी मार्जार २, चवर्गाचा सिंह ३, टवर्गाचा श्वान ४, तवर्गाचा सर्प ५, पवर्गाचा उंदीर ६, यवर्गाचा गज ७, शवर्गाचा डुकर ८, हे क्रमेंकरून वर्गांचे स्वामी जाणावे. आणि ज्या वर्गांतील स्वनामाक्षर येईल त्यापासून पांचवे वर्गाचा स्वामी तो त्याचा रिपू जाणावा.

काकिणी.

स्ववर्गंद्विगुणंकृत्वापरवर्गेणयोजयेत् ॥
अष्टभिश्चहरेद्भागंयोऽधिकःसऋणीभवेत् ॥ ११ ॥

टीका—स्वनामाचा वर्ग द्विगुणित करावा, त्यांत ग्रामादिकाचा वर्ग मिळवावा आणि आठांनीं भागावें. पुनः ग्रामादिकांचा वर्ग द्विगुणित करून स्वनामाचा वर्ग आंत मिळवून पूर्ववत् भागून शेष ज्यांचें अधिक उरेल तो त्याचा ऋणी जाणावा.

चंद्राचें मुख पाहणें.

वाह्नान्मैत्रान्नगर्क्षस्थेचंद्रेयाम्योत्तराननम् ॥
पित्र्याद्वासवतस्तद्वत्प्राक्परास्यंगृहंशुभम् ॥ १२ ॥

टीका—कृत्तिकापासून सात नक्षत्रीं चंद्र असतां गृहाचें मुख दक्षिणेस, आणि अनुराधापासून सात नक्षत्रीं चंद्र असतां गृहाचें मुख-उत्तरेस, आणि मघांपासून सात नक्षत्रीं चंद्र असतां गृहाचें मुख पूर्वेस, आणि धनिष्ठांपासून सात नक्षत्रीं चंद्र असतां गृहाचें मुख पश्चिमेस शुभ जाणावें.

आयादि साधन.

गृहेशकरमानेनगृहस्यायादिसाधयेत् ॥
करैश्चेन्नेष्टमायादिसाध्यमंगुलितस्तथा ॥ १३ ॥

टीका—गृहाचे आयादिक गृहस्वामीच्या हस्तमानेंकरून साधावे, आणि जर ते इष्ट आयादिक हस्तमानानें साधत नाहींत तर अंगुलिमानेंकरून साधावे.

क्षेत्रफळ.

विस्तारगुणितंदैर्घ्यंगृहक्षेत्रफलंभवेत् ॥

तत्पृथग्वसुभिर्भक्तशेषमायोध्वजादिकः ॥ १४ ॥

टीका—ध्वजायादि साधावयाचा प्रकार. रुंदीनें लांबी किंवा लांबीनें रुंदी गुणावी; तें क्षेत्रफळ जाणावें आणि त्यास आठांनीं भागावें; शेष उरेल तें ध्वजायादि जाणावें.

आयांचीं नांवें.

ध्वजोधूमोऽथसिंहःश्वासोरभेयःखरोगजः ॥

ध्वांक्षश्चैवक्रमेणैतदायाष्टकमुदीरितम् ॥ १५ ॥

टीका—ध्वजाय १, धूमाय २, सिंहाय ३, श्वानाय ४, वृषाय ५, गर्दभाय ६, गजाय ७, ध्वांक्षाय ८, हे आठ आय क्रमेंकरून सांगितले आहेत.

वर्णपरत्वें उक्त आय.

ब्राह्मणस्यध्वजोज्ञेयोसिंहोवैक्षत्रियस्यच ॥

वृषभश्चैववैश्यस्यसर्वेषांतुगजःस्मृतः ॥ १६ ॥

टीका—ब्राह्मणांस ध्वजाय, क्षत्रियांस सिंहाय, वैश्यांस वृषभाय, आणि सर्व वर्णांस गजाय उक्त होय.

मतांतरें आयांचीं फळें.

ध्वजेकृतार्थोमरणंचधूमेसिंहेजयश्वाधशुनिप्रकोपः ॥ वृषेचरा

ज्यंचखरेचदुःखंध्वांक्षमृतिश्चैवगजेसुखंस्यात् ॥ १७ ॥ पूर्वद्वारे

वृषःश्रेयान्गजःप्राग्यमदिङ्मुखः ॥

टीका—ध्वजायास कृतार्थ होईल, धूमायास मरणप्राप्ति, सिंहायास जय, श्वना (कुत्र्याचे) आयास कोप, वृषायास राज्य, खर आयास दुःख, ध्वांक्ष (कावळ्याचे) आयास मरण आणि गज आयास सुखप्राप्ति होय. पूर्वाभिमुख गृहास वृषाय आणि गजाय हे श्रेयस्कर होत, आणि दक्षिणाभिमुख गृहास गजाय उक्त.

नक्षत्रपरत्वें व्यय साधणें.

क्षेत्रमष्टाहतंधिष्ण्यैर्विभक्तंस्याद्गृहस्यभम् ॥

भेष्टभक्तेव्ययःशेषमायादल्पोव्ययःशुभः ॥ १८ ॥

टीका—पूर्वीचे क्षेत्रफळास आठांनीं गुणावें आणि गुणांक येईल तो २७ सांनीं भागावा. शेष उरेल तें त्या घराचें नक्षत्र जाणावें. तें नक्षत्र ८ नीं भागावें शेष राहील तो त्या गृहाचा व्यय, तो आयापेक्षां अल्प आला तर शुभ.

गृहाच्या राशि.

अश्विन्यादित्रयेमेषोमघादित्रितयेहरिः ॥

मूलादित्रितयेधन्वीभद्वयंशेषराशिषु ॥ १९ ॥

टीका—गृहाचीं नक्षत्रें अश्विनी, भरणी, कृत्तिका यांची राशि मेष ॥ १ ॥ रोहिणी, मृग यांस वृषभ ॥ २ ॥ आर्द्रा, पुनर्वसु यांस मिथुन ॥ ३ ॥ पुष्य, आश्लेषा यांस कर्क ॥ ४ ॥ मघा, पूर्वा, उत्तरा यांस सिंह ॥ ५ ॥ हस्त, चित्रा यांस कन्या ॥ ६ ॥ स्वाती, विशाखा यांस तूळ ॥ ७ ॥ अनुराधा, ज्येष्ठा, यांस वृश्चिक ॥ ८ ॥ मूळ, पूर्वाषाढा, उत्तराषाढा यांस धन ॥ ९ ॥ श्रवण, धनिष्ठा यांस मकर ॥ १० ॥ शततारका, पूर्वाभाद्रपदा यांस कुंभ ॥ ११ ॥ उत्तराभाद्रपदा, रेवती यांस मीन ॥ ॥ १२ ॥ याप्रमाणें अनुक्रमें राशि जाणाव्या.

गृहाचें नांव आणावयाचा प्रकार.

गृहस्यपूर्वतोदिक्षुक्रमात्कक्ष्यब्धिदंतिनः ॥
संस्थाप्यशालिंदजानंकांस्तन्मित्याषोडशगृहाः ॥ २० ॥

टीका—गृहाचे पूर्वदिशाक्रमानें अंक घालावयाचे ते असे. पूर्वेस १, दक्षिणेस २, पश्चिमेस ४. उत्तरेस ८ असे चोहोंदिशांस स्थापावे आणि त्या गृहाचें मुख असेल त्या दिशांकांत शालाची संख्या असेल त्याजवर एक अधिक धरून मिळवावी. जे अंक येतील तें त्या गृहाचें नांव जाणावें.

गृहाचें नांव.

ध्रुवंधान्यंजयंनंदंखरंकांतंमनोरमम् ॥ सुमुखंदुर्मुखंक्रूरंरिपुदंध
नदंक्षयम् ॥ २१ ॥ आक्रंदंविपुलंज्ञेयंविजयंचेतिषोडश ॥ गृहं
ध्रुवादिकंज्ञेयंनामतुल्यफलप्रदम् ॥ २२ ॥

टीका—हीं षोडश नांवें आहेत. यांचीं फळें नामाप्रमाणें शुभाशुभ जाणावीं.

अंश आणावयाचा प्रकार.

व्ययेनसंयुतेक्षेत्रेगृहनामाक्षरान्विते ॥
त्रिभिर्भक्तांशकास्तेषांद्वितोयोंशोनशोभनः ॥ २३ ॥

टीका—मागील व्यय अंक आला असेल तो क्षेत्रफळांत मिळवावा आणि गृहाचीं नामाक्षरें मिळवून ३ नीं भागावें शेष २ उरले तर वाईट; अन्य शुभ होत.

गृहाचे भाग.

नवभागंगृहंकुर्यात्पंचभागंतुदक्षिणे ॥
त्रिभागंवामतःकुर्याच्छेषंद्वारंप्रकल्पयेत् ॥ २४ ॥

टीका—गृहक्षेत्राचे ९ भाग करावे. त्यांत ५ भाग दक्षिणेस आणि तीन भाग उत्तरेस सोडून मध्यें १ भाग तें द्वार याप्रकारें भाग कल्पावे.

गृहाचें द्वार.

द्वारस्थोपरिथद्वारंद्वारस्यान्यच्चसंमुखम् ॥
व्ययदंतुयदातच्चनकर्तव्यंशुभेप्सुभिः ॥ २५ ॥

टीका—द्वारावर आणि समोरासमोर हीं द्वारें व्ययदायक होत, ह्मणून ज्यांस शुभाची इच्छा असेल त्यांनीं वर्जावीं.

गृहामध्यें स्थानें योजण्याचा प्रकार.

स्नानागारंदिशिप्राच्यामाग्नेय्यांपचनालयम् ॥ याम्यायांशय नागारंनैर्ऋत्यांशस्त्रमंदिरम् ॥ २६ ॥ प्रतीच्यांभोजनागारंवाय व्यांपशुमंदिरम् ॥ भांडकोशंचोत्तरस्यांईशान्यांदेवमंदिरम् ॥ २७ ॥

टीका—पूर्वेस स्नानाचें घर १, आग्नेयकोणास पाकमंदिर २, दक्षिणेस शयनस्थान ३, नैर्ऋत्येस शस्त्रमंदिर ४, पश्चिमेस भोजनस्थान ५. वायव्येस पशुमंदिर ६. उत्तरेस भांडारगृह ७, ईशान्येस देवांचें मंदिर ८ याप्रकारें स्थानांची योजना करावी.

अल्पदोष.

अल्पदोषंगुणश्रेष्ठंदोषायनभवेद्गृहम् ॥
आयव्ययौप्रयत्नेनविरुद्धंभंचवर्जयेत् ॥ २८ ॥

टीका—गृहास अल्पदोष आले आणि बहुगुणेंकरून श्रेष्ठ आले तर त्यास दोष नाहींत. मात्र आयव्यय अथवा नक्षत्र विरुद्ध आलें तर वर्जावें.

वास्तुचक्रांचीं नांवें.

आरंभेवृषभंचक्रंस्तंभेज्ञेयंतुकूर्मवत् ॥
प्रवेशेकलशंचक्रंवास्तुचक्रंबुधैःशुभम् ॥ २९ ॥

टीका—गृहारंभास वृषभ वास्तु आणि स्तंभस्थापनास कूर्मवास्तु, गृहप्रवेशास कलश हीं वास्तुचक्रें पहावीं.

गृहारंभास मास.

पौषफाल्गुनवैशाखमार्गश्रावणकार्तिकाः ॥
मासाःस्युर्गृहनिर्माणेपुत्रारोग्यधनप्रदाः ॥ ३० ॥

टीका—पौष, फाल्गुन, वैशाख, मार्गशीर्ष, श्रावण आणि कार्तिक ह्या महिन्यांत गृहारंभ, शिलान्यास व स्तंभप्रतिष्ठा हीं केलीं असतां आरोग्य, आयुष्यवृद्धी, धनप्राप्ति व पुत्रप्राप्ति हीं होतात.

गृहारंभास मासपरत्वें फळ.

शोकंधान्यंपंचतानिःपशुत्वंस्वाप्तिनैःस्वंसंगरंमृत्युनाशम् ॥
सच्छ्रीप्राप्तिवह्निभीतिंचलक्ष्मींकुर्युश्चैत्राद्यागृहारंभकाले ॥ ३१ ॥

टीका—चैत्रमासीं शोकप्राप्ति १, वैशाखांत धान्यप्राप्ति २, ज्येष्ठांत मृत्यु ३, आषाढांत निःपशुत्व ४, श्रावणांत द्रव्यप्राप्ति ५, भाद्रपदांत दरिद्र ६, आश्विनांत कलह ७, कार्तिकांत चाकराचा नाश ८, मार्गशीर्षांत धनप्राप्ति ९, पौषांत लक्ष्मीप्राप्ति १०, माघांत अग्निभय ११, फाल्गुनांत लक्ष्मी १२, याप्रकारें गृहारंभमासांचीं फळें जाणावीं.

गृहाचें मुख दिशापरत्वें करावयाचें.

कर्कनक्रहरिकुंभगतेऽर्केपूर्वपश्चिममुखानिगृहाणि ॥
तौलिमेषवृषवृश्चिकयातेदक्षिणोत्तरमुखानिवदंति ॥ ३२ ॥

टीका—कर्क, मकर, सिंह, कुंभ या राशींस सूर्य असतां गृहाचें मुख पूर्वेस अथवा पश्चिमेस, तूळ, वृषभ, वृश्चिक या राशींचा सूर्य असतां गृहाचें मुख दक्षिणेस अथवा उत्तरेस करावें. याप्रकारें रत्नमालाग्रंथीं सांगितलें आहे.

गृहारंभास नक्षत्रादि उक्त.

त्र्युत्तरामृगरोहिण्यांपुष्यमैत्रकरत्रये ॥ धनिष्ठाद्वितयेपौष्णये गृहारंभःप्रशस्यते ॥ ३३ ॥ आदित्यभौमवर्ज्यंतुसर्वेवाराःशुभावहाः ॥ चंद्रादित्यबलंलब्ध्वालग्नेशुभनिरीक्षिते ॥ ३४ ॥ स्तंभोच्छ्रायस्तुकर्तव्यअन्यंतुपरिवर्जयेत् ॥ प्रासादेष्वेवमेवस्यात्कूपवापीषुचैवहि ॥ ३५ ॥

टीका—तीन, उत्तरा, मृग, रोहिणी, पुष्य, अनुराधा, हस्त, चित्रा, स्वाती, धनिष्ठा शततारका, रेवती हीं नक्षत्रें उक्त आणि रवि, भौम हे दोन वार वर्ज्य करून बाकीचे सर्व वार शुभ आहेत. ज्या स्थिरलग्नीं शुभग्रहांची दृष्टि असेल त्या लग्नीं स्तंभारोपण, देवळें, कूप, वापी, तडाग हीं कृत्यें करावीं; अन्य कर्में वर्जावीं.

वृषचक्र.

त्रिवेदाब्धित्रिवेदाब्धिद्वित्रिभेष्वर्कतःशशी ॥ कुर्याल्लक्ष्मीसमुद्वासस्थैर्यंलक्ष्मींदरिद्रताम् ॥ धनंहानिंक्रमान्मृत्युमारंभेवृषचक्रकम् ३६

टीका—गृह बांधण्यास आरंभ वृषचक्र पाहून करावा; ह्मणजे सूर्यनक्षत्रापासून ३, ४, ४, ३, ४, ४, २, ३, या मानें दिननक्षत्रापर्यंत मोजावीं; त्यांत प्रथम ३ नक्षत्रें लक्ष्मीदायक, पुढचीं ४ नक्षत्रें उद्वास, पु० ४ नक्षत्रें स्थिरता; पु० ३ न० लक्ष्मीदायक,

पु० ४ न० दरिद्रता, पु० ४ न० धनप्राप्ति; पु० २ न० हानि; आणि पु० ३ न० मृत्युदायक अशीं नक्षत्रफळें पाहून ज्या दिवसनक्षत्रास शुभफळ येईल त्यादिवशीं प्रारंभ करावा.

शिलान्यास.

दक्षिणपूर्वेकोणेकृत्वापूजांशिलांन्यसेत्प्रथमाम् ॥
शेषाःप्रदक्षिणेनस्तंभाश्चैवंप्रतिष्ठाप्याः ॥ ३७ ॥

टीका—आग्नेय कोणीं प्रथम पूजन करून शिला पुरावी. शेष शिला प्रदक्षिण क्रमानें पुराव्या. स्तंभही शिलांप्रमाणेंच स्थापावे.

नक्षत्रें शिलान्यासास.

शिलान्यासःप्रकर्तव्योगृहाणांश्रवणेमृगे ॥
पौष्णेहस्तेचरोहिण्यांपुष्याश्विन्युत्तरात्रये ॥ ३८ ॥

टीका—गृहाच्या शिलान्यासास श्रवण, मृग, रेवती, हस्त, रोहिणी, पुष्य, अश्विनी, ३ उत्तरा हीं नक्षत्रें उक्त होत.

शेषाचें मुख.

कन्यासिंहेतुलायांभुजगपतिमुखंशंभुकोणेग्निखातंवायव्येस्या
त्तदास्यंस्वलिधनमकरेईशखातंवदंति ॥ कुंभेमीनेचमेषेनिर्ऋति
दिशिमुखंखातवायव्यकोणेचाग्नेःकोणेमुखंवैवृषमिथुनगतेकर्कटे
कोणखातम् ॥ ३९ ॥

टीका—कन्या, सिंह, तूळ, या लग्नीं शेषाचें मुख ईशान्यकोणीं असतें; तेव्हां अग्नेयकोणीं खनन करावें. वृश्चिक, धन, मकर, ह्या लग्नीं शेषाचें मुख वायव्येस असतें; तेव्हां ईशान्येस खनन करावें. कुंभ, मीन, मेष या लग्नीं नैर्ऋतीस मुख असतें तेव्हां वाव्येस खनन करावें. वृषभ, मिथुन, कर्क ह्या लग्नीं अग्नेयेस मुख असतें तेव्हां नैर्ऋतीस खनन करावें.

दुष्टयोग व वार.

वज्रव्याघातशूलाश्चव्यतीपातश्चगंडकः ॥
विष्कंभपरिघौवर्ज्यौवारौमंगलभास्करौ ॥ ४० ॥

टीका—वज्र, व्याघात, शूल, व्यतीपात, गंड, विष्कंभ, परिघ हे योग आणि भौम व रवि हे वार वर्जावे.

कूर्मचक्र.

तिथिस्तुपंचगुणिताकृत्तिकाद्यृक्षसंयुता ॥ तथाद्वादशमिश्राच नवभागेनभाजिता ॥ ४१ ॥ ॥ फळ ॥ ॥ जलेवेदामुनिश्चंद्रः स्थलेपंचद्वयंवसुः ॥ त्रिषट्कनवचाकाशेत्रिविधंकूर्मलक्षणम् ॥४२॥ जलेलाभस्तथाप्रोक्तःस्थलेहानिस्तथैवच ॥ आकाशेमरणंप्रोक्त मिदंकूर्मस्यचक्रकम् ॥ ४३ ॥

टीका—ज्या तिथीस गृहारंभ करावयाचा ती तिथी ५ नीं गुणावी आणि कृत्तिकांपासून दिवसनक्षत्रापर्यंत जीं नक्षत्रें येतील तीं आंत मिळवावीं आणि १२ अंक त्यांत मिळवावे. नंतर नवांनीं भागावें शेष ४, ७, १ राहिले असतां कूर्म जलस्थानीं आहे त्याचें फळ लाभ; आणि ५, २, ८ शेष उरले तर कूर्म स्थळाचे ठायीं आहे त्याचें फळ हानि; आणि ३, ६, ९ उरले तर कूर्म आकाशाचेठायीं आहे त्याचें फळ मरण अशीं त्रिविध कूर्मफळें जाणावीं.

घटित काष्ठकाम उभें करण्यास मुहूर्त.

॥ स्तंभचक्र ॥ सूर्याधिष्ठितभद्वयंप्रथमतोमध्येतथाविंशतिस्तंभाग्रेरससंख्ययामुनिवरैरुक्तोमुहूर्तःशुभः ॥ फळ ॥ ॥ स्तंभाग्रे मरणंभवेद्गृहवतेर्मूलेधनार्थक्षयोमध्येचैवतुसर्वसौख्यमतुलंप्राप्नोतिकर्तासदा ॥ ४४ ॥

टीका—सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापर्यंत घ्यावयाचा क्रम. त्यांत प्रथम दोन नक्षत्रें स्तंभमूळ त्यांचें फळ धनक्षय; पुढचीं २० नक्षत्रें स्तंभमध्य त्यांचें फळ श्री, लक्ष्मी, कीर्ति आणि त्या दिवसांच्या पुढचीं ४ नक्षत्रें स्तंभाग्र त्याचें फळ मरण असें आहे; करितां ज्या विभागाचें शुभफळ त्या नक्षत्रीं स्तंभारोपण करावें.

आढ्यास मुहूर्त.

मूलेमोभेत्रिऋक्षंगृहपतिमरणंपंचगर्भेसुखंस्यान्मध्येदेयाष्टऋक्षं धनसुतसुखदंपुच्छदेशेष्टहानिः ॥ पश्चाद्देयंत्रिऋक्षंगृहपतिसुखदं भाग्यपुत्रार्थदेयंसूर्यर्क्षाच्चंद्रऋक्षंप्रतिदिनगणयेन्मोभचक्रंविलोक्य ॥ ४५ ॥

टीका—आढें घालणें तें चक्र पाहून घालावें. ह्मणजे सूर्यनक्षत्रापासून ३, ५, ८, ८, ३, याप्रमाणें दिवसनक्षत्रापर्यंत मोजावें. त्यांत पहिलीं तीन नक्षत्रें मूळभाग त्याचें

फळ स्वामिनाश; दुसरीं ९ न० गर्भभाग त्याचें फळ सुखप्राप्ति; तिसरीं ८ न० मध्य भाग त्याचें फळ धन, सुत व सौख्य यांची प्राप्ति; चवथीं ८ न० पुच्छभाग त्याचें फळ इष्टहानि; आणि पांचवीं तीन नक्षत्रें अग्रभाग त्याचें फळ सुख, भाग्य व पुत्र यांची प्राप्ति; अशीं फळें आहेत. तरी या क्रमानें शुभफलात्मक नक्षत्रें ज्या दिवशीं असतील त्या दिवशीं आढें घालावें.

द्वारचक्र.

अर्काच्चत्वारिऋक्षाणिऊर्ध्वेचैवप्रदापयेत् ॥ द्वौद्वौकोणेषुदद्या द्वैशाखायांचचतुश्चतुः ॥ ४६ ॥ अधश्चत्वारिदेयानिमध्येत्री णिप्रदापयेत् ॥ ऊर्ध्वेतुलभतेराज्यमुद्वासंकोणकेषुच ॥ ४७ ॥ शाखायांलभतेलक्ष्मीर्मध्येराज्यप्रदंतथा ॥ अधःस्थेमरणंप्रोक्तं द्वारचक्रंप्रकीर्तितम् ॥ ४८ ॥

टीका—सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापर्यंत मोजून चतुष्कोण द्वारचक्रावर क्रमें करून नक्षत्रांची योजना करावी, तीं प्रथमचीं ४ नक्षत्रें ऊर्ध्वभागीं त्याचें फळ राज्य प्राप्ति; पुढचीं ८ नक्षत्रें द्वारकोण ४ दर कोणावर २ प्रमाणें, त्याचें फळ उद्वास; पुढें ८ नक्षत्रें द्वाराच्या बाजू दोन दर बाजूस चार प्रमाणें, त्याचें फळ लक्ष्मीप्राप्ति; पुढचीं ४ नक्षत्रें द्वाराच्या अधोभागीं (उंबरठ्यावर) त्याचें फळ मरण; आणि शेवटचीं तीन नक्षत्रें द्वाराच्या मध्यभागीं, त्याचें फळ राज्यप्राप्ति; याप्रमाणें फळें आहेत तर शुभफलात्मक नक्षत्रें पाहून द्वार लावावें.

शांतीस अग्निचक्र.

सैकातिथिर्वारयुताप्ताशेषेगुणेभ्रभुविवह्निवासः ॥
सौख्यायहोमेशशियुग्मशेषेप्राणार्थनाशौदिविभूतलेच ॥ ४९ ॥

टीका—ज्या तिथीस शांति करणें त्या तिथींत १ मिळवावा आणि त्यांत जो वार असेल ते अंक मिळवावे; त्यास ४ नीं भागावें शेष उरेल त्याचें फळ ३ अथवा शून्य आलें असतां अग्नि मृत्युलोकीं आहे त्याचें फळ सौख्यप्राप्ति शांतीस उक्त होय. शेष १ उरला असतां प्राणनाश, २ शेष उरले असतां अर्थनाश, या दोहों अंकांची फलश्रुति ही शांतीस उक्त नाहीं.

ग्रहमुखांत आहुतिपात पाहणें.

तरणिविद्भृगुभास्करिचंद्रमाकुजसुरेज्यविधुंतुदकेतवः ॥
रविभतोदिनभंगणयेत्क्रमात्प्रतिखगंत्रितयंत्रितयंन्यसेत् ॥ ५० ॥

टीका—सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापावेतों मोजून क्रमानें दर ग्रहावर तीन तीन नक्षत्रें स्थापावीं; त्यांचीं फळें—प्रथम ३ नक्षत्रें सूर्य, फळ अशुभ; द्वितीय भा० ३ न०

बुध, फळ शुभ, तृतीय भा० ३ न० शुक्र, फळ शुभ; चतुर्थ भाग ३ नक्षत्रें शनि, फळ अशुभ; पंचम भाग ३ नक्षत्रें चंद्र, फळ शुभ; षष्ठ भा० ३ न० मंगळ, फळ अशुभ; सप्तम भा० ३ न० गुरु, फळ शुभ; अष्टम भा० ३ न० राहु, फळ अशुभ; आणि नवम भाग ३ न० केतु, त्याचें फळ अशुभ; अशीं फळें जाणून शुभग्रहाचीं शुभ आहुती द्यावी.

गृहप्रवेशाचा क्रम.

अथप्रवेशेनवमंदिरस्ययात्रानिवृत्तावथभूपतीनाम् ॥
सौम्यायनेपूर्वदिनेविधेयंवास्त्वर्चनंभूतबलिश्वसम्यक् ॥ ५१ ॥

टीका—नवे गृहांत प्रवेश करणें, यात्रेहून घरीं येणें, राजदर्शनास जाणें; यांचे पूर्व दिवशीं वास्तुपूजा करून भूतबलि द्यावा आणि उदगयनही असावें.

चित्रानुराधामृगपौष्णपुष्यस्वातीश्रविष्ठाश्रवणंचमूलम् ॥
वारेष्वसूर्यक्षितिजेरवरिक्तातिथौप्रशस्तोभवनप्रवेशः ॥ ५२ ॥

टीका—चित्रा, अनुराधा, मृग, रेवती, पुष्य, स्वाती, धनिष्ठा, श्रवण, मूळ या नक्षत्रीं आणि रवि, भौम हे वार वर्ज्य करून शेषवारीं आणि रिक्तातिथि वर्ज्य करून बाकी तिथींस गृहप्रवेश करावा.

कलशचक्र.

प्रवेशःकलशेऽर्कर्क्षात्पंचनागाष्टषट्क्रमात् ॥
अशुभंचशुभंज्ञेयमशुभंचशुभंतथा ॥ ५३ ॥

टीका—गृहप्रवेशाविषयीं सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापावेतों मोजून फळें जाणावीं. त्यांचा क्रम—प्रथम ५ नक्षत्रें अशुभ आणि पुढें आठ नक्षत्रें शुभ; पुढें ८ नक्षत्रें अशुभ; पुढें ६ नक्षत्रें शुभ; याप्रकारें कलशचक्र, होय.

वामार्कलक्षण.

रन्ध्रात्पुत्राद्धनादायात्पंचस्वर्केस्थितेक्रमात् ॥
पूर्वाशादिमुखंगेहंविशेद्वामोभवेदतः ॥ ५४ ॥

टीका—घरांत प्रवेश करण्याचे समयीं सूर्य वामार्क असावा. तो पहावयाचा क्रम प्रवेशलग्नीं अष्टम स्थानापासून पंचम स्थानीं सूर्य आणि घराचें मुख पूर्वेस १, तसेंच घराचें मुख दक्षिणेस असलें तर त्यास ५ स्थानापासून पंचम स्थानापर्यंत २ आणि घराचें मुख पश्चिमेस असल्यास २ स्थानांपासून पंचम स्थानापर्यंत ३, अथवा घराचें मुख उत्तरेस असतां सूर्य ११ स्थानापासून ५ स्थानापर्यंत आला तर प्रवेशास वामार्क होतो तो उक्त जाणावा.

ग्रह शुभाशुभ लग्नीं पाहणें.

त्रिकोणकेंद्रगैःशुभैस्त्रिषष्ठलाभसंस्थितैः ॥
असद्ग्रहैःस्थिरोदयेगृहंविशेद्बलेविधौ ॥ ५५ ॥

टीका—गृहप्रवेशास त्रिकोण व केंद्रस्थानीं शुभग्रह असें स्थिरलग्न पाहून आणि तिसरे, सहावे आणि लाभस्थानीं पापग्रह असले तर शुभ जाणावें.

गृहारंभाची लग्नशुद्धि.

त्रिषडायगतैःपापैरष्टांत्येतरगैःशुभैः ॥
चंद्रेलग्नेऽरिरन्ध्रांत्यवर्जितेस्याच्छुभंगृहम् ॥ ५६ ॥

टीका—३, ६ ११ स्थानीं पापग्रह शुभ, आणि ८, १२ स्थानाहून इतर स्थानीं शुभग्रह असतां शुभ जाणावे परंतु चंद्र ७, १२, ८ लग्नीं नसावा.

अशुभयोगाचें लग्न.

धनकेंद्रत्रिकोणस्थःक्षीणचंद्रोनशोभनः ॥
शत्रोर्नवांशगःखेटःखास्तसंस्थोपिनोशुभः ॥ ५७ ॥

टीका--लग्नाचे ठायीं २, १, ४, ७, १०, ५, ९ या स्थानीं कृष्णपक्षींचा चंद्र अशुभ आणि शत्रूच्या नवांशीं कोणीही ग्रह १०, ७ स्थानीं नसावेत.

आयुष्यप्रमाण.

लग्नेजीवःसुखेशुक्रोबुधःकर्मण्यरौरविः
रविजःसहजेनूनंशतायुःस्यात्तदागृहम् ॥ ५८ ॥

टीका—लग्नीं गुरु, सुहृत्स्थानीं शुक्र, १० वा बुध, ६ वा रवि, ३ रा शनि असे शुभलग्नीं घरास आरंभ केला असतां १०० वर्षें आयुष्य जाणावें.

अधिक आयुष्यप्रमाण.

भृगुर्लग्नेबुधोव्योम्निलाभेऽर्कःकेंद्रगोगुरुः ॥
यस्यारंभेचतस्यायुर्वत्सराणांशतद्वयम् ॥ ५९ ॥

टीका—लग्नीं शुक्र, बुध १० म स्थानीं, रवि ११ श स्थानीं १, ४, ७, १० या (केंद्र) स्थानीं गुरु, असे ग्रह घराच्या आरंभाचे लग्नीं आले तर आयुष्य २०० वर्षें जाणावें.

गृहायुष्यप्रमाण.

जीवोबुधोभृगुर्व्योम्निलाभगोभानुर्भूमिजौ ॥
प्रारंभेयस्यतस्यायुःसमाशीतिःसहस्त्रिया ॥ ६० ॥

टीका—मंगळाचे होऱ्यावर गेलें असतां मांजरांचें युद्ध, किंवा स्त्रीपुरुषांचा कलह, किंवा रजस्वला स्त्री, किंवा जळतें घर किंवा नपुंसक, किंवा २ कुत्रीं, अथवा नग्न ब्राह्मण भेटेल.

बुधाचा होरा.

बुधस्यहोरेशकुनश्चसर्वःस्त्रीपुत्रयुक्ताकलशस्तुपूर्णः ॥
सुचातकश्चाषगजौकुमारःपुष्पाणिनारीखलुदर्पणश्च ॥ ८ ॥

टीका—बुधाचे होऱ्यावर सर्व शकुन, पुत्रयुक्त स्त्री, कलश पाण्यानें भरलेला, चातक पक्षी व चाषपक्षी, गज, मुलगा, पुष्पें किंवा स्त्री अथवा आरसा यांतून कांहीं एक भेटेल.

गुरूचा होरा.

गुरोर्द्विजातिर्गणिकाचधेनुःस्त्रीबालयुक्तासजलोघटस्तु ॥
ऊर्णाचकाकोनकुलोबकश्चहंसस्यराजाबहवस्तुवैश्याः ॥ ९ ॥

टीका--गुरूचे होऱ्यावर ब्राह्मण, कळवंतीण, गाय, मुलासहित स्त्री, भरलेली घागर, शाल, काक, मुंगुस, बगळा हंसांचा राजा किंवा बहुत वाणी यांतून कांहीं भेटेल.

शुक्राचा होरा.

शुक्रस्यहोरेगणिकाद्विजेंद्राःकाकत्रिकंचाथनपुंसकोवा ॥
मद्यंहिमांसंगणकश्चधेनुर्धान्यंचशूद्रत्रितयंचवैश्यः ॥ १० ॥

टीका—शुक्राच्या होऱ्यावर प्रथम ब्राह्मण, कळवंतीण, तीन काक, नपुंसक, मद्य, मांस, गणक (जोशी), गाय, धान्य, वाणी, तीन शूद्र, यांतून कोणी भेटेल.

शनीचाहोरा.

पतंगसूनोर्यवनश्चनग्नोरजस्वलास्त्रीमृतकंतथैव ॥
पिशाचगृध्रोविधवाचवह्निर्नपुंसकश्चाथयुवाप्रचंडः ॥ ११ ॥

टीका—शनीच्या होऱ्यावर नग्न मुसलमान, रजस्वला स्त्री, प्रेत, पिशाच, गृध्रपक्षी, विधवा स्त्री, अग्नि, नपुंसक, तरुण बळकट असा पुरुष, यांतून कोणीतरी शकुन भेटेल; या प्रकारें शकुन जाणावे.

उत्तम प्रश्न न झाला तर.

मनूचें वाक्य ॥ ॥ गमनंप्रतिराजंस्तुसंमुखादर्शनेनच ॥
प्रशस्तांश्चेवसंभाषेत्सर्वानतांश्चकीर्तयेत् ॥ १ ॥

टीका—राजाप्रत सांगतों, हे राजा, गमनकाळीं पूर्वीं शकुन सांगितले ते. किंवा उत्तम भाषण यांचें श्रवण, दर्शन न झालें तर त्यांचें मनांत स्मरण करून गमन करावें; शुभ होय.

वारपरत्वें वस्त्रधारण.

रवौनीलंबुधेपीतंकृष्णवर्णंशनैश्वरे ॥
श्वेतंगुरौभृगौभौमेरक्तंसोमेतुचित्रकम् ॥ १ ॥

टीका—रविवारीं निळें, बुधवारीं पिंवळें, शनिवारीं काळें, गुरुवारीं व शुक्रवारीं पांढरें, मंगळवारीं तांबडें, सोमवारीं चित्र, याप्रमाणें वस्त्र धारण करून गमन करावें.

नक्षत्र तिथि वारपरत्वें दिक्शूल वर्ज्य.

पूर्वदिशा.

मूलश्रवणशाक्रेषुप्रतिपन्नवमीषुच ॥ ॥
शनौसोमेबुधेचैवपूर्वस्यांगमनंत्यजेत् ॥ १ ॥

टीका—मूळ, श्रवण, ज्येष्ठा नक्षत्रें; प्रतिपदा, नवमी तिथि; शनि, सोम बुधवार; यांवर पूर्वदिशेस गमन करूं नये.

दक्षिणदिशा.

पूर्वाभाद्रपदाश्विन्यौपंचमीचत्रयोदशी ॥
गुरुर्धनिष्ठार्द्राचैवयाम्येसप्तविवर्जयेत् ॥ २ ॥

टीका--पूर्वाभाद्रपदा, अश्विनी, आणि तिथि पंचमी, त्रयोदशी, गुरुवार, धनिष्ठा, आर्द्रा, हीं ७ दक्षिण दिशेस गमनास वर्जावीं.

पश्चिमदिशा.

रोहिण्यांचतथापुष्येषष्ठीचैवचतुर्दशी ॥
भौमार्कगुरुवारेषुनगच्छेत्पश्चिमांदिशम् ॥ ३ ॥

टीका--रोहिणी आणि पुष्य, षष्ठी, चतुर्दशी; मंगळ, रवि, गुरु, हे वार यांजवर पश्चिमदिशेस गमन वर्जावें.

उत्तरदिशा.

करेचोत्तरफाल्गुन्यांद्वितीयादशमीतथा ॥

बुधरवौभौमवारेनगच्छेदुत्तरांदिशम् ॥ ४ ॥

टीका—हस्त आणि उत्तराफाल्गुनी हीं नक्षत्रें आणि द्वितीया, दशमी या तिथि व रवि, भौम हे वार यांजवर उत्तरदिशेस गमन वर्जावें.

विदिक्शूल.

ईशान्यांज्ञेशनौशूलआग्नेय्यांगुरुसोमयोः ॥
वायव्यांभूमिपुत्रेतुनैर्ऋत्यांशुक्रसूर्ययोः ॥ ५ ॥

टीका—वारपरत्वें शूल विदिशांस असतो तर ज्या वारीं ज्या विदिशेस शूल असेल तिकडे त्या वारीं गमन वर्जावें, तें असें,—बुध आणि शनि या वारीं ईशान्य दिशेस, गुरु आणि सोम या वारीं आग्नेयेस, मंगळवारीं वायव्येस, शुक्र आणि रवि या वारीं नैर्ऋत्येस शूल असतो.

शूलदोषनिवारणार्थ पदार्थभक्षण.

सूर्यवारेघृतंपीत्वागच्छत्सोमेपयस्तथा ॥ गुडमंगारवारेतुबुध
वारेतिलानपि ॥ १ ॥ गुरुवारेदधिज्ञेयंशुक्रवारेयवानपि ॥
माषान्भुक्त्वाशनेर्वारेशूलदोषोपशांतये ॥ २ ॥

टीका—रविवारीं घृतप्राशन व सोमवारीं पयःप्राशन, मंगळवारीं गूळ आणि बुधवारीं तीळ भक्षण, गुरुवारीं दधिप्राशन, शुक्रवारीं जवभक्षण, शनिवारीं उडदांचें अन्न भक्षण करावें, असें वारपरत्वें भक्षण करून गमन करावें.

कुंभ व मीन चंद्रावर वर्ज्य कर्में.

शय्यावितानंप्रेताग्निक्रियाकाष्ठतृणार्जनम् ॥
याम्यदिग्गमनंकुर्यान्नचंद्रेकुंभमीनगे ॥ १ ॥

टीका—पलंग विणणें, प्रेताग्निकर्म, काष्ठ व तृण यांचा संग्रह आणि दक्षिणेस गमन हीं सकळ कर्में कुंभ व मीन या राशींच्या चंद्रावर वर्ज्य करावीं.

संमुख चंद्र.

करणभगणदोषंवारसंक्रांतिदोषंकुतिथिकुलिकदोषंयामयामार्द्धदोषम् ॥
कुजशनिरविदोषंराहुकेत्वादिदोषंहरतिसकलदोषंचंद्रमासंमुखस्थः ॥१॥

टीका—करण, नक्षत्र, वार, संक्रांति, कुतिथि, कुलिक, यामार्द्ध, मंगळ, शनि, रवि, राहु, केतु इत्यादि दोष संमुख चंद्र घेऊन गमन केलें असतां जातात.

दिशापरत्वें संमुखचंद्र.

मेषेचसिंहेधनपूर्वभागेवृषेचकन्यामकरेचयाम्ये ॥ तुलेचकुंभेमिथुने

प्रतीच्यांकर्कालिमीनेविधुरुत्तरस्याम् ॥ १ ॥ फळ ॥ ॥ संमुखोऽर्थ स्यलाभायदक्षिणेसुखसंपदाम्॥पृष्ठतःप्राणनाशायवामेचंद्रेधनक्षयः ॥२॥

टीका—मेष, सिंह, धन या राशीचा चंद्र पूर्वेस; वृषभ, कन्या, मकर या राशींचा चंद्र दक्षिणेस; तूळ, कुंभ, मिथुन या राशींचा चंद्र पश्चिमेस; कर्क, वृश्चिक, मीन या राशींचा चंद्र उत्तरेस असतो. फळः–दिशापरत्वें, चंद्र संमुख घेऊन गमन करावें. अर्थलाभ होईल आणि उजवेकडे घेतला तर धनसंपदाप्राप्ति, पृष्ठभागीं घेतला तर प्राणनाश होय आणि वामभागीं घेऊन गमन केलें असतां धनक्षय असें जाणावें.

काळवेळा पाहणें.

पूर्वाह्णेचोत्तरांगच्छेत्प्राच्यांमध्याह्नकेतथा ॥
दक्षिणामपराह्णेतुपश्चिमेह्यर्धरात्रके ॥ १ ॥

टीका--दिवसाचे प्रथम प्रहरीं उत्तरेस, द्वितीयप्रहरीं (मध्यान्हीं) पूर्वेस तृतीयप्रहरीं (अपराह्णीं) दक्षिणेस आणि अर्धरात्रीं पश्चिमेस गमन करावें.

दिशापरत्वें योगिनी व त्यांचीं फळें पाहणें.

प्रतिपन्नवमीपूर्वाद्वितोयादशचोत्तरे ॥ तृतीयैकादशीवह्नौचतुर्द्वादशिनैर्ऋते ॥ १ ॥ पंचत्रयोदशीयाम्येषष्ठीभूतश्चपश्चिमे ॥ सप्तमोपूर्णावायव्येअमावास्याष्टमीशिवे ॥ २ ॥ फळें ॥ पृष्ठेच्च शुभदाप्रोक्तावामेचैवविशेषतः ॥ योगिनीसाभवेन्नित्यंप्रयाणे शुभदानृणाम् ॥ ३ ॥

टीका—प्रतिपदा व नवमी ह्या तिथींस योगिनी पूर्वेस; द्वितीया, दशमी उत्तरेस; तृतीया, एकादशी आग्नेयेस; चतुर्थी, द्वादशी नैर्ऋत्येस; पंचमी, त्रयोदशी दक्षिणेस; षष्ठी चतुर्दशी पश्चिमेस; सप्तमी, पौर्णिमा वायव्येस; आणि अमावास्या, अष्टमी, ईशान्येस; याप्रमाणें योगिनी जाणाव्या. यांचें फळ,–योगिनी पृष्ठभागीं किंवा वामभागीं घेऊन नित्य गमन करावें. शुभ होय.

अथ कालपाश.

उत्तरस्यांरवेर्वारेवायौचंद्रदिनेभवेत् ॥ भौमवारेप्रतीच्यांतुनैर्ऋत्यांबुधवासरे ॥ १ ॥ यमाशायांगुरोर्वारेवह्नेर्दिशिभृगोर्दिने ॥ प्राच्यांदिशिशनेर्वारेकालःप्रोक्तोमनोषिभिः ॥ २ ॥

टीका—रविवारीं काल उत्तरेस, सोमवारीं वायव्येस, मंगळवारीं पश्चिमेस, बुध-

वारीं नैर्ऋत्येस, गुरुवारीं दक्षिणेस, शुक्रवारीं आग्नेयेस, शनिवारीं पूर्वेस, याप्रमाणें काल, दिशा व वारपरत्वें असतो असें पंडितांनीं सांगितलें. हा काळ राहुपरी वर्जावा.

काळराहु.

रविगुरुदिनपूर्वेसोमशुक्रेचयाम्येवरुणदिशितुभौमेउत्तरेसौरिसौम्ये ॥ अभिमुखउतदक्षेकालराहुर्दिशायांहरतिसकलकार्यंवामपृष्ठेऽर्थसिद्धिः ॥ १ ॥

टीका—रवि आणि गुरु या वारीं काळराहु पूर्वेस असतो. सोम, शुक्रवारीं दक्षिणेस. भौमवारीं पश्चिमेस. शनि आणि बुधवारीं उत्तरेस काळराहु असतो. तो संमुख अथवा उजवा असतां गमन केल्यास कार्याची हानि करितो व डावीकडे आणि पाठीमागें गमन केल्यास कार्यसिद्धि करितो.

क्षुधितराहु.

शक्रवायुयमेशांबुवह्निग्लौरक्षसांदिशि ॥ यामार्द्धेक्षुधितोराहुर्भ्रमत्येवंक्रमात्सदा ॥ १ ॥ नतिथिर्नचनक्षत्रंनयोगोनचचंद्रमाः ॥ सिद्ध्यंतिसर्वकार्याणियात्रायांदक्षिणेरवौ ॥ २ ॥

टीका—प्रथम यामार्द्धीं क्षुधित राहु पूर्वेस असतो. द्वितीय यामार्द्धीं वायव्येस, तृतीययाº दक्षिणेण, चतुर्थ यामाº ईशान्येस, पंचमयाº पश्चिमेस, षष्ठ याº आग्नेयेस, सप्तमयाº उत्तरेस, अष्टमयाº नैर्ऋत्येस, या प्रमाणें प्रत्यहीं भ्रमण करितो; परंतु दक्षिणभागीं रवि घेऊन गमन केलें असतां तिथि नक्षत्रादि दोष जातात.

काळ कोठें आहे तो पाहणें.

कालःपलंघातकलोहपातदावानलःखड्गकचोलकांतिकाः ॥ नखाश्चतुर्विंशतिषट्तथादिग्रुद्राधृतिर्वेदगुणाःक्रमेण ॥ १ ॥ तिथ्यायुतंवैवसुभाजितंचशेषंचकालंमुनयोवदंति ॥ २ ॥ ॥ फळ ॥ कालंचपृष्ठेपलसंमुखेचघातंचलोहंवडवाचपृष्ठे ॥ खड्गंचचाग्रे कवचंचवामेकांतिश्चयोज्यादिशिदक्षिणस्याम् ॥ ३ ॥

टीका—काळांचीं नांवें:—१ काल, २ पल, ३ घातक, ४ लोहपान, ५ वडवानळ,
२० २४ ६ १० १२
६ खड्ग, ७ कवच, ८ कांति अशीं आठ नांवें. त्यांचे खालीं अंक मांडिले आहेत ते
१८ ४ २
ज्या तिथीस गमन करावयाचें असेल ती तीथ एकेक अंकांत मिळवून आठांनीं भागून शेष जे अंक उरतील त्या दिशेस तो काळ आहे अशा क्रमानें पूर्वादि अष्ट-
दिशांस पहावें. पृष्ठभागीं काळ शुभः संमुख पल शुभ, पृष्ठभागीं घातक, लोहपात
१८

आणि वडवानळ, हे तिन्ही शुभ, अग्रभागीं खड्ग शुभ, वामभागीं कवच शुभ आणि दक्षिणभागीं कांति शुभ. अशीं दिशापरत्वें शुभ घेऊन त्या दिशेस युद्धांत अथवा यात्रादि कार्यांस गमन करावें कार्यसिद्धि होईल.

पंथाराहुचक्र.

स्युर्धर्मेदस्रपुष्योरगवसुजलपद्वीशमैत्राण्यथार्थेयाम्याजांघ्रींद्र कर्णादितिपितृपवनोडून्यथोभानिकामे ॥ वन्हचार्द्राबुध्न्यचि त्रानिर्ऋतिविधिभगाख्यानिमोक्षेऽथरोहिण्यर्यम्णाब्जेंदुविश्वां तिमर्भदिनकरर्क्षाणिपंथादिशाद्यौ ॥ १ ॥

धर्म	अश्विनी	पुष्य	अश्लेष.	विशाखा	अनुराधा	धनिष्ठा	शततारका
अर्थ	भरणी	पुनर्वसु	मघा	स्वाती	ज्येष्ठा	श्रवण	पूर्वभाद्रपदा
काम	कृत्तिका	आर्द्रा	पूर्वा	चित्रा	मूळ	अभिजित्	उत्तराभाद्र.
मोक्ष	रोहिणी	मृग	उत्तरा	हस्त	पूर्वाषाढा.	उत्तराषा.	रेवती

टीका—नक्षत्रें २८ त्यांचे भाग ४ त्यांचीं नांवें. प्रथम भाग 'धर्ममार्गाचीं नक्षत्रें ७, द्वितीय अर्थमार्गाचीं नक्षत्रें ७, तृतीय काममार्गाचीं नक्षत्रें ७ चतुर्थ मोक्षमार्गाचीं नक्षत्रें ६ या प्रमाणें चहूं मार्गांचीं नक्षत्रें जाणावीं. त्यांत एके मागाचे नक्षत्रीं सूर्य असतां चंद्र चहूं मार्गांचे नक्षत्रीं फिरेल त्यांचीं फळें सांगतों.

धर्ममार्गाचीं फळें.

धर्ममार्गेगतेसूर्येअर्थांशेचंद्रमायदि ॥
तदाशत्रुभयंतस्यज्ञेयंतुविबुधैःशुभम् ॥ १ ॥

टीका—धर्ममार्गनक्षत्रीं सूर्य असतां व अर्थमार्गनक्षत्रीं चंद्र आला असतां गमन केलें तर मार्गाचे ठायीं शत्रुभय होईल. अशुभ फळ जाणावें.

धर्ममार्गेगतेसूर्येचंद्रेतत्रैवसंस्थिते ॥
संहारश्चभवेत्तत्रभंगोहानिःप्रजायते ॥ २ ॥

टीका—धर्ममार्गनक्षत्रीं सूर्य व चंद्र हे असतां गमन केलें तर संहार आणि भंग व हानि असें प्राप्त होईल.

धर्ममार्गेगतेसूर्येकामांशेचंद्रमायदि ॥
विग्रहोदारुणश्चैवचोराकुलसमुद्भवम् ॥ ३ ॥

टीका—धर्ममार्गनक्षत्रीं सूर्य आणि काममार्गनक्षत्रीं चंद्र असे असले तर त्यांचें फळ बहुत वैर आणि चोरांचें भय हीं प्राप्त होतील.

धर्ममार्गेंगतेसूर्येचंद्रेमोक्षगतेयदि ॥
गृहलाभोभवेत्तस्यविज्ञेयोनात्रसंशयः ॥ ४ ॥

टीका--धर्ममार्गीं सूर्य आणि चंद्र मोक्षमार्गीं असले तर गृहलाभ आणि मार्गीं सुख प्राप्त होईल.

अर्थमार्गाचीं फळें.

अर्थमार्गेंगतेसूर्येचंद्रेधर्मस्थितेयदि ॥
गजलाभोभवेत्तस्यतत्रश्रीःसर्वतोमुखी ॥ १ ॥

टीका--अर्थमार्गीं सूर्य आणि चंद्र धर्ममार्गनक्षत्रीं असे असले तर गजलाभ आणि लक्ष्मीप्राप्ति व सर्वदा सुखी होईल.

अर्थमार्गेंगतेसूर्येचंद्रेतत्रैवसंस्थिते ॥
प्रथमंजायतेकार्यंतत्रभंगोभविष्यति ॥ २ ॥

टीका--अर्थमार्गीं सूर्य आणि चंद्र आले तर प्रथम कार्य होईल नंतर भंग पावेल.

अर्थमार्गेंगतेसूर्येचंद्रेकामांशसंस्थिते ॥
सर्वसिद्धिर्भवेत्तस्यजानीयान्नात्रसंशयः ॥ ३ ॥

टीका--अर्थमार्गीं सूर्य आणि काममार्गीं चंद्र आला तर सर्व कार्यसिद्धि होईल, यांत संशय नाहीं.

अर्थमार्गेंगतेसूर्येचंद्रेमोक्षस्थितेयदि ॥
भूमिलाभोभवेत्तस्यहर्षयुक्तःसुखीभवेत् ॥ ४ ॥

टीका--अर्थमार्गीं सूर्य आणि मोक्षमार्गीं चंद्र असे असले ह्मणजे भूमिलाभ, हर्षयुक्त व मार्गाच्या ठायीं सुख पावेल.

काममार्गाचीं फळें.

काममार्गेंगतेसूर्येचंद्रेधर्मेचसंस्थिते ॥
गजाश्वाश्वविलभ्यंतेराजसन्मानसंभवात् ॥ १ ॥

टीका--काममार्गीं सूर्य आणि धर्ममार्गीं चंद्र आला तर हत्ती, घोडे यांचा लाभ आणि राजाकडे सन्मान प्राप्त होईल.

काममार्गेंगतेसूर्येचंद्रेचैवार्थसंस्थिते ॥
सकलंजायतेतस्यविघ्नभंगंविनिर्दिशेत् ॥ २ ॥

टीका—काममार्गी सूर्य आणि अर्थमार्गी चंद्र आला तर सकल विघ्नें नाश पावतील आणि सर्व कार्यसिद्धि होईल.

काममार्गेगतेसूर्येचंद्रेतत्रैवसंस्थिते ॥
विग्रहंदारुणंचैवकार्यनाशंविनिर्दिशेत् ॥ ३ ॥

टीका—काममार्गी सूर्य आणि चंद्र आले तर वैर फार आणि कार्यनाश होईल.

काममार्गेगतेसूर्येचंद्रेमोक्षगतेऽपिवा ॥
राज्ञोलाभोभवेत्तस्यस्वर्णलाभंविनिर्दिशेत् ॥ ४ ॥

टीका—काममार्गी सूर्य व मोक्षमार्गी चंद्र आला तर राजापासून लाभ व सुवर्णलाभ होईल.

मोक्षमार्गाचीं फळें.

मोक्षमार्गेगतेसूर्येचंद्रेधर्मस्थितेयदि ॥
हेमलाभोभवेत्तस्यसर्वकार्यप्रसिद्ध्यति ॥ १ ॥

टीका—मोक्षमार्गी सूर्य व धर्ममार्गी चंद्र असले तर हेमलाभ व सर्वसिद्धि होईल.

मोक्षमार्गेगतेसूर्येअर्थांशेचंद्रमायदि ॥
विफलंतस्यकार्यंचचोरराजरिपोर्भयम् ॥ २ ॥

टीका—मोक्षमार्गी सूर्य व अर्थमार्गी चंद्र आहे तर राजा व रिपु यांपासून भय होईल.

मोक्षमार्गेगतेसूर्येचंद्रेकामस्थितेयदि ॥
सर्वसिद्धिमवाप्नोतिकार्येचजयमेवच ॥ ३ ॥

टीका—मोक्षमार्गी सूर्य व काममार्गी चंद्र असला तर सर्व कार्यसिद्धि व कार्यांत जय प्राप्त होईल.

मोक्षमार्गेगतेसूर्येचंद्रेतत्रैवसंस्थिते ॥
विग्रहंदारुणंचैवविघ्नस्तत्रभविष्यति ॥ ४ ॥

टीका—मोक्षमार्गी सूर्य व चंद्र आहेत तर वैर आणि नानाप्रकारें विघ्नें प्राप्त होतील.

पंथाराहूवर कर्में करावयाचीं.

यात्रायुद्धेविवाहेचप्रवेशेनगरादिषु ॥
व्यापारेषुचसर्वेषुपंथाराहुःप्रशस्यते ॥ १ ॥

टीका—यात्रेस आणि युद्धांत व विवाहास व नगरादिकांस तसेंच सर्व व्यापारांत प्रवेश करणें यांस पंथाराहु प्रशस्त होय.

गर्गादिकांचा मुहूर्त.

उषःप्रशस्यतेगर्गःशकुनंचबृहस्पतिः ॥
अंगिरामनउत्साहंविप्रवाक्यंजनार्दनः ॥ १ ॥

टीका—मागील ५ घटिका रात्र शेष उरली ह्मणजे उषःकाल होतो तो गर्गमुनीचे मतें शुभ आणि बृहस्पतीच्या मतें उत्तम शकुन शुभ. अंगिराच्या मतें मनोत्साहकाळीं शुभ आणि जनार्दनमतें विप्रवाक्यें शुभ होय.

शुभाशुभ वाहनें.

आत्मनोजन्मनक्षत्राद्दिननक्षत्रमेवच ॥ एकीकृत्वाहरेद्भागंनं दशेषेचवाहनम् ॥ १ ॥ रासभोऽश्वोगजोमेषोजंबुकःसिंह संज्ञकः॥ काकश्चैवमयूरश्चहंसइत्येववाहनम् ॥२॥ ॥ फळ ॥ रासभेह्यर्थनाशश्चधनलाभश्चवाजिनि ॥ लक्ष्मीप्राप्तिर्गजाख्ये हिमेषेचमरणंध्रुवम्॥३॥जंबुकेस्वल्पलाभश्चसर्वसिद्धिश्चसिंह के ॥ काकेचनिष्फलंकार्यंमयूरेचसुखंबहु ॥ ४ ॥ हंसेतुसर्वसि द्धिःस्याद्वाहनानांफलंस्मृतम् ॥ ५ ॥

टीका—आपले जन्मनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापावतों मोजून नवांनीं भागावें शेष उरेल तें वाहन जाणावें. शेष १ उरेल तर वाहन गाढव, त्याचें फळ अर्थनाश २ उर० वा० घोडा, फळ धनलाभ. ३ उरले तर वा० हत्ती, फ० लक्ष्मीप्राप्ति. ४ उरले तर वा० मेंढा, फ० मरण. ५ उरले तर वा० कोल्हा, फ० स्वल्पलाभ. ६ उरले तर वा० सिंह, फ० कार्य सिद्धि. ७ उरले तर वा० कावळा, फ० निष्फळ. ८ उरले तर वा० मयूर, फळ सुखप्राप्ति. ० उरलें तर वा० हंस फळ, सिद्धि. याप्रमाणें वाहनें व फळें जाणावीं.

त्र्यंकमुहूर्त व त्याचें फळ.

तिथयःपक्षगुणिताःसप्तभिर्भाजिताश्चताः ॥ वाराःस्युर्वह्नि गुणितावसुभिश्चैवभाजिताः ॥ चतुर्गण्यानिभान्यंगभाजिता नियथाक्रमम् ॥ १ ॥ पीडास्यात्प्रथमेशून्येमध्यशून्येम हद्भयम् ॥ अंत्यशून्येतुमरणंत्र्यंकेचविजयोभवेत् ॥ २ ॥

टीका—ज्या तिथीस गमन करावयाचें ती तिथी दुप्पट करून सातांनीं भागावी आणि जो वार असेल तो तिप्पट करून आठांनीं भागावा आणि नक्षत्र असेल तें चौपट करून सहांनीं भागावें, शेषांक येतील त्यांचीं फळें—प्रथम तिथीचे भागास शून्य आलें तर पीडा, द्वितीय वाराचे भागास शून्य आलें तर मोठें भय, तिसरे नक्षत्रभागास शून्य आलें तर मरण, आणि तिन्ही ठिकाणीं अंक आले ह्मणजे त्यांचे त्याणें विजय प्राप्त होय.

भ्रमणाडळ मुहूर्त.

सूर्यभाद्गणयेच्चांद्रंसप्तभिर्भागमाहरेत् ॥ त्रिषट्कभ्रमणंचैवद्वि सप्तमहदाडलम् ॥ १ ॥ प्रथमंपंचचत्वारिह्याडलोनास्तिनि श्चितम् ॥ आडलेताडनंप्रोक्तंभ्रमणेकार्यनाशनम् ॥ २ ॥

टीका—सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापावेतों गणावें आणि सातांनीं भागावें, शेष ३ अथवा ६ उरले तर त्या दिवशीं भ्रमण आहे, कार्यनाश जाणावा. २ अथवा ७ उरले तर आडळ आहे तें गमनास वर्ज्य, ताडण करण्यास उक्त. १, ५ अथवा ४ उरले तर आडळ नाहीं गमनास उक्त जाणावें.

हैवर मुहूर्त.

सूर्यभाद्गणयेच्चांद्रंपक्षादितिथिवारयुक् ॥
नवभिस्तुहरेद्भागंसप्तशेषंतुहैवरम् ॥ १ ॥

टीका—सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापावेतों मोजावें; त्यांत पक्ष, तिथि, वार, मिळवून ९ नीं भागावें; शेष ७ उरले तर हैवर मुहूर्त आहे तो गमनास शुभ होय.

घबाड मुहूर्त.

सूर्यभाद्गणयेच्चांद्रंत्रिगुणंतिथिमिश्रितम् ॥
नवभिस्तुहरेद्भागंत्रिशेषेस्याद्घबाडकम् ॥ १ ॥

टीका—सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापावेतों गणून त्रिगुणित करून चालती तिथि आंत मिळवून ९ नीं भागावें, ३ शेष उरले तर घबाड मुहूर्त जाणावा तो प्रयाणास उक्त.

वारपरत्वें स्वरशकुन.

गुरौशनौरवौभौमेशुभौवैदक्षिणःस्वरः ॥ अन्यवारेषुवामस्तुस्व रश्चैवशुभःस्मृतः ॥१॥ निर्गमेवामतःश्रेष्ठःप्रवेशेदक्षिणःशुभः ॥ यःस्वरःसचनासाग्रेयोगिनांमतमीदृशम् ॥ २ ॥

टीका—गुरु, शनि, रवि, भौम या चोहोंवारीं आपले नासिकेचा दक्षिण स्वर वहात असतां गृहांत प्रवेश करावा. आणि चंद्र, बुध, शुक्र या तिहींवारीं वामस्वर वहात असतां निर्गमास श्रेष्ठ असें योग्याचें मत आहे असें जाणावें.

वारपरत्वें छायाशकुन.

अष्टौपादाबुधेस्युर्नवधरणिसुतेसप्तजीवेपदानिज्ञेयंचैकादशार्के शनिशशिभृगुषुप्रोक्तमर्थंचतुष्कम् ॥ तस्मिन्कालेमुहूर्तेसकलगुणयुतेकार्यसिद्धिः शुभोक्तानास्मिन्पंचांगशुद्धिर्नखलुशशिबलं भाषितंगर्गमुख्यैः ॥ १ ॥

टीका—आठ पावलें आपली छाया आली ह्मणजे बुधवारीं गमन करावें. नऊ पावलें आली ह्मणजे मंगळवारीं. सात पावलें गुरुवारीं. रवि, शनि, सोम, शुक्र या चोहोंवारीं ११ पावलें आपली छाया आली ह्मणजे गमन करावें. हा मुहूर्त सकलगुणयुक्त सर्वकार्यसिद्धिकर्ता आहे असें गर्गादि मुनींनीं सांगितलें आहे.

काकशब्दशकुन.

काकस्यवचनंश्रुत्वापादच्छायांतुकारयेत् ॥ त्रयोदशयुतांकृत्वाषड्भिर्भागमाहरेत् ॥ १ ॥ फळ ॥ ॥ लाभःखेदस्तथासौख्यंभोजनंचधनागमः॥अशुभंचक्रमेणैवगर्गस्यवचनंतथा ॥ २ ॥

टीका—काकशब्द ऐकून आपली छाया पादेंकरून मोजून त्यांत १३ मिळवावे आणि ६ नीं भागावें शेष राहील त्याचें फळः—१ उरेल तर लाभ, २ उरतील तर खेद; ३ उरले तर सौख्य, ४ उरले तर भोजन, ५ उरले तर धनलाभ, शून्य आलें तर अशुभ जाणावें याप्रमाणें गर्गवचन प्रमाण आहे.

पिंगलाशब्दशकुन.

उल्हासःकिल्बिलेचैवचिल्पिल्याभोजनंतथा ॥
बंधनंखिटोखिट्टीस्यात्कुकुर्शब्दैर्महद्भयम् ॥ १ ॥

टीका—किल्बिल शब्द झाला तर उल्हास होय. आणि चिल्पिल शब्द झाला असतां भोजन प्राप्त होय, खिटखिट शब्द झाला तर बंधन होय आणि कुर्कुर शब्द झाला तर महाभय असें जाणावें.

शिंकापरत्वें पादछायाशकुन.

बुधैश्छिंकारवंश्रुत्वापादच्छायांचकारयेत् ॥ त्रयोदशयुतांकृत्वा

चाष्टभिर्भागमाहरेत् ॥ १ ॥ फळ ॥ लाभःसिद्धिर्हानिशोकौ भयंश्रीर्दुःखनिष्फले ॥ क्रमेणैवंफलंज्ञेयंगर्गेणचयथोदितम् ॥ २ ॥

टीका—शिंकाशब्द ऐकून आपली छाया पादंकरून मोजून त्यांत १३ मिळवून ८ नीं भागावें. शेष राहील त्याचें फळः—१ उरेल तर लाभ, २ उरले तर सिद्धि, ३ उरले तर हानि, ४ उरले तर शोक, ५ उरले तर भय, ६ उरले तर लक्ष्मी, ७ उरले तर दुःख, शून्य असल्यास निष्फळ असें गर्गमुनि सांगतात.

शिंकाशकुन.

छिक्काप्रश्नंप्रवक्ष्यामिपूर्वस्यामशुभंफलम् ॥ आग्नेय्यांशोकदुःखं स्यादरिष्टंदक्षिणेतथा ॥ १ ॥ नैर्ऋत्यांचशुभंप्रोक्तंपश्चिमेमिष्टभ क्षणम् ॥ वायव्येधनलाभस्तुह्युत्तरेकलहस्तथा ॥ २ ॥ ईशान्यां चशुभंज्ञेयमात्मछिक्कामहद्भयम् ॥ उर्ध्वेचैवशुभंज्ञेयंमध्येचैवमह द्भयम् ॥ ३ ॥ आसनेशयनेचैवदानेचैवतुभोजने ॥ वामांगेपृष्ठ तश्चैवषट्छिक्काश्चशुभावहः ॥ ४ ॥

टीका—दिशापरत्वें पूर्वेची शिंका अशुभ; आग्नेयेची शोक व दुःखकारक दक्षिणेची अरिष्टकारिणी; नैर्ऋत्येची शुभ; पश्चिमेची मिष्टान्न भक्षण देणारी, वायव्येची धनदायक, उत्तरेची कलहकारिणी, ईशान्येची शुभकारक, आत्मशिंकेचें मोठें भय; ऊर्ध्वे झाली तर शुभ; मध्यें झाली तर मोठें भय; आसनावर, शयनस्थानावर, दान देतां किंवा भोजन करितां अथवा वामभागीं किंवा पृष्ठभागीं ह्या सहा स्थानांची शुभ होय.

पल्लीशब्दशकुन.

वित्तंब्रह्मणिकार्यसिद्धिमतुलांशक्रेहुताशेभयंयाम्येमित्रवधःक्षय श्चनिर्ऋतेर्लाभःसमुद्रालये ॥ वायव्यांवरमिष्टमन्नमशनंसौम्येर्थ लाभस्तथाईशानेगृहगोधिकार्यमतुलंसर्वत्रभूमौभयम् ॥ १ ॥

टीका—पल्लीशब्दाचें दिशापरत्वें फळः—ऊर्ध्व दिशेस द्रव्यप्राप्ति; पूर्वेस कार्यसिद्धि; आग्नेयीस भय; दक्षिणेस मित्रवध; नैर्ऋत्येस क्षय; पश्चिमेस लाभ; वायव्येस मिष्टान्न भोजन, उत्तरेस लाभ; ईशान्येस कार्यसिद्धि; भूमीवर शब्द झाल्यास भय याप्रमाणें फळ जाणावें.

पल्लीपतन व सरटारोहणफळ.

राज्यंदशिरसिज्ञेयंललाटेबंधुदर्शनम् ॥ भूमध्येराजसन्मानसुत्तरो

ष्ठेधनक्षयम् ॥१॥ अधरोष्ठेधनैश्वर्यंनासांतेव्याधिपीडनम्॥आयु
ष्यंदक्षिणेकर्णेबहुलाभस्तुवामके ॥ २ ॥ अक्ष्णोस्तुबंधनंज्ञेयंमु
जेभूपतितुल्यता ॥ राजक्षोभंतथावामेकंठेशत्रुविनाशनम् ॥ ३॥
स्तनद्वयेचदुर्भाग्यमुदरेमंडनंशुभम् ॥ प्रज्ञानाशःपृष्ठदेशेजानुजंघे
शुभावहम् ॥४॥ करद्वयेवस्त्रलाभःस्कंधयोर्विजयीभवेत् ॥ नाभौ
बहुधनंप्रोक्तमूर्वोश्चवहयादिकम् ॥५॥ दक्षिणेमणिबंधेचधनस्ता
पंधनक्षयम् ॥ मणिबंधेतथावामेकीर्तिवृद्धिधनप्रदम् ॥६॥ नखे
षुधान्यलाभंचवक्त्रेमिष्टान्नभोजनम् ॥ गुल्फयोर्बंधनंज्ञेयंकेशांते
मरणंध्रुवम् ॥७॥ अध्वातुदक्षिणेपादेवामेबंधुविनाशनम् ॥ स्त्री
नाशःस्यात्पादमध्येपादांतेमरणंभवेत् ॥ ८ ॥ पल्ल्याःप्रपतनेज्ञे
यंसरठस्याधिरोहणे ॥ यात्रोद्युक्तमनुष्यस्यैतच्छुभाशुभसूचकम्
॥ ९ ॥ तिलमाषादिदानंचस्नात्वादेयंद्विजन्मने ॥ पिनाकिनं
नमस्कृत्यजपेन्मंत्रंषडक्षरम् ॥ १० ॥ शतंसहस्रमथवासर्वदोष
निबर्हणम् ॥ शिवालयेप्रदद्याद्वैदीपंदोषोपशांतये ॥ ११ ॥

टीका--मनुष्य गमनास उद्युक्त होत्साता अंगावर पल्लीपतन अथवा सरठारोहण झालें तर शुभाशुभसूचक स्थानपरत्वें फळें सांगतो.

शरीरस्थानपरत्वें शुभाशुभ फळें.

१ शीर्ष, राज्यप्राप्ति.	११ वामबाहु, राजक्षोभ.	२२ उजवामणिबंध, धनक्षय.
२ कपाळ, बंधुदर्शन.	१२ कंठ, शत्रुभय.	२३ डावा मणिबंध, कीर्ति धनप्रद.
३ भिंवया राजसंन्मान.	१३ स्तन, दुर्भाग्य.	२४ नखें, धान्यलाभ.
४ वरील ओंठ, धनक्षय.	१४ उदर, शुभमंडण.	२५ मुख, मिष्टान्नभोजन.
५ खालचा ओंठ धनैश्वर्य प्राप्त.	१५ पृष्ठी, बुद्धिनाश.	२६ गुल्फ बंधन.
६ नासिकांतीं, व्याधिपीडा.	१६ ढोंपर, शुभ.	२७ केश मरण.
७ उजवा कान, आयुष्य.	१७ पोटऱ्या, शुभ.	२८ दक्षिणपाद, मार्गचालणें.
८ डावा कान, बहुतलाभ.	१८ दोन्हीहात, वस्त्रलाभ.	२९ वामपाद, बंधुनाश.
९ नेत्र, बंधन.	१९ स्कंध (खांदा), विजय.	३० पायांचामध्य, स्त्रीनाश.
१० बाहुद० राजाप्रमाणें.	२० नाभी, बहुधन.	३१ पादाचा अंत, मरण.
	२१ मांड्या, घोडावाहन.	

पाल अंगावर पडली असतां व सरडा चढला असतां सचैल स्नान करून तीळ व उडीद

यांचीं दानें ब्राह्मणांस द्यावीं. सांबास नमस्कार करून शिवमंत्राचा ११०० जप करावा आणि शिवालयांत जाऊन दीप लावावा म्हणजे दोष जातो.

अंगस्फुरणाविषयीं मनुमत्स्यसंवाद.

॥ मनुरुवाच ॥ ॥ ब्रूहिमेत्वंनिमित्तानिह्यशुभानिशुभानिच ॥ सर्वधर्मभृतांश्रेष्ठत्वंहिसर्वंविबुद्धचसे ॥१॥ अंगानांस्पंदनंचैवशु भाशुभविचेष्टितम्॥तन्मेविस्तरतोब्रूहियेनस्यात्तद्विधंभुवि ॥२॥

टीका—मनु मत्स्याप्रत प्रश्न करितो, हे धर्मश्रेष्ठा ! अंगस्फुरणाविषयीं निमित्तें शुभसूचक व अशुभसूचक कोणतीं आहेत तीं विस्तारेंकरून सांग. तीं अशीं कीं, लोकांमध्यें तसा अनुभव यावा, कारण तूं सर्वज्ञ आहेस.

॥ मत्स्यउवाच ॥ अंगस्यदक्षिणेभागेप्रशस्तंस्फुरणंभवेत् ॥ अप्रशस्तंतथापृष्ठेहृदयेचतथैवच ॥ ३ ॥ पृथ्वीलाभोभवेन्मूर्ध्नि ललाटेरविनंदन ॥ स्थानंविवृद्धिमायातिभ्रूनसोः प्रियसंगमः ॥ ४ ॥ भृत्यलब्धिश्चाक्षिदेशेदृगुपातेधनागमः ॥ उत्कंठोपगमे मध्येदृष्टंराज्यंविचक्षणैः ॥ ५ ॥ दृग्बंधनेसंगरेचजयः शीघ्रमवाप्नुयात् ॥ योषिल्लाभोपांगदेशेश्रवणांतेप्रियश्रुतिः ॥६॥ नासिकायांप्रीतिसौख्यंप्रियाप्तिरधरोष्ठयो ॥ कंठेतुभोगलाभःस्याद्भोगवृद्धिरथांसयोः ॥७॥ सुहृत्स्नेहश्चबाहुभ्यांहस्तेचैवधनागमः ॥ पृष्ठेपराजयोत्सेधोजयोवक्षःस्थलेभवेत् ॥ ८ ॥ कुक्षिभ्यांप्रीतिरुद्दिष्टास्त्रियाःप्रजननंभगे ॥ स्थानभ्रंशोनाभिदेशेआंत्रेचैवधनागमः ॥ ९ ॥ जानुसंधौपरैःसंधिर्बलवद्भिर्भवेन्नृप ॥ दशैकदेशे नाथोऽयंजंघाभ्यांरविनंदन ॥ १० ॥ उत्तमस्थानमाप्नोतिपद्भ्यांप्रस्फुरणेनृप ॥ अलाभंचाध्वगमनंभवेत्पादतलेनृप ॥ ११ ॥

टीका—मत्स्य सांगतो, हे सूर्यपुत्रा ! अंगस्फुरण दक्षिणभागीं शुभ, वामभागीं तसेंच पृष्ठभागीं आणि हृदयभागीं अशुभ जाणावें, याप्रमाणें मूर्द्धादिस्थानीं फळें खालीं लिहिल्याप्रमाणें जाणावीं.

स्थानें व फळें.

१ मस्तकस्फुरण, पृथ्वीलाभ.
२ ललाट, स्थानाची वृद्धि.
३ भिवयांचा मध्य, मित्राची भेट.
४ नेत्राजवळ, चाकर मिळतील.
५ पापण्यास्फुरण, धनप्राप्ति.
६ कंठमध्य, राज्यप्राप्ति.

७ दृग्बंधन, युद्धांत जाणें होईल जय.	१७ ऊरु, जयप्राप्ति.
८ अपांगदेश, स्त्रीलाभ.	१८ कुक्षि, प्रीति.
९ कर्ण, प्रीतीचीं भाषणें ऐकूं येतील.	१९ शिश्न, स्त्रिया प्राप्त.
१० नासिका, प्रीति आणि सौख्य प्राप्त हो.	२० नाभि, स्थानभ्रंश.
११ अधरोष्ठ, प्रियकर वस्तु प्राप्त होईल.	२१ आंतडीं, धनप्राप्ति.
१२ कंठ, ऐश्वर्यप्राप्ति.	२२ { ढोंपेसंधी / उपसंधी } बलवान्शत्रूशीं संधिहो.
१३ खांदे, भोगवृद्धि प्राप्त होईल.	
१४ दोन्ही बाहु, सुहृत् स्नेही भेटतील.	२३ पोटऱ्या, एके देशचा स्वामी हो.
१५ दोन्ही हात, धनप्राप्ति.	२४ पाय, उत्तमस्थानीं मान्यता होईल.
१६ पृष्ठ (पाठ), दुसऱ्यापासून जय हो.	२५ पायांचे तळवे, गमन होय.

याप्रमाणें स्थानांचीं फळें जाणावीं.

स्त्रियांचें अंगस्फुरण.

लांछनंपीठकेचैवज्ञेयःस्फुरणवत्तथा ॥ विपर्ययेणविहितःसर्वस्त्रीणांविपर्ययः ॥ १ ॥ दक्षिणेविप्रशस्तेंगप्रशस्तंस्याद्विशेषतः ॥

टीका—स्त्रियांचें अंगस्फुरण, भिवयांमध्यें गोंधलें काढितात तें स्थान शुभ. तशींच हीं सर्व मागें स्फुरणस्थानें सांगितलीं तींच स्थानें स्त्रियांस विपरीत धरून सांगावीं स्त्रियांचें वामांग शुभ आहे.

अंगस्फुरणोद्भूतंरिष्टंसकलंविनाशयतिसद्यः ॥
द्विजंतर्पणमथवाकांचनदानंद्विजायभूमिपते ॥ २ ॥

टीका—हे राजा ! अनिष्ट फळांचे निवारणार्थ ब्राह्मणसंतर्पण व सुवर्णदान करावें; ह्मणजे दोषपरिहार होतात.

नेत्रस्फुरण.


नेत्रस्योर्ध्वेहरतिसकलंमानसंदुःखजालंनेत्रोपांते दिशतिचधनंनासिकांतेचमृत्युम् ॥ नेत्रस्याधःस्फुरणमसकृत्संगरेभंगहेतुर्वामेचैतत्फलमविफलंदक्षिणेवैपरीत्यम् ॥ १ ॥

टीका—नेत्रांचीं ऊर्ध्वप्रांतादि स्थानें स्फुरण होतात त्यांचीं फळें सांगतों. नेत्रांच्या वरील पापण्या स्फुरण झाल्या तर मनाचें दुःख जाईल आणि धन प्राप्ति होईल. नासिकेजवळची स्फुरण झाली तर मृत्यु. अधरप्रांत स्फुरण झाला तर युद्धांत अपजय. हीं सर्व फळें वामनेत्राचीं घ्यावीं. दक्षिण नेत्राचीं विफळ आणि स्त्रियांचीं दक्षिण नेत्राचीं घ्यावीं. वामनेत्राचीं विफळ जाणावीं.

त्रिशूळयंत्र.

रोगेकुजर्क्षतश्चांद्रंगमनेऽर्क्षतस्तथा ॥ अन्यस्मिञ्छुभकार्ये तुसूर्यर्क्षाद्गणयेत्सुधीः ॥१॥ युद्धेतुचंद्रनक्षत्राद्दविभंगणयेत्तथा ॥ त्रिशूलयंत्रतोज्ञेयंफलमेतच्छुभाशुभम् ॥ २ ॥

टीका—रोग्याचे प्रश्नास त्रिशूळ मध्यार्थी, मंगळ ज्या नक्षत्रीं असेल तें घ्यावें आणि चंद्र ज्या स्थानीं यंत्रांत येईल तें फळ घ्यावें. ह्या क्रमानें पुढील क्रम जाणावा. युद्धांत जाणें तर दिननक्षत्रापासून सूर्यनक्षत्रापावेतों आणि गमन करणें तर कृत्तिकांपासून दिवसनक्षत्रापावेतों आणि अन्य कर्मांस सूर्यनक्षत्रापासून दिननक्षत्रापावेतों असा क्रम जाणावा.



त्रिशूलाग्रेभवेन्मृत्युर्मध्यमंबहिरष्टकम् ॥ लाभंक्षेमंजयारोग्यमंतर्गर्भेषुसंमतम् ॥ ३ ॥

टीका—त्रिशूल अग्रभागीं दिननक्षत्र आलें तर मृत्यु, आणि बाहेरील अष्टकांत आलें तर मध्यम, मध्याष्टकांत आलें तर लाभ, क्षेम, जय व आरोग्य हें सर्वसंमत जाणावें.

गमनास लग्नें.

चरलग्नेप्रयातव्यंद्विःस्वभावेतथानरैः ॥ लग्नेस्थिरेनगंतव्यंयात्रायांक्षेममीप्सुभिः ॥ १ ॥

टीका----चर म्हणजे मेष, कर्क, तूळ, मकर हीं ४ लग्नें आणि द्विःस्वभाव म्हणजे

अष्टमस्थानाचें फळ.

क्रूराश्चसर्वेयदिलग्नकालेमृत्युस्थितामृत्युकराभवंति ॥
सौम्योगुरुर्वाभृगुनंदनश्चदीर्घायुषंमृत्युकरश्चचंद्रः ॥ १० ॥

टीका—क्रूर ह्मणजे शनि, रवि, भौम, राहु, केतु, यांतून १ ग्रह अष्टमस्थानीं असतां मृत्युकारक आणि हे नसतां सौम्य ग्रह असले तर आयुष्याची वृद्धि होते. परंतु चंद्र मात्र या स्थानीं नसावा तो मृत्युकारक होय.

नवमस्थानाचें फळ.

धर्मस्थितायदिभवंतिहिपापखेटाःप्रयाणकालेचतथैवचंद्रमाः ॥
तदाजयंवैसबलेचचंद्रेमासत्रयेणापिदिनैश्चतुर्भिः ॥ ११ ॥

टीका—नवमस्थानीं पापग्रह व चंद्र असतां उक्त; परंतु चंद्रबळ असावें ह्मणजे ३ मासांत किंवा ४ दिवसांत कार्यसिद्धि होईल.

धर्मस्थितौवायदिजीवशुक्रौसोमस्यसूनुर्यदिलग्नकाले ॥
लग्नेचरेवायदिवास्थिरेवाकार्यस्यसिद्धिश्चभवेच्चलाभः ॥ १२ ॥

टीका—नवमस्थानीं गुरु, शुक्र, असतां अथवा सोम, बुध हे चरलग्नस्थित अथवा स्थिरलग्नीं असतां कार्यसिद्धि होईल.

कर्मस्थानाचें फळ.

कर्मस्थिताःपापखगास्तुसौम्याःकुर्वंतिकार्यंशनिवर्जिताश्च ॥
लग्नेचरेवायदिवास्थिरेवामासत्रयेणापिचचैकमासतः ॥ १३ ॥

टीका—दशमस्थानीं चरलग्नीं अथवा स्थिरलग्नीं शनिखेरीज पापग्रह अथवा सौम्य असतां एक मासांत अथवा ३ मासांनीं कार्यसिद्धि होईल.

लाभस्थानाचें फळ.

लाभस्थितौगुरुबुधौभृगुनंदनोवाक्रूराश्चसर्वेशशिनैवयुक्ताः ॥
सद्यःफलाप्तिश्चभवेद्धियात्रापक्षैकमध्येदिवसत्रयेच ॥ १४ ॥

टीका—एकादशस्थानीं रवि आदिकरून पापग्रह चंद्रसहित अथवा गुरु आदिकरून सौम्यग्रह असतां ३ दिवसांत अथवा पक्षामध्यें कार्यसिद्धि होईल.

व्ययस्थानाचें फळ.

सर्वेशुभाद्वादशसंस्थिताश्चयात्राभवेत्तत्रविचित्रलाभः ॥
पापाश्चसर्वेव्ययदाभवंतियात्राफलंगर्गमुनिप्रणीतम् ॥ १५ ॥

टीका—सर्व शुभग्रह द्वादशस्थानीं असतां गमन केल्यानें विचित्र लाभ होतो व पापग्रह द्वादशस्थानीं असतां यात्रा केल्यानें नाश होतो; याप्रमाणें गर्गमुनीनें सांगितलें आहे.

सुमुहूर्तीं निघणें न होईल तर प्रस्थान करावें.

यज्ञोपवीतकंशस्त्रंमधुचस्थापयेत्फलम् ॥
विप्रादिक्रमतःसर्वस्वर्णधान्यांबरादिकम् ॥ १ ॥

टीका—सुमुहूर्तावर गमन करण्याचा अभाव आहे तर प्रस्थानीं वस्तु ठेवणें त्या वर्णपरत्वें सांगतों. ब्राह्मणास यज्ञोपवीत, क्षत्रियास शस्त्र, वैश्यास मधु आणि शूद्रास फळ; या क्रमानें जाणावें. आणि सर्वांस स्वर्ण, धान्य, वस्त्र हीं उक्त होत.

प्रस्थान किती दिवस उपयोगीं पडतें.

राजदशाहंपंचाहमन्योहिप्रस्थितोभवेत् ॥
अंगप्रस्थानकेपूर्णवस्तुप्रस्थानकेऽर्द्धकम् ॥ २ ॥

टीका— राजांनीं प्रस्थान ठेविल्यावर १० दिवस, अन्यांस ५ दिवस. तो मुहूर्त उपयोगीं पडतो; परंतु वस्तुप्रस्थानीं अर्धे फळ जाणावें. अंगप्रस्थानीं संपूर्ण फळ.

प्रस्थान किती दूर ठेवावें त्याचें प्रमाण.

गेहाद्गेहांतरंगर्गःसीम्नःसीमांतरंभृगुः ॥ बाणक्षेपंभरद्वाजोवसिष्ठोनगराद्बहिः ॥ प्रस्थानेऽपिकृतेनोऽयान्महादोषान्वितेदिने ॥ ३ ॥

टीका—प्रस्थान ठेवणें तें गर्गाचे मतीं दुसऱ्याचे घरीं; भृगुचे मतीं सीमेचे अंतीं; भरद्वाजाचे मतीं बाण मारावा तो पडेल इतकें लांब ठेवावें; आणि वसिष्ठाचे मतीं नगराचे बाहेर ठेवावें. प्रस्थान केल्यावर महान् दोषयुक्त दिवस आहे तर त्या दिवशीं जाऊं नये.

प्रस्थानदिवशीं वर्ज्य.

क्रोधक्षौररतिश्रमामिषगुडद्यूताश्रुदुग्धासवक्षाराभ्यंगभयासितांबरवमिस्तैलंकटूञ्झेद्रमे ॥ क्षीरक्षौररतीःक्रमात्रिशरसप्ताहंपरंतद्धिनेरोगंरुयातवकंसितान्यतिलकंप्रस्थानकेऽपीतिच ॥ ४ ॥

टीका—कोप, क्षौर, स्त्रीसंग, आयास, मांस, गुड, द्यूत, रोदन, दुग्ध, मद्य, क्षार, अभ्यंग, अन्यविषयक भीति, शुभ्र खेरीजकरून वस्त्र, वमन, तैल, तिखट इतकें प्रस्थान ठेविल्यावर वर्जावें. त्यांत दुग्ध, क्षौर, स्त्रीसंग, हे क्रमानें ३, ५, ७, दिवसपर्यंत

चरादि त्रयोदश योग.

॥ चरयोग ॥ ॥ रवौपूषागुरौपुष्यःशनौमूलंभृगौमघा ॥ सौम्ये ब्राह्मंविशाभौमेचन्द्रेर्द्राचरयोगकः ॥ १ ॥ क्रकचयोग ॥ ॥ रवौतुद्वादशीप्रोक्ताभौमेचदशमीतथा ॥ चन्द्रेचैकादशीप्रोक्ता नवमीबुधवासरे ॥ २ ॥ शुक्रेचसप्तमीज्ञेयाशनौचैवतुषष्ठिका ॥ गुरौचाष्टमिकाज्ञेयोयोगस्तुक्रकचोबुधैः ॥ ३ ॥ दग्धयोग ॥ ॥ बुधतृतीयाकुजपंचमीचषष्ठीगुरावष्टमीशुक्रवारे ॥ एकादशीसोमशनिर्नवम्यांद्वादश्यमर्कामितिदग्धयोगः ॥ ४ ॥ मृत्युदा ॥ ॥ रवौभौमेभवेन्नंदाभद्राजीवशशांकयोः ॥ जयाशुक्रेबुधेरिक्ताशनौपूर्णाचमृत्युदा ॥ ५ ॥ ॥ सिद्धियोग ॥ ॥ शुक्रेनंदाबुधेभद्राजयाभौमेप्रकीर्तिता ॥ शनौरिक्तागुरौपूर्णा सिद्धियोगाउदाहृताः ॥ ६ ॥ ॥ उत्पातादियोगाः ॥ ॥ विशाखादिचतुष्केतुभास्करादिक्रमेणतु ॥ ॥ उत्पातमृत्युकालाख्यसिद्धियोगाःप्रकीर्तिताः ॥ ७ ॥ ॥ यमदंष्ट्रयोग ॥ मघाधनिष्ठासूर्येतुचंद्रेमूलविशाखके ॥ कृत्तिकाभरणीभौमे सौम्यपूषापुनर्वसुः ॥ ८ ॥ गुरौपूषाश्विनीशुक्रेरोहिणीचानुराधका ॥ शनौविष्णुःशतभिषग्यमदंष्ट्रःप्रकीर्तितः ॥ ९ ॥ ॥ यमघंटयोग ॥ ॥ रवौमघाबुधेमूलंगुरौचैवचकृत्तिका ॥ भौमेचार्द्राशनौहस्तःशुक्रेचैवतुरोहिणी ॥ १० ॥ चंद्रेविशाखायोगोयंयमघंटः प्रकीर्तितः ॥ ॥ मुसलवज्रयोग ॥ ॥ चंद्रेचित्राभृगोर्ज्येष्ठाशनौचैवतुरेवती ॥ चांद्रजतुधनिष्ठोक्तारवौतुभरणीतथा ॥ ११ ॥ उषाश्चैवतुभौमेचगुरौचैवोत्तरातथा ॥ अयंमुसलवज्राख्ययोगोवर्ज्यःशुभेबुधैः ॥ १२ ॥ अमृतसिद्धियोग ॥ ॥ आदित्यहस्तेगुरुपुष्ययोगेबुधानुराधाशनिरोहिणीच ॥ सोमेच विष्णुर्भृगुरेवतीचभौमाश्विनीचामृतसिद्धियोगः ॥ १३ ॥

टीका—चरयोगादि त्रयोदश योग आणि वार सात असे पुढील कोष्टकांत अ त्यांत ज्या वारीं नक्षत्र किंवा तिथि येईल तो योग त्या दिवशीं जाणावा.

	योगांची नांवें	रविवार	सोमवार	भौमवार	बुधवार	गुरुवार	शुक्रवार	शनिवार
१	चरयोग	पूर्वाषा.	आर्द्रा	विशाखा	रोहिणी	पुष्य		मूळ
२	क्रकचयोग	१२ तिथि	११ ति.	१० ति.	९ ति.	८ ति०	७ ति.	६ ति.
३	दग्धयोग	१२ ति	११ ति.	५ ति.	३ ति.	६ ति.	८ ति.	९ ति.
४	मृत्युयोग	[illegible] ति.	३ ति.	[illegible] ति.	[illegible] ति.	[illegible] ति.	[illegible] ति.	[illegible] ति.
५	सिद्धियोग	० ति.	० ति	ति.	[illegible] ति.	[illegible] ति.	[illegible] ति.	[illegible] ति.
६	उत्पत्तियोग	विशाखा	पूर्वा	धनिष्ठा.	रेवती	रोहिणी	पुष्य	उत्तरा
७	मृत्युयोग	अनुराधा	उत्तरा	शततार.	अश्विनी	मृगशीर्ष	आश्लेषा	हस्त
८	कालाख्ययोग	ज्येष्ठा	अभिजि	पूर्वाभाद्र.	भरणी	आर्द्रा	मघा	[illegible]
९	सिद्धियोग	मूळ	श्रवण	उत्त. भा.	कृत्तिका	पुनर्वसु	[illegible]	स्वाती
१०	यमदंष्ट्रयोग	मघा	मूळ	कृत्तिका.	पूर्वाषा.	उत्त. षा.	रोहिणी	श्रवण
		धनिष्ठा	विशाखा	रोहिणी	पुनर्वसु	अश्विनी	अनुराधा	शततार.
११	यमघंटयोग	मघा	विशाखा	मृग	मूळ	कृत्तिका	रोहिणी	हस्त
१२	मुसलवज्राख्य.	भरणी	चित्रा	उत्त. षा.	धनिष्ठा	उत्तरा	ज्येष्ठा	रेवती
१३	अमृतसिद्धियो.	हस्त	श्रवण	अश्विनी	अनुराधा	पुष्य	रेवती	रोहिणी

दास व दासी ठेवण्यास मुहूर्त.

॥ दासचक्र ॥ ॥ नराकारंलिखेच्चक्रंसर्वार्थंभृत्यसंग्रहे ॥ शीर्षेत्रीण्यर्थलाभःस्यान्मुखेत्रीणिविनाशनम् ॥ १ ॥ हृदिपंचधनंधान्यंपादेषट्कंदरिद्रता ॥ पृष्ठेद्वेप्राणसंदेहोनाभौवेदाःशुभावहम् ॥ ॥ २ ॥ गुदेद्वेभयपीडाचदक्षहस्तैकमर्थकम् ॥ एकंवामेनाशकरं भृत्यभात्स्वामिभांतकम् ॥ ३ ॥

टीका—नराकार चक्र काढून त्याचे मस्तकापासून अवयवस्थानीं नक्षत्रें द्यावयाचीं त्यांचा क्रम. दासाचे जन्मनक्षत्रापासून स्वामीचे जन्मनक्षत्रापावेतों प्रथम शीर्षावर ३ अर्थलाभ. मुखावर ३ नाश. हृदयावर ५ धनधान्यसमृद्धि. पायांवर ६ दरिद्र. पृष्ठीवर २ मृत्यु. नाभीवर ४ शुभ. गुदावर २ भय, पीडा. उजवे हातावर १ अर्थप्राप्ति आणि नवमस्थान डाव्या हातावर १ नाश.

दासीचक्र.

दासीचक्रंप्रवक्ष्यामिदासीभात्स्वामिभांतकम् ॥ शीर्षेत्रीणिमुखे त्रीणिस्कंधयोश्चद्वयंस्मृतम् ॥१॥ हृदयेपंचऋक्षाणिनाभौपंचक भंगे ॥ जानुद्वयेद्वयंशेयंपादयोश्चत्रयंत्रयम् ॥ २ ॥ ॥ फल ॥

निर्धनक्षयः ॥ कंठेचराजसन्मानोमध्येछत्रपतिर्भवेत् ॥ शिखरे कीर्तिवृद्धिश्चजन्मभात्सूर्यभांतकम् ॥ ३ ॥

टीका--तिन्ही उत्तरा, रोहिणी, आर्द्रा, पुष्य, शततारका, धनिष्ठा, श्र० हीं नक्षत्रें शुभ होत. परंतु आपले जन्मनक्षत्रापासून सूर्यनक्षत्रापर्यंत घ्यावयाचा क्रम-प्रथम मूळावर ३ जीवनाश, दांड्यावर ७ हानि व धनक्षय, कंठावर ९ राजसन्मान, मध्यें ८ छत्रपति, शेवटीं शिखरावर ४ कीर्तिवृद्धि होईल. त्यांतून शुभफळ येईल तो दिवस घ्यावा.

मंचकचक्र.

सूर्यभाद्गणयेच्चांद्रंमंचमूलेचतुश्चतुः ॥ गात्रेषुत्वेकंविंध्यासुमध्ये सप्तविनिर्दिशेत् ॥ १ ॥ ॥ फलं ॥ ॥ मूलेतुसुसौभाग्यंगात्रेप्रोक्तं भयंमहत् ॥ मध्येसरपुत्रलाभायआयुर्वृद्धिकरंपरम् ॥ २ ॥

टीका--सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापावेतों मंचकस्थानीं घ्यावयाचा क्रम, प्रथम खुरांवर १६ सुखप्राप्ति, मग गात्रांवर ४ भयप्राप्ति, पुढें विंध्यावर १ भय, शेवटीं मध्यें ७ पुत्रलाभ आणि आयुष्याची वृद्धि होय.

सशरधनुश्चक्र.

सूर्यभाज्जन्मभांतंचधनुष्येवंचयोजयेत् ॥ चापाग्रेबाणसंख्याकंशराग्रेपं जयोजयेत् ॥ १ ॥ शरमूलेतथापंचपंचसंधौप्रकीर्तयेत् ॥ दंडेशेषंतुदद्याद्वै धनुषश्चक्रमुत्तमम् ॥ २ ॥ ॥ ॥फलं॥ ॥अग्रेहानिःशरेलाभःशरमूले जयस्तथा ॥ चापसंधौतुशौर्यंस्याद्दंडेभंगःप्रजायते ॥ ३ ॥

टीका--सूर्यनक्षत्रापासून जन्मनक्षत्रपावेतों धनुष्यावर घ्यावयाचीं स्थानें व फळें सांगतों. प्रथम अग्रावर ९ हानि, मग शरावर ९ लाभ, शरमूलावर ९ जय, संधिवर ९ शौर्य. शेवटीं दंडावर ९ राज्यभंग, यांतून शुभफळ येईल त्या दिवशीं धनुष्य धारण करावें.

रथचक्र.

रथाकारंलिखेच्चक्रंसूर्यभाजनिर्भन्यसेत् ॥ रथांगेत्रीणिऋक्षाणि षट्चक्रेषुततोन्यसेत् ॥ १ ॥ ऋक्षत्रयंमध्यदंडेरथाग्रेभत्रयंतथा ॥ युगेचभत्रयंज्ञेयंषडक्षाण्यंतिमेऽध्वनि ॥ २ ॥ शेषमृक्षत्रयंयोज्यं चक्रज्ञैःसर्वतोरथे ॥ ३ ॥ फलम् ॥ ॥ शृंगेमृत्युर्जयश्चक्रेसिद्धिर्ज्ञे याचदंडके ॥ रथाग्रेदंडअश्वानंमध्येचैवसुखंशुभम् ॥ ४ ॥ बुध

रेवंफलंज्ञेयंजन्मभांतंक्रमेणच ॥ गर्गेणोक्तानिचक्राणिविज्ञेयानि सदाबुधैः ॥ ५ ॥

टीका—रथाकार चक्र काढून त्याच्या स्थानावर सूर्यनक्षत्रापासून जन्मनक्षत्रापावेतों नक्षत्रें द्यावयाचा क्रम. प्रथम शृंगांवर ३ मृत्यु, मग चक्रांवर ६ जय, पुढें मध्यदंडावर ३ सिद्धि, रथाग्रावर ३ धनलाभ, मग जोखडावर ३ भंग, शेवटीं मार्गांवर ६ शुभ आणि सर्वत्र ३ सुख जाणावें.

तिळांचा घाणा लावण्यास मुहूर्त.

घाणाचक्रंप्रवक्ष्यामिसूर्यभाच्चांद्रमेवच ॥ त्रीणित्रीणित्रयंत्रीणि त्रीणित्रीणित्रयंतथा ॥ १ ॥ त्रीणित्रीणितुभान्यत्रयोजयेद्घाण केशुभे ॥ ॥ फलं ॥ ॥ हानिरैश्वर्यमारोग्यंविनाशोद्रव्यमेवच ॥ स्वामिघातोनिर्धनतामृत्युरेवसुखंक्रमात् ॥ २ ॥

उंसांचा रस काढावयाचा मुहूर्त.

वेदद्विनेत्रभूभूतबाणहस्तरसाःक्रमात् ॥ ॥ फलं ॥ ॥ प्रथमंचलभे ल्लक्ष्मींद्वितीयेहानिमेवच ॥ १ ॥ तृतीयेसर्वलाभंचचतुर्थेचक्षयंतथा॥ पंचमेचभवेन्मृत्युःषष्ठस्थानेशुभंस्मृतम् ॥ २ ॥ सप्तमेचैवपीडास्याद ष्टमेधनधान्यदम् ॥ सूर्यभाद्गणयेच्चांद्रमिक्षुयंत्रेनियोजयेत् ॥ ३ ॥

टीका—सूर्यनक्षत्रापासून चंद्रनक्षत्रापावतों घाणाचक्रास भाग ९ आणि उसांचा रस काढावयाचे चक्रास भाग ८, त्यांचीं निरनिराळीं फळें खालीं लिहितों, त्यांत शुभ ज्या दिवशीं येईल तो दिवस घ्यावा.

तेलाचा घाणा.		उंसांचा चरक.	
३ भाग १ ला	हानि.	४ भाग १ ला	लक्ष्मी.
३ भाग २ रा	ऐश्वर्य.	२ भाग २ रा	हानि.
३ भाग ३ रा	आरोग्य.	२ भाग ३ रा	सर्वलाभ.
३ भाग ४ था	नाश.	१ भाग ४ था	क्षय.
३ भाग ५ वा	द्रव्य.	५ भाग ५ वा	मृत्यु.
३ भाग ६ वा	स्वामिघात.	५ भाग ६ वा	शुभ.
३ भाग ७ वा	निर्धन.	२ भाग ७ वा.	पीडा.
३ भाग ८ वा	मृत्यु.	भाग ८ वा.	धनधान्य.
३ भाग ९ वा	सुख.		

अथ कृषिकर्मास मुहूर्त.

स्वातीब्राह्ममृगोत्तरादितियुगेशाधाचतुष्कंमघारेवत्युत्तरविष्णु भंकृषिविधौक्षेत्रादिवापेविधौ॥गोकन्याझषमन्मथाश्वशुभदा वाराःकुजार्कीतरंषष्ठीद्वादशिरिक्तपर्वसुतथावर्ज्यैद्वितीयाद्वयम् ॥१॥

टीका—स्वाती, रोहिणी, मृग, उत्तरा, पुनर्वसु, पुष्य, अनुराधा, ज्येष्ठा, मूळ, पूर्वाषाढा, रेवती, मघा, उत्तराफाल्गुनी, श्रवण हीं नक्षत्रें आणि वृषभ, कन्या, मकर, मिथुन हीं लग्नें शुभ होत. मंगळ, शनिवार, व षष्ठी, द्वादशी आणि रिक्ता, दोन्ही पर्वणी आणि द्वितीयाद्वय हीं वर्ज्य करून कृषिकर्मास व बीजारोपणासही आरंभ करावा.

हलचक्र.

त्रिकंत्रिकंत्रिकंपंचत्रिकंपंचत्रिकंद्विकम् ॥
सूर्यभाद्गणयेच्चांद्रमशुभंचशुभंक्रमात् ॥ १ ॥

टीका—प्रथम नांगर धरण्यास मुहूर्त. सूर्यनक्षात्रापासून दिवसनक्षत्रापावेतों गणून त्याचे भाग ८ त्यांचा क्रम, प्रथम ३ फळ अशुभ, द्वितीय भाग ३ शुभ, तृतीय ३ अशुभ, चतुर्थ ५ शुभ, पंचम ३ अशुभ, षष्ठ ५ शुभ, सप्तम ३ अशुभ, अष्टम भाग नक्षत्रें २ शुभ, ज्या नक्षत्रभागामध्यें दिवसनक्षत्र शुभ येईल तो दिवस घ्यावा.

गलबताचा मुहूर्त.

पौष्णादितिस्तुरगवारुणमित्रचित्रशीतोष्णरश्मिवसुजीवकभान्यमूनि ॥ वारौचजीवभृगुनंदनकौप्रशस्तौनौकादिसंघटनवाहनमेषुकुर्यात् ॥ १ ॥

टीका—रेवती, पुनर्वसु, अश्विनी, आश्लेषा, शततारका, अनुराधा, चित्रा, मृग, हस्त, धनिष्ठा, पुष्य हीं नक्षत्रें आणि गुरु, भृगु हे वार प्रशस्त. यांजवर नवें गलबत बांधावें अथवा जलामध्यें सोडावें.

गलबताचें चक्र.

रविभुक्तर्क्षमारभ्यकुर्यात्रीण्युदयेचषट् ॥ नाल्यांत्रीणिहृदित्रीणि पृष्ठेभूःपार्श्वगंत्रयम् ॥ १ ॥ शुक्लाणत्रीणिषण्मध्येनौकाचक्रेभसंस्थितिः ॥ उपरिस्थंचमध्यस्थंपट्श्रेष्ठंचपरंनसत् ॥ २ ॥

टीका—रवितक्षत्रापासून चंद्रनक्षत्रापर्यंत मोजून ३।३ नक्षत्रें देण्याचा क्रम; प्रथ

उपरिस्थानीं ६, पुढें गलबताचे नाळावर ३, मग हृदयावर ३, पृष्ठीवर १, कुशी

वर ६, सुकाणावर ३, नौकेचे मध्यभागीं ६ नक्षत्रें चावीं. त्यांत उपरिस्थ आणि मध्यस्थानाचीं एकूण १२ नक्षत्रें शुभ, अन्य स्थानांचीं अशुभ जाणावीं.

लग्नीं ग्रहबळ पाहणें.

त्रिषडायगतःसूर्यश्चंद्रोद्वित्र्यायगःशुभः ॥ कुजार्कीत्रिषडायस्थौ त्रिषट्खेतरगोगुरुः ॥ १ ॥ द्विसुतास्ताष्टरिःफायरिपुसंस्थोबुधः स्मृतः ॥ सुखांत्यारीन्विनान्यत्रनौयानेशुभदःसितः ॥ २ ॥

टीका—गलबतांत बसावयाचें किंवा प्रथम हाकारणी करावयाची असेल त्या लग्नास ग्रहबळ पहाणें. ३।६ व ११ ह्या स्थानीं सूर्य, चंद्र भौम अथवा शनैश्चर हे असतील तर शुभ. आणि ३।६।१० ह्या स्थानाव्यतिरिक्त गुरु अन्यस्थानीं शुभ. २।५।७।८।१२।६ ह्या स्थानीं बुध असला तर शुभ. ७।१२।६ ह्या स्थानांव्यतिरिक्त अन्यस्थानीं शुक्र शुभ होय.

नौकास्थानीं ग्रह.

नाल्यांपापखगाःसौम्याःशुक्काणेशुभकारकाः ॥ व्यस्तामृत्यु कराःक्रूराःपृष्ठेकूर्पेचभीतिकृत् ॥ १ ॥ अंतेबाह्येस्थितास्तेचह्य लाभायस्मृताबुधैः ॥ एवंविचार्यदैवज्ञोनौयानक्षमथंवदेत् ॥ २ ॥

टीका—लग्नकुंडली मांडून त्यांत ग्रह कोणकोणत्या स्थानीं येतील त्यांचीं तसतशीं फळें. पापग्रह नाळीवर शुभ, सौम्यग्रह सुकाणावर शुभ. हे विपरीत आले तर अशुभ आणि क्रूरग्रह पृष्ठीवर किंवा कुशीवर आला तर भय देणारा आणि हेच ग्रह आंत किंवा बाहेर आले तर लाभ नाहीं. यांचा विचार करून जोशी यांनीं सांगावें.

दीपिकाचक्र.

दीपिकायामुखेपंचराजसन्मानलाभदा ॥ कंठेनवधनप्राप्तिर्मध्ये ऽष्टौस्वामिमृत्युदाः ॥ १ ॥ दंडेपंचभवेद्राज्यमग्निऋक्षाच्चदीपिकम् ॥

टीका—कृतिकानक्षत्रापासून दिवसनक्षत्रापावेतों द्यावयाचीं स्थानें व फळें सांगतों. तोंडावर ५ राजसन्मानलाभ, कंठावर ९ धनप्राप्ति, मध्यें ८ स्वामिमृत्यु, आणि दांड्यावर ५ राज्यप्राप्ति. या रीतीनें नक्षत्रक्रम जाणावा.

कूपचक्र.

कूपवाप्योस्तुचक्रंवैविलिख्यंशुभमुत्तमम् ॥ रोहिणीगर्भमेतस्य

त्रित्रिऋक्षाणिचंद्रभम् ॥ १ ॥ मध्यपूर्वेतथाऽग्नेयेयाम्येचैवतुनैर्ऋते ॥ पश्चिमेचैववायव्यांसौम्येशूलिदिशिक्रमात ॥ २ ॥ फलम् ॥ ॥ शीघ्रंजलंनजलंमध्यमजलमजलंबहुजलंच ॥ अमृतजलंबहु क्षारंसजलंमध्यजलंक्रमाज्ज्ञेयम् ॥ ३ ॥ मत्स्येकुलीरेमकरेबहूदकं तथैवचार्द्धंवृषकुंभयोश्च ॥ अलौचतौलौचजलाल्पतामताशेषा श्चसर्वेऽजलदाःप्रकीर्तिताः ॥ ४ ॥

टीका—कूप, वापी नूतन खोदण्यास मुहूर्त, रोहिणीपासून दिवसनक्षत्रापर्यंत देण्याचा क्रम–मीन, कर्क, मकर ह्या तीन राशींस चंद्र असतां पुष्कळ जळ लागेल वृषभ कुंभ ह्या राशींस चंद्र असतां तदर्धजल लागेल, वृश्चिक तूळ ह्या राशींस चंद्र असतां अल्प जल लागेल; शेषराशींस चंद्र असतां जल लागणार नाहीं.

पूर्व
३ नक्षत्रें द्वितीयस्थान
नजलं

आग्नेय
३ नक्षत्रें तृतीयस्थान
मध्यमजलं

ईशान्य
३ नक्षत्रें नवमस्थान
मध्यम जलं

मध्य
रोहिणी ३ नक्षत्रें प्रथम स्थान
शीघ्र जल लागेल.

उत्तर
३ नक्षत्रें अष्टमस्थान
सजलं

दक्षिण
३ नक्षत्रें चतुर्थस्थान
अजलं

वायव्य
३ नक्षत्रें सप्तमस्थान
बहुक्षार जलं

पश्चिम
३ नक्षत्रें षष्ठस्थान
अमृतजलं

नैर्ऋत्य
३ नक्षत्रें पंचमस्थान
बहुजलं

बागांत नवीं झाडें लावण्याचा मुहूर्त.

गोसिंहालिगतेषुचोत्तरगतेभानौबुधादित्रये
चंद्रार्के चशुभाबुधैरभिहिताऽऽरामप्रतिष्ठाक्रिया ॥

टीका—उदगयनीं वृषभ, सिंह अथवा वृश्चिक या राशींचा सूर्य आणि बुध, गुरु, शुक्र, चंद्र, रवि हे वार अशा शुभदिनीं नूतन लागवड करावी.

आश्लेषाभरणीद्वयंशतभिषक्कृत्यक्त्वाविशाखांकुहूं
रिक्तापक्षतिमष्टमींपरिहरेत्षष्ठीमपिद्वादशीम् ॥ १ ॥

टीका—आश्लेषा, भरणी, कृत्तिका, शततारका, विशाखा आणि अमावास्या, रिक्त, तिथि, प्रतिपदा, अष्टमी, षष्ठी, द्वादशी इतकीं वर्ज्य करून अन्यदिनीं लागवड उक्त.

शिक्का चालवण्यास मुहूर्त.

मृदुध्रुवक्षिप्रचरेषुभेषुयोगेप्रशस्तेशनिचंद्रवर्ज्ये ॥
वारेतथापूर्णजलाह्वयेचमुद्राप्रशस्ताशुभदाहिराज्ञाम् ॥ १ ॥

टीका—मृदु, ध्रुव, क्षिप्र चर हीं नक्षत्रें प्रशस्त; आणि शनि, चंद्र हे वार वर्ज्य करून मुद्रा (शिक्का) चालवण्यास राजांस प्रशस्त आहे.

अथ प्रश्नप्रकरण.

तिथ्यादिप्रयुक्त प्रश्न.

तिथिप्रहरसंयुक्तातारकावारसंश्रिता ॥ अग्निभिस्तुहरेद्भागंशेषं सत्त्वंरजस्तमः ॥ १ ॥ फलं ॥ ॥ सिद्धिस्तात्कालिकीसत्त्वे रजसातुविलंबता॥तमसानिष्फलंकार्यंज्ञातव्यंप्रश्नकोविदैः॥२॥

टीका--प्रश्न ज्या तिथीस, वारीं, नक्षत्रीं आणि प्रहरीं करील त्याचें उत्तर खालीं लिहिल्या उदाहरणाप्रमाणें घ्यावें. उदाहरण; तिथ ५ वार ३ नक्षत्रें ७ व प्रहर २ मिळवणी १७ भाग ३ भोग्य १५ शेष त्याचें नांव दुसरें रज त्याचें फळ कार्यविलंब. याप्रमाणें ३ उरले तर तम निष्फल; शेष १ उरला तर सत्व त्याचें फळ सिद्धि.

आत्मच्छायाप्रयुक्त प्रश्न.

आत्मच्छाय त्रिगुणितात्रयोदशसमन्विता ॥ वसुभिश्वहरेद्भागं

शेषंचैवशुभाशुभम् ॥ १ ॥ ॥ फलं ॥ ॥ लाभश्चैकेत्रिकेसिद्धिर्वृद्धि पंचमसप्तके ॥ द्वयोर्हानिश्चतुःशोकंषष्ठाष्टेमरणंध्रुवम् ॥ २ ॥

टीका—आपली छाया मोजून त्रिगुणित करून आंत तेरा मिळवून ८ नीं भागावें, शेष उरेल तें फळ जाणावें.

शेष १	शेष २	शेष ३	शेष ४	शेष ५	शेष ६	शेष ७	शेष ८
लाभ	हानि	सिद्धि	शोक	वृद्धि	मरण	वृद्धि	मरण

अथ पंथाप्रश्न.

तिथिप्रहरसंयुक्तातारकावारमिश्रिता ॥ सप्तभिस्तुहरेद्भागंशेषं तुफलमादिशेत् ॥१॥ वर्तमानंचनक्षत्रंगणयेत्कृत्तिकाऽऽदितः ॥ सप्तभिश्चहरेद्भागंशेषंप्रश्नस्यलक्षणम् ॥ २ ॥ प्रश्नाक्षरैरुद्रयुक्तंसप्त भिर्भाजितंतथा ॥ फलमेवंक्रमाज्ज्ञेयंसर्वेषांहिशुभाशुभम् ॥ ३ ॥

टीका—तिथि, प्रहर, वार आणि नक्षत्र एकत्र मिळवून ७ नीं भागावें, शेष उरेल तें फळ. दुसरा प्रकार–दिननक्षत्रापासून कृत्तिकापावेतों गणना करून ७ नीं भागावें, शेष उरेल तें फळ. तिसरा प्रकार–प्रश्नाचीं अक्षरें मोजून त्यांत ११ मिळवावे आणि सातांनीं भागावें, शेष उरेल तें फळ.

फळें.

एकेशेषेतथास्थानेद्वितीयेपथिवर्तते ॥ तृतीयेप्यर्द्धमार्गेतुचतु र्थेग्राममादिशेत् ॥ १ ॥ पंचमेपुनरावृत्तिःषष्ठेव्याधियुतंवदेत् ॥ शून्यंज्ञेयंसप्तमेवैचैतत्प्रश्नस्यलक्षणम् ॥ २ ॥

टीका—शेष १ राहिल्यास स्थानींच आहे, २ रा० मार्गे चालत आहे, ३ रा० अर्धमार्गी आला, ४ रा० गांवाजवळ आला. ५ रा० माघारा गेला, ६ रा० व्याधिग्रस्त आहे, ७ राहिल्यास मृत्यु. हीं तीन पंथाप्रश्नांचीं फळें क्रमें करून जाणावीं.

दुसरा प्रकार.

धनसहजगतौसितामरेज्यौकथयतआगमनंप्रवासिपुंसाम् ॥ तनुहिबुकगताविमौचतद्वज्झटितिनृणांकुरुतोगृहप्रवेशम् ॥ १ ॥

टीका—द्वितीयस्थानीं शुक्र, तृतीयस्थानीं गुरु अथवा पृच्छालग्नीं शुक्र, चतुर्थे स्थानीं गुरु, असा योग असतां प्रवासी गृहास लवकर येईल.

अथ कार्याकार्य प्रश्न.

दिशाप्रहरसंयुक्तातारकावारमिश्रिता ॥ अष्टभिस्तुहरेद्भागंशेषं प्रश्नस्यलक्षणम् ॥ १ ॥ फलम् ॥ ॥ पंचैकेत्वरितासिद्धिःषट्तुर्येचदिनत्रयम् ॥ त्रिसप्तकेविलंबश्चद्वौचाष्टौनचसिद्धिदौ ॥ २ ॥

टीका—पृच्छकाचें मुख ज्या दिशेस असेल ती दिशा, प्रहर, वार व नक्षत्र अशीं सव एकत्र करून ८ नीं भागावें; शेष उरेल त्याचें शुभाशुभ जाणावें. शेष १ अथवा ५ उरले तर त्वरित कार्यसिद्धि, ६,४ उरले तर तीन दिवसांत कार्यसिद्धि; ३,७ उरले तर विलंबें करून कार्यसिद्धि; २,८ उरले तर कार्य होणार नाहीं.

अंकप्रश्न.

अंकंद्विगुणितंकृत्वाफलनामाक्षरैर्युतम् ॥ त्रयोदशयुतंकृत्वान्भिर्भागमाहरेत् ॥१॥ फलम् ॥ ॥ एकेहिधनवृद्धिश्चद्वितीयेचधनक्षयः ॥ तृतीयेक्षेममारोग्यंचतुर्थेव्याधिरेवहि ॥ २ ॥ स्त्रीलाभःपंचशेषेस्यात्षष्ठेबंधुविनाशनम् ॥ सप्तमेईप्सितासिद्धिरष्टमेमरणंध्रुवम् ॥३॥ नवमेराज्यसंप्राप्तिर्गर्गस्यवचनंतथा ॥४॥

टीका—नऊ अंकांतून एका अंकाचें नांव घ्यावयास सांगावें; ज्या अंकाचें नांव घेईल त्याचे द्विगुणित करून मग फलाचें नांव घेववावें, त्याचीं अक्षरें व दुसरे १५ अंक त्यांत मिळवावे; आणि द्विगुणित केलेले ते असे सर्व एकत्र करून ९ नीं भागावें; शेष राहिल्याचें शुभाशुभ फळ. शेष १ धनलाभ, २ धनक्षय, ३ आरोग्य, ४ व्याधि, ५ स्त्रीलाभ, ६ बंधूचा नाश, ७ कार्यसिद्धि, ८ मरण, ९ राज्यप्राप्ति. अशीं फळें गर्गमुनि सांगतात.

नवग्रहात्मकंयंत्रंकृत्वाप्रश्नंनिरीक्षयेत् ॥
फलंपूर्वोक्तमेवात्रद्रष्टव्यंप्रश्नकोविदैः ॥ १ ॥

टीका—नवग्रहात्मक यंत्र करून यांतील अंकाचें अवलोकन किंवा अंकावर हात ठेवून, किंवा उच्चार करून अंक येईल त्याचीं फळें पूर्वी सांगितलीं आहेत; तीं पाहून यथाक्रमें सांगावीं.

४	३	८
९	५	१
२	७	६

अन्यमतें.

सप्तत्रयांकेकथयंतिवार्तानवैकपंचत्वरितंवदंति ॥
अष्टौद्वितीयेनहिकार्यसिद्धीरसाश्चवेदाघटिकात्रयंच ॥ २ ॥

टीका—अन्यमतें पूर्वींचे अंक सांगितले आहेत त्याप्रमाणेंच कृति परंतु फळें मात्र निराळीं, शेष ७ अथवा ३ उरले तर वार्ता ऐकण्यांत येईल; ९, ३, ५, त्वरित कार्य होईल; ८, २ कार्य होणार नाहीं; ४, ६ तीन घटिकांनीं कार्य होईल, असें जाणावें.

वारनक्षत्रप्रयुक्तपंथाप्रश्न.

बुधेचंद्रेतथामार्गेसमीपेगुरुशुक्रयोः ॥ रवौभौमेतथादूरेशनौच परिपीड्यते ॥ १ ॥ निर्जीवःसप्तऋक्षाणिसजीवोद्वादशेभवेत् ॥ व्याधितोनवऋक्षाणिसूर्यधिष्ण्यात्तुचांद्रभम् ॥ २ ॥

टीका—बुधवारीं व सोमवारीं प्रश्न केला तर मार्गं चालत आहे, गुरुवारीं व शुक्रवारीं समीप आला, रविवारीं व भौमवारीं दूर आहे, शनिवारीं अनिष्ट होय. सूर्यनक्षत्रापासून चंद्रनक्षत्रापावेतों घ्यावयाचा क्रम. प्रथम ७ नक्षत्रांत चंद्र आला तर निर्जीव, द्वितीय १२ नक्षत्रांत चंद्र आला तर जिवंत आहे, तृतीय ९ नक्षत्रांत चंद्र आला तर व्याधि उत्पन्न झाली आहे, असा पंथाप्रश्न जाणावा.

नष्टवस्तुप्रश्न.

तिथिवारंचनक्षत्रंलग्नंवह्निविमिश्रितम् ॥ पंचभिस्तुहरेद्भागंशेषं तत्वंविनिर्दिशेत् ॥१॥ ॥ फलम् ॥ ॥ पृथिव्यांतुस्थिरंज्ञेयमप्सु व्योम्निनलभ्यते ॥ तेजस्तुराजसंज्ञेयंवायौशोकंविनिर्दिशेत् ॥२॥

टीका—प्रश्नतिथि, वार, नक्षत्र, लग्न व त्यांत ३ एकत्र करून ५ नीं भागावें; शेष १ उरला तर पृथ्वींत आहे, २ उरले तर जळांत आहे सांपडणार नाहीं, ३ उरले तर आकाशांत आहे मिळणार नाहीं, ४ उरले असतां तेजराजानें वस्तु नेली, ५ उरले तर वायूनें नेली, फक्त शोक असें जाणावें.

गर्भिणीप्रश्न.

तत्पृच्छलग्नेरविजीवभौमेतृतीयसप्तेनवपंचमेच ॥
गर्भःपुमान्वैऋषिभिःप्रणीतश्चान्यग्रहेस्त्रीविबुधैःप्रणीता ॥ १ ॥

टीका—गर्भिणी, ज्या लग्नावर प्रश्न करील त्या लग्नीं ग्रह पाहणें. लग्नाचे तृतीय, सप्तम, नवम अथवा पंचमस्थानीं रवि, गुरु अथवा भौम असले तर पुत्र होईल व या स्थानीं अन्य ग्रह असले तर कन्या होईल.

मुष्टिप्रश्न.

मेषेरक्तंवृषेपीतंमिथुनेनीलवर्णकम् ॥ कर्केचपांडुसंज्ञेयंसिंहेधूम्रंप्रकीर्तितं

॥१॥ कन्यायांनीलमिश्रन्तुतुलायांपीतमिश्रितम्॥वृश्चिकेताम्रमिश्रंच चापेपीतंविनिश्चितम्॥२॥नक्रेकुंभेकृष्णवर्णमीनेपीतंवदेत्सुधीः ॥ ३ ॥

टीका—पृच्छकाचे मुष्टींत कोणते वर्णाची वस्तु आहे ती सांगावी, ती याप्रमाणें— मेषलग्न असलें तर तांबडे वर्णाची वस्तु आहे आणि वृषभ लग्नीं पिंवळी, मिथुनीं निळी, कर्कीं पांढरी, सिंहीं धूम्रवर्णाची, कन्यालग्नीं नीळमिश्रित, तूळीं पीतमिश्रित, वृश्चिकीं तांम्रमिश्रित, धनलग्नीं पीतमिश्रित, मकरीं कृष्णवर्ण, कुंभीं लोहमय, मीनलग्नीं पीतवर्णाची आहे; असें जाणावें.

लग्नपरत्वें मनश्चिंतित प्रश्न.

मेषेचद्विपदांचिंतावृषेचिंताचतुष्पदः ॥ मिथुनेगर्भचिंताचव्यव सायस्यकर्कटे ॥ १ ॥ सिंहेचजीवचिंतास्यात्कन्यायांचस्त्रिय- स्तथा ॥ तूलेचधनचिंताचव्याधिचिंताचवृश्चिके ॥ २ ॥ चापे चधनाचिंतास्यान्मकरेशत्रुचिंतनम् ॥ कुंभेस्थानस्यचिंतास्या- न्मीनेचिंताचदैविकी ॥ ३ ॥

टीका—लग्नपरत्वें प्रश्नाचें उत्तर, मेषलग्नीं प्रश्न केला तर मनुष्याची चिंता, वृषभ- लग्नीं गायी, म्हैशी इत्यादि चतुष्पदाची, मिथुनीं गर्भाची, कर्कीं व्यापाराची, सिंहीं जीवाची, कन्यालग्नीं स्त्रीची, तूळीं धनाची, वृश्चिकीं रोगाची, धनलग्नीं धनाची, मकरीं शत्रूची, कुंभीं स्थानाची, मीनलग्नीं भूत पिशाचादिक, दैविक; अशा चिंता लग्नपरत्वें पृच्छकास सांगाव्या.

संज्ञापरत्वें लग्नांचीं नांवें.

धातुर्मूलंजीवश्चरस्थिरद्विःस्वभावाश्च ॥
मेषादयःक्रमेणज्ञातव्याःप्रश्नकोविदैः ॥ १ ॥

टीका—मेषादि क्रमानें द्वादशलग्नें त्यांचीं नांवें दोन दोन संज्ञेचीं सांगतों. धातु व चर अशी मेषलग्नाची संज्ञा. मूल स्थिर वृषभाची. जीव, द्विस्वभाव मिथुनाची. धातु, चर कर्काची. मूल स्थिर सिंहाची. जीव, द्विःस्वभाव कन्येची. धातु, चर तुळेची. मूल स्थिर वृश्चिकाची. जीव, द्विःस्वभाव धनाची. धातु चर मकराची. मूल, स्थिर कुंभाची. जीव व द्विःस्वभाव मीनाची. अशा १२ लग्नांच्या संज्ञा जाणाव्या.

अंकप्रश्न.

अष्टोत्तरशतांकेषुप्राश्निकोन्यूनमाचरेत् ॥ शेषंद्वादशभिर्भक्तंशेषंचैवशुभ माशुभम् ॥ १ ॥ ॥ फलं ॥ एकंदुर्गासप्तकेवैविलंबश्चांगेतुर्येदिक्षुभूते षुनाशः॥रुद्रेसिद्धिर्युग्मलब्धिर्हस्तकाशीघ्रंकार्यस्यात्रिषट्द्वादशेषु ॥ २ ॥

टीका--प्रश्नपृच्छकाकडून अष्टोत्तरशतांचे अंकांतून एके अंकाचें नांव घेववावें आणि त्यास १२ नीं भागावें. शेष उरेल त्याचीं फळें. शेष १ अथवा ९ किंवा ७ उरले तर विलंबें कार्य होईल; ८, ४, १०, ५ उरले तर नाश; ११ सिद्धि, २ वृद्धि, ३, ६, १२ उरले तर शीघ्र कार्यसिद्धि होईल असें जाणावें.

रोगीप्रश्न.

तिथिवारंचनक्षत्रंलग्नंप्रहरएवच ॥ अष्टभिस्तुहरेद्भागंशेषंतुफलमादिशेत् ॥ १ ॥ ॥ फलम् ॥ ॥ हयाग्नौदेवताबाधापैत्रिकेनेत्रदंतिषु ॥ षट्चतुर्षुभूतबाधानबाधाएकपंचके ॥ २ ॥

टीका—तिथि, वार, नक्षत्र व लग्न आणि प्रहर हीं प्रश्नदिवशीं एकत्र करून ८ नीं भागावें. शेष उरेल त्याचें फळ. शेष ७ अथवा ३ उरले तर देवतेची बाधा; २, ८ पितरांची बाधा; ६, ४ भूतबाधा, १, ५ उरले तर बाधा नाहीं असें जाणावें.

केवळ लग्नपरत्व.

मेषेचदेवीदोषःस्याद्वृषेदोषश्चपैतृकः ॥ मिथुनेशाकिनीदोषःकर्कटेभूतदोषकः ॥ १ ॥ सिंहेसहोदराणांचकन्यायाकुलमातृजः ॥ तूलेदोषश्चंडिकायानाडीदोषोदिवृश्चिके ॥ २ ॥ चापेचयक्षिणीपीडामकरेग्रामदेवतात् ॥ अपुत्रादृष्टिजःकुंभेमीनेआकाशगामिनः ॥ ३ ॥

टीका--ज्या लग्नीं रोगी प्रश्न करील त्याचें उत्तर. मेषीं देवीदोष, वृषभीं पितृदोष, मिथुनीं शाकिनीदोष, कर्कीं भूतदोष, सिंहीं भावाचा दोष, कन्यालग्नीं कुळदेवतेचा दोष, तुळीं चंडिकादोष, वृश्चिकीं नाडीदोष, धनीं यक्षिणीदोष, मकरीं ग्रामदेवतेचा दोष, कुंभीं अपुत्रस्त्रीदर्शनदोष, मीनीं आकाशगामिनी दोष असे पृच्छकलग्नपरत्वें रोग सांगावे.

पर्जन्यप्रश्न.

आषाढस्यासितेपक्षेदशम्यादिदिनत्रये ॥ रोहिणीकालमाख्यातिसमदुर्भिक्षलक्षणम् ॥ १ ॥ रात्रावेवनिरभ्रंस्यात्प्रभातेमेघडंबरम् ॥ मध्याह्नेजलबिंदुःस्यात्तदादुर्भिक्षकारणम् ॥ २ ॥

टीका—आषाढ कृष्णपक्षीं १० मी, ११ शी, १२ शी ह्या ३ दिवसांत रोहिणी दिवसनक्षत्र आलें तर सुभिक्ष, मध्यम व दुर्भिक्ष हीं तिन्हीं फळें तिथिक्रमेंकरून

घ्यावीं आणि रात्रीं निरभ्र, प्रातःकाळीं मेघगर्जना, मध्याह्नीं जलबिंदु पडतात, असें लक्षण झाल्यावर त्या संवत्सरीं महर्घता होईल असें जाणावें.

जललग्न.

कुंभःकर्कवृषौमीनमकरौवृश्चिकस्तुला ॥ जललग्नानिचोक्तानि लग्नेष्वेतेषुसूर्यभम् ॥ लभत्येवसदावृष्टिर्ज्ञातव्यागणकोत्तमैः ॥ १ ॥

टीका—कुंभ, कर्क, वृषभ, मीन, मकर, वृश्चिक आणि तूळ हीं ७ जललग्नें होत; यांवर सूर्यमहानक्षत्र निघालें तर पर्जन्य पुष्कळ पडेल.

पर्जन्यनक्षत्रें.

अश्विनीमृगपुष्येषुपूषविष्णुमघासुच ॥
स्वात्यांप्रविशतेभानुर्वषतेनात्रसंशयः ॥ १ ॥

टीका—अश्विनी, मृग, पुष्य, रेवती, श्रवण, मघा, स्वाती ह्या दिवशीं सूर्यानें महानक्षत्रीं प्रवेश केला असतां पर्जन्यवृष्टि पुष्कळ होईल.

स्त्री नपुंसक, पुरुष नक्षत्रें.

आर्द्रादिदशकंस्त्रीणांविशाखात्रिनपुंसकम् ॥ मूलाच्चतुर्दशर्क्षाणिपुंसांभानिक्रमाद्बुधैः ॥ १ ॥ वायुर्नपुंसकेभेचस्त्रीणांभेचाभ्रदर्शनम् ॥ स्त्रीणांपुरुषसंयोगेवृष्टिर्भवतिनिश्चितम् ॥ २ ॥

टीका—आर्द्रादिस्वात्यंत १० नक्षत्रें स्त्रीसंज्ञक होत, विशाखादि ज्येष्ठांत हीं ३ नक्षत्रें नपुंसक, मूळादि मृगांत हीं १४ नक्षत्रें पुरुषसंज्ञक होत. नपुंसक नक्षत्रीं स्त्रीमहानक्षत्र आलें तर वायु सुटेल, दोन्ही स्त्रीनक्षत्रें आलीं तर अभ्र येईल आणि स्त्रीपुरुष असा योग आला तर पर्जन्यवृष्टि होईल.

सूर्यनक्षत्रें व चंद्रनक्षत्रें.

अश्विन्यादित्रयंचैवआर्द्रादेःपंचकंतथा ॥ पूर्वाषाढादिचत्वारिचोत्तरारेवतीद्वयम् ॥ १ ॥ उक्तानिशशिभान्यत्रप्रोच्यंतेसूर्यभान्यथः ॥ रोहिणीचमृगश्चैवपूर्वाफाल्गुनिकातथा ॥ २ ॥ सूर्येसूर्यभवेद्वायुश्चंद्रेचंद्रेनवर्षती ॥ चंद्रसूर्योभवेद्योगस्तदावर्षतिमेघराट् ॥ ३ ॥

टीका—अश्विनी, भरणी, कृत्तिका, आर्द्रा, पुनर्वसु, पुष्य, आश्लेषा, मघा, पूर्वा-

षाढा, उत्तराषाढा, श्रवण, धनिष्ठा, उत्तरा, रेवती हीं चंद्रनक्षत्रें आणि शेष जीं उरलीं तीं सूर्यनक्षत्रें जाणावीं. फळें, दिवसनक्षत्र आणि महानक्षत्र हीं दोन्ही सूर्यनक्षत्रें असलीं तर वायु सुटेल आणि दोन्ही चंद्रनक्षत्रें आलीं तर पर्जन्य पडणार नाहीं. जेव्हां चंद्र आणि सूर्य अशीं येतील तेव्हां वृष्टि होते असें जाणावें.

धान्यप्रश्न.

कापायेजयशर्मलाभकुगिशैमित्राणिसर्वेंशुभं गोरायेप्रियमुग्धनानि लपेरेलाभारिनाशादिकम् ॥ रय्यगेकलहःश्रियश्चबलगेस्थानानि मित्रागमौ रोराशंविपदःपरांगकलहःखालेयशोकावहः ॥ १ ॥

टीका—सत्तावीस दाणे धान्याचे घेऊन एक रास करावी. मग त्या राशींतून एक चिमटी भरून निराळे ठेवावे ह्मणजे ३ राशी होतात. यांतील दाणे मोजून शेवटीं एकेक उरला तर शुभ असें त्रिवार पहावें.

उदाहरण.

का ह्मणजे १ पा ह्मणजे १ ये ह्मणजे १ अशा तीन राशींत पृथक् पृथक् एकेक उरला तर त्याचें फळ जय कल्याण आणि लाभ.

२ कु ह्मं० १ गी ह्मं० ३ शै ह्मं० २ मित्रादि सर्व शुभ.

३ गो ह्मं० ३ रा ह्मं० २ ये ह्मं० १ प्रियभोग, धनप्राप्ति.

४ ल ह्मं० ३ प ह्मं० १ रे ह्मं०२ लाभ आणि अरीचा नाश.

५ र ह्मं० २ य ह्मं० १ गे ह्मं० ३ कलह होईल.

६ ब ह्मं० ३ ल ह्मं० ३ गे ह्मं० ३ लक्ष्मी आणि मित्र आपले घरीं येईल.

७ रो ह्मं० २ रा ह्मं० २ रा ह्मं० २ विपत्तिप्राप्ति.

८ प ह्मं० १ रा ह्मं० २ ग ह्मं० ३ कलह होईल.

९ खा ह्मं० २ ले ह्मं० ३ य ह्मं० १ शोकप्राप्ति. याप्रमाणें त्रिवार केलें असतां, हीं ९ फळें येतात. राशी मोजतेवेळेस तीन तीन दाणे मोजावे.

गुरू चुकलें त्याचा प्रश्न.

द्युमणिभान्नवभेषुवनेपशुस्तदनुषट्सुचकर्णपथेस्थितम् ॥ अचलभेषुगतंगृहमागतंद्वयगतंगतमेवमृतंत्रिषु ॥ १ ॥

टीका—सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापर्यंत मोजावें. दिवसनक्षत्र प्रथम ९ नक्षत्रांत आलें तर गुरूं वनांत आहे. पुढें ६ नक्षत्रीं आलें तर मार्गी आहे. पुढें ७ नक्षत्रांत आलें तर गृहास लवकर येईल. पुढें २ नक्षत्रांत आलें तर सांपडणार नाहीं. पुढें ३ नक्षत्रांत आलें तर मृत्यु पावलें असें जाणावें.

राज्यादि नाशक योग.

यदिभवतिकदाचिच्चाश्विनीनष्टचंद्रा शनिरविकुजवारेस्वातिरा
युष्ययोगे ॥ गगनचरपशूनांजंगमस्थावराणांनृपतिजनवि
नाशोराज्यभंगस्तुचोक्ताः ॥ १ ॥

टीका—कदाचित् शनि, रवि, भौम या वारीं अमावास्येस अश्विनी किंवा स्वाती नक्षत्र आणि आयुष्यमान् योग असा योग असला तर पशु, पक्षि, जंगम, स्थावर व राजेजन, यांचा, नाश आणि राज्यभंग होईल.

रवि, चंद्रास खळें पडतें त्याचें फळ.

रविशशिपरिवेषेपूर्वयामेचपीडारविशशिपरिवेषमध्ययामेचवृ
ष्टिः॥रविशशिपरिवेषेधान्यनाशस्तृतीयेरविशशिपरिवेषेराज्य
भंगश्चतुर्थे ॥ १ ॥

टीका—रवीला किंवा चंद्राला प्रथमप्रहरीं खळें पडलें तर जनांस पीडा होईल. दुसरे प्रहरीं पडलें तर पर्जन्य पडेल. तृतीय प्रहरीं धान्याचा नाश होईल. चतुर्थ प्रहरीं पडलें तर राज्यभंग होईल.

धनुष्याचें फळ.

रात्रौधनर्दिनेउल्कातारा चैवदिनेतथा ॥ रात्रौतुधूमकेतुश्चभूकं
पश्चतथैवहि ॥ एतानिदुष्टचिह्नादिदेशक्षयकराणिच ॥ १ ॥

टीका—रात्रीस धनुष्य व दिवसा उल्का आणि दिवसास नक्षत्रपात व रात्रीस धूमकेतु आणि भूमिकंप अशीं दुष्ट चिन्हें झालीं तर तीं देशक्षयकारक होत.

अथ ग्रहचक्रप्रकरण.

॥ सूर्य ॥ ॥ ऋक्षसंक्रमणंयत्रद्वेवक्रेविनियोजयेत् ॥ चत्वारिद
क्षिणेबाहौत्रीणित्रीणिचपादयोः ॥१॥ चत्वारिवामबाहौचहृदये
पंचनिर्दिशेत् ॥ अक्ष्णोर्द्वयंद्वयंयोज्यंमूर्ध्निचैकैककंगुदे ॥ २ ॥
॥ फलम् ॥ ॥ रोगोलाभस्तथाध्वाचबंधनंलाभएवच ॥ ऐश्वर्यं
राजपूजाचअपमृत्युरितिक्रमात् ॥ १ ॥ ॥ चंद्र ॥ ॥
चंद्रचक्रंप्रवक्ष्यामिनराकारंसुशोभनम् ॥ शीर्षेषट्कंमुखेत्वेकंत्रीणि

दक्षिणहस्के ॥ १ ॥ हृदिषट्कंप्रदातव्यंवामहस्तेत्रयंतथा ॥ कुक्ष्योःषट्कंचदातव्यंपादैकैकंविनिर्दिशेत् ॥ २ ॥ ॥ फलम् ॥ शीर्षेलाभकरंज्ञेयंमुखेतुद्रव्यहारकम् ॥ हानिदंदक्षिणेहस्तेहृदये चसुखावहम् ॥ ३ ॥ वामहस्तेतुरोगाश्चकुक्ष्योःशोकस्तथैवच ॥ पादयोर्हानिरोगौचजन्मधिष्ण्यादिचंद्रभम् ॥ ४ ॥ ॥ भौम ॥ ॥ भौमचक्रंप्रवक्ष्यामिजन्मधिष्ण्यादिभौमभम् ॥ शीर्षेषट्कंमुखे त्रीणित्रीणिवैदक्षिणेकरे ॥ १ ॥ पादयोःषट्चयोज्यानिवामह स्तेत्रयंतथा ॥ गुह्येचैकंनेत्रयोर्द्वेहृदयेत्रयमेवच ॥२॥ ॥ फलं ॥ विजयश्चैवरोगश्चलक्ष्मीःपंथाभयंतथा ॥ मत्युर्लाभःसुखंचापि फलंज्ञेयंविचक्षणैः ॥ ३ ॥

सूर्य. सूर्यसंक्रांत ज्या नक्षत्रीं असेल तेथून जन्मनक्षत्रापर्यंत मोजून जेथें नक्षत्र पडेल तें फळ जाणावें.			चंद्र. जन्मनक्षत्रापासून ज्या नक्षत्रीं चंद्र असेल तेथपर्यंत मोजावें जेथें नक्षत्र पडेल तें फळ जाणावें.			मंगळ. जन्मनक्षत्रापासून भौम ज्या नक्षत्रीं असेल तेथपर्यंत मोजून जेथें नक्षत्र पडेल तें फळ जाणावें.		
स्थानें	नक्षत्रें	फळें	स्थानें	नक्षत्रें	फळें.	स्थानें	नक्षत्रें	फळें
मुखावर	२	रोगप्राप्ति	मस्तकावर	६	लाभकर	शिरावर	६	विजय
उजवेहा०	४	लाभ	मुखावर	१	द्रव्यहरण	मुखावर	३	रोगप्रा०
पायांवर	६	मार्गचाल०	उज.हात.	३	हानिकारक	उ.हात.	३	लक्ष्मीप्राप्ति
डावाबाहु	४	बंधन	हृदयावर	६	सुखप्रा०	पायांवर	६	मार्गचाल०
हृदयावर	५	लाभ	डावाहात	३	रोगप्रा०	डावेहात.	३	भय
नेत्रांवर	४	लक्ष्मीप्रा०	कुक्षीवर	६	शोक	गुदावर	१	मृत्यु
मस्तकावर	१	राजगृहींपू०	उ. पाया.	१	हानी	नेत्रावर	२	लाभ
गुदावर	१	अपमृत्यु	डा. पाया.	३	रोगप्राप्ति	हृदयावर	३	सुख

॥बुध॥ ॥बुधचक्रंप्रवक्ष्यामिजन्मऋक्षादिसौम्यभम् ॥ शिरसित्रा णिराज्यंस्याद्वक्रेकंधनधान्यदम् ॥ १ ॥ नेत्रेद्वेप्रीतिलाभौ चनाभौश्रीःपंचकंतथा ॥ पादयोःषट्प्रवासश्चवामेवेदाधनंतथा ॥ २ ॥ चत्वारिदक्षिणेहस्तेधनलाभस्तथैवच ॥ गुह्यस्थानेभद्र यंचबंधनंमरणंफलम् ॥ ३ ॥ ॥गुरु॥ ॥गुरुचक्रंप्रवक्ष्यामि गुरुभाजन्मऋक्षकम् ॥ दद्याच्छिरसिचत्वारिचत्वारिदक्षिणेकरे॥ ॥ १ ॥ एकंकंठेमुखेपंचपादयोःषट्प्रदापयेत् ॥ करेवामेचचत्वा

रित्रीणिदद्याच्चनेत्रयोः ॥ २ ॥ ॥ फलं ॥ ॥ राज्यंलक्ष्मीर्धनप्राप्तिःपीडामृत्युस्तथैवच ॥ सुखंचैवक्रमेणैवंफलंज्ञेयंविचक्षणैः ॥३॥ ॥ शुक्र ॥ शुक्रचक्रंप्रवक्ष्यामिशुक्रधिष्ण्यात्तुजन्मभम् ॥ मुखेत्रीणिमहालाभःशीर्षेपंचशुभावहः ॥ १ ॥ त्रिकंतुदक्षिणेपादेक्लेशहानिकरंसदा॥तथैववामपादेचत्रीणिभानितुयोजयेत् ॥२॥ हृदयेद्वेधनंसौख्यंभाष्टकंहस्तयोर्द्वयोः ॥मित्रसौख्यंधनप्राप्तिर्गुह्येत्रीणितथैवच ॥ स्त्रीलाभश्चफलंप्रोक्तंभृगुपुत्रस्यसूरिभिः ॥ ३ ॥

बुध.			गुरु.			शुक्र.		
जन्मनक्षत्रापासून बुध ज्या नक्षत्रीं असेल तेथपर्यंत मोजून ज्या स्थानीं पडेल त्या स्थानाचें फळ जाणावें.			गुरु ज्या नक्षत्रीं असेल तेथपासून जन्मनक्षत्रापावेतों मोजून ज्या स्थानीं पडेल त्या स्थानाचें फळ जाणावें.			शुक्र ज्या नक्षत्रीं असल तथपासून मन्मनक्षत्रापावेतों मोजून ज्या स्थानीं पडेल त्या स्थानाचें फळ जाणावें.		
स्थानें	नक्षत्रें	फळें	स्थानें	नक्षत्रें	फळें	स्थानें	नक्षत्रें	फळें
मस्तकीं	३	राज्यप्राप्ति	मस्तकीं	४	राज्यप्राप्ति	मुखावर	३	उत्तमलाभ
मुखावर	१	धनधा०द्र०	उजवेहा०	४	लक्ष्मीप्रा०	मस्तकावर	५	शुभ
नेत्रांवर	२	प्रीतिलाभ	कंठावर	१	धनलाभ	द० पायां	३	क्लेशहानि
नाभीवर	५	लक्ष्मीप्रा०	मुखावर	५	पीडा	वा.पायां.	३	क्लेशहानि
पायांवर	६	प्रवास	पायांवर	६	मृत्यु	हृदयावर	२	धनसौख्य
डावेहात.	४	धनलाभ	डावेहाता.	४	सुखप्राप्ति	हातांवर	८	मित्रसुख व
दक्षिणहा.	४	धनलाभ	नेत्रांवर	२	सुखप्राप्ति			धनलाभ
गुदावर	२	बंधन; मर०				गुह्यावर	३	स्त्रीलाभ

शनि.

सौरिचक्रंप्रवक्ष्यामिसौरिभाज्जन्मऋक्षभम् ॥ मूर्ध्न्येकंचतथावक्त्रे, करेचत्वारिदक्षिणे॥ १ ॥विन्यसेत्पादयुग्मेषट्‍वामबाहौचतुष्टयम्॥ हृदयेपंचऋक्षाणिक्रमाच्चत्वारिनेत्रयोः ॥ २ ॥ शीर्षेत्वेकंगुदेचैकंमंदस्यपुरुषाकृतेः ॥ ३ ॥

फल.

मूर्द्धवक्त्रस्थभेरोगोलाभोवैदक्षिणेकरे ॥ स्याद्वामचरणद्वंद्वेबंधो

वामकरेन्नृणाम् ॥ ४ ॥ हृदयेचैवलाभश्चनेत्रेप्रीतिरुदाहृता ॥
पूजामस्तेपरानूनंगुदेमृत्युंविनिर्दिशेत् ॥ ५ ॥

राहु.

राहुचक्रंप्रवक्ष्यामिजन्मभाद्राहुऋक्षभम् ॥ मूर्ध्नित्रीणिचऋक्षाणि
करेचत्वारिदक्षिणे ॥ १ ॥ पादयोःषट्चऋक्षाणिवामहस्तेचतुष्ट
यम् ॥ हृदयेत्रीणिकंठेकंमुखेद्वौनेत्रयोर्द्वयम् ॥ २ ॥ गुह्येद्वयं
क्रमेणैवराहुचक्रंस्वभावतः ॥ ३ ॥

फळ.

राज्यंरिपुक्षयःपंथामृत्युर्लोभोऽथरोगकः ॥
जयःसौख्यंतथाकष्टंक्रमाज्ज्ञेयंफलंबुधैः ॥ ४ ॥

केतु.

केतुचक्रंप्रवक्ष्यामिजन्यभात्केतुऋक्षभम् ॥ मूर्ध्निपंचजयश्चैवमु
खेपंचमहद्भयम् ॥ १ ॥ हस्तयोर्भानिचत्वारिविजयश्चजयस्तथा ॥
पादयोःषट्चसौख्यंस्याहृदिद्वेशोककारके ॥ २ ॥ कंठेचत्वा
रिचव्याधिर्गुह्येचैकंमहद्भयम् ॥ ३ ॥

शनि. शनि ज्या नक्षत्रीं असेल तेथून जन्मनक्षत्रापर्यंत मोजून जेथें नक्षत्र पडेल तें फळ जाणावें.

स्थानें	नक्षत्रें	फळ
मस्तकीं	१	रोग
मुखावर	१	रोग
दक्षिणहा.	४	लाभ
,, पायांवर	६	मार्गचाल
वामबाहु	४	बंधन
हृदयावर	५	लाभ
नेत्रांवर	४	प्रीतिउदा०
मस्तकावर	१	पूजा
गुदावर	१	मृत्यु

राहु. जन्मनक्षत्रापासून राहुनक्षत्रापावेतों मोजावें जेथें नक्षत्र पडेल तें फळ जाणावें.

स्थानें	नक्षत्रें	फळें
मस्तकावर	३	राज्यप्राप्ती
उज. हाता.	४	रिपुक्षय
पायांवर	६	मार्गचाल
डावाहात	४	मृत्यु
हृदयावर	३	लोभफार
कंठावर	१	रोग
मुखावर	२	क्षम
नेत्रांवर	२	सौख्य
गुह्यावर	२	कष्ट

केतु. जन्मनक्षत्रापासून केतु ज्या नक्षत्रीं असेल तेथपर्यंत मोजुन जेथें सक्षत्र पडेल ते फळ जाणावें.

स्थानें	नक्षत्रें	फळें
मस्तकीं	५	जय
मुखावर	५	मोठें भय
हातावर	४	विजय
पायांवर	६	सौख्य
हृदयावर	२	शोक
कंठावर	४	व्याधि
गुह्यावर	१	मोठेंभय

जन्मनक्षत्र कोठें पडलें तें पहाणें.

शीर्षेत्रीणिमुखेत्रयंचरविभादेकैकमंस्कंधयोरेकैकंभुजयोरतथाकर तलेधिष्ण्यानिपंचोदरे ॥ नाभौगुह्यतलेचजानुयुगलेचैकैकमृक्षं क्षिपेज्जंतोःकेचिदितिब्रुवंतिगणकाःशेषाणिपादद्वये॥ १॥अल्पा युश्चरणस्थितेचगमनंदेशांतरंजानुभे गुह्येस्यात्परदाररंभनहो नाभौचसौख्यप्रदम् ॥ ऐश्वर्यंहृदिचौर्यमस्यकरयोर्बाह्वोर्बलं वैमुखेमिष्टान्नंचलभेच्चमानवगणोराज्यंस्थिरंमूर्द्धनि ॥ २ ॥

टीका—सूर्यनक्षत्रापासून जन्मनक्षत्रापावेतों मोजून प्रथम ३ मस्तकावर त्यांचें फळ राज्यप्राप्ति. पुढें मुखावर ३ मिष्टान्नभक्षण. प्रत्येक खांद्यावर १, १ बळकट असेल. भुजांवर १, १ याचेंही फळ बळकट. तळहातांवर १, १ चोरी करील. हृदयावर ५ ऐश्वर्य. नाभीवर १ सौख्यप्राप्ति. गुह्यावर १ परदारलंपट. जानूवर १, १ देशांतरीं गमन करील. प्रत्येक पावलावर ३, ३ अल्पायुषी याप्रमाणें जेथें जन्मनक्षत्र पडेल तेथचें फळ सांगावें.

लग्नशुद्धीस पंचक पाहाणें.

गततिथियुतलग्नंनंदहृच्छेषकंचवसुयमयुगषट्केक्षोणिसंख्याक्रमेण ॥ रुगनलनृपचौरंमृत्युदंपंचकंस्याद्व्रतगृहनृपमार्गोद्वाह केवर्जनीयम् ॥ ३ ॥

टीका—गततिथि मोजून त्यांत लग्न मिळवावें आणि नवांनीं भागावें; शेष उरेल त्यांचें फळ. ८ उरले तर रोगपंचक. तें मुंजीस वर्ज्य. २ उरले तर अग्निपंचक, तें गृहारंभास वर्ज्य. ४ उरले तर राजपंचक, आणि ६ उरले तर चोरपंचक हीं दोन्हीं पंचकें गमनकाळीं वर्जावीं. १ उरला तर मृत्युपंचक तें विवाहास वर्ज्य. याशिवाय शेषां राहिल्यास निष्पंचक जाणावें. तें सर्व कर्मांस उक्त होय.

वारपरत्वें पंचकें वर्ज्य.

रवौरोगंकुजेवह्निःसोमेतुनृपपंचकम् ॥
बुधेचौरंशनौमृत्युःपंचकानितुवर्जयेत् ॥ १ ॥

टीका—रविवारीं रोगपंचक, मंगळवारीं अग्निपंचक, सोमवारीं राजपंचक, बुधवारीं चोरपंचक, शनिवारीं मृत्युपंचक, अशीं हीं पंचकें वाराचे वारास वर्ज्य करावीं

दिनमान व रात्रिमान.

अथनादिकवासररामहतागगनानलबाणशशांकयुताः ॥
परिभाजितशून्यरसैर्घटिकाकर्कादिनिशामकरादिदिनम् ॥ १ ॥

टीका—अयन ह्मणजे कर्कसंक्रांतीपासून मकरसंक्रांतीपर्यंत महिने ६, तसेंच मकरापासून कर्कापावेतों महिने ६, ज्या दिवसाचें दिनमान करावयाचें तेथपर्यंत एकंदर दिवस मोजून त्यांना ३ नीं गुणून जे अंक येतील त्यांत १५३० मिळवावे आणि ६० नीं भागून शेष उरेल तें रात्रिमान जाणावें आणि मकर संक्रांतीपासून मोजिलें असतां दिनमान जाणावें.

दिवस किती आला तें पाहणें.

पादप्रभानगयुतारहिताचमेषात्षट्स्विंदुनात्रियुगबाणशराब्धिरामैः ॥
स्याद्भाजकोदिनदलस्यनगाहतस्यपूर्वेगताःस्युरपरेदिनशेषनाड्यः ॥ १ ॥

टीका—आपली छाया पावलेंकरून मोजावी. जीं पावलें येतील त्यांत ७ मिळवावे आणि मेष संक्रांतीपासून कन्येपर्यंत इंदु ह्मणजे १ त्यांत वजा करावा. त्याचे पुढें तूळापासून मीनपर्यंत जी संक्रांत असेल त्या संक्रांतीचा क्षेपक वजा करावा. तें असें:—तूळ ३, वृश्चिक ४, धन ५, मकर ५, कुंभ ४, मीन ३, याप्रमाणें अंक वजा करून निराळे मांडून ठेवावे. नंतर दिनदल ह्मणजे १५ यास ७ नीं गुणून १०५ झालें यांस मागें ठेविलेल्या अंकांनीं भागावें, भागांक येतील त्या घटिका झाल्या, परंतु पूर्वार्द्धीं दिवस तितक्या घटिका आला आणि उत्तरार्द्धीं दिवस तितक्या घटिका उरला हें समजावें.

रात्र किती झाली तें पाहणें.

सूर्यभान्मध्यनक्षत्रंसप्तसंख्याविशोधितम् ॥
विंशतिघ्नंनवहृतंगतारात्रिस्फुटाभवेत् ॥ १ ॥

टीका—रात्रीस मध्यें जें नक्षत्र आलें असेल तितकीं नक्षत्रें सूर्यनक्षत्रापासून मोजून त्यांत ७ कमी करावे. शेष राहील तें २० नीं गुणून ९ नीं भागावें. शेषसंख्या उरेल तितकी रात्र भुक्त झाली असें समजावें.

अंतरंग व बहिरंग नक्षत्रें.

सूर्यभादुडुगणंपुनपुनर्गण्यतामितिचतुष्टयंत्रयम् ॥
अंतरंगबहिरंगसंज्ञकंतत्रकर्मविदधीततादृशम् ॥ १ ॥

टीका—सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापर्यंत प्रथम ४ नक्षत्रें तीं आंत चालीच होत, मग ३ नक्षत्रें तीं बाहेर चालीचीं होत, अशा क्रमानें जाणावें. हें गुरुं आण घ्यास व पोंचविण्यास उक्त होय.

सूतिकास्नान.

करेंद्रभाग्यानिलवासवांत्यमैत्रेंदवाश्विध्रुवभेऽह्निपुंसाम् ॥
तिथावरिक्तेशुभमामनंतिप्रसूतिकास्नानविधिंमुनींद्रा ॥ १॥

टीका—हस्त, ज्येष्ठा, पूर्वाफाल्गुनी, स्वाती, धनिष्ठा, रेवती, अनुराधा, मृग, अश्विनी आणि ध्रुव नक्षत्रें अशीं ज्या दिवशीं असतील तो दिवस सूतिकास्नानास उक्त होय, परंतु रिक्ता तिथि वर्ज्य करावी असें मुनींद्र मानिताहेत.



Printed & Published by V. V. Pathak at the Jagdishwar Press,
Girgaon, Gaiwadi House No. 9 Bombay.

